
माणिकमोती
प्रदिप केळुस्कर

# माणिक मोती

हा कथासंग्रह ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक श्री प्रदिप केळुसकर यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही शिवराज प्रेस प्रकाशनचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय श्री. प्रदिप केळुसकर यांना 9762209028 या क्रमांकावर कळवावे.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
Phone- 7757031933 (जनसंपर्कविभाग)
ई प्रकाशन तिथी- दहा नोव्हेंबर दोनहजार चौवीस

# माणिकमोती

## कथा संग्रह

लेखक
**श्री. प्रदिप केळुसकर**

'शिवराज' प्रेस ॲण्ड प्रकाशन,कोल्हापूर
प्रकाशित

❖ **माणिकमोती**

कथासंग्रह

❖ **श्री. प्रदिप केळुसकर**

३८५, मतकरवाडी, गाव – पाट

तालुका – कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन ४१६५२०

भ्रमणध्वनी ९४२२३८१२९९/ ९३०७५२११५२

❖ **प्रथमावृत्ती : १० फेब्रुवारी २०२४**

❖ **सर्व हक्क**

सौ. भारती प्रदिप केळुसकर

३८५, मतकरवाडी, गाव – पाट

तालुका – कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिन ४१६५२०

भ्रमणध्वनी ९५२९८४२२२८

❖ **प्रकाशक** :

'शिवराज प्रेस ॲण्ड प्रकाशन',कोल्हापूर

❖ **मुखपृष्ठ : –**

श्री. अरुण दाभोलकर

❖ **अक्षर जुळणी** :

श्री प्रिंटर्स, कुडाळ

प्रोप्रा. सौ. मिराली श्रीकृष्ण मयेकर

९३२५३१०६३०

❖ **मुद्रक** : शिवराज प्रेस ॲण्ड प्रकाशन प्रा. लि.,कोल्हापूर

❖ **मुल्य** : रु. ३००/–



**✻ विशेष सूचना ✻**

या संग्रहातील कथांचे भाषांतर, नाट्यचित्र रुपांतर, इत्यादी कामी सौ. भारती प्रदिप केळुसकर यांची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा कायदेशीर कारवाई करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

# अर्पण...





'' माझी दोन भावंडे जी अवेळी काळाच्या पडद्यामागे गेली.
मोठा भाऊ कै. कृष्णाजी रामदास उर्फ बाबा केळुसकर
आणि
मागची बहीण कै. मंगल शशिकांत देसाई
(माहेरची मंगल रामदास केळुसकर)
यांच्या स्मृतीस...!!

# मनोगत

''माणिकमोती'' हा कथा संग्रह तुमच्या हाती देताना अतिशय आनंद होतो आहे. मागील दिवाळीत माझ्या सतरा कथा वेगवेगळ्या सतरा दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्या, त्या सतरा कथा एकत्र करून या ''माणिकमोती'' कथासंग्रहात घेतल्या आहेत. गेल्या वर्षी माझा पहिला कथासंग्रह '' एका पेक्षा एक ' प्रसिद्ध झाला आणि माझ्या अनेक वाचकमित्रांच्या प्रतिसादाने पहिली पाचशे पुस्तकांची आवृत्ती सात महिन्यात संपली. ऑगस्टमध्ये याच पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढली आणि त्यातील सुमारे एकशे पन्नास पुस्तके संपली सुद्धा. कुठल्याही पुस्तक दुकानात विक्रीस न ठेवता ही पुस्तके वाचकांनी पुस्तकाचे पैसे पोस्टेजसह पाठवून मागवली हे विशेष.

मला असे वाटते पुस्तकांना वाचक मिळत नाहीत हें तितकेसे खरे नाही, महाराष्ट्रात अनेक साहित्यिक ग्रुप्स आहेत ज्यांना नवनवीन साहित्य वाचायची ईच्छा आहें. आपले लिखाण त्यांना पसंत पडायला हवे.

या माझ्या सतरा कथा वेगवेगळ्या विषयावरील आहेत, हे तुमच्या लक्षात येईल. माझ्या कथा सोशल मिडियावर प्रसिद्ध झाल्यानंतर अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या. त्यातील काही या कथा संग्रहात तुम्हाला वाचता येतील. माझ्या या सर्व कथा माझ्या आवाजात माझ्या युट्युब चॅनेलवर ऐकता येतील. या माझ्या आवाजातील कथांना पण मोठा प्रतिसाद मिळतो आहे.

मी खरं तर हल्लीच लिहू लागलो, करोना काळात माझा व्यवसाय कमी झाला होता, त्या काळात मी कथा लिहायला सुरवात केली, सुरवातीला मित्र मंडळींना वाचून दाखविल्या नंतर मी सोशल मीडिया वर त्या पाठवू लागलो आणि त्यामुळे मला हजारो वाचक मिळाले. महाराष्ट्रातील अनेक साहित्यिक ग्रुप्स नी मला त्यांच्यात सामावून घेतलं, या ग्रुप्स वरील शेकडो वाचक माझे कौतुक करू लागले, अभिप्राय देऊ लागले आणि त्याचे प्रोत्साहन घेऊन मी लिहीत राहिलो.

जानेवारी २३ ते जानेवारी २४ या एका वर्षात मी २८ कथा लिहिल्या आणि एकाही कथेचा दर्जा खालवला असे कोणी वाचक

म्हणाला नाही, याचे समाधान वाटते. मागील वर्षी म्हणजेच २०२३ मध्ये सतरा दिवाळी अंकात माझ्या कथा छापून आल्या तसेच नवी मुंबई येथील 'नवे शहर' या वृत्तपत्रात माझ्या कथा क्रमश: येत आहेत तसेच ई अभिव्यक्ती, सांगली येथे सुद्धा माझ्या कथा क्रमश: येत आहेत आणि त्या वाचकांना आवडत आहेत.

माझे हे पुस्तक मी माझ्या दोन भावंडांना अर्पण केले आहे. जी दोन भावंडे अकाली काळ्याच्या पडद्याआड गेली.

हे पुस्तक छपाई करण्यासाठी आमचे कुडाळ मधील सहकारी श्री. सचिन चेंदवणकर, कु. सारिका पालव यांचे तसेच श्री. मयेकर यांच्या श्री प्रिंटर्स स्टाफचे मोठे सहकार्य लाभले आहे. त्या सर्वांचा मी आभारी आहे. या ''माणिकमोती'' या कथा संग्रहाचे मुखपृष्ठ आमच्या कुटुंबाचे स्नेही आणि थोर चित्रकार अरुण दाभोलकर यांनी केले आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार. कथासंग्रहाची छपाई कोल्हापूर मधील शिवराज ऑफसेट प्रिंटर्स आणि प्रकाशन यांनी कमी वेळात करून दिली म्हणून त्यांचेही आभार. या कथासंग्रहाचे वाचक स्वागत करतील, अशी आशा आहे.

**धन्यवाद...!!!**

**आपला स्नेहांकित**

**(श्री. प्रदिप केळुसकर )**

मु.पो. कुडाळ, जिल्हा- सिंधुदुर्ग

दि. १० फेब्रु. २०२४

# अनुक्रमणिका


१. म्हाई.................................. ७–१५

२. राजवैद्य.............................. १६–२५

३. शुभमंगल सावधान.................. २६–३८

४. प्रिये पहा.....!

५. पाणक्या

६. चल धन्नो

७. कृष्णसर्प

८. (शिक्षक) सेवक

९. आंब्याची बाग

१०. चळवळ

११. श्रीमंत

१२. बासरी

१३. लंच टाईम

१४. लग्नाला यायचं हं...!

१५. मृत्युपत्र

१६. त्या दोघी...

१७. रंगदेवता आणि...


माणिक मोती

# म्हाई

लेखक –प्रदिप केळूसकर
९४२२३८१२९९/९३०७५२११५२

शांती भाजीवाली डोक्यावर भाजीची टोपली घेऊन आळीत घरोघरी फिरत होती. दिपूच्या आईचं घर येताच तिने टोपली जमिनीवर ठेवली आणि मोठ्याने हाळी दिली
'' ओ दिपूच्या आई, भाजी घेणार काय ?
' तिची हाळी ऐकून दिपूची आई पदराला हात पुसत बाहेर आली.
'' घेणार का भाजी, कांदापात हाय, माठ हाय, मुळा हाय, कोबी हाय.
'' शांतीला पाहतात दिपूच्या आईला आनंद झाला. तशी दोन दिवसाआड येणारी शांती ही त्यांची मैत्रीणच. दोघी एकमेकांसमोर आपलं मन मोकळ्या करायच्या.
'' होतीस कुठे इतकं दिवस ? लय दिसानं आलीस ?'
' ताप येत होता दादल्याला, त्याला डागदर कडे नेत व्हते '.
आता बर हाय का ?
' व्हय, घेणार का भाजी ?'
'' लाल माठ दे दोन जुड्या, ''.
शांतीने माठाच्या दोन जुड्या दिपूच्या आईच्या हातात दिल्या.
'' मग दिपूच्या आई,  म्हाई येणार की आता लवकरच '. ''म्हाई ' म्हटल्याबरोबर दिपूच्या आईचा चेहरा चिंताग्रस्त झाला.
''काय झालं, गप का रवला ? शांतीने विचारले.
'' काय सांगावं शांते, घर वाल्यांची नोकरी राहिली नाही, पैसे मिळाले होते फंडाचे ते त्या संस्थेत ठेवले होते नव्हे  ''. कुठल्या ?
ती ती बुडाली त्या संस्थेत की काय ?
'' होय बाई,'
'' लई लोकांचे बुडाले बघा, मग मग आता म्हणणं काय त्यांचं ?'
'' पैसे मिळणार, बुडायचे नाहीत म्हणत्यात, पण आता''म्हाई ' यायची झाली आणि खिशात पैसे नाहीत अशी परिस्थिती.
'' होय बाई, आणि दिपू अजून लहान हाय.
' हो बाई, खूप दिवसांनी झालाय ना तो.
'' पण तुम्ही देवीचे मानकरी, म्हणजे तुम्हास्नी  म्हाईचा लई खर्च असणार ?

‘‘ होय बाई, आम्ही मानकरी देवीचे, म्हाई आमच्याच घरी येणार, सोबत वीस पंचवीस देवीचे भक्त पण असतात, एवढ्या मंडळीचे जेवण व्हायला पाहिजे. ५० ६० लोकांचे चहापाणी, देवींची पूजा, ओटी भरणे हायचं.

‘‘ मग दिपूच्या बाबांनी काहीतरी व्यवस्था केलीच असेल ?

‘‘ ते काय करतात, साखर कारखान्यातून रिटायर झालेत, त्यात त्यांचा पगार तो कितीचा होता, पेन्शन वगैरे काही नाही, काय फंड मिळाला तो त्या संस्थेत घातला, चार वर्षात डबल होणार म्हणून सांगितलं, ठेवून दोन वर्षे झाली, सहा लाखाचे बारा लाख होणार म्हणून ठेवले, पण आता संस्था बुडाली म्हणे ‘‘ .

‘‘ अरे देवा, मग फुड काय व्हायचं ’.

‘‘ बघूया ’ असं म्हणून दिपूच्या आईने माठाच्या दोन जुड्या घरात नेल्या. शांतीला दहा रुपये दिले तशी शांती गेली. दिपूच्या आईच्या लक्षात आलं, फेब्रुवारी महिना आला म्हणजे, या महिन्यात ‘‘म्हाई ’ येणार, त्यात आपण देवीचे मानकरी, उत्पन्न काही नसलं तरी खर्च थांबत नाहीत. तिने डबे उघडले. तांदुळाच्या डब्यातले तांदूळ तळाला टेकले होते. पिठाच्या डब्यात जेमतेम चार दिवसापूर्वी पीठ शिल्लक होते. तेल जवळ जवळ संपले होते. वाटाणे हरभरे शेंगदाणे सर्व संपत आले होते. अजून पंधरा दिवस आहेत म्हाईला. अजून पंधरा दिवसाला खायला तर पाहिजे.

एका महिन्यापूर्वी तिच्या आईने धान्य पाठवलं होतं. जोंधळे, शेंगदाणे, तांदूळ गहू इत्यादी. आता परत तिच्याकडे कसे मागायचे? आता आईचे काही चालत नाही घरात. भावजई चा कारभार. आणि तेथे सुद्धा रयत फारसे देत नाहीत. आपला भाऊ तसा सतत आजारीच असतो. त्यांची परिस्थिती पण आता फारशी बरी नाही. त्यांच्याकडे परत मागायला नको. तिने नवऱ्याला हाक मारली ‘‘अहो, ऐकलंत का, घरातलं धान्य तसेच पीठ संपत आलंय. पाच-सहा दिवसा पुरते आहे. या महिन्यात‘‘म्हाई ’ येणार, तिच्या पालखीसोबत वीस-पंचवीस माणसे असतात. त्यांना दरवर्षी आपल्याला जेवण खान करावे लागतं. आणि ५० ६० माणसांना चहा पाणी.

‘‘ मग मी तरी काय करू ? सगळे पैसे त्या संस्थेच्या बोडक्यावर टाकलेत ना ?

‘ पण मी म्हणत होते, असल्या संस्थेमध्ये पैसे ठेवू नका, ते पैसे घेतात आणि मग खाका वर करतात,

‘‘ बघू, आबा म्हणत होता, रिझर्व बँक काहीतरी करेल.

‘‘ त्या आबावर विश्वास ठेवून पैसे ठेवलेत ना, मग मग आबाला सांगा आमचे पैसे दे म्हणून ’.

‘‘ आबा काय देतो, त्याचा पोरगा त्या संस्थेत मॅनेजर होता म्हणून तो सर्वांना तेथे पैसे

ठेवायला सांगायचा, आता सर्वजण त्याला विचारतात, तेव्हा तो रिझर्व बँकेकडे बोट दाखवतो ‘‘.

‘‘ म्हणजे पैसे मिळवले ह्या लबाडानी आणि पैसे कोण देणार म्हणे तर रिझर्व बँक. ते काही नाही, तुम्ही या पतसंस्थेच्या तालुक्याच्या ऑफिसात जाऊन खडसावून विचारा, म्हणावं आम्ही खावं काय? आमचे फंडाचे सर्व पैसे विश्वासाने तुमच्याकडे ठेवले, पैसे तुम्ही खाल्ले आणि ठेवीदारांच्या तोंडाला पाने पुसलात

‘‘ जातो मी उद्या’.

‘‘ जावाच आणि खडसावून विचारा, त्यांना सांगा पंधरा दिवसांनी आमच्याकडे ‘‘म्हाई ’ येणार आहे, आम्हाला मोठा खर्च आहे, तोपर्यंत आम्हाला काहीतरी पैसे द्या ’. शेवटी मानकरी ना तुम्ही देवीचे, उत्पन्न काही नसले तरी मानकरी, जमीन सगळी कुळांना गेली. पण मान फक्त तुम्हालाच. खर्च फक्त तुम्ही करायचे ‘‘.

दिपूच्या आईचा संताप संताप झाला. खरं तर ती आपल्या नवऱ्याला जास्त बोलायची नाही. कारण तिला माहीत होते आपला नवरा स्वभावाने गरीब आहे. त्यांचा जन्म झाला जमीनदाराच्या कुटुंबात पण चुलत भावांनी फसविले. घरातील दाग दागिने, सोने, रोख रक्कम घेऊन पळाले. मोठ्या शहरात जाऊन स्थायिक झाले. आता ढुंकूनही गावाकडे पाहत नाहीत. कुळांकडे असलेल्या जमिनी आपल्या नवऱ्याकडे आल्या. कुळ कायद्याने त्या जमिनी गेल्या. राहिले फक्त फुकटचे मोठेपण. हे जुने मातीचे पडणारे घर सोडून दुसरे काही नाही. आपल्या नवऱ्याचे शिक्षण फारसे झाले नाही. या जमीनदार कुटुंबाकडे पाहून आपल्या वडिलांनी आपल्याला या घरात दिले. त्यावेळी घर गजबजलेले होते. येणे जाणे होते. कुळाकडून वसुली करण्यासाठी घोडे ठेवले होते. स्त्रियांसाठी मेणे होते. सर्व गेले. राहिली फक्त भोके. उत्पन्न काही नाही.

नशीब त्यावेळी खासदार जयवंतराव नवीन साखर कारखाना काढत होते. आम्ही या गावचे मानकरी म्हणून देवीला नमस्कार करून सरळ ते आमच्या घरी आले. मी त्यांना आमची परिस्थिती सांगितली. आमच्याकडे उत्पन्नाचे काही साधन नाही हे त्यांना सांगितले. त्यांनी नवऱ्याला कारखान्यात नोकरी देण्याचा शब्द दिला. दोन वर्षांनी कारखाना उभा राहिला तेव्हा जयवंतरावांना मी परत भेटले. त्यांनी आपल्या नवऱ्याला नोकरीला ठेवले. पण शिक्षण जास्त नसल्याने उसाच्या वजन काट्यावर वजन नोंदवून ठेवण्याचे काम दिले. थोडाफार पगार घरात येऊ लागला आणि संसार टुकूटुकू का होईना चालू झाला.

बारा वर्षांपूर्वी दिपूचा जन्म झाला, दोनाची तीन माणसे झाली. पण दोन वर्षांपूर्वी आपला नवरा निवृत्त झाला आणि पगार थांबला. दिपू शाळेत. उत्पन्न काही

नाही. फंडाची रक्कम आली ती गावातल्या आबांना कळली. त्यांच्या रोज सायंकाळी फेऱ्या वाढू लागल्या. चार वर्षात डबल पैसे होतील, तुझ्या दिपूच्या पुढच्या शिक्षणासाठी पैसे येतील अशी आश्वासने देऊ लागले. आम्हाला ते खरेच वाटले, त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि आता हा पश्चाताप झाला. नवऱ्याने पतसंस्थेची सर्टिफिकेट दाखवली तेव्हा आपण पण खुश झालो. आपले शिक्षण पण फारसे नाही. बाहेरच्या लबाड जगाची एवढी कल्पना नव्हती. पैसे डबल झाले म्हणजे दिपूला शिकवायचं, मग घर बांधायचं, मग दिपूला नोकरी मिळेल, मग दिपूच लग्न................

पतसंस्था अडचणीत आल्याचे कळले, लोकांचे पैसे मिळत नाहीत याची कल्पना आली आणि पायाखालची वाळू सरकली. मग संस्थेत आपल्या नवऱ्याच्या रोज खेपा सुरू झाल्या. आपल्यासारखे शेकडो लोक रोज संस्थेत येत होते. मॅनेजरला भंडावून सोडत होते. मॅनेजर हाता पाया पडून पुढची आश्वासने देत होता.दुसऱ्या दिवशी सकाळी आठच्या एसटीने तालुक्याच्या गावी गेले. त्या संस्थेच्या मुख्य ऑफिसमध्ये जाऊन साहेबांना भेटले.

'' साहेब मी गरीब माणूस. कारखान्यातून मिळालेली सर्व फंडाची रक्कम तुमच्या संस्थेत ठेवली. आम्हाला पेन्शन वगैरे काही नाही. आमच्या पैशांचे काय? पंधरा दिवसांवर आमच्या गावातली ''म्हाई ' आली. आम्ही देवीचे मानकरी. आम्हाला दरवर्षी मोठा खर्च असतो. तातडीने काहीतरी पैशाची व्यवस्था करा.

'' अहो काका, इथे रोज शेकडो माणसे येऊन गर्दी करतात. सर्वांचेच पैसे अडकले. अडकले याचा अर्थ बुडाले असे नव्हे. पैसे मिळणार पण ते केव्हा ते मी सांगू शकत नाही. रिझर्व बँकेने तात्पुरते निर्बंध घातलेत. आपले चेअरमन जाऊन दिल्लीला अर्थमंत्र्यांना भेटलेत. सर्व व्यवस्थित होणार काळजी करू नका '.'' पण साहेब पंधरा दिवसावर आमची म्हाई आली. खर्चाला आमच्याकडे पैसे नाहीत '.

' हो का केव्हा आहे तुमची म्हाई?''

'' या महिन्याच्या २२ तारखेला साहेब ''.

२२ तारखेला ठीक आहे, मी २२ तारीखची तुमची व्यवस्था करतो. तुम्हाला २२ तारीख चा स्टेट बँकेचा चेक देतो. त्यादिवशी येऊन बँकेतून पैसे घेऊन जा '.

साहेब यांनी ५० हजाराचा चेक लिहून दिला. खाली आपली जोरदार सही केली. दिपूचे बाबा खुश झाले. दुपारच्या एसटीने गावी आले. घरी आल्याबरोबर त्यांनी दिपूच्या आईला पन्नास हजाराचा चेक दाखवला. ती पण खुश झाली. आता निर्धास्तपणे २२ तारखेच्या म्हाईची तयारी सुरु केली.

गावात सगळीकडे लगबग सुरू होती. देवीच्या देवळात झाडलोट केली

गेली. देवळाला नवीन रंग दिला. देवीची पालखी तसेच भांडीकुंडी सर्व काही झकपक झाले. गावातील प्रत्येक घराघरात  म्हाईची तयारी सुरू झाली. घरांची साफसफाई झाडलोट सुरू होती.

दिपूच्या घरी दिपूच्या आईने घर वर पासून खालपर्यंत झाडलं. प्रत्येक भांड धुतलं. घरातली अंथरूण पांघरून पुन्हा टाकली. घराकडे येणाऱ्या पानंदी स्वच्छ केल्या. नोकरी निमित्त बाहेरगावी गेलेले लोक आपल्या गावात यायला लागले. वर्षभर बंद असलेली घर उघडून साफसूफ करायला लागले. गावाला जाग आली. अनेक चाकरमानी गावात दिसायला लागले.

दिपूचे बाबा परत परत तो ५०००० चेक पाहत होते.  त्या खालची ती झोकदार सही पाहत होते. २२ तारखेला सकाळी आठच्या गाडीने दिपूचे बाबा तालुक्याच्या गावी गेले. दिपूच्या घरची तशी सर्व तयारी झाली होती. फक्त घरात धान्य सामान आणि साखर वगैरे नव्हते. पैसे आले की ताबडतोब वासूच्या दुकानातून सर्व सामान आणण्याची तयारी दिपूच्या आईने केली. सामान घरात आले की ताबडतोब जेवण करायला सुरुवात करायची. दिपूच्या आईने दिपूला कागद पेन घेऊन लिहायला सांगितले. दिपूच्या आईने यादी करायला घेतली तांदूळ पाच किलो, गव्हाचे पीठ पाच किलो, साखर पाच किलो, वाटाणे दोन किलो, बटाटे दोन किलो, कांदे दोन किलो, गोडेतेल दोन लिटर, शेवया दोन पॅकेट, वेलची १०० ग्रॅम, गूळ दोन किलो. दिपूच्या आईने दोन चुली तयार केल्या. चुली सारवून ठेवल्या. टिपूला मदतीला घेऊन परसातील लाकडे जमवून ठेवली. अगदी आगपेटी पण तयार ठेवली. आता पैसे आले की दुकानातून सामान आणायचे आणि रात्र ११ पर्यंत स्वयंपाक पुरा करायचा, एवढेच बाकी होते.

दिपूच्या आईने अंगण शेणाने सारवले. पानंदीपासून घरापर्यंत रांगोळी घातली. आता तिचे लक्ष येणाऱ्या एसटीवर होते. कधी एकदा पैसे हातात येतात आणि दुकानाचे मन आणतो असे तिला झाले होते. त्यांच्या गावात एसटी नदीपलीकडे थांबत असे. टिपूच्या घरातून गाडी आल्याचा अंधुकसा आवाज येत असे. इतक्या वर्षाच्या सरावाने गाडी थांबल्याचा आणि वळण्याचा आवाज कळत असे.

दोन वाजायला आले आणि दिपूची आई आत बाहेर करू लागली. पण दुपारच्या गाडीने दिपूचे बाबा आले नाहीत. पण तिला निश्चित माहीत होते चारच्या गाडीने ते येणारच. पाच वाजण्याच्या सुमारास पुन्हा तिच्या आत बाहेर सुरु झाल. साडेपाचच्या सुमारास गाडीचा आवाज आला तशी ती बाहेर येऊन उभी राहिली. लांबून तिला दिपूचे बाबा येताना दिसले. तसा तिला खूप आनंद झाला, तिने दिपूला

हाक मारली

'' दिपू ती सामानाची यादी आणि पिशव्या घेऊन ये बाहेर. बाबा आले, त्यांचे कडून तीन हजार घे आणि यादी घेऊन दुकानात जा आणि सर्व सामान व्यवस्थित आण.''

'' हो आई येतो, म्हणत दिपू यादी आणि पिशव्या घेऊन आला. तोपर्यंत दिपूचे बाबा घराजवळ पोहोचले होते. पण तिच्या लक्षात आले त्यांचा चेहरा पडलेला दिसत होता.

'' मिळाले ना पैसे ? दिपूच्या आईने विचारले.

बाबा रडविले होत म्हणाले '' नाही, बँकेत त्यांच्या अकाउंट वर पैसेच नाही '.

'' काय ? दिपूची आई रडविली होत किंचाळली.

'' सकाळपासून बँकेत होतो, स्टेट बँकेच्या अकाउंट वर त्यांच्या अकाउंटला फक्त २२० रुपये होते, म्हणून परत त्या संस्थेच्या ऑफिसमध्ये गेलो. तेव्हा तेथे मॅनेजर म्हणाले '' काळजी करू नका, आजच एक मोठा चेक पास होऊन गेला म्हणून पैसे कमी झाले. मी दोन वाजता पुन्हा पैसे भरतो. तुम्ही दोन नंतर तुमचा चेक पास करा. म्हणून न जेवता परत दोन पासून बँकेत उभा. अडीच वाजता चेक बँकेत दिला तर तो बँकेचा माणूस म्हणाला अहो या लोकांनी अनेकांना असे चेक दिलेत, सर्वांचे चेक परत गेलेत, यांच्या अकाउंटला काही रक्कम नाहीच आहे. त्यामुळे कुणाचे चेक पास झालेले नाहीत.''

मी परत या संस्थेच्या ऑफिसमध्ये गेलो तर ऑफिसला भले मोठे कुलूप. चार वाजेपर्यंत मी तेथे वाट पाहिली आणि शेवटी कंटाळून एसटी पकडली.

'' दिपूच्या बाबांचे शब्द दिपूच्या आईच्या मेंदूपर्यंत पोहोचत नव्हते. तिच्या लक्षात आले आपल्या डोळ्यासमोर अंधार येतोय. आता आपण निश्चित खाली पडणार हे तिला कळत होते.पण तिच्या मनाने उसळी घेतली.

'' छे छे, मला खाली पडून चालणार नाही. आपला नवरा साधा आहे. तो हातपाय गळून बसेल. आपल्याला धडपड करायलाच हवी '. पटकन ती सावरली. खुर्चीला धरून उभी राहिली. आईला बरं वाटत नाही हे पाहून दिपू घरात धावला आणि पाणी घेऊन आला. त्याच्या हातातला पाण्याचा ग्लास तिने तोंडाला लावला आणि घटाघटा पाणी प्यायली. दिपूचे बाबा डोकं धरून बसले. शेवटचा प्रयत्न म्हणून ती दिपूला म्हणाली '' दिपू ही यादी घे आणि वासूच्या दुकानात दे, म्हणावं आज म्हाई येणार आमच्याकडे,. एवढे द्या आणि पैसे लिहून ठेवा '. दिपू यादी आणि पिशव्या घेऊन गेला. तिला अंदाज होता वासू वस्तू द्यायचा नाही. कारण गेल्या चार महिन्यापासून त्याचे बिल द्यायचे होते. पाच मिनिटात दिपू धावत आला. '' आई

वासू काका म्हणतात, म्हाईच्या दिवशी आम्ही कुणाला उधार देत नाही.' तिला अंदाज होताच. आता म्हाई यायला पाच तास बाकी होते. एवढ्या माणसांचे जेवणखाणं व्हायलाच हवे. तिचा डावा हात गळ्याकडे गेला. गळ्यातील मंगळसूत्रात तीन चार ग्रॅम सोने होते. आता हाच एकमेव उपाय. तिला खूप वाईट वाटले. गावातील सर्वात प्रतिष्ठित मानकरी यांची ही परिस्थिती. प्रतिष्ठित मानकरी म्हाईच्या भक्तांना जेवण घालू शकत नाही? ज्या घरात कुळाकडून वसुलीसाठी घोडे ठेवले होते, रोज दहा वीस बाहेरची माणसे जेवून जात होती, सकाळपासून चुलीवर ठेवलेले चहाचे आधन बंदच होत नव्हते, ज्या घरातील शिल्लक अन्नावर तीन चार कुटुंब रोज जेवत होती, त्या कुटुंबाची आज काय परिस्थिती? घरात रिकामे डबे.

या कुटुंबाच्या आश्रयावर मोठा झालेला वासू दुकानदार म्हाईसाठी माल नाही म्हणतो?? ''. दिपूच्या आईला रडू येत होते. हुंदक्यावर हुंदके येऊन गळ्यावर आदळत होते. पण तिने डोळे पुसले. दिपूला म्हणाली '' दिपू चल माझ्याबरोबर.''' कुठे आई?'' रघु सोनार किती पर्यंत दुकान उघडे ठेवतो? तिने गळ्यातील मंगळसूत्राला हात लावत विचारले.'' सहा पर्यंत '.'' मग चल चप्पल घाल '. तिने घरात नेसलेली साडी ठीकठाक केली. डोळे कोरडे केले. केसावरून हात फिरविला आणि पायात चप्पल घातली. चप्पल घालून ती आणि दिपू चार पावले चालली एवढ्यात वाडीतील संज्या डोक्यावरून टोपली आणताना दिसला. ती संजय कडे पहात म्हणाली '' काय हे संज्या?'' आईने पाठवले तुमच्याकडे,'. संजयच्या डोक्यावर जड होणारी टोपली दिपूच्या आईने हाताला धरून खाली घेतली. उतरलेल्या टोपलीकडे दिपूची आई पहातच राहिली. टोपलीत तीन चार किलो तांदूळ, गव्हाच्या पिठाच्या दोन पिशव्या, तेलाची पिशवी, कांदे बटाटे, वाटाणे, साखर इत्यादी होते.'' अरे हे कोणासाठी संज्या? दिपूची आई आश्चर्याने ओरडली. '' तुमच्यासाठी काकी, तुमच्याकडे म्हाई येणार ना.

दिपूचे बाबा एसटीतून उतरले तेव्हा माझ्या बाबांना वाटेत भेटले. तेव्हा ते रडत होते. माझ्या बाबांना म्हणाले, '' संस्थेने फसवलं, खोटा चेक दिला, आज आमच्याकडे म्हाई येणार, तिच्याबरोबर वीस पंचवीस लोक असणार त्यांचे जेवण करावे लागणार. घरात अन्न शिजवायला धान्य नाही '. माझ्या बाबांनी आईला हे सांगितलं. आई म्हणाली'' संजय ताबडतोब हे सामान दिपूच्या घरी पोहोचव, आज त्यांना याची गरज आहे. गावच्या मानकऱ्यांचे घर ते. त्या घराण्याच्या जीवावर अनेक जण जेवले, मोठे झाले, आज त्यांची परिस्थिती खराब आहे. पुन्हा त्यांचे दिवस येतील. माझ्या आईने ही टोपली भरली आणि आणि तुमच्याकडे हे सामान पोहोचवायला सांगितलं '. दिपूची आई रडत रडत खाली बसली. '' काय हे

संज्याच्या आई, तुमचे उपकार कसे फेडू मी. म्हाई रात्री येणार खरी पण संज्याच्या आई मला खरी म्हाई तुमच्याच रूपात आत्ताच भेटली.'. दिपू ची आई चटकन उभी राहिली डोळे पुसले आणि पुढे येऊन संजयला जवळ घेतले. '' बाळा, माझ्यासाठी डोक्यावर टोपलीतून एवढे सामान आणलंस, तुला द्यायला लाडू पण नाही रे घरात '. संजाने आणि दिपू ने सर्वसामान घरात घेतले. आईने त्यांना डबे दाखवले त्या डब्यात भराभर भरले. आता दिपूच्या आईच्या अंगात हत्तीचे बळ आले. तिने भराभर दोन चुली पेटवल्या. वाटाणे पाण्यात फुगत घातले. बटाटे कांदे चिरायला घेतले. कोथिंबीर मोडून ठेवली. एका चुलीवर तेल तापवून पुऱ्या करायला घेतल्या. इकडे देवळात ढोलांचे ताशांचे आवाज सुरू झाले. ढम... धम..ढम, ताशांचे आवाज ताड ताड ताड, शिंग वाजले पु... उ.... पु.......म्हाई निघाली, म्हाई निघाली, भक्तांच्या भेटीला म्हाई निघाली. सगळ्या गावात उत्साह संचारला. दिपूच्या आईची घाई होत होती. दोन चुली रट्टा रट्टा पेटत होत्या. तिने दोन अडीच तासात सगळा स्वयंपाक पुरा केला. आधी बाबांनी आंघोळ केली आणि सोवळे नेसून ते तयार राहिले. दिपूच्या आईच्या मदतीला शांती भाजीवाली हजर झाली तसेच शेजारची शोभा काकी पण आली. दिपूच्या आईने अंघोळ करून घेतली, आणि त्यातल्या त्यात चांगले लुगडे ती दिसली. दिपू ही आंघोळ करून तयार झाला. साडेअकरा वाजले आणि ढोल ताशे जवळ वाजायला लागले. ढम...ढम... ढम, ताड.. ताड... ताड...., शिंग वाजू लागले.

दिपूच्या बाबांनी म्हाईला घरापर्यंत आणलं. दिपूच्या आईने सर्वांच्या पायावर पाणी ओतून त्यांना आत घेतलं. म्हाईची पालखी आत ओसरीवर आली. दिपूच्या आईने तिची ओटी भरली. पुजाऱ्यांनी गाऱ्हाणे घातले. तीर्थप्रसाद सर्वांना दिला. मग सोबतची मंडळी विसावली. गेले कित्येक वर्षे देवीच्या मानकऱ्यांच्या घरात सर्व भक्तांना जेवण असते. त्याप्रमाणे पत्रावळी मांडून त्यांना जेवण वाढले. दिपूच्या मदतीला शांती भाजीवाली आणि शोभा काकी पण होत्या. भराभर वाढून झाले. मंडळींनी '' पुंडलिक वरदे '' म्हणत जेवणाला सुरुवात केली. वरण-भात, वाटाण्याची बटाट्याची भाजी, कोशिंबीर, शेवयाची खीर आणि पुरी. भक्त मंडळी भरपूर जेवली. सर्वांनी दिपूच्या आई-वडिलांना आशीर्वाद दिले आणि म्हाईची पालखी दुसऱ्या घरी जायला निघाली. रात्री दिपूची आई अंथरुणावर पडली पण तिच्या डोळ्यासमोर संज्याची आई होती. संजय ची आई म्हाई सारखी धावली म्हणून गावच्या मानकरांची अब्रू वाचली, नाहीतर...... दिपूच्या आईला झोप येईना. आज दिवसभर जो मनस्ताप झाला त्याची तिला एक सारखी आठवण येत होती.

सकाळ झाली. म्हाईच्या ढोलांचा आवाज लांब लांब ऐकू येत होता.

दिपूच्या आईने डब्यात शेवयाची खीर आणि पुरी आणि वाटाणा बटाट्याची भाजी घेतली. आणि ती मागच्या दरवाजाने बाहेर पडली. त्याच आळीत शेवटचं घर संज्याच. संजयच्या घरी मागच्या दरवाजावर तिने टकटक केले. संजयच्या आईने मागचं दार उघडलं. तिला पाहता दिपूची आई पुढे गेली आणि तिने संज्याच्या आईला मिठीच मारली. रडत रडत ती बोलू लागली ‘‘ संज्याच्या आई, तुमचे उपकार कसे फेडू? तुम्ही काल सामान पाठवले नसते तर गळ्यातील मंगळसूत्र मोडाव लागणार होतं. त्यात तरी काय तीन-चार ग्रॅम सोनं. पण गावातील सोनारसमोर घराण्याची अब्रू जाणार होती. संज्याच्या आई, माझी म्हाई मला काल संध्याकाळीच भेटली. संज्याच्या आई, तुम्हीच माझ्या म्हाई''.

‘‘ असं बोलू नका दिपूच्या आई, अश्रू आवरा.''

‘‘ कशी आवरू संज्याच्या आई, रात्री आलेल्या म्हाईला आमची काळजी असती, तर आमचे कष्टाचे पैसे त्या संस्थेने बुडवले असते का? आणि ज्यांनी पैसे खाल्ले ते गाड्या घेऊन मजेत. आमची म्हाई त्यांना शिक्षा देत नाही. संज्याच्या आई, तुम्हीच माझ्या म्हाय.'' संजयच्या आईला मिठी मारून दिपूची आई रडत होती आणि संजयची आई तिला समजावत होती. त्यांचे बोलणे रडणे ऐकून तेथे आलेले संजयचे बाबा आणि संजय आपले डोळे पुसत होते

# राजवैद्य

प्रदीप केळूसकर – ९४२२३८१२९९/९३०७५२११५२

आनंदराव गाडीतून उतरून हॉटेलच्या पायऱ्या चढू लागले, तर शिर्के साहेब त्यांची गॅलरीत बसून वाट बघत होते. त्यांना पायऱ्या चढताना पाहून शिर्के साहेब म्हणाले ‘‘ गुड इव्हिनिंग आनंदराव, लॉन वरच बसू, हवा छान आहे.

‘‘ गुड इव्हिनिंग शिर्के साहेब, चालेल.’ असं म्हणून दोघे हॉटेलच्या लॉन मध्ये ठेवलेल्या खुर्चीत बसले.

‘‘ झाली का काम ? आनंदरावांनी शिर्के साहेबांना विचारले.

‘‘ अजून दोन दिवस लागतील, कारखान्याचे मुख्य डायरेक्टर दिल्लीला गेले आहेत, शनिवार पर्यंत येतील’.

‘‘ हो, ते खासदार आहेत ना या भागातले, सध्या दिल्लीत अधिवेशन सुरू आहे, त्यामुळे ते शनिवारीच येतील.

‘‘ बरं मग शिर्के साहेब, तुम्ही आमच्या गावात आलात, बोला काय घेणार ? या हॉटेलला इम्पोर्टेड मिळते.‘ नाही आनंदराव, मी ड्रिंक घेत नाही.’ आश्चर्य आहे, तुमच्या व्यवसायानिमित्त तुम्हाला देशात आणि प्रदेशात फिरावे लागते. तरी पण तुम्ही ड्रिंक घेत नाही याचे आश्चर्य वाटते.

‘‘ काय आहे आनंदराव, पूर्वी मी ड्रिंक घेत होतो. पण गेली काही वर्षे मला लिव्हरचा त्रास सुरू आहे,.‘‘ मग तुम्ही उपचार केलेत असतील.!’’ उपचार ? भारतातील सर्व लिव्हर स्पेशालिस्टकडे आणि इंग्लंड मध्ये डॉक्टर स्टीफनकडे जाऊन उपचार घेतो आहे.

‘‘ मग डॉक्टरांचे काय म्हणणे ?

‘‘ भारतातील बहुतेक डॉक्टर्स म्हणतात माझे लिव्हर जन्मतः खराब आहे. त्यावर निश्चित असे बरे करण्याचे उपाय नाहीत. लिव्हर ट्रान्सप्लांट करणे अशक्य आहे. कारण ऑपरेशन करताना अमोनिया वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच डॉक्टरांचे म्हणणे आहे लिव्हरची काळजी घेत चला. सध्या डॉक्टर स्टीफन यांच्याकडून आलेल्या इम्पोर्टेड गोळ्यांवर माझे चालू आहे. त्यामुळे कंट्रोल मध्ये आहे. माझ्या डॉक्टर्सनी सांगितले आहे, दारूचा एक थेंब जरी पोटात गेला तरी तरी खेळ खल्लास होईल. म्हणून म्हणतो आनंदराव तुम्हाला काय हवं ते मागवा.’’

‘‘ नाही शिर्के साहेब, तुम्ही माझे पाहुणे आहात. तुम्ही ड्रींक घेत नसताना मी ड्रींक मागवू शकत नाही. आपण लिंबू पाणी घेऊ.. असं म्हणून आनंदरावांनी

दोघांसाठी लिंबू पाणी मागवले. आनंदराव शिर्के साहेबांना म्हणाले '' तुम्ही एवढे उपचार केलेत, मग एकदा राजवैद्यांच मत घेऊ. आमच्या राज्यवैद्यांकडे काही आश्चर्यकारक आयुर्वेदिक औषधे आहेत. तसं ते फारसे कुणाला माहीत नाही. पण आम्ही दोघे एका कल्चरल क्लब मध्ये एकत्र असतो. त्यामुळे आमची मैत्री आहे.''

'' राजवैद्य ? कोण हे राजवैद्य ?''

'' शिर्के साहेब, आमचा हा जिल्हा म्हणजे पूर्वी संस्थान होते. राज घराण्याची गादी होती इथे. म्हणजे अजूनही आहे पण त्यावेळचा मान वेगळा होता. ६०– ७० वर्षांपूर्वी आमच्या महाराजांच्या पदरी हे राजवैद्य होते. महाराजांच्या खास मर्जीतले. त्याकाळी महाराजांना शरीरभर गळू आले होते. असह्य वेदना सुरू होत्या. अनेकांनी उपचार केले. अगदी मिशनरी डॉक्टर नी उपचार केले. मग कुणीतरी बातमी दिली, मलकापूर भागात एक वैद्य आहे, त्यांचे कडे अनेक रोगांवरची औषधे आहेत. राजघराण्याने त्यांना बोलावले. त्यांनी पंधरा दिवसासाठी औषध लावायला व पोटात घ्यायला दिले. आश्चर्य म्हणजे आठ दिवसानंतर एक एक गळू फुटून साफ झाले. महिन्याभरात महाराज खडखडीत बरे झाले. त्या वैद्यांना महाराजांनी या शहरात आणले आणि राजवैद्य बनवले. त्या राज्यवैद्याने महाराजांची आणि महाराजांच्या कुटुंबाची अखेरपर्यंत सेवा केली. सगळीकडे नाव कमावले. महाराजांच्या शेवटच्या आजारपणात या वैज्ञानिक त्यांच्यावर उपचार केले. त्यामुळे या संस्थांच्या सर्व लोकांना त्यांचे बद्दल मोठा आदर होता.

''आणि आता ? शिर्के साहेबांनी विचारले.

'' आता राजवैद्य यांचे नातू आहेत. बापूसाहेब त्यांचं नाव. त्यांना पण आयुर्वेदाची चांगली माहिती आहे. पण आता काळ बदलला. इंग्लिश औषधे भारतात आली आहेत. डॉक्टर्स ऍलोपथी शिकून आले आहेत. ते ऍलोपॅथी औषधे वापरतात. त्यामुळे राजवैद्य मागे पडले.'

पण आयुर्वेदिक डॉक्टर्स पण आहेत ना भारतभर ?

'' आयुर्वेदिक डॉक्टर्स पण इंग्लिश औषधे वापरतात. ते शिकतात आयुर्वेद पण औषधे वापरतात ऍलोपॅथिक. अजून काही वैद्य आयुर्वेदिक औषधे वापरतात. पण आयुर्वेदमध्ये सुद्धा आता मोठ्या मोठ्या कंपन्या उतरल्या आहेत. त्यांच्याकडे मोठे कारखाने आहेत. आमचे बापूसाहेब वैद्यराज मात्र मागे मागे राहिले.' कारण त्यांना पैशाचे पाठबळ नाही '. मी आमच्या वैद्यराजांना बोलावतो ते नाडी परीक्षा करतात आणि मग औषध देतात.'' हो बोलवा तुमच्या राजवैद्यांना, त्यांचे कडून काही फायदा होतो का पाहू. ''

दुसरे दिवशी आनंदरावांनी बापूसाहेब राजवैद्यांना फोन केला. बापूसाहेब

आले. त्यांची शिर्के साहेबांची भेट झाली. त्यांनी शिर्के साहेबांचे सोनोग्राफी रिपोर्ट पाहिले. नाडी परीक्षा केली आणि यावर एक जालीम औषध मिळते का बघतो असे म्हणून ते गेले.

बापूसाहेबांच्या लक्षात आले, शिर्के साहेबांवर उपचार करण्यासाठी केरबाचे औषध मिळवणे आवश्यक आहे. नुसत्या आपल्या औषधाने शिर्के साहेबांची लिव्हर व्यवस्थित होणार नाही. बापूसाहेब स्कूटर वरून निघाले ते १५ किलोमीटर वरील भडगाव या गावी पोहोचले. एका जंगलाजवळ त्यांनी आपली स्कूटर ठेवली. आणि लहानशा पायवाटेने जंगल चढू लागले. पंधरा-वीस मिनिटे चढण चढल्यावर त्यांना शिळ्यामेंढ्या चढताना दिसायला लागल्या. तसं त्यांनी 'केरबा, केरबा ' अशा हाका मारायला सुरुवात केली. दहा-बारा वेळा हाका मारल्यानंतर ''जी जी'' उत्तर मिळाले. आणि दोन मिनिटात त्यांच्यासमोर केरबा धनगर उभा राहिला.

''आव बापूसाब, तुमी सवता, सुरवं कुनिकडे उगवला मनायचं,''.

''आर मित्रा, तुझी लय आठवण आली न्हवं ' बापूसाहेब उदगारले.

''मित्र म्हणताय हे तुमच मोठेपण बापूसाहेब, तुमी कुठं आमी कुठं, तुमी आमचे राजवीद्य, तुमास्नी आमच्या महाराजणं पदवी दिली न्हवं ''

''आर पदवी दिली आमच्या आजोबांना, मला न्हवं '.

'' बरं बापूसाहेब, का आला व्हता गरिबाकडं!

'' केरबा, आमचा एक दोस्त आहे आनंदराव, त्याचे साडू मुंबईचे शिर्के, ते इकडं आपल्या गावात आलेत कामासाठी, त्या शिर्केंच यकृत खराब झालंय, यकृत समजतय न्हवं (बापूसाहेबांनी पोटाजवळ हात ठेऊन लिव्हर दाखवले ).

''समजलं कीं, कावीळ व्हते न्हाई का ?', पण तुमी काविली वर दवा देताय न्हवं '.

आर, नुसती कावीळ असती किंवा बारीकसारीक काय बी असत, तर मी इलाज केला असता, पर या पावण्याचं पूर यकृत खराब झालाय, त्यासाठी माझ्या कडे इलाज न्हाई बाबा, तेला तुझी मुळी हवी, माग दादा डॉक्टर साठी ती मुळी तू दिलेली '. ''दादा डागदार तसा भला माणूस, किती लोकांचे परान वाचवले त्याने, माझ्या आजा न दाखवलेली मुळी तुमच्या कडच्या औषतून दिली तुमी, पन माझ्या आज्यान मला बोलून ठेवलंय

'' या मुळीचा बाजार करू नको केरबा, म्हणून मी तस कुणला ह्या मुळीच सांगत न्हाई आणि पैस भी घेत न्हाई ''

'' होय, मला माहीत आहे ते, पण आनंदरावांचे हे पाहुणे भले माणूस आहेत. मी त्यांना शब्द दिला आहे, माझ्यासाठी एकदा तू ती मुळी मला दे ''

'' होय बापूसाहेब, राजवीद्य हाय तुमी आमचे, आमच्या म्हाराजांचे राजवीद्य,

तुमास्नी मी न्हाई म्हणु शकत न्हाई '. उद्या राती पर्यत मुळी पोच करतो, तुमच्या कविलीच्या दावंय मध्ये घालून द्या.'

बरं, म्हणून बापूसाहेब घरी आले, दुसऱ्या दिवशी संध्याकाळी केरबाने ती मुळी आणून दिली. बापूसाहेबांनी ती मुळी आपल्या नेहमीच्या लिव्हर वरील औषधात मिसळली. त्यांच्या फॅक्टरीतल्या मुलीला सांगून त्याच्या दोन महिन्यासाठी च्या गोळ्या तयार केल्या आणि दुसऱ्या दिवशी शिर्के साहेबांच्या हवाली केल्या. शिर्के साहेब मुंबईला जाताना बरोबर त्या गोळ्या घेऊन गेले आणि नियमित घेऊ लागले. त्यांची इतर पथ्ये चालू होतीच. दर दोन महिन्यांनी शिर्के साहेब आपल्या डॉक्टरकडे तपासून घेत असत. नेहमीप्रमाणे शिर्के साहेबांनी लिव्हरची सोनोग्राफी केली आणि पॅथॉलॉजीमध्ये जाऊन लिव्हर टेस्ट केल्या. डॉक्टर मोटवानी लिव्हर वर उपचार करणारे डॉक्टर हॉस्पिटलमध्ये होते. शिर्के साहेब नेहमी त्यांचेकडून तपासून घेत असत. नवीन केलेली सोनोग्राफी आणि लिव्हर टेस्ट घेऊन शिर्के साहेब मोटवानी ना भेटायला गेले. डॉक्टर मोटवानी सोनोग्राफी चे रिझल्ट पाहायला लागले आणि आश्चर्यचकित झाले, तसेच त्यांनी पॅथॉलॉजी मधील केलेल्या लिव्हर टेस्ट बघितल्या, त्यांच्या आश्चर्याचा धक्का बसला.

डॉ मोटवानी – मिस्टर शिर्के, धिस इज मिराकल, Your bilirubin reached normal level , युवर सोनोग्राफी टेस्ट अल्सो शोज युवर लिव्हर इज नियर टू नॉर्मल. हाऊ दिस हॅपेंड? शिर्के साहेबानं खूप खूप आनंद झाला, सर्व डॉक्टर नी त्यांच्या लिव्हर च्या रिकव्हरी बद्दल नकारघंटा लावली होती आणि आपले पाहुणे आनंदराव यांच्या शब्दाखातर आपण राजवैद्यना रिपोर्ट दाखवले, आणि राजवैद्यांनी आश्चर्य आपल्या बाबतीत घडवले. असे वैद्य अजून आहेत यावर आपला विश्वास नव्हता. राजवैद्यानी आणि ही जादू केली खरी.

'' डॉक्टर, मी कामानिमित्त एका शहरात गेलो होतो, माझ्या एका नातेवाईकाने त्यांच्या संस्थांनच्या राजवैद्यांना बोलावून घेतले आणि माझे रिपोर्ट्स दाखवले. या राज्यवैद्यांचे आजोबा ६०– ७० वर्षांपूर्वी राजांच्या पदरी होते. त्यांच्याकडे अजूनही काही आश्चर्यकारक औषध आहेत. ते त्याचा फारसा प्रसार करत नाहीत.'

डॉ.मोटवानी – मिस्टर शिर्के, या अशा जादू सारख्या औषधांचा इतर लोकांना पण फायदा व्हायला पाहिजे. तुम्ही जर या राजवाड्यांचा पत्ता मला दिलात तर इतरही पेशंटसाठी मी ते औषध त्यांचे कडन घेऊ शकतो. हे आपल्या समाजाचे काम आहे. जास्तीत जास्त पेशंट बरे व्हायला पाहिजेत. '' शिर्के साहेबांनी त्यांना आनंदरावांचा आणि राजवैद्यांचा पत्ता दिला.

शिर्के साहेब बाहेर जातात डॉक्टर मोटवानी यांनी बेंगलोर मधील जया ड्रग कंपनीचे मालक नियाज शेख यांना फोन लावला. जया ड्रग कंपनी ही आयुर्वेद मधील भारतातील पहिल्या तीन नंबराची कंपनी होती. डॉक्टर मोटवानी त्यांचे एक डायरेक्टर होते. जया ड्रग कंपनीचे मालक नियाझ शेख शक्यतो कुणाचा फोन घेत नसत, पण डॉक्टरमोटवानी हे त्यांच्या कंपनीचे डायरेक्टरच होते म्हणून त्यांनी फोन घेतला.

डॉक्टर मोटवानींनी नियाझ शेख यांना सांगितले ''माझ्याकडे एक शिर्के नावाचा पेशंट गेली दहा वर्षे येत आहे. त्याची लिव्हर पूर्ण खराब झाली होती. इंग्लंड मधून येणाऱ्या औषधावर तो जगत होता. परंतु आज तो तपासणीला आला तेव्हा त्याची लिव्हर जवळजवळ रिकव्हर झाली आहे. मला याचे आश्चर्य वाटले आणि मी चौकशी केल्यानंतर कळले महाराष्ट्रात एका शहरात एका माजी संस्थांनाचे राजवैद्य राहतात. ही त्यांची तिसरी पिढी आहे. त्या त्या राजवैद्याने शिर्के साहेबांना हे औषध दिले. मला वाटते लिव्हरच्या उपचारासाठी ही एक जादू आहे. आपण जर ते औषध मिळवले तर आपलं सबंध भारतभर धंदा करू शकतो, या औषधाला सध्या तरी स्पर्धा नाहीये. त्यामुळे कोणी ते औषध मिळवण्याआधी आपण ते औषध मिळवायला हवे. यासाठी तातडीने हालचाल करायला हवी''.

डॉक्टर मोटवानी ही बातमी देताच,नियाझ शेखचे डोळे चमकले, त्याच्या तीन पिढ्या या व्यवसायात मोठया झाल्या.

डॉक्टर मोटवानी हे मुंबईतील मोठे प्रस्थ, लिव्हर समस्येवर मुंबई मधील विशेषतज्ज्ञ, त्यांचा अंदाज आणि मत चुकीचे ठरणार नाही. हे आयुर्वेदिक औषध लिव्हर समस्येवर जादू आहे हे शेखने जाणले. त्याने तातडीने हालचाल सुरु केली. सर्व डायरेक्टर्सना बोलाविले, मोटवानींनी कळवलेल्या माहितीबद्दल सर्वांना सांगितले. हे आयुर्वेदिक औषध आपल्याला मिळाले तर आपण भारतात नंबर वन वर पोहोचू असा विश्वास सर्वांना दिला. याकरिता ते औषध आपल्याला मिळायला हवे.

त्या वैद्यांपर्यंत पोहोचण्यासाठी चांगला माणूस हवा होता. त्यांच्या एका डायरेक्टरनी त्यांच्या कंपनीच्या पूणे विभागाचा मुख्य ज्ञानेश सबनीस याचे नाव सुचवले. सर्वांनी ज्ञानेशच्या नावाला एकमताने संमती दिली. ज्ञानेश ला बेंगलोरला बोलवले गेले. त्याला सर्व माहिती आणि वैद्य राजांचा पत्ता दिला गेला. हवे तेवढे पैसे खर्च करण्याची मुभा दिली गेली. ज्ञानेश मराठी असल्याचा त्यांना फायदा होता. वैद्य राजांबरोबर बोलू शकणार होता. शिवाय त्याला महाराष्ट्रातील सर्व माहिती होती. ज्ञानेश त्या शहरात आला आणि एका मोठ्या हॉटेलात उतरला, त्याच संध्याकाळी तो बापूसाहेबांना भेटायला गेला.

**ज्ञानेश –** बापूसाहेब मी ज्ञानेश सबनीस जया ड्रग कंपनीचा सेल्स मॅनेजर, तुम्हाला

माहिती असेलच आमची कंपनी भारतातील अग्रगण्य आयुर्वेदिक कंपनी आहे. आमच्या कंपनीचा विस्तार भारतभर आहे. मुंबईचे जे शिर्के नावाचे एक लिव्हर पीडित पेशंट तुमच्याकडे आले होते, ते मुंबईच्या डॉक्टर मोटवानीचे पेशंट होते. तुमच्याकडचे औषध घेतल्यानंतर त्यांचा आजार जवळजवळ संपला. हे एक मोठे आश्चर्य घडले. मोटवानीने चौकशी करता करता शिर्के म्हणाले या शहरातील आयुर्वेदाचार्य राजवैद्य बापूसाहेब यांच्या औषधाने हा चमत्कार झाला.

तुम्ही जी वनस्पती या आजारासाठी वापरलात ती जर आमच्या कंपनीला दिलीत तर कंपनी तुम्हाला त्याचा योग्य मोबदला देईल.

**बापूसाहेब -** शिर्के साहेबांची लिव्हर बरी झाली याचे श्रेय माझे नव्हे. माझा एक जंगलात राहणारा मित्र आहे, जो शेळ्या मेंढया राखतो, त्याचे हे ज्ञान आहे. त्याच्या आज्यानं  ही विद्या त्याला दिली आहे.

**ज्ञानेश -** मग बापूसाहेब, तुमच्या त्या मित्राला बोलवाल तर बरं होईल. त्यांनी जर त्या वनस्पतीची माहिती आम्हाला दिली तर त्यांना आम्ही मोबदला देऊच पण तुम्हाला पण देऊ.

**बापूसाहेब -** ज्याचं श्रेय माझं नाही, त्याचा मोबदला मी कसा घेऊ? पण केरबाला जर तुम्ही पैसे देणार असाल तर त्याने ते घ्यावे. म्हणजे त्याचे दारिद्र्य मिटेल. बापूसाहेबांनी त्यांचा मुलगा दिलीप याला बोलावून केरबा धनगरला आणायला सांगितले.

दिलीप केरबाला भेटायला गेला आणि येताना गाडीतून त्याला घेऊन आला. आता बापूसाहेबांच्या घरात ज्ञानेश सबनीस, बापूसाहेब आणि केरबा समोरासमोर बसले होते.

**बापूसाहेब -** केरबा, तू जी झाडाची मुळी मला दिली होतीस, मी ती माझ्या औषधास मिसळून मुंबईच्या शिर्के साहेबांना दिले. त्यामुळे त्यांची लिव्हर एकदम बरी झाली. त्या औषधाच्या शोधात हे एका औषध कंपनीचे माणूस माझ्याकडे आले आहेत. ते औषध जर तू त्यांना दाखवलं, तर तुला ते दोन कोटी रुपये द्यायला तयार आहेत. त्यांचं म्हणणं आहे, या औषधामुळे अजून अनेक लिव्हरच्या पेशंटला  फायदा होईल. त्यामुळे तू त्याचा विचार करावा.

**केरबा -** असल्या पैशावर थुंकतो मी बापूसाब, मी हाय तो झोपड्यात बरा हाय. या मुळीचा मी बाजार करणार न्हाई, माज्या आज्यान मोठया विश्वासन माझ्याकडं ही मुळी दावली, तेचा व्यापार करू? न्हाई जमायचं.

**ज्ञानेश -** केरबा कंपनी तुम्हाला शहरात घर देईल. तुमच्या मुलाला नोकरी देईल.

**केरबा -** अरे हट, मान कापली तरी मुळी दवणार न्हाई. मला तुमच पैस नग, घर नग.

नोकरीं नग. माझा शेळ्या मेंढया विकायचा धंदा हाय तो बरा हाय. बापुसो, मी चाल्लो.' म्हणत केरबा निघून गेला.

बापूसाहेब पण गप्प बसून होते. बापूसाहेबांना पण मनातल्या मनात समाधान वाटत होतं. पैशाला न भूलणारी अजून माणसे आहेत याचे त्यांना समाधान वाटले. ज्ञानेश गप्प बसून होता. पण तो मनातल्या मनात पुढची आखणी करत होता. कंपनीने त्याच्यावर मोठी जबाबदारी दिली होती. आणि ती पुरी करण्याची त्याची जबाबदारी होती.

**ज्ञानेश -** बापूसाहेब तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. केरबा सारखी प्रामाणिक माणसं आता क्वचित. पण मला सांगा हा केरबा राहतो कुठे?

**बापूसाहेब -** इथून १५ किलोमीटरवर भडगाव नावाचे गाव आहे, तेथील बाजूच्या जंगलात याची झोपडी आहे. याची म्हातारी मेली. आता हा आणि त्याचा मुलगा म्हदबा दोघेच राहतात.

बरं तर मग असं म्हणून ज्ञानेश उठला आणि आपल्या हॉटेलवर गेला. ज्ञानेशच्या लक्षात आलं आता केरबाचा मुलगा म्हदबा याला गाठावं लागणार. त्याने त्याच्या कंपनीचा सेल्समन अजयला फोन केला आणि ताबडतोब हॉटेलकडे बोलावले.

**ज्ञानेश -** अजय एक कंपनीचे महत्त्वाचे काम आहे आणि तुझ्यावर ही जबाबदारी दिली आहे. येथून १५ किलोमीटरवर भडगाव नावाचे गाव आहे हे तुला माहीत असेलच. त्या गावात जायचं. तेथे केरबा धनगर नावाचा माणूस राहतो. अर्थात तो जंगलात झोपडीत राहतो. शेळ्या मेंढ्या राखत असणार. त्याचा मुलगा आहे महादबा. त्याची माहिती काढायची. त्याला जास्त काय आवडते हे चौकशी करायची. पण लक्षात ठेव. त्याची चौकशी करत आहोत हे म्हदबाला कळता कामा नये. तू हे महत्त्वाचे कंपनीचे काम आहे, ते व्यवस्थित केलेस तर मी तुझी शिफारस करीन.

अजय मोटार सायकलने भडगाव मध्ये गेला. भडगाव मधील केमिस्ट मनोहर त्याच्या खास ओळखीचा.

**अजय -** मनोहर तुला या गावातला केरबा धनगर माहीत असेल. त्याचा मुलगा म्हदबा याला ओळखतस का, कसा आहे आणि कसले व्यसन वगैरे आहे का?

**मनोहर-** केरबा हा सरळ माणूस आहे, दारूच्या थेंबालाही शिवत नाही, पण त्याचा मुलगा महादबा हा पक्का बेवडा आहे. दिवस-रात्र दारूच्या नशेत पडून असतो. आता थोड्यावेळाने या देशी दारूच्या दुकानात येईल. आणि खरंच थोड्या वेळाने म्हदबा देशी दारूच्या दुकानाकडे जाऊ लागला.

अजयला अंदाज होताच म्हणून जाताना त्याने पाच सहा इंग्लिश दारूच्या बाटल्या बरोबर घेतल्या होत्या. त्याने म्हदबाची ओळख काढली दारूच्या बाटल्या दाखवून त्याला गाडीवर बसवले आणि ज्ञानेश च्या हॉटेल कडे घेऊन आला. एवढं मोठं हॉटेल बघून म्हदबा बावचाळून गेला. खोलीत आल्यावर ज्ञानेशने त्याला आपल्याकडच्या बाटल्या दाखवल्या.

**म्हदबा -** मला इत कशाला आणलंय?

**ज्ञानेश -** दारू प्यायला! पी हवी तेवढी दारू.' ज्ञानेशने दारूची बाटली उघडली आणि ग्लासात ओतली, म्हदबाने एका दमात ग्लास रिकामा केला. दुसरा भरला दुसरा रिकामी, असे पाच ग्लास पटापट रिकामी केली.

**ज्ञानेश -** मादबा लेका, एक काम होत, तुझ्या बाबाकड एक औषधाची मुळी आहे, त्याच्यामुळे पोटाचे आजार बरे होतात. ती मुळी कोणत्या झाडाची हे फक्त तू आम्हाला सांगायचे. तू जर ते सांगितलेस तर तुला हवी तितकी दारू देतो आणि भरपूर पैसे देतो.

ज्ञानेशने पैसे भरलेली सुटकेस दाखवली.

‘‘ तुझा बाबा तसा मुळी द्यायला ऐकायचा नाही, जर ऐकला नाही तर त्याला हे दाखवायचं.’’ अस म्हणून ज्ञानेशने एक सुरा म्हदबाच्या हातात दिला. ‘‘हा सुरा मानेवर ठेवलास की तो घाबरून ती मुळी तुला दाखवेल. त्या मुलीचे झाड आम्हाला दाखवायचे. मग तुला हे सगळे पैसे हवी तेवढी दारू.’’

दारू पिऊन पिऊन तोल जाणाऱ्या म्हदबाला अजयने त्याच्या गावात सोडले. दुसऱ्या दिवशी सकाळी बापूसाहेब घरी हॉलमध्ये चहा घेत होते. एवढ्यात ‘‘ बापूसाहेब, बापूसाहेब चला माझ्याबरोबर’’ असं म्हणत केरबा धावत धावत बापूसाहेबांच्या घरी आला.

‘‘ अरे कुठे?’’

‘‘ बापूसाहेब, माझ्या जीवाचं मला काय खरं वाटत नाय, माझा पोरगा राती सुरा घेऊन माझ्या मागे धावत होता. त्या मुळीच झाड मला दाखव म्हणूंन सांगत व्हता. बापूसो, तुमास्नी त्ये झाड दाखवितो आणि जबाबदारीतून मोकळा होतो.’’

‘‘ कसली जबाबदारी?’’

‘‘ माझ्या आजानं मला सांगितलं व्हतं मुळीचा बाजार करायचा न्हाई, झाड कधी दाखवायचं असलं तर फकीत राजवैद्यना दाखवायचं. कारण त्या घराण्याने आमच्या राजाला बर केल व्हतं.’’

‘‘ आरं पण मी त्या मुळीच झाड बघून काय करू?’’

‘‘ बापूसो, तुमी राजवैद्यांच्या घराण्यातले, परत एकदा दवा तयार करा,

'' आरं, पण तू त्याचा बाजार करायचा नाही असं म्हणतोस ना?''
'' तुमी सोडून कुंनी नाही करायचं, फक्त तुमी करू शकत. ''
चला चला बापूसाहेब घाई करा.

बापूसाहेबांनी आपला मुलगा दिलीपला सोबत घेतला. दिलीपने गाडी बाहेर काढली आणि केरबा आणि बापूसाहेब मागे बसले. केरबा दाखवत होता त्या रस्त्याने दिलीप गाडी चालवत होता. वीस पंचवीस किलोमीटर गेल्यावर केरबानी गाडी थांबवायला सांगितली आणि खूप उभ्या चढणीवर तो चालायला लागला. बापूसाहेबांना एवढं चढणे शक्य नव्हते म्हणून फक्त दिलीप त्याचे बरोबर गेला.

केरबाने तेथेच दिलीपला ती झाडे दाखवली. त्याची मुळी कशी काढायची हे पण दाखवले. बापूसाहेब केरबाला ''आपल्या घरी चल, आज तिथेच रहा'' म्हणून आग्रह करत होते पण केरबाने मानले नाही. त्याच रात्री दारूच्या नशेत केरबाच्या मुलाने म्हद्‌बाने केरबाचा सुरा पोटात खुपसून खून केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी बापूसाहेबांना ही बातमी कळली, बापूसाहेब मुलगा दिलीप सह धावले, केरबाचे प्रेत झाडीत टाकून दिलेले होते आणि बाजूला दारू पिऊन म्हद्‌बा पडला होता.

बापूसाहेबांनी दोन-तीन माणसांना बोलावून केरबाचे प्रेत आपल्या गाडीत घेतले आणि दोन किलोमीटर वरील आपल्या स्वतःच्या जमिनीत त्याचे पुढचे विधी केले. बापूसाहेब कित्येक दिवस सुन्न सुन्न होते, आपल्यामुळे केरबा हकनाक मेला असे त्यांचे मत झाले. मुंबईच्या शिर्के साहेबांना केरबाच्या मरण्याची बातमी कळली. ते मुद्दाम बापूसाहेबांना भेटायला आले. बापूसाहेबांनी त्या दिवशी मुद्दाम केरबा धावत धावत आला आणि त्या मुळीची वनस्पती दाखवली हे पण सांगितले.

**शिर्के साहेब -** बापूसाहेब तुम्ही राजवैद्य आहात. तुम्ही पुन्हा औषधाच्या व्यवसायात उतरायला पाहिजे. तुमच्याकडे ज्ञान आहे आणि आता ही मुळी आणि तिची वनस्पती पण तुम्हाला कळली आहे, मग आता वाट कसली बघता?

**बापूसाहेब -** शिर्के साहेब, आम्ही राजवैद्य असलो तरी आमच्याकडे पैशाची कमी आहे, आमच्याकडे दाम नाही आम्ही एवढी वर्ष गप्प आहोत.

**शिर्के साहेब -** बापूसाहेब,. तुम्ही पैशाची काळजी करू नका. तुम्हाला वाटेल तेवढे कर्ज बँक देईल. तुम्हाला कर्ज देण्याची व्यवस्था मी करतो. आणखी काही रक्कम कमी पडत असेल तर मी तुमच्या मागे आहे. पण तुम्ही आता आयुर्वेदिक कंपनी सुरू करायलाच हवी. केरबाची मुळीचा लोकांना फायदा व्हयला हवा आणि शिर्के साहेबांनी सांगितल्याप्रमाणे एका बँकेचा मॅनेजर सकाळीच त्यांच्या घरी हजर झाला. ''शिर्के साहेबांनी तुम्हाला हवे तेवढे कर्ज द्यायला सांगितले आहे. '' जामीन स्वतः

शिर्के साहेब राहणार आहेत, तुम्हाला किती कर्ज हवे ते मला सांगा ''. बापूसाहेबांनी मुलगा दिलीप याला हाक मारली. दोघांनी मिळून विचार केला आणि कर्जाच्या अर्जावर सही केली.

ज्या ठिकाणी केरबाचे अंत्यविधी केले गेले, त्याच्या शेजारीच '' केरबा फार्मा '' उभी राहिली. गेटमधून आत गेल्यावर केरबा धनगरचा पुतळा तुमचे स्वागत करेल, त्याला नमस्कार करून आत गेल्यावर केरबा फार्मा ची भली मोठी फॅक्टरी आणि दिलीपरावांचे मोठे सेल्स ऑफिस भेटेल. दिलीपरावांनी आपल्या मित्रमंडळींची मदत घेऊन केरबा फार्माचा व्यवसाय खूप वाढवला. यावर्षी केरबा फार्माने शंभर कोटीचा व्यवसाय पुरा केला. केरबा फार्माच्या पाठीमागे गेलात तर आपले बापूसाहेब राजवैद्य आयुर्वेदिक संधोधनात मग्न दिसतील.

बापूसाहेब राजवैद्य, दिलीपराव रोज फॅक्टरीत येतात हे केरबाच्या पुतळ्याला नमस्कार करुनच.

# शुभमंगल सावधान

प्रदीप केळुस्कर ९४२२३८१२९९/९३०७५२११५२

---

राजूच्या आईला संध्याकाळी पेपर वाचायची सवय. त्यांच्या जिल्ह्यातील पेपर यायचा सकाळी पण घरच्या व्यापात तिला पेपरात डोकं घालायला वेळ मिळायचा नाही. तशी ती सातवी शिकलेली, त्यामुळे तिला मराठी वाचन चांगले यायचे. सकाळी पेपर आला की राजूचे बाबा पहिल्यांदा पेपर वाचायचे. त्यांना तसा राजकारणात इंटरेस्ट, गल्लीपासून दिल्लीपर्यंत चे सर्व राजकारण ते वाचायचे. राजू दुपारी आला की पेपर वाचायचा.

राजूच्या आईचे पेपर वाचता वाचता एका बातमीकडे लक्ष गेले, कुडाळ मध्ये त्यांच्या जातीचा वधू-वरांचा मेळावा होता. जिल्ह्यातील पुढारी मंडळींनी हा मेळावा ठेवला होता. इतर काही काही कार्यक्रम होते पण मुख्य कार्यक्रम हाच होता. राजूच्या आईच्या मनात कितीतरी दिवस आता राजू २७ वर्षाचा झाला, त्याचे दोनाचे चार हात करायला हवेत. आपणच या विषयावर घरात बोलायला हवे, नाहीतर बापलेक काही बोलायचे नाहीत. आपला राजू कमी बोलणारा, मुलींच्या मागे मागे फिरणारा नव्हे.

तिने राजूच्या बाबांना हाक मारली.

‘‘ अहो ही बातमी बघितलात, समाजाचो मिळावो आसा कुडाळाक, वधू आणि वर दोघांचा बोलावल्यानी, राजू साठी बघूक होया आता ’’

‘‘ पण राजू काय म्हणता लग्नाबद्दल.

‘‘ तो कसो म्हणतंलो ? आपण मोठ्यांनी आता बोलाक व्हया.

‘‘ पण तेका विचार रात्री, तेच्या मनात कोण आसात तर,

नायतर खय ठरवल्यानं तर ’’

‘‘ तो काय ठरवतलो ?

खयच्या मुलीकडे मान वर करून बोलाचो नाय कधी ’.

‘‘तरीपण इचार तेका ’.

रात्री राजूच्या आईने राजाला विचारले.‘‘राजू, आपल्या समाजाचो मिळावो आसा कुडाळाक, त्याच्याबरोबर वधू आणि वरांचा पण मिळावो आसा. तुझा नाव देऊया मेळाव्यात, आता तुझा २७ वर्ष वय झाला. खयतरी बघुक व्हयाचं आता ’.

राजू गप्प बसला.

‘‘ तुझ्या मनात कोण असला तर सांग.’’

‘‘ नाय तस कोणी नाय ’’.
‘‘मग नाव नोंदवूक सांगू बाबांका ?’’
‘‘हा, म्हणत राजू जेवू लागला.

राजूच्या आईने राजूच्या बाबांना हाक मारून सांगितले
‘‘ ऐकलात हो, राजू म्हणता रविवारी कुडाळाक जाऊया.’’
‘‘ बरा, मी फोन करून नाव नोंदवतंय ’ बाबा म्हणाले.

राजूच्या बाबांनी मेळाव्याच्या आयोजकांना फोन करून राजू चे नाव दिले. रविवार १२ जानेवारी रोजी कुडाळच्या मंगलमूर्ती हॉलमध्ये समाजाचा मेळावा भरला होता. राजू आणि राजूचे आई वडील सकाळी नऊ वाजताच हॉलमध्ये हजर होते. आज समाजातील आणि आजूबाजूची लोक सुद्धा बरीच हजर होती.

साडेनऊला कार्यक्रम सुरू झाला. पहिल्यांदा प्रास्ताविक, समाजाची माहिती वगैरे. मग आमदारांच्या मागे समाजाने उभे राहिले पाहिजे, अशा तऱ्हेची नेहमीसारखी भाषणे. मग चहापाणी झाले आणि मग मुख्य कार्यक्रम सुरू झाला. पहिल्यांदा वरांची ओळख सुरू झाली. आयोजक एक एक वराचे नाव पुकारत होते. प्रत्येक वर आपली ओळख करून देत होता. मुली बद्दलच्या अपेक्षा सांगत होता. असे करत करत ३३ मुलांनी आपली ओळख करून दिली. मग दुपारचे जेवण झाले आणि मग मुलींची ओळख सुरू झाली. आयोजकांचे म्हणणे फक्त दोन मुलींनीच नाव दिलेले आहे. त्यांची ओळख सुरू झाली.
**पहिली मुलगी -** माझे नाव विशाखा. शिक्षण बी.ए. थोडे थोडे टायपिंग येते. घरी एक भाऊ, वडिलांची थोडी शेती. दहा आंब्याची कलमे.
मग आयोजकांनी नवऱ्याबद्दलच्या अपेक्षा विचारल्या.

विशाखा अपेक्षा सांगू लागली ‘‘सरकारी नोकरी, घरात कमीत कमी माणसे, नवऱ्याचे शहरात वास्तव्य, नवऱ्याची स्वतःची गाडी.’
आयोजकांनी दुसऱ्या मुलीचे नाव पुकारले.
**नाव सोनाली-** वडील बस कंडक्टर, आई अंगणवाडी शिक्षिका. शिक्षण बारावी पास.
मग आयोजकांनी तिच्या नवऱ्याबद्दलच्या अपेक्षा विचारल्या.

सोनाली अपेक्षा सांगू लागली ‘‘ मुलगा इंजिनियर किंवा डॉक्टर. शहरात स्वतःची जागा. चार चाकी गाडी.’
दोनच मुलींनी नाव नोंदवले होते, आयोजकांनी कोणी आयत्यावेळी नाव द्यायचे असेल तर द्या असे कळवूनही कोणीही मुली पुढे आली नाही.

राजूची आई आ वासून बसली होती. वधू वर मेळाव्यासाठी ३२ मुलगे

आणि फक्त दोन मुली. खेड्यात राहणाऱ्या या मुलींची अपेक्षा काय ‘‘ सरकारी नोकरी, घरात जास्त माणसे नकोत.

त्या दुसऱ्या कंडक्टरच्या मुलीची अपेक्षा ‘‘ नवरा इंजिनियर किंवा डॉक्टर, शहरात स्वतःच घर.’! राजूची आई मनातल्या मनात असल्या मुलींना शिव्या देत होती ‘‘आपला तोंड तरी बघा गो एकदा आरश्यात, धड नाक नाय डोळो, बारावी पास आणि अंगात कसली कला नाय, दोन पैसे मिळविण्याची अक्कल नाय आणि नवरो इंजिनिअर आणि डॉक्टर होयो? अगो, इतक्या शिक्षण घेतलेले नवरे तुमच्याबरोबर कित्या लगीन करतीत? तेंका नोकरीं करणारी मुलगी गावाची नाय काय?

आमच्या काळात आमचे आईवडील दाखवतीत तेचाशी आमी लगीन करू फक्त धड धाकट नवरो आणि एकत्र कुटुंब आसला कीं काळजी वाटा नाय, अडीअडचणीक कुटुंब होया आसता, तुमका सासू सासरे नको, दीर नणंद नको. असली भूतां माझ्या झिलाक नकोच ’.

राजू आणि त्याचे आई–बाबा घरी आले. मुलींच्या एवढ्या अपेक्षा असतील हे राजूला माहीतच नव्हते, असे असेल तर आपल्यासारख्या शेती बागायती करणाऱ्या मुलाला मुलगी मिळणे किती अशक्य आहे हे त्याला कळले. सध्या समाजात लग्नाच्या मुली नाही की काय असाही त्याला प्रश्न पडला. आपली ४०० आंब्याची कलमे, शंभराच्या वर नारळीची झाडे, गाई म्हशी, त्यांचे दूध काढणे, घरातले रोजचे जेवण तसेच गडी माणसांची रोजची जेवणे. एवढे सर्व आपली आई विना तक्रार किती वर्षे करते. आणि या सध्याच्या मुली? यांना शहरातला डॉक्टर इंजिनियर नाहीतर सरकारी अधिकारी हवा. कसे व्हावे आपले लग्न?

राजूचे बाबा राजूच्या आईला म्हणाले ‘‘ बघितलस काय परिस्थिती आसा? समाजात आधी मुली कमी. लोका मुलींका जन्मच देणत नाय, कसला तरी मशीन इल्ला मागे, त्यात कळा मुलगी काय मुलगो? मुलगी दिसली काय पाडुन टाकायचा, तेचो हो परिणाम, ह्याच्यात डॉक्टर लोकांनी पैसे मिळविल्यानी.’

राजूची आई म्हणाली ‘‘ तेंका जाऊदे, मी माझ्या भावाशीक विचारतंय, माझ्या भावाशीच चेडू आसा हेमा लग्नाचा, माझो भाऊस तसो नाय म्हणाचो नाय. हेमा तसा कामाचा पण आसा ’.

‘‘मग तूझ्या दादाक विचार राजू साठी हेमा देतास काय.’

दुसऱ्या दिवशी राजूची आई बांदा एस.टी.त बसली आणि ओटावण्याला भावाकडे आली. तिला अचानक आलेली पाहून भावाला खूप आनंद झाला.

‘‘अगो, अचानक कसा इलंस, कळविलंस पण नाय ’ भाऊ म्हणाला. एवढ्यात

वहिनी पण बाहेर आली.

‘‘ अचानक इलास वन्सनू, जेवण करतय, आधी चहा घ्या.’ वहिनीने पाणी दिलं चहा दिला,

‘‘ सगळी घरची बरी आसात मा, राजू काय म्हणता ?’’

‘‘बरो आसा, तेच्या लग्नाचा बघतय ’’

‘‘होय काय, बघलंस खय काय ?’.

‘मुलींचे नखरे काय कमी ? हेमाचा बघलंस नाय अजून, तेची पण पंचवीस झाली मा ? बघुक व्हया,’ ‘‘गे वैनी,

हेमाक विचारूक इललैय मी राजू साठी ’.

‘‘कोणाक राजूसाठी? काय आसता वन्स, आमी गावात लगीन करून इलाव, आयुष्यभर हाल काढलव, ह्या घर सांभाळून आता म्हातारी झालाव, शहरांतली माणसा घराक कुलूप लावून जग फिरतत, आमी आयुष्यभर हायसार, इतक्या करून गाठीक नाय दोन पैसे, त्यामुळे मी ठरवलंय हेमांक नोकरीवालोच आणि शहरातलोच नवरो बघायचो,

‘‘ह्या गावात आसा काय? आंबे लागले तर पैसे आणि तेका मेहनत किती? नोकरीवल्या सारखो एक तारखेला पगार नायतर पेन्शन थोडीच गावतली. तेव्हा राजूक दुसरी मुलगी बघूया, मी बघतय. माझे ओळखी असात, तुमी काळजी करू नकात ’’.

‘‘बरा तर, मी निघतय,’’

‘‘असा काय जेऊन जावा ना, किती दिवसांनी इलात मा’’

‘‘नाय गे, घराकडे कोण आसा ? कामाक माणसा इलीत.’’ असं म्हणून राजूची आई बाहेर पडलीच. भाऊ बाहेर गेला होतात तो तेवढ्यात घरी आला. ‘‘ अग तू खय चाल्लं, जेऊन जा.’’असा आग्रह करत होता, पण त्याला न जुमानता ती बाहेर पडलीच, परत देवगड गाडी पकडून गावी आली. घरी पोहोचताच तिने सर्व बातमी राजूच्या बाबांना सांगितली.

‘‘मुली पेक्षा मुलींच्या आईचो जास्त प्रॉब्लेम आसा, सगळ्यांका शहरातलोच होयो, गावातली कामा नको ’’. माझ्या भावाक आणि भावजयक सुद्धा मुलगी शहरात देवची आसा.

मग राजूच्या बाबांनी मुलगी बघण्याची मोहीमच काढली. अनेक ओळखीच्या आणि नातेवाईकांना जाऊन लग्नासाठी भेटले. सर्वजण हो हो म्हणत होते, पण कोणी स्थळ आणत नव्हते. असेच एक वर्ष गेले. त्यांच्या एका नातलगाने बातमी दिली, सावंतवाडीत एक एजंट आहे. तो सिंधुदुर्गात लग्नाच्या मुली पुरवतो.

त्याने जिल्ह्यात काही मुली आणून त्यांची लग्न लावून दिली आहेत. त्यांचे संसार उत्तम चालले आहेत. राजूच्या बाबांनी त्या एजंटचा फोन नंबर घेतला आणि वेळ घेऊन सावंतवाडीला त्याच्या घरी पोहोचले.

ते घरी पोहोचले तेव्हा त्यांच्या आधी सात-आठ जण मुलाचे आई-वडील तेथे बसलेले होते. एजंटाच्या ऑफिसात एकेक पालक आत जात होता. एका तासानंतर राजूच्या बाबांचा नंबर लागला.

**एजन्ट -** तुमचा मुलगा किती वर्षाचा आहे आणि तो काय करतो?

**राजूचे बाबा -** अठ्ठावीस वर्षाचा आहे, आमची आंबा बाग आहे चारशे कलमांची.

**एजन्ट -** घरी कोण कोण आहेत -मी, माझी बायको आणि हा एकच मुलगा.

**एजन्ट -** काय असते शेतकऱ्याच्या मुलाशी मुली लग्न करायला तयार होत नाहीत. तरीपण मी प्रयत्न करतो. बुधवारी आजऱ्याला मुली आणणार आहोत. माझे कमिशन पहिल्यांदा ८० हजार रुपये द्यायचे. मगच मुली दाखवणार.

तुम्ही मुलगी पसंत केल्यानंतर लग्नाच्या आदल्या दिवशी मुलीच्या बापाला पाच लाख रुपये रोख द्यायचे. लग्न सर्व तुमच्या खर्चाने. लग्नात जास्त माणसे जमवू नका. लग्नात मुलीच्या अंगावर दहा तोळे सोने घालायचे. मुलीच्या भावाला अर्ध्या तोळ्याची अंगठी. मुलीच्या माहेरच्या माणसांसाठी १५ चांगल्या प्रतीच्या साड्या. १५ पॅन्ट शर्ट पीस. लग्नाला जी माणसे कारवार होऊ देणार त्यांच्या गाडीचा खर्च. हे सर्व कबूल असेल तर मला उद्या संध्याकाळपर्यंत कळवा.आजऱ्याला जायचं असेल तर आठ आसनी चांगली गाडी घेऊन यायची. माझ्या फोनवर काय ते उद्या संध्याकाळपर्यंत कळवा. मुलींना मागणी खूप आहे. अजून कितीतरी लोक भेटायला यायचे आहेत. काय ते कळवा.

राजूचे बाबा बाहेर पडले. एसटी पकडून गावी आले. बायकोला आणि राजूला सर्वच बातमी सांगितली. मुलींच्या अटी ऐकून राजूची आई गप्पच झाली पण नाईलाज होता. आपल्या भागातून लग्नासाठी मुली मिळत नव्हती. शेवटी त्या एजंटला पैसे देण्याचे ठरले. बाबांनी दुसऱ्या दिवशी एजंटला फोन केला. त्यांनी बुधवारी सकाळी आठ वाजता आपल्या घरी सावंतवाडीत यायला सांगितले. येताना एजंटचे कमिशन ८० हजार रुपये आणि आजऱ्याला जाण्यासाठी चांगली इनोवा गाडी आणण्यास सांगितले.

राजूला हे सर्व पसंत नव्हते. तो असल्या भानगडी नकोच म्हणत होता. परंतु राजूच्या आईने जोर धरला.' एकदा लग्न होऊ दे 'असा तिचा आग्रह होता.

रविवारी गावातील एक आठ आसनी गाडी भाड्याने घेऊन तिघेजण सावंतवाडीत आले. एजंटला ८० हजार रुपये दिले आणि सोबत दोन लग्नाचे मुलगे

आणि त्यांचे आई-वडिलांसह आजऱ्याला रवाना झाले.

आजऱ्याला एका दुसऱ्या एजंटच्या घरात कारवार होऊन दोन मुली आणि त्यांचे वडील आले होते. तेथेच मुली दाखवल्या गेल्या. मुली मात्र दिसायला छान होत्या पण भाषा कन्नड. राजूच्या घरच्यांना कन्नड येत नव्हते आणि त्या मंडळींना मराठी येत नव्हते.

दोन मुली पैकी एक मुलगी राजूच्या आईने पसंत केली. तिचे वडील आणि ते आणि हे दोन एजंट राजूच्या आई-बाबांच्या समोर बसले. लग्नाच्या आदल्या दिवशी पाच लाख मुलीच्या वडिलांना द्यायला पाहिजेत तरच मुलगी लग्नाला उभी राहील हे निक्षून सांगितले. लग्नाच्या वेळी मुलीच्या अंगावर दहा तोळ्याचे दागिने घातलेले पाहिजेत तरच मुलगी लग्नाला येईल. हे असे सांगितले त्याप्रमाणेच व्हायला पाहिजे. नाहीतर मुलीला घेऊन आम्ही माघारी येऊ अशी धमकी दिली.

या सर्व अटी मान्य करून राजूचे आई-बाबा गाडीत बसले आणि एजंटला सावंतवाडीत उतरवून आपल्या घरी आले. एकंदरीत सर्व विचार करून दोन मार्च ही लग्नाची तारीख ठरवली. लग्न राजूच्या शेजारील घराच्या दारात करायचे ठरले. एजंटला तारीख कळवली. त्यांनी एक मार्च रात्री पर्यंत गावात पोहोचवण्याचे मान्य केले. राजूच्या बाबांनी दहा तोळ्याचे दागिने करायला दिले. मुलीच्या भावासाठी अर्ध्या तोळ्याची अंगठी करायला दिली. कणकवली जाऊन ''मालू क्लॉथ'' मधून साड्या तसेच पॅन्ट पीस शर्ट पीस खरेदी केले. घराची रंगरंगोटी केली. जास्त लोकांना आमंत्रण दिले नाही. फक्त जवळच्या माणसांना आणि जवळच्या नातेवाईकांना आमंत्रण दिले.

कारवारहून मुलीकडची माणसे, दोन्ही एजंट, सायंकाळी सात वाजता हजर झाले. एजंटनी आल्या आल्या राजूच्या वडिलांकडून पाच लाख रुपये रोख मोजून घेतले. मुलीचे दागिने ताब्यात घेतले. कपडेलत्ते ताब्यात घेतले. रात्री हळदी कार्यक्रम. सर्वांनी कौतुकाने राजूला हळद लावली. हळदीची गाणी म्हटली डान्स केले. लाऊड स्पीकर मोठ्यामोठ्याने हळदीची गाणी म्हणत होता.

दोन मार्चला लग्न लागले. मुलीच्या अंगावर दहा तोळ्याचे दागिने दिसत होते. गावातील भटजींनी लग्न लावले. मग इतर लग्नाचे विधी आणि सर्वांसाठी जेवण. खास देवगडहून आचारी बोलावले होते. मग देवळापर्यंत वरात, वरातीत नाचणे, बेंजो, फटाके वाजले. राजूची बायको घरात आली ती एकसारखी कन्नड मधून मोबाईलवर बोलत होती. सर्वांना वाटत होते आपल्या गावातील जवळच्या माणसांशी बोलत असेल. राजूच्या घरी पुन्हा रात्री माटाव जेवण. यावेळी खारे जेवण. बकरा मटण, चिकन, रस्सा, भात आणि भाकरी आणि तरुण मंडळी साठी बाटल्यांची खास

सोय. रात्री अकरापर्यंत जेवणाची धामधूम सुरू होती.

हळूहळू सकाळ पासून दमलेले शेजारी, नातेवाईक आपापल्या घरी गेले, लाऊड स्पीकर बंद झाला. दोन दिवस धामधूम झाल्याने लोकांना झोप येत होती. लाईटी बंद केल्या गेल्या. राजू रात्री बारा वाजता खोलीत गेला तेव्हा त्याची बायको कॉटवर गाढ झोपी गेली होती. सकाळी लग्नात घातलेले दागिने तसेच अंगावर होते. राजूने चटई आणि चादर घेतली आणि तो खाली जमिनीवर झोपला. दोन रात्री झोप न मिळाल्याने सर्वजण गाढ झोपी गेले. सगळीकडे शांतता.

सकाळी सहा वाजता राजूची आई जागी झाली. बाहेर ओट्यावर आली तर घराच्या पुढच्या दाराची कडी काढलेली दिसत होती. तिला आठवले रात्री तिनेच दाराची कडी लावली होती. मग दार कोणी उघडले ? हे तिच्या लक्षात येईना. काल रात्री मुक्कामास राहिलेले पाहुणे अजून झोपेत होते, नवरा झोपेत होता, राजू आपल्या खोलीत होता, मग दार उघडे कसे ? दाराची कडी कोणी काढली ?

एवढ्यात खोलीतून राजू बाहेर आला. आईने त्याला पुढचे दार उघडे असल्याचे सांगितले. राजू ने परत खात्री केली, सर्वजण झोपेत होते. मग तो आपल्या खोलीत गेला तर काल लग्न केलेली त्याची बायको कॉटवर नव्हती. तिची कपड्यांची बॅग पण दिसत नव्हती. राजूला वाटले परसात कुठेतरी गेली असेल. त्यानी परसात शोधले. विहिरीजवळ पाहिले. ती कुठेच दिसेना. त्याने आईला तसे सांगितले. आईने पुन्हा त्याच्या खोलीत येऊन पहिले, तिची बॅग जागेवर नव्हती. एवढ्यात शेजारची माई त्यांच्याकडे आली.

''राजूच्या आई, काल रात्री चार वाजता मी बाहेर इल्लाय तर तुमच्या घरासमोर तीच कारवारची गाडी उभी होती आणि तुमच्या घरातून कोण त्या गाडीत बसलेला काय गे?''. राजूच्या आईच्या काळजात धस झाले. म्हणजे काल लग्न केलेली नवरी रात्री पळाली की काय ? तिने नवऱ्याला उठवले. राजूचे बाबा हडबडून उठले, झोपलेले सर्व नातेवाईक उठले. पुन्हा एकदा परस, विहीर, शेजारी पाजारी शोधले. सावंतवाडीच्या एजंटना फोन लावले. तेव्हा ते फोन उचलत नव्हते. मग एका नातेवाईकाच्या फोनवरून त्यांना फोन लावला, तेव्हा त्यांनी फोन उचलला, त्यांनी हात झटकले '' लग्न लावून मुलगी तुमच्या घरात येईपर्यंत माझी जबाबदारी आता मुलगी नाहीशी झाली ती तुमच्या घरातून. माझी जबाबदारी नाही''. राजूच्या बाबांनी डोक्याला हात लावला. राजूची आई मावशी रडायला बसल्या. राजूचा चेहरा पडला. आई रडते हे पाहून तो पुन्हा रडायला लागला. कुणीतरी म्हणाले पोलीस कम्प्लेंट करा. राजूच्या बाबांनी पोलिसात तक्रार दिली. काल लग्नात कोणीतरी मोबाईलवर काढलेले तिचे फोटो दाखवले.

पोलीस इन्स्पेक्टरला काहीतरी शंका आली. त्याने एक फाईल बाहेर काढली. फोटो पडताळून पाहिले. ''अहो, या मुलीने आपल्याच तालुक्यात दोन वेळा दोन मुलांबरोबर लग्न केले आहे. हे पहा त्या लग्नातील फोटो. ती मंडळी लग्नात घातलेले दागिने आणि पैसे घेऊन पोबारा करतात. आम्ही त्या एजंटची पण चौकशी केली होती. ते म्हणतात आम्हाला कर्नाटकचे एजंट येऊन फोटो देतात ते आम्ही आमच्या भागात दाखवतो. आम्ही त्या मुलींना किंवा त्यांच्या आई-वडिलांना ओळखत नाही. त्यामुळे तो तपास इथेच थांबला. तुमची तक्रार येथे नोंदवा तसेच किती दागिने घेऊन ती मंडळी पळाली ते पण लिहा. चौकशी करतो''.

राजूच्या बाबांनी डोक्याला हात लावला. पोलिसांनी मग त्या गाडीचा तपास केला, ती गाडी हलकर्णी भागातील भाड्याने घेतलेली गाडी होती. ती गाडी त्या मंडळींनी आंबोलीजवळ पैसे देऊन सोडली. रात्री सगळेजण डोक्याला हात लावून बसले होते. जवळजवळ ११ तोळे सोने, सहा लाख रुपये, अडीच लाख रुपये लग्नाचा खर्च. एवढ्यात राजूच्या आईला आपल्या दागिन्यांची आठवण झाली, काल रात्री घाईघाईत तिने दागिने काढून डायनिंग टेबलावर ठेवले होते, ती टेबलावर जाऊन पाहू लागली पण ते दागिने पण नाहीसे झाले होते.

**... चार वर्षानंतर......**

राजूच्या लग्नाच्या धक्क्यातून कुटुंब हळूहळू सावरत होते. राजूची आई भांबावली होती. आपल्या काळी सहज लग्न जमत होती. त्यावेळी मुलींना हुंडा द्यावा लागत होता. पंधरा-वीस वर्षात परिस्थिती किती बदलली? राजू लग्नाचे नाव घेत नव्हता, शुभमंगलं सावधान कुठे ऐकू आले तरी तो दचकत होता.

राजूने बांबू लागवड केली, आंब्याची कलमे होतीच, नारळीची पण शंभर झाडे होती, तो आंबा कलमे करारावर घेत होता, टेम्पो भरून बेळगावच्या मार्केटात पाठवत होता. पैसे येत होते पण हे सर्व सांभाळायचे कोणी? असा प्रश्न राजूच्या आई-वडिलांना पडला होता.

मार्गशीर्ष महिना आला. राजूची आई गुरुवारचा उपास धरायची. लक्ष्मीचे व्रत करायची. एका गुरुवारी त्यांच्या दारात मोटरसायकल थांबली, तिने पाहिले, शेतकी मदतनीस माने गाडीवरून उतरत होते, त्यांच्या पाठीमागे एक २७- २८ वर्षाची युवती उतरत होती. माने या घरात नेहमी येणारे. या भागात येणे झाले की नेहमी राजूच्या घरी येणारे. माने घरात येता येतात ओरडून म्हणाले.

'' काय म्हातारे बरी आहेस ना?'.

''होय बाबानू, खूप दिवसांनी इलात, ही कोण बरोबर?''

‘‘ म्हातारे माझी आता बदली झाली, नोकरीची दोन वर्ष शिल्लक राहिली, कोकणात इतकी वर्षे काढली आता जातो गावाकडे, ही तुमच्या भागातील नवीन शेती मदतनीस. पूजा साळवी हिचे नाव. खेडच्या बाजूची आहे. ती माझ्या जागेवर पंधरा दिवसांपूर्वी रुजू झाली. तिची ओळख करून द्यायला आलो ’’.

‘‘बसा हो, पेज वाढतंय, ही बाई पेज घेतली मा ?’’

‘‘ हो ना घेते मी पेज, पण तुम्हाला उगाच त्रास....

‘‘त्रास कसलो गो, आमच्या बागेत दहा जण काम करतात, सगळ्यांका पेज करूचच आसता ’. येवा, आत येवा.’. राजूची आई आत गेली, तिने दोन पातेल्यात पेज आणि कुळथाची पिठी आणून ठेवली. मानेने आणि पूजाने हात धुतले आणि पेज घ्यायला बसले.

पेज घेतल्यानंतर माने म्हणाले ‘‘ चला बाई तुम्हाला राजूची आंब्याची बाग दाखवतो.’’ मानेंच्या गाडीवर बसून पूजा राजूच्या आंबा बागेकडे गेली. राजूच्या बागेत कलमांना लहान लहान फळे आली होती. त्यावर फवारणी सुरू होती. पूजाने एवढी व्यवस्थित बाग क्वचितच पाहिली होती. ४०० आंब्याच्या कलमानंतर पुढे ओढा होता. ओढ्याचे पाणी वाहत होते. पुढे ओढ्यावर बंधारा घातला होता. पाच चे दोन पंप लावले होते. त्या पंप आणि नारळीच्या बागेत पाणी घेतले होते. त्याच्या पुढील दहा एकर वरकस जमिनीवर बांबू लावला होता. राजू पूजाला आणि मानेंना सर्व बाग दाखवत होता. पूजाने राजूला विचारले ‘‘ ही कुठली बांबूची जात आहे ?’’ ‘‘इथे दहा जातीचे बांबू लावले आहेत. मिक्स प्रकार केले आहेत.’’ कोकणात ‘‘माणगा ’’ ही बांबूची जात जास्त फोपावते. इथली हवामान त्याला अनुकूल आहे. कुडाळ जवळ मिलिंद पाटील नावाचा आमच्याच कॉलेजचा विद्यार्थी आता बांबू लागवडी संबंधी माहिती देतो, माणगाची रोपे पण मिळतात. मी तुम्हाला त्याचा नंबर देते, असं म्हणून तिने पर्स मधून मिलिंद चा फोन नंबर दिला.‘‘ तुम्ही बांबू कोणाला देता ? तुम्ही कुडाळ मध्ये ‘‘कॉर्नबॅक’’ नामाची बांबूचे वस्तू बनवणारी कंपनी आहे. त्यांचेकडे बांबूची रिक्वायरमेंट कायम असते.’

एवढ्यात राजूच्या आईचा फोन आला.‘‘माने आणि पूजा दोघांना घरी जेवूक पाठव ’’ म्हणून. माने आणि पूजा पुन्हा राजूच्या घरी आली. आईने त्यांना गरमागरम वरण भात, कैरीचे लोणचे, मुळ्याची भाजी वाढली. माने आणि पूजा व्यवस्थित जेवली. जेवता जेवता आईने पूजाला विचारले ‘‘ घरी कोण कोण असतं ग तुझ्या पूजा ?’’ पूजा गप्प झाली. मानेंनी आईला विचारू नका असा इशारा केला. आई गप्प झाली.

जेवण झाल्यावर पूजाने आपले ताट उचलले तसेच मानेंचे पण ताट उचलले

आणि मोरीत धुवायला गेली. ‘‘अगो, ठेव ती ताटा’’ म्हणेपर्यंत पूजाने दोन्ही ताटे विसळून ठेवली. राजूची आई बघतच राहिली.‘‘ हल्ली मुलींना संस्कार नाही असे म्हणतात, बघा ही संसारी मुलगी ’’ असं मनातल्या मनात म्हणत होती. जेवण झाल्यावर माने आणि पूजा गाडीवर बसून गेली. संध्याकाळ झाली रात्र झाली तरी आईच्या डोळ्यासमोर पूजा जाईना.

दुसऱ्या दिवशी मानेंचा आईला फोन आला ‘‘ म्हातारे, काल तू पूजाला घरी कोण कोण असतं म्हणून विचारत होतीस, तेव्हा मी तुला गप्प बसवलं तिला ते सांगणं अवघड होतं. आता मी तुला तिच्याबद्दल सांगतो.’’

‘‘ पूजा ही खेड जवळची. घरी आई-वडील आणि एक लहान भाऊ. हिने दापोली कृषी विद्यापीठातून बी.एस.सी ॲग्रीकल्चर केल पण तिला लगेच नोकरी मिळाली नाही. तिच्या वडिलांनी तिचे एका ग्रामसेवकांशी लग्न लावून दिले. तिचे सासू-सासरे आणि नवरा हिला माहेरून पैसे आणण्यासाठी छळू लागले. मारझोड करू लागले. एका वर्षातच हिला एक मुलगी झाली. मुलगी झाली म्हणून परत जास्त छळ सुरू केला. सतत छळाला कंटाळून हिने स्त्रियांसाठी धडपडणाऱ्या संस्थेकडे तक्रार दिली. त्यांनी तिच्या घरच्यांना तंबी दिली. म्हणून सासरच्या मंडळींनी हिला जाळण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्या तावडीतून ही सुटली आणि मुलीसह माहेरी आली.

त्या संघटनेने नंतर तिच्या नवऱ्याला आणि सासूला धडा शिकवलाच, तिच्या नवऱ्याची नोकरी पण गेली. दरम्याने पूजाला कृषी विभागात कृषी सहाय्यक म्हणून नोकरी मिळाली. एक वर्ष दापोलीत नोकरी केली आणि आता या भागात तिची बदली झाली. हिची चार वर्षाची मुलगी तिच्या आई-वडिलांकडे असते. म्हातारे, की ही खरोखरच गुणी मुलगी आहे. आमच्या कृषी विभागात सर्वांची लाडकी आहे.’’ असं म्हणून मानेने फोन खाली ठेवला.

राजूच्या आईला चुटपुट लागून राहिली. किती गुणी मुलगी आणि तिच्या घरच्यांनी हिची काय दशा करून ठेवली. रात्री राजूचे बाबा आणि राजू जेवायला बसले तेव्हा तिने त्यांना पूजाची कहाणी सांगितली. बाबांना पण ह्या चांगल्या मुलीची ही दशा बघून वाईट वाटले. असे नराधम अजून अस्तित्वात आहेत हे त्यांना खरे वाटेना.

पुढे दोन महिने झाले तरी पूजा त्या गावात आली नाही. आता राजूच्या बागेत आंब्याचा सिझन सुरू झाला होता. रोज पंधरा माणसे कामाला होती. त्यांचे चहापाणी, पेज, जेवण करून राजूची आई थकत होती. आपली सून असती तर तिने ही जबाबदारी घेतली असती, असे तिच्या मनात येई.

अचानक एक दिवस स्कूटरवर बसून पूजा हजर झाली. पूजाला पाहताच आईना खूप आनंद झाला ''अगो, होतंस खय इतके दिवस?'' आईने विचारले.
'' दीड महिन्याचे ट्रेनिंग होत दापोली कृषी विद्यापीठात, तिकडे अडकले होते. तुमची सर्वांची आठवण येत होती. पण त्यादिवशी घाईत कुणाचा फोन नंबर घेतला नाही. ''
'' बस बस, पेज घेतस मा?.''
'' हो घेते, तुम्ही उठू नका, मी तुमचे स्वयंपाक घर त्यादिवशी पाहिले आहे.'' असं म्हणून पूजा चटकन आत गेली आणि तपेल्यातील पेज लहान भांड्यात ओतून घेतली. टेबलावर बरणीत लोणचं दिसत होतं, त्यातील दोन फोडी घेतल्या. पेज जेऊ लागली, आई तिच्यापाठोपाठ आतमध्ये आल्या होत्या. तिचं सराईतपणे घरात वावरणं त्यांना आनंद देत होत्या.

पेज जेवल्यानंतर पूजा म्हणाली '' आई मी बागेत जाते यंदा आंबे कसे आहेत ते पाहून येते.''. स्कूटरवर बसून पूजा बागेत गेली. राजू घामाने डबडबला होता. आंबे उतरवणे सुरू होते. चार झाडावर चारजण आंबे काढण्यासाठी चढले होते. टोपलीतून खाली आंबे सोडत होते आणि मोठ्या टँक मध्ये आंबे ठेवत होते. एक पिकप गाडी आंब्याचे टँक घेऊन घरी जात होती. कितीतरी वेळ पूजा काम बघत होती.

राजूचे तिच्याकडे लक्ष नव्हते. तो चार ठिकाणी धावत होता. काम करून घेत होता. एवढ्यात एका कामगाराचे पूजाकडे लक्ष गेले. त्याने राजूला पूजा आल्याचे दाखवले. राजू हसत हसत तिच्याजवळ आला '' केव्हा आलात?''
''आत्ता तुमच्या घरी पेज जेऊन आले, दीड महिना ट्रेनिंग होते दापोलीला, म्हणून इकडे येता आले नाही ''.
''होय काय, मला वाटले आम्हाला विसरलात.''
'' छे हो. कशी विसरेन. तुमच्यासारखे मेहनती बागायतदार कमी.''

आमच्या कृषी विभागाचे तुमच्यासारख्यांकडे लक्ष असतेच. यावर्षी कुठली खते वापरणार हे बोलायचे होते, पण तुम्ही कामात''.
'' सध्या वेळच नाही, मी आणखी सहा बागा करारावर घेतल्या आहेत, त्याचे आंबे अजून काढायचे आहेत ''
'' मग हे आंबे पाठवता कोठे?''
'' सध्या तरी बेळगाव मार्केट आणि कोल्हापूर मार्केट धरलय, रोज चार पिकप धावतात. रोजच्यारोज हिशेब मिळतो.''
'' सातारा मार्केटचा पण प्रयत्न करा. कोल्हापूर पेक्षा साताऱ्यात जास्त दर मिळतो असे मी ऐकले आहे. ''

एवढ्यात आईचा फोन, तू जेऊक ये आणि पूजाकपण जेऊक घेऊन ये. राजूने मोटरसायकल काढली पूजाने आपली स्कूटर काढली आणि दोघं घरी जेवायला आली. राजूचे बाबा घरी आलेलेच होते.

''तू मासे खातास काय गो पूजा?'' आईने विचारले.

''हो खाते ''. पूजा आत गेली. तिने भराभर स्वयंपाकवर नजर टाकली. ताटे वाढायला घेतली. आई बघत राहिली. वाटीत बांगड्याचे तिखले, तळलेली कोलंबी, भात आणि सोलकढी. राजूचे बाबा आणि राजू जेवायला बसले.

आई म्हणाली '' तू पण जेवायला बस ग पूजा.''

'' नको आई आपण मग जेवू.'' दोघं पुरुष जेवण जेवून बाहेर गेले कसे पूजाने चटकन ताटे उचलले आणि दोन ताटे वाढायला घेतली.

जेवता जेवता आई पूजाला म्हणाली '' मानेंनी फोनवर सांगितल्यानी तुझ्याबद्दल, तुझ्या लग्नाबद्दल, घटस्फोटाबद्दल, तुझ्या मुलीबद्दल.'' पूजाच्या डोळ्यात चटकन पाणी आलं. आई तिच्या डोळ्याकडे बघत म्हणाली '' पुस ते डोळे, स्त्रियांनी खंबीरच होऊक व्हया, असल्या माणसांका धडो शिकवकच व्हयो.'' पूजा गप्प झाली. ''परत लग्नाचो काय विचार केलंस गो पूजा?''. पूजाने मान हलवली. ''माझी सून होऊन या घरात येशीत?'' पूजाला एकदम ठसका लागला.

तिच्या तोंडाला पाण्याचा ग्लास लावून आई म्हणाली ''माझो राजूपण तडफडता, शेतकऱ्याक कोण मुली देऊक तयार नाय, सगळ्यांका सरकारी नोकरीं व्हयी, माझ्या भावानं सुद्धा नाय म्हणून सांगितल्यानं. म्हणून नाईलाजाने एका एजन्ट मार्फत कारवारच्या मुली बरोबर लग्न ठरवलं.'' आणि आईने केलेलं लग्न आणि झालेली फसगत सांगितली.'' पैसे, दागिने गेले ते मिळवता येतीत पण गेलेली अब्रू कशी येतली?'' अस म्हणून आई रडू लागली. पूजा उभी राहिली आणि आपल्या ओढणीने तिने त्यांचे अश्रू पुसले. जाता जाता तिने '' आई-वडिलांना विचारून सांगते '' असं म्हणत पूजाने भांडी आणि ओटा आवरला आणि ती गाडी स्टार्ट करून निघून गेली.

चार दिवसांनी पूजाचा फोन आला '' माझे आई बाबा तुम्हाला भेटायला येत आहेत म्हणून.'' दुसऱ्याच दिवशी पूजाचे आई बाबा, चार वर्षाची मुलगी आणि पूजा आली. पूजाचे आई-बाबा म्हणजे राजूच्या आई-बाबांसारखीच साधी माणसं होती. त्यांनी राजूला पाहिले, राजूची आंब्याची बाग पाहिली, पूजाची छोटी मुलगी एवढं मोठं घर, गाई म्हशी, आंब्याचे ढीग, झाडांना लगडलेले फणस बघून भलतीच खुश झाली. राजूला पूजा आवडली होतीच. वेळ न काढता चार दिवसांनी राजू आणि पूजाचे लग्न झाले. ''शुभमंगल सावधान'' म्हणताना राजू एकदम नर्व्हस झाला,

अंतरपाटामागे पूजा आहे हे दिसतात तो निर्धास्त झाला.

वाचक हो, आपल्या कथेचा नायक राजू याला पूजा सारखी पत्नी मिळाली, घरात छोट्या मुलीचा चिवचिवाट सुरू झाला. घराला घरपण आले. पूजाने नोकरी सोडली पण चाफ्याची नर्सरी सुरू केली. या नर्सरीत सर्व प्रकारची चाफ्याची कलमे मिळू लागली.

दोन वर्षात या नर्सरीची बातमी सर्व दूर पोहोचली. मृग नक्षत्राच्या वेळी चाफ्यांसाठी गाड्या लागू लागल्या. राजूने पिंगुळीतून मिलिंद पाटील यांच्या नर्सरीतून ''माणगा ' या जातीची बांबू लावले आणि बांबूचे मोठे पीक घेऊ लागला. ज्या मुलींनी राजू बरोबर लग्न करायला नकार दिला त्या मुली सध्या मुंबईमध्ये दहा बाय दहाच्या खुराड्यात रखडत आहेत. नवऱ्याला धड नोकरी नाही,, धड घर नाही, पदरी दोन–तीन मुले. राजूच्या मामाची मुलगी एका टेम्पो ड्रायव्हर बरोबर पळून गेली. मामी आता तिची आठवण काढून डोक्याला हात लावून बसली आहे.

पण आपल्या कथेचा नायक राजू सुखात आहे. एकदा शुभ मंगल झाल्यावर तो पुरता खचला होता. पण राजूच्या आईच्या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पहिल्यांदाच त्यांच्या घरात आलेली ''पूजा'' त्यांची लक्ष्मीच ठरली. आणि हो, तुम्हाला एक सांगायचंच राहिलं, राजू पूजा यांच्या वेलीवर एक फूल फुलणार आहे, तेव्हा त्यांना आशीर्वाद द्यायला येणार ना?

# प्रिये पहा.....!

लेखक – प्रदीप केळूसकर
९४२२३८१२९९/९३०७५२११५२

अनघा हॉल बाहेर ऍक्टिवावर बसली होती, आतमध्ये बुवांच्या गाण्याचा कार्यक्रम सुरू होता. पार्किंगलॉट मध्ये नेहमीप्रमाणे भरपूर गाड्या आणि स्कूटर्स लागल्या होत्या. सायंकाळी पाच वाजता कार्यक्रम सुरू झाला तो अजूनही संपला नव्हता, पण आता पाच दहा मिनिटात संपेल याचा अनघाला अंदाज होता. कार्यक्रम संपला की १५ मिनिटात अर्जुन बाहेर येईल हे तिला माहीत होते, आज अर्जुन बरोबर बाहेर जेवायला जायचे ठरले होते, पण कार्यक्रम अजून संपत नव्हता, तिचे एक सारखे घड्याळात बघणे सुरू होते.

एवढ्यात आतून आवाज बंद झाले आणि लोकं हॉल बाहेर पडू लागली. हळूहळू हॉल खाली झाला. दहा मिनिटांनी अर्जुन बाहेर आला, इकडे तिकडे पाहताना त्याला अनघा दिसली, तसा तो तिच्या दिशेने येऊ लागला. जवळ येताच त्याने स्कूटर चालवायला घेतली, अनघा मागे बसली, अर्जुन म्हणाला '' कुठे जायचे जेवायला ?''

'' कुठेही ! आता थोडा उशीर झाला तर देविकामध्ये जाऊ, तिथे गुजराती डिशेस चांगल्या मिळतात.''

अर्जुनने स्कूटर हॉटेल देविकाच्या दिशेने वळवली. स्कूटर बाहेर लावून दोघं आत गेली. एक कोपऱ्यातले टेबल पकडून तिथे बसली. वॉशरूममध्ये जाता जाता तो अनघाला म्हणाला '' दे ऑर्डर, तुला काय आवडते ते.'' अनघाने दोन गुजराती पदार्थांची ऑर्डर दिली, सोबत रायता, पापड आणि रोट्या मागवल्या.

अर्जुन रुमालाने हात पुसत पुसत समोर येऊन बसला, तेव्हा तिने विचारले '' प्रोग्रॅम कसा झाला ?''

'' नेहमीप्रमाणे उत्तम! बुवांचा कार्यक्रम कधी फेल होत नाही, एवढ्या वर्षांची तपश्चर्या आहे बुवांची, रोजचा रियाज कधी चुकणार नाही बुवांचा.''

'' आणि तुझा ? तू पण कधी रियाज चुकवत नाहीस, मी तुला ओळखते त्यापासून तुझी मेहनत कधी कमी होत नाही, पण तू स्वतः कार्यक्रम करत नाहीस त्यामुळे तुझी मेहनत दिसत नाही. तू बुवाना साथ करत असतोस, पण स्वतः कार्यक्रम करण्याचे धाडस करत नाहीस.''

'' झालं तुझं सुरू!''

'' मग मी बायको आहे ना तुझी, मला तुझी काळजी वाटणारच, बुवांना साथ करत

राहिलास तर स्वतः कधी मोठा होणार नाहीस, एका वटवृक्षाखाली दुसरं झाड मोठं होत नाही.''
'' ते खरं आहे पण बुवांना कसं सांगू, मी आता वेगळे कार्यक्रम करतो म्हणून. शेवटी गेली वीस वर्षे त्यांच्यासोबत आहे, त्यांच्यामुळे माझं नाव भारतभर आहे.''
'' नाव आहे भारतभर पण ते बुवांचा साथीदार म्हणून. गायक म्हणून नव्हे.'' तसा तू गेली वीस वर्षे बुवांकडे शिकतो आहेस, त्यांना कार्यक्रमात साथ करतो आहेस, मग बुवा का म्हणत नाहीत '' अर्जुन, आता तू स्वतंत्र कार्यक्रम कर म्हणून .''
''नाही म्हणत हे मात्र खरं ''.
'' बुवा आता ८० वर्षाचे आहेत पण त्यांची तब्येत ठणठणीत. मग त्यांच्या शिष्यांना कार्यक्रम कसे मिळणार? ओरिजिनल समोर असताना डुप्लिकेटना कोण बोलवणार? बुवांना मिळणाऱ्या बिदागीतून तुला पाच टक्के तरी देतात का ते, कार्यक्रम ठरला की तुझी किती धावपळ, मग ते चार-पाच दिवस तुला धड झोप नसते, कार्यक्रमाची तयारी तुझ्यावर सोपवून ते निर्धास्त असतात. फक्त आयत्यावेळी येऊन गायचं. सर्व कौतुक वा वा बुवांना. तू मागे बसून साथ संगत करत असतोस. त्यांचा स्वर कुठे कमी पडतोय असं वाटलं की स्वर बरोबर ॲडजस्ट करतोस, म्हणून बुवांचं गाणं परिपूर्ण होतं. पण बुवा ना त्याची किंमत नसते.''

'' किंमत नसते असं म्हणू नकोस अनघा, लोकांकडे माझं कौतुक करत असतात, अर्जुन पाठीमागे असतो म्हणून मी निर्धास्त असतो.''

'' आणि शिव्या ही घालतात. जरा कुठे साथीदार चुकला की शिव्या तुला, कोण साथीदार उशिरा आला की शिव्या तुला, पडद्याच्या पाठीमागे बाटलीची सोय केली नसेल तर शिव्या तुला'' .

'' मग मी तरी काय करू, बुवा खेरीज माझं अस्तित्वच नाही, अशी परिस्थिती आहे. ''

'' मग समज, उद्या समजा बुवांचं काही बरं वाईट झालं तर तू काय करशील? तो बुवांचा मुलगा परेश नाही तरी तुझ्यावर जळफळत असतो, तुला हाकलून देईल तो.''
'' गेली वीस वर्षे मी बुवा समवेत आहे, आता अचानक वेगळा होऊ?''

एवढ्यात जेवण आले. अनघाने दोन प्लेटमध्ये जेवण वाढून घेतले आणि ती जेवता जेवता बोलू लागली. '' बुवांना न दुखवता हळूहळू वेगळे कार्यक्रम घ्यायचे, माझ्या डोक्यात एक कल्पना आली आहे. तू आता ३२ वर्षाचा आहेस, उंच, गोरा देखणा आहेस. भाषा स्वच्छ आहे, माझ्या मते तू संगीत नाटकांसाठी योग्य आहेस.''

'' मी आणि संगीत नाटक, कधी स्टेजवर उभा राहिलो नाही अजून, स्टेजवर

जातो तो बैठक घालून बसतो गाण्यासाठी.''
'' सरावानंतर सर्व जमेल, स्टेजवर काय उद्याच जायचं नसतं, त्याकरिता तालमी असतात, घोटून घोटून तालमी घेतल्या जातात, मग रंगीत तालमी असतात आणि स्टेजवर सहकलाकार पण असतात. ''
'' पण मला नाटकात कोण घेईल ?''
''निश्चित घेतील, आपली परांजपे नाट्य कंपनी आहे ना, ती संगीत नाटकांसाठी प्रसिद्ध आहे, पण आता वर्षाताई वयस्क दिसू लागल्यात, त्यांच्या नाटक कंपनीत तरुण गायक नसल्याने त्यांची नाटके बंद झाली आहेत. पण त्यांना नाटके सुरू करायची आहेत, तरुण गायक नटाच्या त्या शोधात आहेत''.
'' पण त्यांना विचारणार कोण ?''
मी विचारीन. '' तू संगीत नाटकात काम करायला तयार असशील तर मी उद्या त्यांच्या घरी जाते, एकदा तू नाटकात गायक नट म्हणून प्रसिद्ध झालास की मग तुला मैफिलीसाठी विचारतात की नाही बघ.'' अर्जुनने मान डोलावली.

जेवण संपवून हॉटेल बिल देऊन ती दोघं सदाशिव पेठेतील आपल्या घरी गेली. अर्जुनची आई जागीच होती, ती दोघं बाहेरून जेवून येणार आहेत याची तिला कल्पना होती. दुसऱ्या दिवशी अनघा वर्षाताईंकडे गेली, वर्षाताईंकडे संगीत शिकायला येणारी मुलं होती, ती आता घरी गेली होती, त्यामुळे वर्षाताई निवांत बसल्या होत्या. अनघा घराचे फाटक उघडून आत गेली, तेव्हा वर्षाताईंनी तिला –
''या '' म्हंटल. ''कोण आपण ?'' वर्षा ताईंनी विचारले.
''वर्षाताई, मी अनघा साठे, अर्जुन साठेची पत्नी ''.
'' अर्जुन म्हणजे बुवांचा साथीदार, अरे वा! अर्जुन म्हणजे मोठा कलाकार, इकडे कशी काय आलीस ?''
'' वर्षाताई, अर्जुनची इच्छा आहे संगीत नाटकात काम करायची, नाटकामुळे प्रेक्षकांची आणि स्टेजची भीती चेपते म्हणून.''
'' अर्जुन संगीत नाटकात काम करणार ?'' क्षणार्धात वर्षाताईंच्या डोळ्यासमोर उंच, गोरा, भरदार शरीर यष्टीचा अर्जुन साठे उभा राहिला. शिवाय बुवांच्या तालमीत उत्तम गाणारा. '' अगं मी खरंतर अशा तरुण गायक नटाच्या शोधात आहे, मी आमची नाटके बंद केलीत कारण पुण्यातील बहुतेक गायक नट वृद्ध झालेत, अगदी माझ्यासकट ( वर्षाताई हसल्या ) आणि संगीतावर प्रेम करणारे नट राहिले नाहीत. त्यांना टीव्ही  मालिका किंवा रियालिटी शो ची आवड. त्यामुळे अर्जुन काम करायला तयार असेल तर मी माझ्या कंपनीची संगीत नाटके सुरू करणार, एक चांगला देखणा गायक नट मिळाल्यावर इतर कलाकार जमवायला वेळ लागत नाही.

अर्जुन काम करायला तयार असेल तर मी प्रथम ''संगीत सौभद्र ' प्रथम उभे करीन. कृष्णाच्या भूमिकेत अर्जुन सारखा देखणा गायक नट हवा, एकदा घेऊन ये अर्जुनला ''.

'' उद्याच येतो आम्ही '' असे म्हणताना अनघाच्या मनात भीती वाटत होती, अर्जुन कृष्ण तर रुक्मिणी कोण करणार? स्वतः वर्षाताई करणार की काय? वर्षाताईंचं आता वय दिसायला लागलय,' असे विचार अनघाच्या मनात येत असतानाच फाटक उघडून एक वीस-बावीस वर्षाची देखणी गॉगल लावलेली तरुणी आत आली. वर्षाताई तिच्याकडे पहात म्हणाल्या

'' अनघा या नवीन 'सौभद्र'मध्ये ही माझी मुलगी मयुरी रुक्मिणीच्या भूमिकेत असेल.'' अनघा मयुरीकडे पाहतच राहिली. एकदम देखणी मुलगी.

'' अनघा ही उत्तम गाते बरं का, माझ्याकडे शिकतेच शिवाय अनंतराव धर्माधिकारी बुवांकडे पण शिकते. '' मयुरी येऊन आईच्या शेजारी बसली, तिच्या चेहऱ्यावर '' ही कोण?'' असं प्रश्नचिन्ह होतं.

'' अगं ही अनघा, बुवांचा साथीदार अर्जुन आहे ना त्याची पत्नी.''

'' हो का नमस्ते.'' मयुरीने अनघाला नमस्कार केला.

'' अगं अर्जुनला संगीत नाटकामध्ये काम करण्याची इच्छा आहे हे सांगायला अनघा आली होती, मी तिला म्हटलं, अर्जुन नाटकात काम करत असेल तर आम्ही''सौभद्र'' चा विचार करू.''

'' हो हो अर्जुन सर काम करत असतील तर छानच होईल.''

''अर्जुन कृष्ण आणि तू रुक्मिणी. नारद, सुभद्रा, अर्जुन ही पात्रे शोधायला लागतील.''

'' अनंतरावांच्या क्लासमध्ये काही नवीन नट तयार होत आहेत, त्यांना मी विचारते उद्या ''

'' हो, उद्या त्यांना घेऊनच ये.

आता श्रावण महिन्यापासून नाटकाचा व्यवसाय सुरू होतो. गणपतीच्या अकरा दिवसात साखर कारखान्यांना नाटके हवी असतात, आपलं नाटक एका महिन्यात स्टेजवर जायला पाहिजे. ''अनघा, तू उद्याच अर्जुनला घेऊन ये.'' तेवढ्यात त्या आतल्या खोलीत गेल्या आणि 'संगीत सौभद्र' चे पुस्तक घेऊन आल्या. '' हे घे अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे अजरामर '' सौभद्र ''. अर्जुनला वाचायला सांग. अनघा आनंदाने घरी गेली, दुसऱ्या दिवशी पुन्हा अर्जुन आणि अनघा वर्षाताईंकडे आली. मयुरीने आपल्या क्लासमधून तीन तरुण पुरुष कलाकार आणि दोन स्त्री कलाकार आणले होते. काल अनघाने नेलेले सौभद्रचे पुस्तक अर्जुनने

पूर्ण वाचलेच होत. वर्षाताईंनी अर्जुनला कृष्णाची भूमिका, त्याचा वावर, बोलणे हे समजावून सांगितले. गाणी पाठ करायला दिली. नारद, सुभद्रा, बलराम, अर्जुन हे पण निवडले गेले. आता रोज चार पाच तास 'सौभद्र' च्या तालमी सुरू झाल्या. मयुरीला तसे सर्व नाटक पाठच होते, गाणी पाठ होती. अर्जुनने झटपट पाठांतर केले. सहाव्या दिवसापासून त्यांच्या उभ्याने तालमी सुरू झाल्या. अर्जुन आणि मयुरी यांच्या कृष्ण आणि रुक्मिणीच्या संवादासह हालचाली वर्षाताईंनी बसवल्या.

नारदाच्या भूमिकेसाठी भरत हा एक चांगला नवीन तरुण मुलगा मिळाला. संगीत साथ करणारे परांजपे नाट्यमंडळीचे नेहमीचे होतेच. ते येऊन गाणी बसवू लागले. वर्षाताईंनी ठरवले सुदैवाने यावेळी सर्व तरुण मंडळी मिळाली आहेत, तर नेपथ्य पण नवीनच करायचे. वर्षाताईंनी नवीन प्लॉट्स तयार केले. प्रायोगिक नाटकांसाठी उत्तम प्रकाशयोजना करणारा सहाय्यक प्रकाश योजनेसाठी बोलावला गेला. वर्षाताईंनी कपडेपट नवीनच बनवले. मागील पडदे गॅलरी सर्व चकाचक नवीन. वर्षाताईंना अंदाज आला होता हे नाटक चांगला धंदा करणार. नाटकाच्या तीन रंगीत तालमी झाल्या आणि परांजपे नाट्यमंडळीचे पुण्याच्या टिळक नाट्य मंदिरमध्ये सलग चार प्रयोग लावले. लोकात कुतुहूल निर्माण झाले. अर्जुन साठेला गायक म्हणून लोक ओळखत होतेच तो कृष्णाची भूमिका करणार होता. वर्षाताईंची तरुण मुलगी मयुरी रुक्मिणी करणार होती. भरत हा नवीन गायक नारद करणार होता.

## स्थळ - टिळक नाट्य मंदिर, पुणे

सायंकाळी पाच वाजता पडद्यामागे पात्र परिचय सुरू झाला. परांजपे नाट्यमंडळी पुणे सविनय सादर करीत आहे, अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे अजरामर **नाटक** '' संगीत सौभद्र''

**कलाकार - नारद -** भरत जोशी, **कृष्ण-** अर्जुन साठे आणि **द्रौपदी -** मयुरी परांजपे.

नाटक हाउसफुल्ल होतं.

पहिल्यांदा नारदाचा प्रवेश '' लग्नाला जातो मी......, म्हणत त्याने प्रेक्षकांची मने जिंकली. मग अर्जुन, बलराम, सुभद्रा ही पात्र येऊन गेली आणि मग रुक्मिणीच्या महालातील प्रवेश सुरू झाला.

रुक्मिणीवर प्रकाशझोत पडला मात्र लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. तरुण देखणी, रुक्मिणी त्यांनी गेल्या कित्येक वर्षात पहिली नव्हती. मग रुक्मिणीच्या महालात आला कृष्ण. उंच देखणा अर्जुन साठे कृष्णाच्या भूमिकेत शोभून दिसत होता. मग नाट्यसंगीतांची मेजवानी सुरू झाली, '' नभ मेघानी आक्रमिले, नच सुंदरी करी कोपा '' आणि मग कृष्ण रुक्मिणीला सांगतो, बोलण्याच्या नादात रात्र संपत

आली आणि आता पहाट होते आहे,

अचानक स्टेजवरील लाईट मंद झाले. खिडकीतून मंद निळा प्रकाश कृष्ण आणि रुक्मिणीच्या चेहऱ्यावर पडला आणि कृष्ण गाऊ लागला '' प्रिये पहा, रात्रीचा समय सरुनी...... प्रिये पहा!'' प्रेक्षकांनी अख्ख नाट्यगृह डोक्यावर घेतलं.
'' वन्स मोअर, वन्स मोअरने '' नाट्यगृह दणाणलं, विंगेतून वर्षाताई आनंदाश्रू पुसत होत्या, त्यांच्या बाजूला अनघा पण होती, तिच्याही डोळ्यातून आनंदाश्रू गळत होते.

चार तासानंतर नाटक संपले, प्रेक्षकांचा लोंढा कलाकारांना भेटायला स्टेजवर आला. सर्वांना अतिशय उत्तम असे 'सौभद्र' बघायला मिळाले. सर्व तरुण रसरशीत कलाकार. टिळक नाट्यमंदिर मधले ओळीने चारही प्रयोग हाऊसफुल्ल झाले. मग दोन दिवसांची विश्रांती घेऊन कोथरूडच्या नाट्य मंदिरातही चार प्रयोग हाऊसफुल्ल झाले. पुण्याच्या सर्व पेपर्समध्ये कौतुक करणारी उत्तम परीक्षण आली. प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी नाट्यगृहाकडे वळल्या होत्या. मग पिंपरी चिंचवडचे प्रयोग पण हाऊसफुल्ल झाले. मग मुंबई दौरा, ओळीने आठ प्रयोग, सर्व प्रयोग हाउसफुल. मग नाशिक सोलापूर सांगली, कोल्हापूर, सर्व ठिकाणी हाउसफुल चा झेंडा. .... मग गोवा दौरा सुरू झाला, गोव्यातील वर्तमानपत्रातून अर्जुनच्या गाण्याचे कौतुक सुरू झाले होते, इथेही प्रेक्षकांनी प्रयोगांना गर्दी केली. गोव्याच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या घरी अर्जुनचे गाणे ठेवले.

खरंतर अर्जुन याआधी स्वतंत्र असा कधीही गायला नव्हता. त्याला भीती वाटत होती, पण अनघा त्याच्या मागे होती '' घाबरू नकोस, हीच संधी आहे, तुझं नाव लोकांपर्यंत पोहोचू दे.'' अर्जुन ने गोव्यातील साथीदार घेऊन उत्तम कार्यक्रम सादर केला. गोव्यातील अनेक मातब्बर लोकांची अर्जुनची ओळख झाली. त्याला गोव्यात अनेक सुपाऱ्या येऊ लागल्या. पण अनघाने 'सौभद्रचे ' प्रयोग सुरू असल्याने या सुपाऱ्या स्वीकारल्या नाहीत. पुन्हा एकदा पुण्यात परांजपे नाट्यमंडळीचे 'सौभद्र' ने पुण्यात धुमाकूळ घातला. याच काळात पुण्यात दुसरीकडे एक नाट्य रंगलं होतं.

## स्थळ - डेक्कन जवळील बुवांचा बंगला

कोचवर बुवा सुपारी कातरत बसले होते. त्यांच्या समोरील खुर्चीवर बुवांच्या पत्नी मोहिनीबाई बसल्या होत्या. एवढ्यात बाहेरून बुवांचा मुलगा परेश आला.
**परेश -** बाबा, अर्जुनने गोव्यात मुख्यमंत्र्यांसमोर मैफिल केल्याची बातमी आहे. आणि ती चांगलीच गाजली म्हणे. गोव्याच्या वर्तमानपत्रात मोठ्या मोठ्या बातम्या आल्या आहेत. बाबा अर्जुन तुमचा शिष्य म्हणवता, मग एका शब्दाने त्याने तुम्हाला कळवलं

नाही.

**मोहिनीबाई -** मागचं सगळं विसरला अर्जुन. दहा वर्षाचा होता तेव्हापासून येथे येतोय. नाटकात भूमिका घेतली सांगितले नाही. आपल्या गुरुंना नाटकाला बोलावलं नाही. आता म्हणे गोव्यात मैफिली करायला लागला आहे. अहो एकदा त्याला बोलवा आणि खडसावून विचारा.

**बुवा -** खडसावून विचारायला त्याने काही कॉन्ट्रॅक्ट केलं नव्हतं माझ्याबरोबर. तो गेली वीस-बावीस वर्षे इथे येतो. मी त्याला गाणे शिकवतो, तो माझ्या कार्यक्रमाला साथ करतो, एवढचं.

**मोहिनीबाई -** एवढेच काय एवढेच, या बंगल्यावरचं अन्न खाल्लं त्याने, अन्नाला विसरू नये माणसाने.

**परेश-** बाबा आता तुमच्या मैफिलीत तो साथ करणार आहे की नाही?

**बुवा -** साथ करणे किंवा न करणे ही त्याची मर्जी, पण त्याची साथ संगत असल्याशिवाय माझं गाणं रंगत नाही हे खरे.

**परेश-** पण तुम्ही त्याचेवर अवलंबून राहू नका. दुसरा कुणीतरी शोधा.

**बुवा -** ( चिडून ) मग तू येतो साथ करायला? तुझ्या जन्मापासून तू इथे राहतोस,

**परेश-** तुम्हाला माहीत आहे मला तुमच्या गाण्यात किंवा मैफिलीत इंटरेस्ट नाही.

**बुवा -** मग कशात इंटरेस्ट आहे? दारू पिण्यात की रेस खेळण्यात?

**मोहिनीबाई -** जाऊदे तो विषय, पहिल्यांदा अर्जुनचे काय ते पहा.

**परेश -** बाबा तुमचा २० तारीखला नाशिकला प्रयोग ठरतो आहे, २१ तारीखला पनवेल आहे, त्याला निरोप धाडा, येतो का पहा, मी सांगतो त्याच्या नाटकाचा दौरा २० तारीख पासून बेळगावच्या बाजूला आहे, तेव्हा तो येणार नाही.

**मोहिनीबाई -** परेश तू मुद्दाम अर्जुनला फोन कर, त्याला सांग २० आणि २१ चे कार्यक्रम ठरले, मग काय करतो बघ. परेशने अर्जुनला फोन करून बुवांचे कार्यक्रम २० आणि २१ तारखेला ठरल्याचे सांगितले, अर्जुनला काय करावे हे कळेना. तो तातडीने वर्षाताईंकडे गेला.

वर्षाताईंनी पाहिलं 'सौभद्र' नाटकाचा प्रयोग २० तारखेला निपाणी आणि २१ तारीखला इचलकरंजी होता. २२ तारीखला बेळगावचा प्रयोग करून कंपनी गोव्यात जायची होती.

अर्जुन हा परांजपे नाट्यमंडळीचा हुकमाचा एक्का होता. त्याच्या गाण्यासाठी लोक पुन्हा पुन्हा नाटकाला येत होते. पण वर्षाताईंना हेही माहीत होते, अर्जुन हा बुवांचा उजवा हात आहे. इतकी वर्ष तो बुवाना साथ करत आहे. वर्षाताईंनी २० आणि २१ तारखेचे नाटकाचे प्रयोग रद्द केले.

२२ तारीख पासूनच बेळगावहून दौरा चालू ठेवला. अर्जुन नेहमीप्रमाणे २० तारीखला नाशिकला पोहोचला. स्टेजवर जाऊन साथीदारांसह हार्मोनियम तबला यांची तालीम घेऊ लागला. नेहमीप्रमाणे साऊंड सिस्टिम व्यवस्थित आहे की नाही याची त्याने दोन दोन वेळा खात्री केली. कार्यक्रमानंतर बुवांची ''बाटली'' ची व्यवस्था आहे की नाही हे पाहिले.

साडेआठ वाजता बुवा आले. ते सर्व साथीदारांना भेटले पण अर्जुनकडे त्यांनी ढुंकूनही पाहिले नाही. बुवा बैठकीवर बसल्यानंतर अर्जुन मागे बसला. मग तंबोरा जुळण्याचे काम सुरू झाले. मनासारखा तंबोरा जुळल्यानंतर आणि कार्यक्रम सुरू केला, कार्यक्रम नेहमीप्रमाणे रंगला आणि तीन तासानंतर संपला. नेहमीप्रमाणे अर्जुन दहा मिनिटानंतर बाहेर पडला.

वर्षाताईंनी ड्रायव्हरसह गाडी तयार ठेवली होती त्यात बसून तो पुण्याला रवाना झाला. दुसऱ्या दिवशी अर्जुन पनवेलच्या कार्यक्रमाला वेळेत हजर झाला. कालच्या सारखीच सर्व तयारी पाहिली आणि आणि कार्यक्रम वेळेत सुरू झाला आणि तीन तासानंतर संपला. मग अर्जुन पुण्याला रवाना झाला.

परेश आता मुद्दाम अर्जुनचा नाटकदौरा असे तेव्हा बुवांचे कार्यक्रम ठेवू लागला. नाटकाचे प्रयोग आणि बुवांचे कार्यक्रम यात अर्जुनची फार ओढाताण होऊ लागली. त्यामुळे त्याची चिडचिड होत होती. पण अनघा त्याला शांत ठेवण्याचा प्रयत्न करत होती.

२० जूनला 'सौभद्र' चा ठाण्यात दुपारी प्रयोग होता. परेशने बुवांचा त्याच दिवशी रात्री नऊ वाजता कार्यक्रम खंडाळ्यात ठेवला होता. त्यामुळे साडेतीनचे नाटक साडेसहा पर्यंत संपवून खंडाळ्याला जायचे अर्जुनने ठरवले होते. अर्जुनने साडेसहाला प्रयोग संपवला आणि धावत धावत बाहेर येऊन वर्षाताईंनी ठेवलेल्या गाडीत बसला. सदाशिव ड्रायव्हर सीटवर बसूनच होता. साडेआठ पर्यंत खंडाळ्याला पोहोचायला हवे होते. संध्याकाळच्या गर्दीत सदाशिवने गाडी जोरात घेतली. गाडीने पनवेल मागे टाकले, स्पीड वाढव अजून स्पीड वाढव म्हणू लागला, म्हणून सदाशिवने गाडीचा स्पीड १२५ च्या पुढे घेतला, आणि एका वळणावर गाडी दुभाजकावर आदळली आणि लांब फेकली गेली. मागच्या गाड्या थांबल्या. पोलिसांना फोन केले गेले. ॲम्बुलन्स मागवली गेली. पोलिसांची व्हॅन आली आणि एका बाजूचा पत्रा कापून ड्रायव्हर सदाशिव ची डेडबॉडी बाहेर काढली. अर्जुन मागच्या सीटवर पण ड्रायव्हरच्या विरुद्ध सीटवर बसल्यामुळे रक्तबंबाळ झाला आणि विव्हळत होता. त्याला बाहेर काढून प्रथम पनवेलच्या इस्पितळात आणि मग ठाण्याला ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये हलवले गेले.

अनघा पुण्यात होती, वर्षाताई पण पुण्यात होत्या. वर्षाताई गाडी घेऊन तिच्या घरी गेल्या. अनघाला आणि अर्जुनच्या आईला गाडीत घालून त्या ठाण्याच्या दिशेने निघाल्या. अनघाचा आणि अर्जुनच्या आईचा आक्रोश सुरू होता. वर्षाताई त्यांना धीर देत होत्या, डॉक्टरांची टीम अर्जुनवर उपचार करत होती, विविध चॅनेलवर अर्जुनच्या अपघाताची बातमी फोटोसकट सांगितली जात होती. सर्व लोक हळहळत होते. '' अर्जुन बरा होऊ दे '' म्हणून देवाला नवस घालत होते.

बुवाना ही बातमी खंडाळ्यात समजली. परेश कार्यक्रम चालू करा म्हणत होता, पण बुवांनी कार्यक्रम रद्द केला. बुवांचे सर्व वादक हे अर्जुनचे नेहमीचे सवंगडी, अर्जुनचा अपघाताचे बातमी ऐकून ते रडू लागले. ती सर्व मंडळी भाड्याची गाडी करून ठाण्याकडे रवाना झाली. बुवाना हॉस्पिटलमध्ये जायचे होते, पण परेशने त्यांना जाऊ दिले नाही. त्याने जबरदस्तीने त्यांना गाडीत बसवले आणि तो पुण्याला घेऊन आला. बुवा गप्प बसून होते. मनातल्या मनात रडत होते. अर्जुन दहा वर्षाचा असताना त्याची आई आपल्याकडे घेऊन आली होती. अर्जुनचे वडील पण गायक होते. लहान मोठ्या बैठका करत होते पण हृदयविकाराने ते लवकर गेले.......

अनघा आणि अर्जुनची आई हॉस्पिटलमध्ये पोहोचली. तेथे अनेक नाट्य कलाकार सिनेमा टीव्हीची मंडळी जमली होती. आतमध्ये डॉक्टरांची टीम तातडीची ऑपरेशन्स करत होती. रक्त चढवले जात होते. वर्षाताई हॉस्पिटलच्या डीनला भेटल्या. '' कितीही खर्च होऊ देत, गरज असेल तर बाहेरचे डॉक्टर्स बोलवा पण अर्जुन ला बरा करा'' असा निरोप तिने दिला. पहाटे तीन वाजता डॉक्टरांची टीम बाहेर आली. '' सध्या तरी तो धोक्याच्या बाहेर आहे, आता यापुढे कसा रिस्पॉन्स देतो तो पाहू .'' असे डॉक्टरने अनघाला आणि वर्षाताईला सांगितले.

अनघा तेथेच थांबली, वर्षाताई अर्जुनच्या आईला तिच्या बहिणीकडे घेऊन गेल्या. सर्व प्रमुख वर्तमानपत्रातून 'सौभद्र' मधल्या 'कृष्णाला' अपघात झाला, अशा मथळ्याच्या बातम्या आल्या होत्या. अर्जुनचे श्रीकृष्णाच्या वेशातील फोटो झळकले होते. त्याची गाणी ऐकवली जात होती. शहरापासून खेड्यापर्यंतचे लोक अर्जुनच्या स्वास्थ्यासाठी प्रार्थना करत होते. नवस बोलत होते. पंधरा दिवस झाले तरी अर्जुनच्या तब्येतीत फार बदल दिसेना, डॉक्टरांना त्याच्या मेंदूच्या कार्यक्षमतेबद्दल काळजी वाटत होती. जवळची माणसे हॉस्पिटलमध्ये येऊन त्याच्या रूममध्ये त्याला बघून जात होती. अनघाशी बोलून तिला धीर देत होती.

इकडे बुवांच्या बंगल्यात बुवा बेचैन झाले होते. वर्तमानपत्रातील बातमीप्रमाणे अर्जुन अजून शुद्धीवर येत नव्हता. बुवाना अर्जुनला भेटायला जायचे होते. पण मोहिनीबाई आणि परेश त्यांचेवर लक्ष ठेवून होते. त्यांना भेटायला जाऊ देत

नव्हते. पण एकदिवशी बुवांनी ठरविले, आता या दोघांचे ऐकायचे नाही त्यांना त्यांची जागा दाखवायची.

सकाळी सकाळी फोन करून त्यांनी त्यांचा ड्रायव्हर मोहनला ‘ टाकी फुल्ल कर ’ असा निरोप दिला. आठ वाजता मोहन गाडी घेऊन आला, बूवा आपल्या खोलीतून दाराकडे निघाले. हॉलमध्ये मोहिनीबाई कोचवर बसलेल्या होत्या. बाहेर जायची तयारी केलेले बुवा, बाहेर पडताच, मोहिनी बाईंनी मोठ्याने विचारले ‘‘ कुठे निघालात ?

बुवा उद्‌गारले ‘‘ अर्जुनला भेटायला जातोय ठाण्याला, का तुझी भीती आहे का ?’’

‘‘ जायचं नाही, तो खाल्ल्या मिठाला जागला नाही.’’

‘‘मी जाणार, कोण मला अडवतो ते मी पाहतो.’’

तेवढ्यात परेश बाहेर आला ‘‘ बाबा बाहेर पडू नका, वाईट परिणाम होतील. ’’

‘‘ अरे जा रे, पाच पैसे कमवण्याची अक्कल नाही, मी पैसे कमवतो आणि तू उधळतोस.’’

मोहिनीबाई संतापाने बोलल्या ‘‘ तुम्ही बाहेर पडला तर आम्ही घरात राहणार नाही.’’

‘‘ चालते व्हा. एक मिनिट थांबू नका इथे ’’ बुवा कडाडले आणि घरातून बाहेर पडले. आणि त्यांनी मोहनला गाडी बँकेकडे घ्यायला सांगितली. मोहनने बुवांच्या बँकेकडे गाडी घेतली. बुवा तडक बँक मॅनेजरच्या केबिनमध्ये गेले. स्वतः बुवा बँकेत आले म्हणून बँक मॅनेजर उभे राहिले. बुवाने आपले चेकबुक हरवले असल्याने ते रद्द करावे असा अर्ज लिहून दिला. कारण ते चेकबुक परेश वापरत होता, तसेच परेश वापरत असलेले एटीएम कार्ड रद्द करण्याचा अर्ज दिला. तेथून मोहनला ‘‘ गाडी ठाण्याकडे घे’’ असं सांगितलं आणि ते मागे डोके टेकून बसले.

तीन तासाच्या पुणे ते ठाणे या प्रवासात छोटा अर्जुन तो आता गायक अर्जुन डोळ्यासमोर येत होता… दुपारी दोनच्या सुमारास बुवांची गाडी जुपिटर हॉस्पिटलच्या आवारात शिरली, बुवा खाली उतरले आणि हॉस्पिटलच्या दिशेने चालू लागले. भारतातील सुप्रसिद्ध गायक बुवा आपल्या हॉस्पिटलमध्ये आल्याने हॉस्पिटल मधील ऑफिस स्टाफ पुढे आला. हॉस्पिटल मधील अधिकाऱ्यांसह बुवा अर्जुनच्या रूमकडे चालू लागले.

बुवा खोलीत आले, अनघा बेड जवळ बसली होती. बुवा आत येताच अनघा उठली. बुवांनी अर्जुनकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावरून मायेने हात फिरवला. अनघा उभी होती तिच्या डोक्यावर हात ठेवला. बुवाना भरून आलं होतं. अनघा पण डोळे टिपत होती.

सद्‌गदीत स्वराने बुवा अनघाला म्हणाले ‘‘ मुली रडू नकोस. मी दत्ताचा

उपासक आहे. दत्त महाराज अर्जुनच्या पाठीमागे आहेत. माझं निगडित दत्त मंदिर आहे हे तुला माहिती आहेच. दरवर्षी दत्त जयंतीला माझं गाणं त्या दत्त मंदिरात ठरलेलं असतं. दरवर्षी अर्जुन साथीला असतोच. दत्त जयंतीला अजून साडेचार महिने आहेत. यावर्षी या दत्त जयंतीला माझं आणि अर्जुनचं संयुक्त गाणं दत्त महाराजांसमोर होणार आहे. तोपर्यंत अर्जुनला खणखणीत बरं व्हावंच लागेल. तो दत्त जयंतीला दत्त महाराजांकडे स्वतःच्या पायांनी येणार आहे आणि माझ्या समवेत गाणे ही म्हणणार आहे. हा माझा शब्द आहे आणि अर्जुनचा गुरु म्हणून अर्जुनला आज्ञा आहे. त्याला निगडित दत्त जयंतीला यावेच लागेल.'' बुवा गप्प झाले व मोठ्या प्रयासाने डोळ्यातील अश्रू थोपवत होते. अनघा मुसमुसत होती.

पुन्हा एकदा अनघाच्या डोक्यावर हात ठेवून बुवा बाहेर पडले. बुवा घरी पोहोचले, मोहिनीबाई आणि परेश रागारागाने त्यांचेकडे पाहत होती. बुवा कडाडले '' परेश यापुढे माझे कार्यक्रम ठरवू नकोस. मी आता ८० वर्षे पार केली. आता मला निवृत्ती घेऊ दे. दुसऱ्यांची गाणी ऐकू दे. यापुढे मला विचारल्याशिवाय बँकेतून पैसे काढायचे नाही. मी बँकेला तशी सूचना देऊन ठेवली आहे, आणि स्वतः काहीतरी नोकरी धंदा बघा. बापाच्या जीवावर खूप मजा मारलीत आता यापुढे नाही.''

बुवा येऊन गेल्यानंतर अर्जुनची तब्येत सुधारू लागली. त्याच्यावर उपचार करणारे डॉक्टर्स आता समाधानी होते. हळूहळू अर्जुन डोळे उघडू लागला. पातळ पदार्थ घेऊ लागला. पुन्हा एकदा न्यूरोलॉजिस्टकडून त्याच्या सर्व तपासण्या झाल्या. त्याच्या तब्येतीत प्रगती दिसत होती. हळूहळू तो हात हलवू लागला. पाय हलवू लागला. दिवाळीपर्यंत अर्जुन वॉकर घेऊन चालू लागला.

दिवाळीनंतर पंधरा दिवसांनी त्याला हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाला. घरी आल्यावर अनघाची सेवा आणि आईच्या आशीर्वादाने त्याच्या तब्येतीत झटपट सुधारणा दिसू लागली. बसल्या बसल्या अर्जुनने गाण्याचा रियाज सुरू केला. हल्ली दर आठ दिवसांनी बुवा अर्जुनच्या घरी येत होते. त्याच्या तब्येतीतील प्रगती पाहत होते. बळे बळे अनघाच्या हातात पैसे कोंबत होते. वर्षाताई कन्या मयुरीसह येतच होत्या. येताना भाजी फळे आणत होत्या. बुवा आता घरी येऊन अर्जुनला गाणं शिकवत होते. त्याच्या रियाझवर लक्ष ठेवत होते. नोव्हेंबर अखेरपर्यंत अर्जुन घरातल्या घरात फिरू लागला.

आता दत्तजयंतीच्या उत्सवाची सर्वजण वाट पाहत होते. अर्जुन बरा झाला आणि बुवा निश्चिन्त झाले. आता दत्तजयंतीला दत्तमंदिरात कार्यक्रम होणार होता.

## स्थळ - निगडी येथील दत्त मंदिर

निगडीतील दत्त मंदिरात दत्त जयंतीची गडबड सुरू होती. बुवा दोन दिवस आधीच हजर झाले होते. सर्व तयारी जातीने पाहत होते. मोठा मंडप घातला होता. खूप महिन्यांनी बुवा गाणार होते, अर्जुन पहिल्यांदाच बुवांसमोर गाणार होता. दत्त जन्माचा कार्यक्रम नेहमीसारखा पण जास्त उत्साहाने पार पडला. दुपारी महाप्रसाद होता. सायंकाळी सातला बुवांचे गाणे म्हणून लोक जमू लागली होती. गाण्यासाठी स्टेज सजवले होते. बुवांचे वादक सहकारी हजर झाले. वादक मंडळी अर्जुनची वाट पाहत होती. साडेपाच वाजता अर्जुन वर्षाताईंच्या गाडीतून आला. सर्व वादक सहकाऱ्यांची त्याने चौकशी केली. बुवांनी त्याला आपल्या जवळ बसवले आणि आज कुठले कुठले राग गायचे आहेत याची माहिती दिली. बरोबर सात वाजता बुवा बाहेर आले आणि स्टेजवर बसले. सर्व वादक मंडळी तयारच होती.

अर्जुन येऊन बुवांच्या मागे बसला. बुवानी त्याच्या हाताला धरून आपल्या शेजारी बसविले. तंबोरे मनासारखे जुळेपर्यंत बुवा आपल्या गाण्याला सुरुवात करत नसत. तंबोरे मनासारखे जुळले आणि बुवांनी एका रागाने सुरुवात केली. त्यातून हळूच यमन, पुरिया, शुद्ध कल्याण करून आलापी सुरु केली. धीर गंभीरपणे आलापीतून तो राग श्रोत्यांसमोर ठेवला. राग फुलत गेला तशी त्याची लय वाढवली. मग वरचा षडज आला, तेव्हा श्रोते बेभान झाले. दृत सुरू केल्यानंतर तानांची नुसती बरसात केली. मग एक नाट्यसंगीत म्हणून मध्यंतर केले.

मध्यंतरानंतर अर्जुनला गायला सांगितले. अर्जुनने बुवाना नमस्कार केला. श्रोत्यांना नमस्कार केला आणि गायला सुरुवात केली. दरबारी, मालकंस,मिया – मल्हार, अभोगी एकापाठोपाठ एक राग श्रोत्यांच्या अंगावर येऊन आदळत होते आणि श्रोते चिंब भिजत होते. दोन तास अर्जुन गात होता. बुवान सकट सर्वजण मान हलवत होते. समेवर आले कीं मांडीवर थाप मारत होते.

मग बुवानी माईक हातात घेतला आणि ते श्रोत्यांसमोर बोलू लागले ''माझ्या गाण्यावर प्रेम करणाऱ्या तुम्हाला आणि भारतातील आणि परदेशातील असंख्य श्रोतेहो, तुम्हाला माझा नमस्कार. गेली ५० वर्षे माझ्यावर उदंड प्रेम केले, गेली ५० वर्षे मी भारतात आणि परदेशी गातो आहे, मैफिली करतो आहे, पण आता थांबायची वेळ आली आहे, मी माझ्या वयाची ८० वर्षे पुरी केली आहेत, आता मला विश्रांती हवी आहे, आता माझे शिष्य माझी जागा घेण्यासाठी उत्सुक आहेत, त्यांना जागा करून देणे हे माझे कर्तव्य आहे. आज दत्त महाराजांच्या साक्षीने गायलेली ही माझी शेवटची मैफिल.'' ही वाक्य बोलल्या बरोबर अर्जुनसह सर्व स्टेजवरील आणि श्रोते पण उभे राहिले.'' नाही नाही बुवा, तुम्ही गायले पाहिजे, तुम्ही निवृत्त होऊ

शकत नाही,'' असे ओरडून सांगत होते. अर्जुन पण बुवाना कळकळीने काही सांगत होता. पण बुवा ऐकत नव्हते. ..

बुवा स्टेजवर उभे राहिले. सोबत अर्जुनला उभे केले आणि बोलू लागले '' श्रोतेहो, हा माझा शिष्य अर्जुन साठे यापुढे माझी गादी चालवील. मी माझा निर्णय दत्त महाराजांच्या समोर घेतला आहे. तो बदलणे शक्य नाही. माझ्यावर जसं प्रेम केलं तसं माझ्या शिष्यावर प्रेम करा.'' असं म्हणून बुवांनी आपल्या गळ्यातली माळ अर्जुनच्या गळ्यात घातली. सर्व श्रोत्यांसमोर हे सर्व अचानक घडले त्यामुळे अर्जुन भारावून गेला. अर्जुनने बुवाना नमस्कार केला.

बुवानी अर्जुनला आपल्या बाजूला बसवले आणि दोघे भैरवी गाऊ लागले

**''सजल नयन नित धार बरसती, भावागंध त्या जळी मिसळती''**

बुवांचा आणि अर्जुनचा तो आर्त सूर ऐकून श्रोत्यांच्या डोळ्यातून केव्हाच अश्रू वाहू लागले होते, दोघेही भैरवी आळवीत होते.

**''थकले पैंजण, चरणही थकले, वृंदावनीचे मोहन सरले''**

या ओळी गाता गाता स्वतः बुवा, अर्जुन, सारे संगीत साथ करणारे आणि श्रोते रडू लागले. सारे वातावरण सर्द झाले होते. साऱ्यांचे कंठ दाटून आले होते. भैरवी संपली तसे बुवांनी तमाम श्रोत्यांना साष्टांग नमस्कार घातला. रडणाऱ्या बुवाना अर्जुनने आणि इतरांनी उभे केले. आज रडत रडत श्रोते बुवांना येऊन भेटत होते. पाणावलेल्या डोळ्यांनी गळा भेटा होत होत्या.

अर्जुनला मैफलीची निमंत्रणे येत होती, पण अनघा अर्जुनला म्हणाली '' पहिल्यांदा नाटक सुरू कर कारण संकटाच्या वेळी वर्षाताई पहाडासारख्या मागे उभ्या होत्या.'' परांजपे नाट्यमंडळीचे '' सौभद्र '' पुन्हा धुमधडाक्यात सुरू झाले. तसेच अर्जुनच्या मैफिली पण सुरू झाल्या. ''बुवांचा शिष्य'' असं नाव झाल्याने लोक कौतुकाने अर्जुनच्या गाण्याला गर्दी करत होती. आता सौभद्रचे मुंबईत सलग दहा प्रयोग लागले होते. रोजच्या मैफिली आणि नाट्यप्रयोग यामुळे अनघाला अर्जुन व्यवस्थित भेटत नव्हता. त्यामुळे अनघा कंपनी बरोबर मुंबईत आली.

एके दिवशी पहाटे पहाटे अनघा आणि अर्जुन फिरायला वरळ सी फेस वर आली. वरळी सी फेसच्या कठड्यावर बसल्यानंतर अनघा अर्जुन ला म्हणाली '' महाराष्ट्राच्या जनतेसाठी एवढी गाणी म्हणतोस, वन्स मोअर घेतोस, मग माझ्यासाठी गाणं कधी म्हणणार?'' अर्जुनने उगवणाऱ्या सूर्याकडे पहात आणि अनघाला तो सूर्य हाताने दाखवीत गाणे सुरू केले .

''रात्रीचा समय सरुनी, रात्रीचा समय सरुनी 'होत उष :काल हा, प्रिये पहा, प्रिये पहा, प्रिये पहा......! त्याची ही आळवणी ऐकून अनघा त्याला बिलगली.

# पाणक्या

लेखक – प्रदीप केळूसकर / ९४२२३८१२९९

विजयराव देवाचे स्तोत्र म्हणत होते, सायंकाळचे सात वाजले होते, स्तोत्र म्हणता म्हणता विजयरावांच्या डोक्यात विचार येत होते, थोड्यावेळाने कुकर लावू, दुपारी हॉटेल मधुन मागवलेली आमटी व भाजी आहे, फ्रिजमध्ये दही आहे. विजयरावांची ही नेहमीची पद्धत, सायंकाळी सातच्या सुमारास देवापुढे निरंजन लावायचे, मग स्तोत्र म्हणायचे. वसुधा आजारी पडेपर्यंत देवाचे सर्व तीच पहायची. त्यामुळे रात्री आठपर्यंत विजयराव पार्कमध्ये फिरत. वसुधा आजारी पडली आणि विजयरावांचे फिरणे थांबले. बाहेर पडायचे ते फक्त बाजारहाट करण्यासाठी, आता बऱ्याच गोष्टी ऑनलाइन होतात, त्यामुळे बाहेर जाणे कमीच, पेन्शन बँकेत जमा होते, सुनीलचा फोन रात्रौ नऊ वाजता नेहमीचाच, तोपर्यंत जेवून घ्यायचे आणि त्याच्या फोनची वाट पाहायची, असा त्यांचा दिनक्रम.

सव्वासातच्या सुमारास बेल वाजली, विजयरावांनी होल मधून बाहेर पाहिले, मध्यम वयाचा एक गृहस्थ बाहेर उभा होता. कोण पाहिजे? विजयरावांनी विचारले. ‘‘दादासाहेब एवढ्या वर्षांनी तुम्ही ओळखणार नाही मला.’’ ‘‘ दादासाहेब ’’ ही हाकच इंदूरची. इंदूरच्या घरात सर्वजण दादासाहेब म्हणत.

‘‘ तुम्ही इंदूरहून आलात का?’’ दादासाहेबांनी विचारले.

‘‘नाही, दादासाहेब मी शामू, तुमच्या इंदूरच्या वाड्यात कामाला होतो लहानपणी.

‘‘कोण शामू?’’ अरे तू म्हणजे......., दादासाहेब थोडं थोडं आठवू लागले.

‘‘ दादासाहेब मी शामू ‘‘पाणक्या ’’, तुमच्या दातेंच्या वाड्यावर मी पाणी भरायचो, आठवलं नाही का?’’

‘‘ अरे तो शामू?’’. दादासाहेबांनी संपूर्ण दार उघडलं.

‘‘ कुठे होतास इतकी वर्ष?’’ शामू आत आला आणि दादासाहेबांच्या पाया पडला.

‘‘ अरे एवढा मोठा झालास तू, माझ्या पाया काय पडतोस, ये ये, बस.’’

‘‘ नाही दादासाहेब पहिल्यांदा तुम्ही बसा. ’’

‘‘ बरं बाबा’’, म्हणत विजयराव कोचवर बसले. त्याच क्षणी शामू येऊन त्यांच्या पायाकडे बसला आणि त्यांचे पाय चुरू लागला.

‘‘ अरे शामू काय करतोस हे?, माझे पाय दाबतोस, केवढा मोठा झालास तू.’’ ‘‘ मोठा झालो इतरांसाठी, तुमच्यासाठी नाही दादासाहेब, अजून मी ‘पाणक्या’ शामूच आहे तुमच्यासाठी. तुम्ही माझे अन्नदाते मालक, तुमच्या वाड्यावर मिळणाऱ्या

तुकड्यावर माझे बालपण गेले, ते कसे विसरू ?''
'' ते जुने दिवस होते रे बाबा, इंदूरमध्ये आम्ही रावसाहेब, संस्थानिकांचे सरदार. पण ते सर्व संपले आता. या मुंबईत आम्हाला कोण विचारतो ?''
'' कोणी विचारो न विचारो, तुम्ही माझे अन्नदातेच आहात.''
'' ते असू दे, तू आधी त्या खुर्चीवर बस पाहू.'' तसा शामू एका लहानच्या स्टुलावर बसला.
'' कुठे होतास इतकी वर्ष ? माझ्या अंदाजाने ३५ –४० वर्षानंतर दिसतोस तू मला.''
'' हो दादासाहेब, इंदोरला तुमच्या वाड्यावर होतो तेव्हा आठ नऊ वर्षाचा होतो आणि तुम्ही कॉलेजमध्ये होतात.''
'' हो बहुतेक तेव्हा मी एम.कॉम.ला होतो. मग मी बँकेत लागलो आणि मग भारतभर बदल्या. शेवटी मुंबईत येऊन स्थायिक झालो.''
'' मग इंदूरचा वाडा आणि त्यातली संस्थानिकांचे सरदार एवढी माणसं ? नोकर मंडळी ? ''
'' सगळा पोकळ वासा होता तो, संस्थानिकांचे सरदार म्हणून सगळा खर्च सुरू होता. आमच्या पाच–सहा पिढ्यांनी नुसतं बसून खाल्लं, तळ्यात साठवलेलं पाणी किती दिवस पुरणार ? त्यासाठी झरा हवा असतो, तो झरा तलाव रिकामा करू देत नाही., आमच्या कुटुंबात झराच नव्हता. शेवटी मी निर्णय घेतला, कर्ज अंगावर येत होतं, सगळे डामडौल बंद केले. नोकर चाकर कमी केले, आईवडील गेल्यावर मी बँकेत नोकरी धरली.''
'' आणि दादासाहेब एवढा मोठा वाडा ? ''
'' वाडाही कोसळत होता मागून, तो विकला, आता त्या ठिकाणी मॉल उभा राहिलाय, कालाय तस्समय: नमः.
'' हो दादासाहेब, मी पाहून आलो.''
'' तू इंदूरला गेला होतास ?''
'' हो तर, तुमच्या शोधात होतो मी, दोन वर्षांपूर्वी खूप वर्षांनी भारतात आलो, पहिल्यांदा इंदूरला गेलो तर वाड्याच्या ठिकाणी मॉल उभा. शेवटी तुमचा पत्ता शोधत शोधत या ठिकाणी आलो.''
'' मग पत्ता मिळाला कसा ?''
'' इच्छा असली तर मार्ग सापडतो दादासाहेब, मी इंदूरहून बाहेर पडलो तेव्हा तुम्ही कोणत्यातरी बँकेत नोकरीला लागला होतात, हे माहीत होतं, मात्र कुठली बँक हे माहीत नव्हतं, मग मी भारतातील प्रमुख बँकांच्या ऑफिसमध्ये पत्र लिहून तुमचा पत्ता विचारला, पण तुमचा सध्याचा पत्ता कोणाला माहीत नव्हता. इंदोरमध्ये चौकशी

केली तेव्हा कोणी अचलपूर, नागपूर तर कोणी पंढरपूरचा पत्ता दिला, या प्रत्येक शहरात तुमचा पत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही, शेवटी मुंबईत जीपीओमध्ये या नावाचे पत्र कोणत्या पत्त्यावर देता अशी चौकशी केली आणि हा सांताक्रूझचा तुमचा पत्ता मिळाला.''

'' धन्य आहे तुझ्यापुढे, एवढी आठवण ठेवून तू येथे पोहोचलास याचे मला कौतुक वाटते, तू भेटलास आणि दादासाहेब अशी हाक मारलीस, मी इंदूरला असल्यासारखे वाटले. रम्य आठवणी होत्या रे त्या. आता मी मुंबईत एकटाच राहतो, बायको वसुधा चार वर्षांपूर्वी गेली. मुलगा सुनील जर्मनीत स्थायिक झालाय, तिथल्या मुलीशी लग्न करून तेथेच सेटल झालाय. इंदूरचा वाडा विकला मी कारण कर्ज फार झालं होतं. रावसाहेबांचा तोरा मिरवताना खर्च सुरूच होते. उत्पन्न नव्हते. आता परत इंदूरमध्ये जाऊन छोट्या घरात राहणे कमीपणाचे वाटते, नोकरीत शेवटचा स्टॉप मुंबई होता, सुनीलचे शिक्षण पण होते, या दृष्टीने मुंबईत सेटल झालो, पण इंदूर ते इंदूर, तिथली मजा मुंबईत नाही, स्वच्छ शहर, खाण्यापिण्याची लय लूट, गाणे संगीत भरपूर.

'' अरे शामू पण तू मुंबईत राहतोस कुठे ?''

'' दादासाहेब, आता यापुढे मी मुंबईतच राहणार आहे. याविषयी सर्व सांगतो नंतर, पण दादासाहेब, आज मात्र मी घरी जाणार आहे.''

'' अरे रहा ना, मी पण इथे एकटाच, कोण बोलायला पण नाही, सुनीलचा रोज रात्री नऊ वाजता फोन येतो, त्याची मुलगी आहे पाच वर्षाची तीपण बोलते. कधी कधी सून बोलते, बरं दुपारची आमटी भाजी आहे, दही आहे, भात लावतो थोडा.''

'' मी लावतो दादासाहेब, तुम्ही बसा. मला फक्त तांदळाचा डबा दाखवा.''

'' अरे मी करतो भात मला रोजची सवय आहे.''

'' नाही दादासाहेब, मी असताना तुम्हाला कसलेही काम करू देणार नाही, तुम्ही बसा.'' विजयरावांनी शामला तांदळाचा डबा दाखवला. त्यातून थोडे तांदूळ घेऊन श्यामने गॅसवर भात लावला. फ्रिज उघडून दही बाहेर काढलं, फ्रिज मधून दोन अंडी बाहेर काढून त्याचे हाफ आमलेट तयार केले. छोट्या पातेल्यात सकाळची आमटी भाजी झाकून ठेवली होती. ती गॅसवर गरम केली. भांड्याच्या स्टॅन्ड वरून ताटे, वाट्या, ग्लासेस बाहेर काढले आणि दोन ताटे तयार केली. त्यातील एक टेबलावर ठेवले. शेजारी पाणी ठेवले आणि म्हणाला ''दादासाहेब, बसा.''

विजयराव टेबलावर जेवायला बसले, त्यांनी पाहिलं दुसरे ताट घेऊन श्याम खाली फरशीवर बसला होता.

‘‘ अरे शाम वर बस जेवायला.’’

‘‘नाही दादासाहेब, तुम्ही जेवत असताना याआधी मी कधी तुमच्या सोबत बसलो नाही आणि यापुढे बसणार नाही.’’

‘‘ अरे शाम, ते दिवस गेले, मागचे विसरायचे आता.’’

‘‘ नाही विसरणार दादासाहेब, एका खेड्यातल्या अनाथ मुलाला तुमच्या घरात आश्रय मिळाला, ‘‘पाणक्या’’ होतो मी. तुमच्या घरात आडावरून पाणी भरत होतो. रोज प्रत्येकाच्या खोलीत पाण्याचा तांब्या नेऊन ठेवत होतो, तुम्ही कॉलेजमधून किंवा खेळून आलात की मला हाक मारत होतात, मी तुम्हाला पाण्याचा तांब्या आणून देत असे. जेवणाची वेळ झाली की तुमचे ताट तुमच्या खोलीत आणून देत असे, मग तुमच्या खोलीत माझी जेवणाची ताटली घेऊन येत असे आणि खाली बसून जेवत असे.’’

‘‘ होय पण या त्यावेळच्या गोष्टी होत्या, त्यावेळी आम्ही इंदूरच्या संस्थानिकांचे रावसाहेब होतो, सध्याची माझी ओळख म्हणजे एका बँकेतून रिटायर झालेला माणूस.’’

‘‘ असू दे, पण तुम्ही इंदूरच्या रावसाहेबांच्या पोटी जन्म घेतला हे विसरू नका, माझ्यासारख्या कित्येक आश्रयीतांना तिथे अन्न,वस्त्र, निवारा मिळाला होता.’’ जेवता जेवता विजयरावांचे आणि श्यामचे बोलणे सुरू होते, इंदूरच्या आठवणी काढल्या जात होत्या, मातोश्रींची ( विजयरावांच्या आईची ) आठवण निघाली. विजयरावांचे जेवण संपले तसे ते नेहमीप्रमाणे आपले ताट घेऊन धुवायला जात होते. एवढ्यात श्याम उठला आणि त्याने त्यांचे ताट आपल्याकडे घेतले.

‘‘ दादासाहेब मी येथे असताना तुमची ताट भांडी तुम्ही धुवायची नाही.’’ शेवटी हा काही ऐकायचा नाही म्हणून विजयराव गप्प बसले. श्यामने झटपट भांडी धुतली. ओटा आवरला आणि तो विजय रावांबरोबर हॉलमध्ये गप्पा मारायला आला.

‘‘ हं, आता सांग, तू होतास कुठे इतकी वर्ष?’’ सांगतो दादासाहेब, श्यामच्या डोळ्यासमोर सर्व बालपण सरकू लागलं.

‘‘ दादासाहेब मी इंदूर जवळच्या खेड्यातला गरीब मुलगा, घरची अत्यंत गरिबी, वडील देवीच्या साथीत गेले, तुमचे मुनीमजी गावात खंड वसुलीसाठी येत, माझी आई त्यांना हात जोडून म्हणाली ‘‘ माझ्या मुलाला कुठेतरी अन्नाला लावा, नाहीतर इथे भूक भूक करत मरेल तो.’’ दिवाणजी मला घेऊन गेले आणि तुमच्या वाड्यावर ठेवले, तुमच्या वाड्यावर मी पाणी भरायचो, तुमच्या मातोश्रींनी मला कधी उपाशी ठेवलं नाही, घरात जे शिजायचं तेच माझ्या ताटलीत असायचं.

एकदा एक प्रसंग घडला कदाचित तो तुमच्या लक्षात नसेल पण माझं आयुष्य बदलणारा ठरला. तुम्ही कॉलेजात गेलात की मी तुमची पुस्तकं वह्या उघडायचो आणि वाचायचा प्रयत्न करायचो. एकदा तुम्ही अचानक घरात आलात, तर माझ्या मांडीवर पुस्तक उघडलेलं होतं आणि मी वाचायचा प्रयत्न करत होतो, तुम्ही ते पाहिलंत आणि मला विचारलंत '' श्याम पुस्तक वाचावीशी वाटतात तुला? शाळेत जाशील का? जाणार असशील तर मी व्यवस्था करतो.'' मी हो म्हंटल, मग तुम्ही मुनीमजींना सांगून माझं नाव शेजारच्या शाळेत घातलेत आणि मी आनंदाने शाळेत जायला लागलो, शाळेत पालकाचे नाव लिहायची वेळ आली, तेव्हा दादासाहेब तुम्ही तुमचं नाव दिलत, केवढे उपकार तुमचे या अनाथ मुलावर.''

''त्यात विशेष काही नाही श्याम, गोरगरिबांना शिक्षण द्यायचं हे आमच्या संस्थानिकांचं ब्रीद होतं, आम्ही ते पाळत होतो इतकच.''

'' दादासाहेब एकदा शाळेत पालकांचा मेळावा होता, प्रत्येकाने आपल्या पालकांना शाळेत आणायचं होतं, मी हे तुम्हाला सांगितलं, त्या दिवशी तुम्ही तुमच्या कॉलेजात न जाता माझ्या शाळेत माझे पालक म्हणून आलात.''

'' अजून हे सर्व तुझ्या लक्षात आहे श्याम.''

'' सर्व गोष्टी माझ्या लक्षात आहे दादासाहेब, मी दरवर्षी एक नंबर मिळवत शाळेत शिकत होतो. तुम्ही त्यानंतर पुढील शिक्षणासाठी नागपूरला गेला होतात. मी दहावीत बोर्डात आलो. स्कॉलरशिप मिळाली आणि पुढील शिक्षणासाठी रायपूरला गेलो, त्याचवेळी माझी आई निधन पावल्याची बातमी आली. मी तिचे शेवटचे दर्शन घेतले आणि रायपूरला गेलो, त्यावेळी पासून तुमचा इंदूरचा वाडा सुटला, बारावीनंतर स्कॉलरशिप घेत लखनऊला गेलो. लखनऊला ''सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ फॉरेन लँग्वेज ' मधून फ्रेंच आणि जर्मन भाषेमध्ये मास्टर्स केले. तेथे पुन्हा स्कॉलरशिप घेऊन फ्रान्समध्ये फ्रेंच तत्वज्ञानमध्ये Phd केली आणि मग केंब्रिज विद्यापीठात फ्रेंच तत्वज्ञान शिकवायला लागलो.

श्याम बोलत होता आणि विजयराव आ वासून ऐकत होते. खडतर परिस्थितीत श्यामने घेतलेले शिक्षण ऐकून त्यांना त्याचं खूप कौतुक वाटलं, त्याचबरोबर आपला जन्म श्रीमंत घराण्यात होऊन सुद्धा आपण बँकेत नोकरीकरण्या एवढीच प्रगती केली याचं त्यांना वैशम्य वाटले.'' श्याम कौतुक वाटतं तुझं, आमच्या वाड्यात पाणी भरणारा मुलगा केंब्रिज विद्यापीठात प्रोफेसर झाला, तुझं कौतुक करायला माझ्याकडे शब्द नाहीत, मग सध्या तू कुठे असतोस?''

'' दादासाहेब, आपलं मुंबई विद्यापीठ फ्रेंच तत्त्वज्ञान विभाग सुरू करत आहे, याकरता मला इथे बोलावून घेतले आहे, पण याआधीची गेली दोन वर्षे मी

दिल्ली विद्यापीठात फ्रेंच तत्त्वज्ञानाचा विभाग प्रमुख म्हणून काम करत आहे. पण पुढील दोन महिन्यानंतर मी मुंबई विद्यापीठाचा फ्रेंच तत्त्वज्ञानाचा विभाग प्रमुख म्हणून जॉईन होईल.

‘‘ बापरे शाम केवढा मोठा माणूस तू ! आणि माझ्या घरची भांडी घासलीस आज!’’

‘‘ मी मोठा जगासाठी असेन कदाचित, पण इंदोरच्या दातेंसाठी नाही.’’

‘‘ मग शाम, तुझं लग्न, बायको..... दादासाहेब माझी बायको इंदूरचीच आहे, ती पण तुमच्या कुटुंबाला ओळखते, साधना तिचं नाव, माझ्यासारखी तीपण लखनऊला जर्मन भाषा शिकण्यासाठी होती, मग ती पण केंब्रिजला जर्मन भाषा शिकविण्यासाठी आली, आम्ही त्याकाळात लग्न केलं, आम्हाला एक मुलगी आहे, ‘‘मिहिरा’’ तिचं नाव. मिहिरा दिल्लीत दहावी शिकते. माझी पत्नी साधना सध्या दिल्ली विद्यापीठात जर्मन भाषा शिकवते पण आता ती माझ्याबरोबर मुंबई विद्यापीठात येईल.

एवढ्यात विजयरावांना जर्मनीहून त्यांच्या मुलाचा सुनीलचा फोन आला. बोलण्यासाठी श्याम हा विषय होता. त्याच्याविषयी किती बोलू मी किती नको असं विजयरावांना झालं. मग शाम सुनिलशी बोलला, सुनिलच्या बायकोबरोबर जर्मनमध्ये बोलला, ती दोघेही सुनीलशी बोलून फारच प्रभावी झाले. रात्री १० ही विजयरावांची झोपायची वेळ. श्याम म्हणाला ‘‘ दादासाहेब तुम्ही बेडरूममध्ये झोपा, मला चटई आणि चादर द्या मी हॉलमध्ये झोपतो.’’ विजयराव त्याला काही सांगण्याचा प्रयत्न करत होते पण त्या आधीच शाम बेडरूममध्ये गेला आणि त्यांच्या बेडवर त्यांची गादी चादर व्यवस्थित करून दिली, बेड खाली असलेली चटई आणि चादर घेऊन तो हॉलमध्ये आला, विजयराव त्याला काही सांगण्याचा प्रयत्न करत होते, पण तो काही ऐकणार नाही हे माहीत असल्याने ते गप्प राहिले.

रोज सकाळी सहा वाजता विजयरावांना जाग यायची. आज पण त्यांना जाग आली तेव्हा किचनमधून आवाज ऐकू येत होता. बायको वसुधा गेल्यानंतर ते रोज स्वतःचा चहा स्वतः बनवत असत, मग आज कोण आलं? असा प्रश्न त्यांच्या मनात आला, एवढ्यात काल रात्री श्याम आलेला आहे आणि तो हॉलमध्ये झोपलेला आहे हे त्यांच्या लक्षात आलं. ते बाहेर आले तर त्यांना त्यांचे घर आज वेगळचं वाटलं, आपले अस्ताव्यस्त घर आज एवढे व्यवस्थित कसे असा त्यांना प्रश्न पडला, कोचा वरील कापड आज व्यवस्थित बसलेले होते. चप्पल, बूट चपलाच्या स्टॅन्डवर ठेवलेले होते. पेपरांची रद्दी बांधून ठेवलेली होती, हॉलमधील फोटोंचे जुने हार काढलेले होते, ते किचनमध्ये गेले, श्यामने सर्व भांडी धुवायला काढली होती,

भांड्याचा स्टॅन्ड पुसून ठेवला होता, शेगडी बर्नर स्वच्छ पुसलेले दिसत होते, डायनिंग टेबल चक्क चकाचक दिसत होते, फ्रिज आतून बाहेरून स्वच्छ झाला होता, खिडकीवरची जळमटे नाहीशी झाली होती, बाथरूम टॉयलेट स्वच्छ दिसत होते, विजय रावांना वाटले, आज किती दिवसांनी एखाद्या बाईचा हात फिरावा आणि घर स्वच्छ व्हावे तसे घर स्वच्छ दिसत आहे. विजय रावांना पाहता श्यामने त्यांच्यासाठी चहा आणि बिस्किटे समोर ठेवली.

'' श्याम अरे केवढे व्यवस्थित घर केलेस हे, मला असं व्यवस्थित घर ठेवायला जमायचे नाही, तू गेलास की पुन्हा माझा अजागळ संसार सुरु होईल ''.

'' दादासाहेब आम्ही मुंबईत आलो की तुम्ही आमच्याकडे यायचं, मला युनिव्हर्सिटीकडून मोठा फ्लॅट मिळेल.''

'' बघू बघू, तुला जागा तर मिळू दे!''

'' दादासाहेब तुमची भेट झाली आनंद वाटला. आता माझं नऊच विमान आहे. मला आता जायला लागेल. तुमचा मोबाईल नंबर द्या. बहुतेक दोन महिन्यांनी आम्ही सर्व मुंबईत येऊ, मग तुम्ही आमच्याकडे यायचं.''

दादासाहेबांना नमस्कार करून श्याम निघाला. विजयरावांन तो जाताना वाईट वाटले, जेमतेम एक रात्र शामू राहिला, पण लळा लावून गेला, नाहीतर आपला मुलगा सुनील, रोज रात्री नऊ वाजता फोन करतो पण ते कर्तव्य म्हणून, त्यात ओलावा नसतो, आपल्या जर्मन सुनेने आपल्याला एकदाच पाहिले, तिला आपल्याबद्दल प्रेम कसं वाटणार? विजय रावांना आपल्या पुढच्या आयुष्याची पण काळजी वाटत होती, सुनील जर्मनीला बोलावतो पण त्याच्या लग्नाआधी आपण दोघे जर्मनला गेलो होतो, पण पंधरा दिवसात परत आलो, जर्मनीमधील थंडी, जेवण त्यांना मानवेना. आपल्याला भारताची सवय, आपले हात पाय फिरते आहेत तोपर्यंत ठीक, पण नंतर....., एखादा वृद्धाश्रमच शोधायला हवा.

दिल्लीत गेल्यावर सुद्धा श्यामचा रोज फोन येत होता. त्याची बायको मुलगी पण फोनवर बोलायची आणि दोन महिन्यांनी त्यांना एक दिवस त्यांचा अचानक फोन आला. '' आम्ही सर्वजण मुंबईत येतोय, कलिना भागात युनिव्हर्सिटीने मोठा फ्लॅट दिलाय.'' आणि चार दिवसांनी श्याम त्याची बायको आणि मुलगी मुंबईत आली सुद्धा. दोन दिवसांनी शाम भली मोठी गाडी घेऊन आला आणि विजयरावांना आपल्या घरी घेऊन गेला. त्या अत्यंत पॉश वसाहतीमध्ये युनिव्हर्सिटीने शामला सहा खोल्यांचा फ्लॅट दिला होता. दारात शोफरसह गाडी. बाहेर बगीचा, जवळच मोठे गार्डन, आपण मुंबईत आहोत असे त्यांना वाटेना, श्यामच्या पत्नीने आणि मुलीने त्यांना वाकून नमस्कार केला. श्यामची पत्नी साधना विजयरावांना म्हणाली

" दादासाहेब मी पण इंदूरचीच, संपूर्ण दाते कुटुंबाबद्दल इंदूर शहराला आदर आहे, दादासाहेब तुम्ही आता इथेच राहायचं, कृपा करून एकटे राहू नका."

श्याम दादासाहेबांना म्हणाला " काल मी सुनीलशी बोललो, तोपण म्हणाला बाबांनी एकटे राहण्यापेक्षा तुमच्या सोबत राहणे केव्हाही चांगले, त्यांना या वयात सोबत हवीच."

विजयराव गप्प बसले, ते पण एकटे राहून कंटाळले होते, संध्याकाळी शामने विजयरावांचे आवश्यक तेवढे सामान त्या घरी आणले. आता विजयराव मजेत राहू लागले, श्याम आणि साधना रोज युनिव्हर्सिटी जात होते, पण जाताना किंवा आल्यानंतर त्यांची चौकशी करत होते, श्यामची मुलगी त्यांच्या नातीसारखीच गप्पा मारत होती, कॉलेजमधील गमती जमती सांगत होती, श्यामच्या फ्लॅटमध्ये स्वयंपाकी होता, इतर कामासाठी माणूस होता, त्यामुळे विजयरावांना काहीच करावे लागत नव्हते. रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी शाम त्यांना नाटकांना किंवा गाण्याच्या कार्यक्रमाला घेऊन जात असे, विजयरावांना शास्त्रीय संगीताची फार आवड. मुंबईत इच्छा असूनही त्यांना जाता येत नव्हते, आता त्यांना गाण्याच्या मैफिली ऐकण्यासाठी मुद्दाम गाडी ठेवलेली होती. आपले बाबा आता एकटे नाहीत श्यामच्या कुटुंबात आहेत हे पाहून सुनीलचे फोन अनियमित येऊ लागले. विजय रावांना सुद्धा सुनीलची किंवा सुनीलच्या मुलीची पूर्वीसारखी आठवण येत नव्हती. उलट त्यांना श्यामची मुलगी मिहिरा जास्त जवळची वाटू लागली, आई बाबांना वेळ नसेल तेव्हा मिहिरा त्यांना गाण्याच्या मैफिलीला घेऊन जाऊ लागली.

एकंदरीत विजयराव दाते आता मुंबईत मजेत होते. इंदोर सुटल्यानंतर एवढे सुख त्यांना कधी मिळाले नव्हते. रोज सकाळी फिरायला जाणे, बागेत मित्रांसमवेत गप्पा, मग घरी येऊन पेपर वाचन, आंघोळ मग नाश्ता. त्यानंतर ते त्यांच्या आवडीच्या शास्त्रीय संगीतात रमत असत. कधी किशोरीताई ऐकत, कधी कुमार गंधर्व, कधी शोभा गुरुटू, कधीकधी नव्या गायकांना सुद्धा ते ऐकत. दुपारी जेवणानंतर थोडी वामकुक्षी, सायंकाळी चॅनेलवर इंग्रजी सिनेमा पाहणे, सायंकाळी परत फिरून येणे. रात्री शाम साधना आली की एकत्र बसून जेवण. अजूनही श्याम साधना त्यांच्याबरोबर जेवताना खाली बसून जेवत.

विजयरावांना ७५ वर्षे पुरी झाली. या दिवशी श्यामने एका नवीन गायकाला घरी बोलावून त्याचे गाणे विजयरावांना ऐकवले. श्यामची मुलगी मिहीरा पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेली. सारं कसं आनंदात छान चाललं होतं.

असेच एकदा रात्री जेवताना विजयराव टेबलावर आणि श्याम साधना खाली बसून जेवत होते. साधनाचे लक्ष गेले दादासाहेबांच्या पायाला सूज आली होती. तिने

शामला दादासाहेबांचे पाय दाखवले. शनिवारी श्याम त्यांना डॉक्टरांकडे घेऊन गेला. त्यांनी सुजीवरच्या गोळ्या दिल्या. हळूहळू त्यांचे पोट मोठे दिसू लागले. श्यामला शंका आली त्याने दुसऱ्या दिवशी लीलावतीमध्ये नेऊन सर्व तपासण्या केल्या, डॉक्टरनी 'लिव्हर सोरायसिस' चे निदान केले. पोटात पाणी जमा होऊ लागले होते, ते काढावे लागत होते. श्यामने सुनीलला सर्व कळवले, त्याने बाबांना जर्मनीला नेऊन सर्व उपचार करतो असे कळवले पण विजयराव जर्मनीला जायला तयार झाले नाहीत, पुण्याच्या खडीवाले वैद्यांचे पण उपचार सुरू होते, पण आजार कमी होईना. हळूहळू विजयरावांचे पोट मोठे आणि हातापायाच्या काड्या दिसू लागल्या, त्यांच्या तब्येतीचा वृत्तांत श्याम सुनीलला नियमित कळवत होता पण सुनीलला भारतात येणे जमेना. कधी त्याच्या मुलीची परीक्षा जवळ येत होती तर कधी पत्नीची तब्येत बरी नसायची. हळूहळू विजय रावांना अन्न जाईना, शेवटी त्यांना लीलावतीमध्ये ॲडमिट केले गेले. दर दोन दिवसांनी पोटातील पाणी काढले जात होते. पण विजयराव हॉस्पिटलमध्ये कंटाळू लागले मग शामने घरीच एका खोलीत त्यांची हॉस्पिटल सारखी व्यवस्था केली. घरीच ऑक्सिजन लावला, एक नर्स दिवस-रात्र घरी ठेवली. पण विजयरावांची तब्येत दिवसेंदिवस खालावू लागली.

२२ जूनची रात्र, मुंबई भरपूर पाऊस सुरू होता, विजयराव अन्न पाणी घेत नव्हते, पोटात असह्य वेदना सुरू होत्या. श्याम आणि साधना त्यांच्या आजूबाजूलाच होते. रात्रौ ११ च्या सुमारास विजयरावांना घरघर लागली, श्यामने फोन करून लीलावतीच्या डॉक्टरांना घरी बोलावले, डॉक्टर आले त्यांनी विजयरावांची तब्येत पाहिली, नर्सला ऑक्सिजन काढायला सांगितला, विजयराव तोंडाने ''पा पा'' करू लागले म्हणून डॉक्टरनी श्यामकडे पाहिले. श्यामने चमच्याने त्यांच्या तोंडात पाण्याचे दोन थेंब टाकले. त्याच क्षणी विजयरावांनी प्राण सोडला. श्याम ओक्साबोक्शी रडत होता. साधना रडत रडत त्याला सांभाळत होती. साधनाने फोन करून सुनीलला जर्मनीला ही बातमी कळवली. ही बातमी कळताच श्यामचे आजूबाजूचे प्रोफेसर मित्र आणि युनिव्हर्सिटीतील लोक जमा झाली.

त्या रात्री श्यामने विजयरावांच्या प्रेताला अग्नी दिला. घरी अनेक जण शामला-साधनाला भेटायला येत होते. युनिव्हर्सिटी चे कुलगुरू श्यामला भेटायला आले. श्यामने त्यांना दादासाहेबांचा इंदोरचा वाडा, त्या वाड्यात आपण ''पाणक्या'' म्हणून आलो, पण दादासाहेबांनी आपल्याला शिक्षण घेऊ दिले एवढेच नव्हे तर शाळेत पालक म्हणून स्वतः उभे राहिले, ती कृतज्ञता आपल्या मनात सदैव राहिली, आपले आई-वडील आपल्याला फारसे माहित नाहीत पण दादासाहेब आई-वडिलांच्या जागी कायमच राहिले. श्याम पुढे म्हणाला '' शेवटची दहा वर्षे

दादासाहेब आपल्या सोबत राहिले हे आपले भाग्य पण त्यापेक्षा दादासाहेबांना शेवटच्या क्षणी या ''पाणक्याने '' तोंडात पाण्याचे थेंब टाकले, हे माझे परमभाग्य!''

# चल धन्नो

लेखक – प्रदीप केळुसकर/ ९४२२३८१२९९

---

वर्षा सकाळी उठून दात घासत होती. तेवढ्यात तिचा फोन वाजू लागला. तिने नाव पाहिले, आईचा फोन होता.

‘‘ काय गं आई, सकाळी सकाळी फोन केलस.’’

‘‘ अगो, बाबा काल रात्री सांगा व्हते, वर्षाक बोलावून घे म्हणान, राजापूरचा स्थळ ईलाहा म्हणान सांगाव्हते.’’

‘‘स्थळ? माझ्यासाठी? तुका माहिती आसा ना, फायनल क्लियर होवचा आसा म्हणान?’’

‘‘ ते बडबडा व्हते, तीन वरसा झाली, ह्येचा शिक्षण काय संपना नाय हा. पैशे खयसून हाडतले?’’

‘‘पण माझ्यासारखोच झील पण आसा ना पुण्यात, तेका काय येगळो न्याय?’’

‘‘अगो तो झील आसा शेवटाक, तो ह्या घरात रवतलो, तू चेडू, परक्याच्या घरात जातलंस.’’

‘‘म्हणान माझा शिक्षण अर्धवट ठेवतलांत, माझी तीन वरसा वाया गेली तरी यंदा पास व्होतलंय, मगे अधिकारी झालंय काय मगे पाठसुन धावतलांत.’’

‘‘नायं गे बाये, माकां वायट वाटता पण मी काय करू? तुजे बाबा तरी पैशे खयंसून हाडतंले? आमचा उत्पन्न तरी काय हां?, आंब्याची १०० कलमां, ती दरवर्षी येतत असां काय नाय, तुमका दोघांका पुण्यात पैशे धाडूक तेंका जड जाताहां.’’

‘‘बाबा ह्यां सगळा शामग्याक कित्या सांगणंत नाय? तो नायतरी पास होवचो नाय, मी पुण्याक इलंय, म्हणान तो पुण्याक इलोहां, अभ्यासबिभ्यास काय करणां नाय हां.’’

‘‘बाये, तुजे बाबा लय चिडले हतं, तुज्या मुंबईच्या काकांचो फोन इल्लो, वर्षाच्या लग्नाचा काय ठरवतास म्हणान, तुज्या पाठची तेंची दोन चेडवा आसतं ना लग्नाची!’’

‘‘ मग काकांका सांग, तेंच्या चेडवांची लगना करून टाका, वर्षाच्या लग्नासाठी थांबा नकांत.’’

‘‘बाये, बाबा लय चिडलेहत, सांच्याक घेवन ईले काय माझ्यावांगडा भांडतंत, तू असा कर तू तुज्या बाबांका फोन लाव, माझ्यापाठना कटकट नको.’’

आईने फोन बंद केला तशी वर्षाने गुश्श्यात तोंड धुतले आणि ती रूममधील

गॅसवर चहा ठेवायला गेली. तिची रूममेट नर्मदा अजून झोपली होती, तिने चहा कपात ओतला आणि ती नर्मदेला उठवायला गेली.
'' नर्मदे, उठ गं, चहा ओतून ठेवलाय तुझा!''
''सकाळी सकाळी मालवणीतून कुणाशी भांडत होतीस? माझी झोपमोड झाली.''
''उठ आता, अभ्यास करायला पुण्यात राहतेस ना, वाजले किती बघ!''
'' हो उठते बाई, पण मोठ्या मोठ्याने कुणाशी बोलत होतीस?''
''आईशी, माझं लग्न ठरवतायत घरी''
''अरे वा! आम्हाला जीजू मिळणार तर, कोण गं तो?''
''ए बाई, एवढ्यात लग्न बिग्न काही नको, फायनल अजून पुरी करायची आहे, ती क्लिअर झाल्याशिवाय लग्न नाही. पण या बाबांना आणि काकांना कोण सांगणार?''
''बाबांनी आणि काकांनी तुझं लग्न ठरवले की काय?''
''होय बाई! मुंबईच्या काकांच्या दोन मुली म्हणजे माझ्या चुलत बहिणी लग्नाच्या आहेत, त्यातील मोठी ज्योती माझ्यापेक्षा एका वर्षांनी लहान, म्हणजे २६ वर्षाची, माझं वय आता २७ झालं, काकांना तिचं लग्न जमवायचे आहे पण माझ्यामुळे अडलंय''
'' का ग! तिचं लग्न तुझ्यामुळे का अडलंय?''

''अगं, आमचं तसं एकत्र कुटुंब, मोठीच झाल्याशिवाय छोटीच केलं तर बरं दिसत नाही, म्हणून काकांनी माझ्या वडिलांचे डोकं पिकवलं असणार, त्यामुळे बाबा माझ्या लग्नाची घाई करतायतं, एक मुलगा बघितलाय म्हणे माझ्यासाठी, तेच आई सांगत होती.''
''मग करून टाक की लग्न!''

''वेडी का खुळी तू नर्मदे, हा माझा एम.पी.एस.सी चा अभ्यास, फायनल क्लियर व्हायला पाहिजे, लहानपणापासून मी स्वप्न बघितले, सरकारी अधिकारी बनायचे आहे मला, दोन वर्षे वाया गेली खरी पर्यंत जोरात अभ्यास करून फायनल क्लियर करणार असं म्हणत होते पण मध्येच हे लग्नाचं आलं!''

'' मग आता करणार काय?''
''बघते बाबांना फोन लावून. केव्हा केव्हा वाटते त्यांच पण चूक नाही, माझं वय आता २७ वर्षे झालं, अजून एम.पी.एस.सी फायनल क्लियर झालं नाही, अजून एक वर्ष म्हणजे २८ वर्षे होतात, म्हणजे अर्ध तारुण्य वाया गेलेच की ''

''हो ग वर्षे, मी तुझ्यापेक्षा एका वर्षांनी मोठी, मला पुढील वर्षी २९ वर्षे होतील, अजून पहिलं वर्ष सुटलं नाही!''
'' काय करणार? आपल्याला सरकारी अधिकारी व्हायचंय ना, मग सगळ्या

तडजोडी कराव्या लागतात. आपण ग्रामीण भागातून आलेल्या मुली, आमच्यासारख्या मुलींना पुण्यात ॲडजेस्ट व्हायला दोन वर्षे लागतात. हा एवढा कठीण अभ्यास, एवढे पेपर्स, एवढं पाठांतर, किती कठीण आहे हे?''

''मुलांना आपल्यापेक्षा बरं, एक तर लग्नाची डेडलाईन नसते किंवा विनयभंग, बलात्कार होण्याची भीती नसते.''

''हो गं, आपणा मुलींना सर्व बाजूंनी लढायचं असतं, अभ्यासात लक्ष ठेवायचं आणि स्वतःला सांभाळायचं, दर महिन्याचे चार दिवस हे या पुरुषांना कसं कळणार.?''

'' स्त्रीचा जन्म घेतला की हे सर्व सहन करायला हवं वर्षे!''

'' बघ बघ, बाबांना फोन लावून काही उपयोग होतो का बघ''

वर्षाने बाबांना फोन लावला'' हॅलो बाबा, वर्षा बोलतंय, कीत्याक फोन करू सांगलेल्यात?''

''अगो वर्षा, तुजो आता अभ्यास पुरे, चार वरसा पुण्यात आसस, अधिकारी होवचा होता म्हणान पुण्याक गेलंस, आजून काय ता पुरा होणा नाय तुजा शिक्षण, तू आता २७ वर्षाचा झालंस, मुंबईसून शरद उद्या येतलो, तेचा चेडू तुझ्यापेक्षा एका वरसान न्हान, तेचा लगीन करुचा आसा, म्हणून तो पाठी लागलोहां, वर्षाचा यंदा कायतां बघा ''

''पण बाबा, माका फक्त एक वरीस देवा, यंदा माजो अभ्यास बरो झालोहां, मी आजून जोर करतंय आणि पुढच्या वरसाक एम.पी.एससी क्लियर करतंय.''

''आता एक वरीस नुको, तू शनिवारा परयात घराक ये, राजापूरचा स्थळ इलाहां, नवरो मिलिटरीत आसां, आतासो वाघा बॉर्डरवर नोकरीक आसां, एका महिन्याची रजा घेवन इलोहां, लगीन करून तुका घेवन जातलोहा. मी मुलाक बघितलंय, पगार बरो आसा, राजापुरात जमीनजुमलो आसा''

''पण बाबा फक्त एक वरीस माका देवा!''

''अजिबात नाय! शनिवारा कोणत्याय परस्थितेत घराक येवक व्हया.'' असं बोलून बाबांनी फोन खाली ठेवला. वर्षाला वाईट वाटले. आपण मुलगी असल्याचे पण तिला वाईट वाटले, तिला तिच्या आजीची आठवण झाली, आजी आपले खूप लाड करायची, कमरेवर घेऊन रामेश्वराच्या देवळात कीर्तनाला घेऊन जायची. मला त्यातले फारसे काही कळायचे नाही पण किर्तनकारांच्या कीर्तनात आजी तल्लीन व्हायची, मला किर्तनकारांना नमस्कार करायला सांगायची. थोरे नावाचा एक कीर्तनकार होते, त्यांना थोडेफार ज्योतिष कळायचे असे म्हणत. मला आशीर्वाद देताना थोरेबुवा म्हणाले '' बाई ही तुमची नात अधिकारी होईल हा माझा शब्द

आहे'' आजी ज्याला त्याला सांगे ''थोरेबुवानी सांगल्यानी हां, तुजी नात मामलेदार होतली म्हणान.''

आजी गेली आणि घरातला आपला पाठिंबा गेला, पाठला भाऊ शामू याचेच लाड सुरू झाले. तो तसा आडदांड आणि लबाडपण. कसाबसा बारावी झाला, मी पुण्याला एमपीएससी परीक्षेकरता आले म्हणून हट्ट करू लागला आणि बारावीनंतर इंजीनियरिंगसाठी पुण्यात आला, त्याच्या या मार्कात पुण्यात चांगल्या कॉलेजमध्ये ॲडमिशन कशी मिळणार? साध्या कॉलेजात ॲडमिशन घेतली आणि आत्ता बाबांच्या पैश्यावर मजा मारतोय, तो इंजिनीयर होणार नाही आणि झाला तरी नोकरी मिळणार नाही हे वर्षाला माहीत होते. तिने आई-बाबांना सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना हे समजत नाही आणि मुलगा म्हणजे कुटुंबाचा वंशाचा दिवो म्हणून त्याला सर्व माफ होते.

ती शनिवारी सकाळच्या एसटीने वर्षा देवगडला जायला निघाली, देवगड होऊन विजयदुर्ग रस्त्यावर तिचे छोटे गाव, सायंकाळी सात वाजता घरी पोहोचली. आईने तिच्या हातची पिशवी घेतली आणि म्हणाली ''हात पाय धुऊन घे, जेवान गरम करतय''

''माका तुमचा जेवान नुको, माज्या आयुष्याचा सपान मातीत जातलहां ''

''मी तरी काय करू गो वर्षा?''

'' तुजे बाबा काय आयकत नाय, तेंका पण तुजी काळजी वाटता हां, २७ वर्षा झाली तूका, तुज्या मागची शरदभाऊजींची चेडवा लग्नाची आसतं मा?'६'

''पण माका एक वर्ष व्हया व्हता, माका सरकारी अधिकारी होवचा आसा, माज्या आजयेची पण ती इच्छा व्हती पण तुमी माजा लगीन ठरवलांस. तो वाघा बॉर्डरवरचो मिलिटरी माणूस, आता कसली परीक्षा आणि कसला काय?

''उद्या ती पाहुणे मंडळी तुका बघुक येतली.''

''मी काय त्येंच्यासंबुर जावचयं नाय, माका इतक्यात लगीन नुको.''

''ता कायता तुज्या बाबांका आणि काकांका सांग, उद्या ते पाहुणे येतले म्हणून हे देवगडात पेढे लाडू हाडूक गेले हतं.''

'' एवढ्यात बाहेर ओसरीवर हाका येऊ लागल्या, म्हणून आई बाहेर गेली. बाहेर अंगणात वर्षाचे बाबा आणि काका आले होते.

''इलां काय वर्षा?'' बाबांनी विचारले

''व्हयं, इलां, सहा वाजता इलां''

''बरा झाला, ह्ये पिशयेत बुंदी लाडू आणि पेढे आसात, त्या पिशवीत फुला, अबोलीचे वळेसार आसत.''

‘‘उद्याची तयारी मी केलंय पण वर्षाक इतक्यात लगीन करुची इच्छा नाय म्हणता.’’

‘‘आता काय जमाचा नाय, चार वरसा थांबलंव, उद्याची तयारी करा, दुपारी पावणे येतले.’’ एवढ्याच वर्ष रडत रडत बाहेर आली.

‘‘बाबा, फक्त एक वरास थांबा, नायतर माझ्या आयुष्याचा नुकसान होतला, एकदा काय लगीन झाला की शिक्षण रवला, तो मिलिट्रीमॅन माका घेवन जातलो वाघा बॉर्डरवर.’’

‘‘ आता मी तुझा काययेक आयकाचंय नाय, गपचूप उद्याची तयारी कर.

रडत रडत वर्षा आत गेली आणि चादरीत तोंड खुपसून रडू लागली. रात्री बाबा काका जेवले. वर्षाची आई वर्षाला जेवायला बोलवायला गेली, पण तिने जेवायला साफ नकार दिला.

‘‘वर्षा,तू आणि तुजे बाबा ह्यांच्यात माजी पंचायती व्हता, मी तरी कोणाक सांबाळू?’’ आई रडू लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी वर्षाची आई लवकर उठून कामाला लागली, पाहुणे येणार म्हणून तिने अंगण शेणाने सारवले, दारात रांगोळ्या घातल्या, वर्षाचे बाबा आणि काका बागेत गेले होते, वर्षा अजून झोपूनच होती, एवढ्यात घरातील मोबाईल वाजू लागला. हे दोन्ही पुरुष घरात नव्हते म्हणून वर्षाच्या आईने मोबाईल उचलला ‘‘ हॅलो, मी बोलतय, ते बागात गेले हतं, काय काम होता? पलीकडून राजापूरचे पाहुणे बोलत होते.

‘‘जरा अडचण इलीहां म्हणान फोन केलयं, मी राजापूराणसून सुर्वे बोलतोय, वाईट बातमी म्हणजे माजो मुंबईचो मोठो भाव काल रात्री अचानक वारलो.

‘‘काय म्हणतांस?’’

‘‘व्हय अचानकच झाला, तेंका लय डायबिटीस होतो, पण इतक्यात जातील असा वाटला नाय व्हता, त्याकारणान आज आमी तुमच्याहारी येणव नाय आणि दुसरा म्हंजे आमच्यात कुटमात कोण मेला काय वरीसभर लगीन करीत नायत. त्याकारणान ह्या लगीन याक वरीस पुढे ढकलूया, माजो झील पुडच्या वरसाक रजेवर इलो मगे लग्नाचो बार उडवया.’’

‘‘ बरा बरा, मी हेन्का सांगतंय.’ असं म्हणून आईनी फोन खाली ठेवला.

एवढ्यात वर्षाचे बाबा आणि काका बागेतून आले. आल्या आल्या वर्षाच्या आईने त्यांना पाहुण्यांकडून आलेला फोन सांगितला. तेव्हा अरेरे म्हणत बाबांनी त्यांना परत फोन लावला. पाहुण्यांनी परत सर्व बाबांना सांगितले, वर्षाचे बाबा आणि काका खूप नाराज झाले, एवढे ठरत आलेले लग्न पुढे गेले, आतमध्ये वर्षा आईचे आणि बाबांचे सर्व बोलणे ऐकत होती. लग्न रद्द झाल्याचे कळताच ती

ताडकन उठली, बाथरूममध्ये जाऊन स्वच्छ झाली आणि बाहेर ओसरीवर आली, आई वर्षाला म्हणाली ''वर्षा, राजापूरच्या लोकांका अडचण इलीहां, त्येंचो मोटो भाव रातच्याक वारलो, त्याकारणान आज ते येवचे नाय. आता एक वरसान लगीन करूया असा त्यांचा म्हणणां..वर्षा गप्प उभी होती, तिच्या हृदयात आनंदाची कारंजी उडत होती, तिने मनातल्या मनात आजीला नमस्कार केला, स्वर्गस्थ आजीने आपल्याला वाचवले असेच तिला वाटले.

''नायतरी व्हयतेका इतक्यात लगीन नकोच होता' बाबा बडबडले.

वर्षा घरात गेली, कालपासून तिच्या पोटात काही अन्न गेले नव्हते, तिला भूक लागली होती. ती स्वयंपाक घरात गेली आणि पातेल्यातल्या भातावर लोणचं टाकून जेवू लागली. बाहेर बाबा आपल्या धाकटा भावाला शरदला सांगत होते ''तू ज्योतीचा लगीन करून घे, आमच्यासाठी थांबा नको, आता हे रितीभाती बदलूक होयेतं. वर्षा आता खुशीत आली, तिने आंघोळ करून घेतली आणि ती चुलीकडे आईला मदत करायला आली.

'' आई आता याक वरीस थांबाक होया, मगे मी पुण्याक जातंय.''

''मी हेंका विचारतंय मगे काय ता ठरवं.''आई उत्तरली.

सायंकाळी वर्षाचे बाबा आणि काका चहा घ्यायला आले तेव्हा आई म्हणाली '' वर्षा म्हणताहां नायतरी लगीन पुढे गेला हां तर एक वरीस मी पुण्याक जातय आणि पुढचो अभ्यास करतंय.''

बाबा कडाडले '' जावचा आसा तर जावंदे पण ह्येच्यापुडे माझ्याकडसून एक अणो पण मिळनार नाय. स्वतः कमव आणि कायता शिक.''

बाबांचे बोलणे वर्षाने ऐकले आणि ती पिशवी भरू लागली, तिच्या लक्षात आले येणारे एकच वर्ष आपल्याकडे आहे, पैसे मिळवायला हवेत आणि फायनल क्लियर करायला हवी, आयुष्यात केली नव्हती एवढी धडपड एका वर्षात करायला हवी, नाहीतर आजपर्यंत केलेली धडपड पाण्यात गेली म्हणायचे, या एका वर्षात ठरेल चांगला अभ्यास करून अधिकारी व्हायचे की पोरंबाळं, उष्टीखरकटी काढायची, येणारे वर्ष आपल्यासाठी आणिबाणी सारखे आहे, फायनल पास व्हायलाच लागेल, कोणत्याही परिस्थितीत फायनल क्लियर करायलाच हवी, याकरता जोरात धावावं लागेल अगदी घोडी सारखं धावावं लागेल तरच......

वर्षाला फिल्म शोले मधली बसंती टांगेवाली आठवली, गुंड मागे लागले तेव्हा घोडीला पळवणारी, '' चल धन्नो, तेरे बसंती के अब्रू का सवाल है, धन्नो धाव धाव धावली आणि बसंतीची अब्रू वाचली. वर्षा विचार करायला लागली, आता मला पण ''चल धन्नो' म्हणण्याची गरज आहे. धन्नो सारखे आपल्याला धावावे

लागेल, होय, मी धन्नो सारखी धावणार, मी विजयी होणार, तिने मनातल्या मनात आरोळी ठोकली ''चल धन्नो '

दुसऱ्या दिवशी सकाळी देवगड पुणे एसटीने वर्षा पुण्यात आली, नर्मदा तिची वाटच बघत होती, तिने नर्मदाला सर्व परिस्थिती सांगितली आणि लग्नाचे संकट एका वर्षाकरिता पुढे गेल्याचे सांगितले, तसेच यापुढे बाबा पैसे पाठवणार नसल्याने पार्ट टाइम जॉब शोधावा लागणार असल्याचे सांगितले. एवढ्यात नर्मदा म्हणाली,
'' अगं त्या मॅकडॉल कंपनीत पार्ट टाइम मुली हव्या आहेत, माझी क्लासमेट शारदा जाते त्या दुकानात, तू तेथे प्रयत्न कर.

वर्षा उद्गारली '' अगं त्या शारदा चा मला फोन नंबर दे, उद्याच मी जाते तिच्याकडे.'' नर्मदाने तिला शारदाचा फोन नंबर दिला, वर्षाने शारदाला फोन लावला, शारदाने वर्षाला उद्या कोथरूडच्या दुकानात यायला सांगितले.

दुसऱ्या दिवशी वर्षा कोथरूडच्या मॅकडॉलच्या दुकानात शारदाला भेटली, शारदा तिला मॅकडॉलच्या मॅनेजर कडे घेऊन गेली. शारदा मॅनेजरला म्हणाली '' ये मेरी फ्रेंड स्टुडन्ट है और उसे पार्ट टाइम जॉबकी जरूरत है।''

मॅनेजर ने कहा '' हमारे दुकान मे पार्टटाइम जॉब है, कस्टमर के ऑर्डर अटेंड करने का और उनका ऑर्डर पॅक करनेका।''

वर्षा ने कहा '' मैं कर सकती हूँ, मगर दोपहर को मेरे क्लास होते है।''

**मॅनेजर–** कोई बात नही, हमारा पिकअप अव्हर दोपहर बारा से दोन और शाम को सात से दस होता है, मगर तुम लडकी होने के कारण ९ बजे जा सकती हो। तुम्हे दो दिन ट्रेनिंग मिलेगी और दस हजार सॅलरी मिलेगी।

**वर्षा –** आभारी हुँ। सर, मै आज से जॉईन करती हुँ ।

मॅनेजरने कहा ''ठीक है, अंदर जाके शुभमसे मिलो।''

अशा रीतीने वर्षाला जॉब मिळाला, वर्षा खुश झाली आता बाबांकडून पैसे मागायला नको, पण दिवसाचे पाच तास नोकरी, तीन तास क्लास, जेवण झोप...., मग अभ्यासाला वेळ? पण हे जमवायलाच हवं, धन्नोसारखी पळायला हवं, वर्षाने मनातल्या मनात आरोळी ठोकली ''चल धन्नो '.

वर्षाचा दिनक्रम बदलला, रात्री बाराला झोपणे, सकाळी पाचला उठणे, साडेपाचला अभ्यासाला सुरुवात ते आठवाजेपर्यंत, आठ वाजता चहा नाश्ता आंघोळ मग परत अभ्यास सुरू ११:३० पर्यंत, साडेअकरा वाजता जेवणाच्या मेसमध्ये जायचे, तेथून परस्पर मॅकडॉलमध्ये, तेथूनच दोन वाजता क्लासला जायचे, पाचला क्लास सुटला की क्लासमध्येच बसून रोजच्या अभ्यासाची उजळणी, पावणेसातला बाहेर पडून परत मॅकडॉलमध्ये दुकानातून नऊ वाजता बाहेर पडायचे,

मेसमध्ये जेवायचे आणि रूमवर साडेनऊ पर्यंत पोहोचायचे. रात्री वर्षा रूमवर यायची तोपर्यंत नर्मदा रूमवर आलेली असायची, ती मोबाईलवर कसले कसले व्हिडिओ पाहत असायची. दिवसभर धावपळ करून आणि मॅकडॉल दुकानात एसी मध्ये राहून तिला त्यावेळी झोप यायची. मग तिला शोलेतील बसंती आठवायची आणि ती मनातल्या मनात आरोळी ठोकायची 'चल धन्नो'. रात्रीच्या शांत वेळेत वर्षाचा छान अभ्यास व्हायचा, गेली चार वर्षे आपल्यामागे अशी धावपळ नव्हती पण अभ्यास झाला असे वाटत नव्हते, परत पैसे मिळवण्याची जबाबदारी, त्यामुळे वेळ थोडा पण त्यामुळेच अभ्यास चांगला होतोय आणि सोबत धन्नो आहे, धन्नो म्हणते आहे ''धाव धाव माझ्यासारखी,धाव, वेळ थोडा आहे.''

मार्च दहा तारीख पासून परीक्षा सुरू होणार होती, वर्षाने मॅनेजरला सांगून पंधरा दिवसाची रजा घेतली, पुढचे आठ दिवस लायब्ररीत बसून सर्व पेपर्स नोट्स तिने पुन्हा पुन्हा अभ्यासले, परीक्षा सुरू झाली आणि संपली सुद्धा. वर्षाला यावेळी पास होण्याची शक्यता वाटत होतीआई गावाला बोलवत होती, राजापूरच्या सुर्व्यांचा मुलगा रजेवर आला म्हणजे भेटायला यायचे होते. वर्षा गावी गेलीच नाही. गावी गेल्यावर बाबांचा लग्नाचा विषय सुरु होणार होता,वर्षाची नोकरी सुरू होती, परीक्षा संपल्याने आता थोडा निवांत होता, आता एवढ्यात पुन्हा निवांतपणा मिळणार नाही म्हणून तिने नाटके सिनेमा बघून घेतले.

रिझल्ट ची तारीख जसजशी जवळ येऊ लागली तसतशी वर्षा निराश होऊ लागली. यावेळी फायनल क्लियर झाले नाही तर राजापूरच्या मिलिट्रीमॅनबरोबर लग्न आणि थेट वाघाबॉर्डर. या काळात वर्षाला तिच्या आजीची आठवण झाली, आजी असती तर तिला आपली धडपड समजली असती.

जून १५, सकाळी सकाळी तिच्या क्लास मधून अभिनंदनाचा फोन आला. वर्षा स्तब्ध झाली, खरंतर तिला खूप आनंद व्हायला होता, पण तिला कसलीही जाणीव होत नव्हती. तिचं मन शांत शांत झालं. मोठी लंबी रेस धन्नोने जिंकली होती, तिने आईला फोन करून ही बातमी सांगितली. देवगडच्या घरी पत्रकार धावत होते, कोकणात तसे युपीएससी परीक्षेला बसणारे कमीच, एम पी एस सी परीक्षेला सुद्धा बसणारे कमीच, खूप वर्षांनी देवगड तालुक्यात कोणी एमपीएससी पास झाले होते. पत्रकार घरी आल्याने वर्षाचे बाबा भांबावून गेले, पेपरात लिहिणारे एवढे लोक आपल्या घरी का आले हे त्यांना कळेना.पत्रकारांनी वर्षाच्या बाबांना तुमची मुलगी एमपीएससी परीक्षा पास झालेली आहे आता ती सरकारी अधिकारी होईल कदाचित तहसीलदार किंवा मामलेदार सुद्धा होईल अशी बातमी दिली.

वर्षाच्या बाबांनी वर्षाच्या आईला ही बातमी सांगितली, तिला वर्षाकडून ही

बातमी आधीच कळली होती, फक्त ही परीक्षा एवढी महत्त्वाची आहे हे आईला माहीत नव्हते. तोपर्यंत टीव्हीवरून एमपीएससी परीक्षेचे निकाल जाहीर होत होते आणि तिच्या गावातील घराघरात वर्षाचे नाव घेतले जात होते, गावातील मंडळी पण वर्षाच्या घरी कौतुक करायला आली, गावचे सरपंच आले. आजूबाजूचे प्रतिष्ठित लोक आली, सर्वजण वर्षाचे कौतुक करत होते, वर्षाच्या बाबांच्या डोळ्यातून आनंदाश्रू येत होते.पुण्यात वर्षाच्या क्लासमध्ये जल्लोष सुरू होता. यावर्षी या क्लास मधील चार मुलांनी एम पी एस सी क्लियर केली, क्लास मधून फोटो काढले आणि सत्कार केले गेले.

कोथरूडच्या मॅकडॉलच्या मालकांनी आज दुकानाबाहेर फ्लेक्सवर वर्षाचे फोटो लावले. आज मालक स्वतः दुकानात आले, आपल्या दुकानात बर्गर पॅक करणारी मुलगी एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाली म्हणून त्यांनी आजच्या खाद्यपदार्थावर ५०% डिस्काऊंट जाहीर केले. कौतुकाचा धबधबा सुरू होता, पण वर्षा शांत होती, गेल्या वर्षभराचा ताण कमी झाला होता, तिचा भाऊ तिला भेटायला आला, गेले वर्षभर भावाने तोंड दाखवले नव्हते अथवा फोन केला होता. तिच्या आई-बाबांचे फोन एक सारखे येत होते पण ती वेगवेगळ्या ठिकाणच्या सत्कारात किंवा टीव्ही चॅनेल वरील मुलाखतीत अडकली होती, तिच्या कोथरूडच्या मॅकडॉलच्या मालकांनी तिचा सत्कार केला. ती मालकांना म्हणाली ''आपने आपके दुकानमें मुझे पार्टटाइम जॉब देकर मेरा काम सरल किया था, आपकी वजह से मेरा पुनामें रहना, क्लास करना आसान हो गया, इसलिये ये दुकान को मैं कभी भूल नही सकती।'

रात्री तिने आईला फोन केला, तेव्हा तिला रडू कोसळले, गेले वर्षभर डोळ्यात साठवलेले अश्रू मोकळे झाले, ती आईला म्हणाली ''बाबांनी खर्चासाठी पैसे नाही म्हटले तेव्हाच माझ्या आतली जिद्द जागी झाली, कोणत्याही परिस्थितीत बाबांकडून पैसे घ्यायचे नाहीत आणि यावर्षी फायनल क्लियर करायची जिद्द मनात ठेवली. वर्षाला नातेवाईकांकडून फोन येणं सुरू होतं, मुंबईतील शरद काकांनी फोन करून सांगितलं. ''वर्षा, बरा झाला त्या राजापूरच्या सुर्व्यांचो मोठो भाव आयत्यायेळी मेलो नाहीतर इतक्यात तू वाघा बॉर्डरवर आसतंस'' या वाक्यावर वर्षा खळखळून हसली.

देवगडच्या आमदार गोगटेंनी वर्षाचा सत्कार आयोजित केला, तेव्हा वर्षा पुण्याहून गावाकडे आली, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले, कौतुक केले.सत्काराच्या वेळी आमदार गोगटे म्हणाले '' कोकणात हुशार मुलांची कमतरता नाही, दहावी आणि बारावी परीक्षेत कोकण नेहमी अव्वल असतो

पण आमची मुले स्पर्धा परीक्षेकडे जात नाहीत, इथे स्पर्धा परीक्षेच्या सोयी नाहीत हे त्याचे मुख्य कारण आहे, पण देवगड तालुक्यातील गिर्ये गांवची वर्षा थेट पुण्याला जाऊन धडकली आणि शेवटी यश घेऊन आली. सत्काराला उत्तर देताना वर्षा म्हणाली ''मी गेली चार वर्षे पुण्यात राहून एम पी एस सी चा अभ्यास करत आहे, पण गेले तीन वर्ष मी यशस्वी झाले नाही, गेल्या वर्षी माझ्या वडिलांनी माझं लग्न ठरवलं आणि मी धडपडून जागी झाले. मी माझ्या पालकांना फक्त मला एक वर्ष द्या असे म्हणत होते, पण ते ऐकत नव्हत पण ठरलेल्या नवऱ्याचे काका वारले आणि लग्न एक वर्ष पुढे गेले, नशिबाने मला एक वर्ष मिळालं, या वर्षाचा मी पुरेपूर उपयोग केला, मी मनात म्हटले ''चल धन्नो '. शोलेमधली बसंती धन्नो नावाच्या घोडीला पळवत असते आणि अतिजलद पळून धन्नो बसंतीचे गुंडांपासून रक्षण करते. मी माझ्या जिद्दीला, मेहनतीला हाक मारली ''चल धन्नो'', ये आखरी साल है, ये साल में नही तो कभी नही......... आणि मी जिंकले, माझ्या धन्नोमुळे मी जिंकले.म्हणून माझ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनो, तुम्ही तुमच्यातील 'धन्नो' ला हाक मारा, तिला पळवा आणि शर्यत जिंका' टाळ्यांचा कडकडाट झाला.

वर्षाचे पेपर मधील आणि टीव्हीवरील फोटो पाहून राजापूरच्या सुर्वेना साखरपुड्याची घाई झाली होती. ते एकसारखे वर्षाच्या बाबांना फोन लावत होते. वर्षाच्या आईने बाबांना त्यांचे फोन आलेले सांगितले. त्यांच्या त्रासाला कंटाळून वर्षाच्या बाबांनी त्यांचा फोन नंबर मोबाईल मधून डिलीट करून टाकला.

# कृष्णसर्प

प्रदिप केळुसकर / मोबा. ९४२२३८१२९९

सकाळी उठून राजेंद्र पेपर वाचत होता. त्याच्या हातात चहाचा कप देताना सविता म्हणाली, 'वसुमती ताईंचा मेसेज आलाय, तुम्ही दोघं केव्हा येताय रत्नागिरीला ?' तिच्याकडे पाहात राजेंद्र उत्तरला 'हो, जायला पाहिजे. एकदाचे हे रिटर्न्स भरुन झाले की जाऊ.'

'त्यांच म्हणण आहे या आठ दिवसांत या. नाहीतर आपली भेट होणार नाही एवढ्यात.'

'का ? ताई कुठे बाहेर जात आहेत की काय ?'

'कल्पना नाही. तस काही बोलल्या नाहीत. पण त्यांचा आवाज निश्चयाचा होता, ठाम होता. काहीतरी असेल त्यांच्या मनात'

'उदय सर गेल्यापासून त्या एकट्या झाल्यात. त्यात त्यांची विभा पण ऑस्ट्रेलियाला. पण आता या आठवड्यात जाऊया रत्नागिरीला. '

'मग, तस कळवू का मी त्यांना ?'

हो, गुरुवारी जाऊ आपण. रविवारी परत फिरू.

'चालेल, मी कळवते त्यांना.'

मग सविताने वसुमती ताईंना कळविले आम्ही गुरुवारी येतोय म्हणून. मग दुसऱ्या दिवशीपासून सविताची खरेदी सुरु झाली. वसुमती ताईंना काय काय आवडत त्याची. कोल्हापूर चे कंदी पेढे, सुती साड्या, कोल्हापुरी चिवडा, भडंग इ.

गुरुवारी कार ने राजेंद्र आणि सविता रत्नागिरीला जायला निघाली. वसुमती ताईंना पुस्तकांची आवड म्हणून राजेंद्रने अजब मधून नवीन पुस्तके विकत घेतली. आंबा घाट आला आणि राजेंद्र ने चहासाठी एका टपरीकडे गाडी थांबविली. हातपाय धुऊन त्यानी चहाची ऑर्डर दिली. बरेच दिवस नवऱ्याला विचारायच विचारायचे म्हणत होते ते सविताने विचारले शेवटी. 'राजेंद्र उदय सर गेले तेव्हा वसुमती ताईंना दु:ख झाल्याचे वाटले नाही, नाही का ? '

'सद्या सुशिक्षित समाजात दु:ख न दाखवण्याची पद्धत आहे. आणि दोन प्रकारची माणसे असतात. काही माणसं ओक्साबोक्सी रडतात. काहीजण बाहेरुन दाखवत नसली तरी मनात ठेवतात. ताई या सुशिक्षित पुढारलेल्या विचाराच्या. त्यांनी दु:खाचे प्रदर्शन केले नसेल कदाचित पण त्या हादरलेल्या दिसत होत्या. '

'हो तर. उदय सर अचानकच गेले ना. कसलाही आजार नाही. रात्रौ झोपले

ते सकाळी उठले नाहीत .’
‘तसे सर बेफिकीर. नॉनव्हेज किती खायचे एकाचवेळेस. ’
‘हो ना. त्यांना कोल्हापुरी मटण फार आवडायचे. ते जेवायला असले तर तू दोन किलो मटण आणायचास आणि त्यातील जास्त तेच संपवायचे. ’
‘ताई त्यांच्या एकदम विरोधी. एवढेसे जेवण आणि रोज कसला ना कसला उपवास’
‘दोन वेगवेगळ्या स्वभावाची माणसे एकत्र संसार करत होती. आत सर गेले बाई राहिल्या. विभा मात्र आईवर गेली. शांत, हुशार, सुस्वभावी’
तुला सरांचा किती वर्षे सहवास मिळाला असेल ?
‘किमान दहा वर्षे. रत्नागिरीच्या कॉलेजात मी ज्युनियर प्रोफेसर म्हणून जॉईन झालो तेव्हा सर हेड ऑफ द डिपार्टमेंट होते. आमच्या फिजिक्स डिपार्टमेंटची दर शुक्रवारी मिटिंग व्हायची तेव्हा सरांच्या केबिनमध्ये मी जायचोच. मी त्यावेळी बॅचलर त्यामुळे शनिवारी, रविवारी सरांकडे जेवायला जायचो. त्यामुळे ताईंची ओळख झाली. ताई हायस्कूलमध्ये शिक्षिका. संस्कृत शिकवायच्या. विद्यार्थी प्रिय. सर एकदम देखणे. तर ताई सर्वसाधारण.
‘मग दोघांचा संसार कसा होता ? ’
‘काही कळायचं नाही पण ताई नाराज दिसायच्या. ’
‘का ?’
‘काय होत, सर हे पुढं पुढं करणारे. सर्वात मिसळणारे, स्त्रियांमध्ये प्रिय, नास्तिक विचाराचे आणि बाई त्याविरुद्ध, ठरावीक मंडळीमध्ये विसरणाऱ्या, सतत पुस्तके वाचणाऱ्या, व्रते करणाऱ्या, नोकरी प्रामाणिकपणे करणाऱ्या. म्हटलं तर ही दोन टोक होती.

राजेंद्रने पुन्हा गाडी सुरु केली. त्याच्या डोक्यात सरांच्या संसाराची चक्रे फिरु लागली. सरांचे मोठ्याने हसणे, नॉनव्हेज जोक्स मारणे, कॉलेजमधील लेडी प्रोफसरस् आणि मुलींमध्ये इंप्रेशन मारण. राजेंद्र ला आठवण झाली. आपल्यानंतर दोन वर्षांनी रत्नागिरीजवळची एक तरुण मुलगी फिजिक्स डेमॉस्ट्रेटर म्हणून जॉईन झाली होती. सरांनी तिची नेमणूक आपल्या सोबतच्या प्रॅक्टीकल्स मध्ये केली. राजेंद्र च्या लक्षात यायच की ती सरांबरोबर प्रॅक्टीकल करायला नाराज असायची पण आपण जर प्रॅक्टीकल ला असलो तर खुष असायची. दोन महिन्यानंतर एकदा ती त्रासलेल्या चेहऱ्याने आपल्याला म्हणाली, ‘राजेंद्र सर मी नोकरी सोडतेय. त्रास होतो मला. ’ मी म्हटलं, ‘अगं कसला त्रास? मला सांग, मी प्रयत्न करतो त्रास कमी करण्याचा.’ ती म्हणाली, ‘नाही, तुम्हाला शक्य नाही ते. मला प्रिन्सिपल ना भेटाव लागेल.’ मग दोन दिवसांनी तिने राजीनामा दिल्याची बातमी आली. पुन्हा कधी ती

दिसली नाहीच. तिला सरांकडून काही त्रास झाला होता का? राजेंद्रच्या मनात ती शंका त्यावेळेपासून होती पण ती परत दिसली नाही त्यामुळे तो विषय तेथेच संपला.

दुपारी १.०० च्या सुमारास त्यांची गाडी साळवी स्टॉप जवळील घराजवळ आली. वसुमती ताई वाटच पाहत होत्या. ती दोघ येताच क्षणी त्यांना खूप आनंद झाला असे वाटले. त्यांनी चहा दिला आणि विभाची खोली दाखविली. राजेंद्र आणि सविताने विभाच्या खोलीत आपली बॅग ठेवली.

'हातपाय धुवा आणि जेवायला या. जेवण तयार आहे. '

'हो ताई, दहा मिनिटात येतो. '

राजेंद्र आणि सविताने हातपाय धुतले आणि कपडे बदलून जेवायला बसली. राजेंद्र पूर्वी रत्नागिरीला असताना बऱ्याच वेळा ताईंच्या हातच जेवला होता. त्यानंतर सुद्धा तो वर्षातून एखाद्या वेळेस रत्नागिरीला सरांना-ताईंना भेटायला यायचा. सविता एक वेळ आली होती. त्यानंतर मागच्या वेळेस सरांच निधन झाल तेव्हा दोघही आली होती. दोघांना ताईंच्या हातचं जेवण मनापासून आवडल. मग ताई भांडी वगैरे आवरायला लागल्या तेव्हा सविता त्यांच्या मदतीस आली. दोघींनी गप्पा मारत दहा मिनिटांत आटोपल आणि आपल्या खोलीत सविता, राजेंद्र आराम करायला गेली.

साडेचार वाजता कॉफीचा दरवळ घरात पसरला तसे राजेंद्र, सविता उठले. तोंड धुऊन हॉल मध्ये कॉफी प्यायला आले. सविता किचन मध्ये ताईंनी कॉफीचे भरलेले कप आणायला गेली. तिघजण हॉल मध्ये कॉफी पिता पिता गप्पा मारायला लागली.

'सविता , तुझ माहेर कुठं गं ? '

'निपाणी. निपाणीचे मानवी. '

'हो का. माझे माहेर बेळगांव. त्यामुळे कोल्हापूरातून बेळगावला जाताना वाटेत निपाणी लागायचं. '

'तुम्ही बेळगावच्या का ? मग सर कुठे भेटले ?'

'ते दोन-तीन वर्षे बेळगावच्या कॉलेजात होते. तेव्हाची ओळख.'

'मगं, तुमचा प्रेमविवाह का ?'

'ते जाऊदे, तुम्ही गणपतीपुळ्याला जाणार आहात का?' बाईंनी सरांचा विषय टाळला हे सविताच्या लक्षात आले.

'हो, उद्या जाऊ पण तुम्ही तातडीने आम्हाला का बोलावल होत, सहज ना ?'

'ते उद्या बोलू. ' 'तुम्ही गणपतीपुळ्याला जाऊन या'

सायंकाळी राजेंद्र -सविता रत्नागिरीत फिरुन आले. रत्नागिरीतील आपले कॉलेज, फिजिक्स डिपार्टमेंट, कॅन्टीन सर्व राजेंद्रने सविताला दाखविले. दुसऱ्या दिवशी राजेंद्र

–सविता पावस गणपतीपुळे फिरुन आली. ताईंनी त्यांच्यासाठी चहा भरलेला थर्मास आणि बिस्किटे तयार ठेवली होती. राजेंद्र सविताला म्हणाला, ‘ताईंनी मुद्दाम येऊन जा असे का सांगितले, हे अजून कळले नाही.
’हो. पण त्या म्हणाल्यात ना मग बोलू म्हणून.’  सायंकाळी ४.०० पर्यंत दोघ घरी आले. वाटेत जेवण झाल्याने जेवणाची घाई नव्हती. थोडावेळ विश्रांती घेऊन दोघ पुन्हा ताईंशी गप्पा मारण्याच्या तयारीने हॉलमध्ये आले.
राजेंद्र ताईंना म्हणाला, ‘ताई दोन दिवस राहिलो. आता उद्या दुपारी निघाव म्हणतोय. परवा माझी डेंटिस्टची अपॉईंटमेंट आहे. ’
‘हो, तुम्ही आल्याने बर वाटलं. यावेळी मी तुम्हाला मुद्दाम बोलावल. सविताला फोन करुन तस सांगितल. ’
‘हो. म्हणूनच तातडीने आलो. तुम्ही कुठे बाहेरगावी जाताय का?’विभा कडे, ऑस्ट्रेलियाला ?
‘नाही. परदेशी जायला मी फारशी उत्सुक नाही. विभा आणि विघ्नेश यांच बर चाललयं. दोघांनी स्वत: ठरवून लग्न केलयं. दोघं ही नोकरी करतात. पैसे मिळतात, खर्च ही करतात. मला फोन करतात. हळूहळू सर्व पाशातून मोकळं होण हे उत्तम.’
‘मग, कुठे जाताय? बेळगावला की माहेरी ?’
‘नाही.’
‘मग ?’
‘मला तुम्हाला दोघांना काही सांगायच आहे. मी जे सांगणार आहे. ते समजण्याएवढी प्रगल्भता असणारी तुम्ही दोघे आहात अस माझ मत आहे आणि तुम्ही दोघ मला जवळची पण आहात. विभाचा पण तुम्हा दोघांवर विश्वास आहे. राजेंद्र सहा महिन्यापूर्वी सरांचा मृत्यू झाला त्यावेळी तुम्ही दोघ आला होतात, त्यांच्या अंत्यविधीला तुम्ही होतात. ’
‘हो, ताई. ’ एक मिनिट थांबत निश्चयाने ताई म्हणाल्या.
‘सरांचा मृत्यू नैसर्गिक नव्हता. ’
राजेंद्र चित्कारला. .. काय?...म्हणजे?
‘म्हणजे सरांना नैसर्गिक मृत्यू आला नाही. यासाठीच मी तुम्हाला बोलावले. तुम्हाला सर्व मागचा इतिहास सांगायचा आहे. ’
‘माझा जन्म बेळगावचा. मी ज्या कॉलेजात शिकत होते. त्याच कॉलेजात सर फिजिक्स शिकवायला आले. तरुण, हँडसम. थोड्याच दिवसात समस्त मुली त्यांच्यावर फिदा झाल्या. त्यांना पण मुलींमध्ये मिसळायला आवडायचे. मी ज्या बेळगावच्या गल्लीत राहत होते त्याच गल्लीत ममता राहायची. दिसायला एकदम

सुंदर. आम्ही दोघी एकत्र सायकल वरुन कॉलेजला जायचो. सरांच्या रुबाबाची भूल तिच्यावर होती आणि माझ्यावर पण होती. तिने सरांचा ध्यास घेतला होता. मग काही दिवसांनी ती कॉलेजला लवकर जायला लागली. काही मैत्रिणी ती सरांबरोबर कुठल्या कुठल्या हॉटेलमध्ये पाहिल्याचे सांगत होत्या पण मी मात्र स्वत: कधी पाहिले नाही. काही महिन्यांनी ममता कॉलेजला यायची बंद झाली. मी तिच्या घरी जाऊन तिची चौकशी पण केली पण तिच्या वडिलांनी ती मुंबईत कॉलेजसाठी गेली म्हणून सांगितल. ममता नंतर अनेक वर्षांनी कोल्हापुरात एका लग्नात भेटली. तो विषय पुढे येईलच.' कॉलेजच्या नाटकात मी भाग घेतला. सर नाटक बसवत होते. या नाटकात आणखी एक मुली काम करत होती. ती सरांसाठी पागल झाली होती. सर पण तिला खेळवत होते हे दिसत होते. या नाटकामुळे माझी सरांशी ओळख झाली. अचानक एक दिवस सर माझ्या घरी आले. त्यांनी माझ्या वडिलांकडे माझ्याशी लग्नाचा प्रस्ताव ठेवला. माझे आई-वडील खुश झाले. एवढे देखणे, हुशार स्थळ आपणहून आल्याने ते फारच आनंदित झाले. आमचा साखरपुडा झाला ही बातमी सर्वत्र पसरली तशी माझ्याबरोबर नाटकात काम करणारी दुसरी मुलगी घाबरीघुबरी झाली. मला एकदा भेटायला आली. 'वसुमती, सरांबद्दल तुझा साखरपुडा झाला ही बातमी खरी का?'

'हो ग. रविवारी झाला साखरपुडा. ती नर्व्हस होत गप्प राहिली. डोळ्यात अश्रू आले होते. तशाच रडवल्या स्वरात म्हणाली. 'सरांनी मला लग्नाचा शब्द दिला होता पण ...'

हे तू आधी नाही का सांगायचस?

'काय सांगू, कप्पाळ माझं. मी फसले गं... असं म्हणत रडत रडत ती गेली. या तिच्या फसण्याचा नंतर माझ्या लक्षात आलं त्यावेळी मी सरांबरोबर लग्न या जगात मश्गुल होते. त्याचवर्षी मे मध्ये माझं सरांबरोबर लग्न झाल. मी ग्रॅज्युएशन नंतर बीएड करायच ठरवल. आम्ही किर्लोस्कर रोडवर बिऱ्हाड केल. सर त्यांच्या स्कुटर वरुन मला कॉलेजमध्ये सोडायचे आणि मग कॉलेजला जायचे. माझ बीएड झाल आणि सरांनी रत्नागिरीच्या कॉलेजात नोकरी पकडली. सर तसे मूळ लांजा तालुक्यातील. मी पण रत्नागिरीस आल्यावर इथल्या शाळेत नोकरीला लागले. लग्नापासून रत्नागिरीत येईपर्यंत माझे आयुष्य आनंदात गेले. त्यावेळी रत्नागिरी फार मोठ शहर नव्हत. सरांनी आल्या आल्या एक प्लॉट विकत घेतला आणि घर बांधायला सुरुवात केली. माझी शाळा थोडीशी लांब म्हणून सर मला सोडायला यायला लागले. शाळा सुटल्यावर मला एस.टी मिळायची म्हणून मी येताना एस.टी ने यायची. माझी शाळा कन्या शाळा होती. त्यामुळे सर्वच मुली आणि सर्व शिक्षिका.

सर मला सोडायला यायचे तेव्हा इतर शिक्षिका पहायच्या. बहुतेक जणी

सरांच्या पर्सनॅलिटीने भारावल्या होत्या. त्यातील कुमुद ही जास्त सरांची चौकशी करायची. कुमुद ही दापोलीची. लग्न झालेली. नवरा  दापोलीत आणि ही रत्नागिरीत. याचदरम्याने मी प्रेग्नंट राहिले आणि सहाव्या महिन्यापासून रजेवर गेले आणि पहिले बाळंतपण म्हणून माहेरी बेळगावला गेले. या दरम्याने मला शाळेतील एका सहशिक्षिकेचे पत्र आले की, तुझा नवरा आणि या कुमुदचे प्रेमप्रकरण जोरात सुरु आहे. मी आठ महिन्याची गरोदर त्यामुळे रत्नागिरीला येऊ शकत नव्हते म्हणून माझ्या धाकट्या भावाला रत्नागिरीस पाठविले. तेव्हा त्याला कळले, सर रत्नागिरीत नव्हते. त्याने कॉलेजात, मित्रमंडळीत चौकशी केली पण कुणाला माहीत नव्हते. कंटाळून तो बेळगावला येण्यासाठी एस.टी स्टॅण्ड वर आला एवढ्यात त्याच्या समोर महाबळेश्वर- रत्नागिरी एस.टी उभी राहिली. त्याच सहज लक्ष गेलं तर त्या गाडीतून सर आणि एक बाई खिदळत उतरत होती. त्याने पुढे जाऊन सरांना कुठे गेला होतात असे विचारले. तर सर त्याच्यावरच डाफरले. या पुढे कळविल्याशिवाय येत जाऊ नकोस. असे म्हणून रिक्षात बसून निघून गेले. बेळगावात आल्यावर माझ्या भावाने मला सर्व परिस्थिती सांगितली. अवघडलेल्या परिस्थितीत मी काही करु शकत नव्हते पण मी माझ्या शाळेतील मैत्रिणीच्या संपर्कात होते. तिच्या म्हणण्यानुसार कुमुदचा नवरा शाळेत आला होता आणि शाळेत सर्वांसमोर त्याने बायकोच्या दोन-तीन थोबाडीत मारल्या आणि तिला तिच्या माहेरी पाठविले. मला फार  दु:ख झाले. मी त्यांना दोन पत्रे पाठविली पण त्यांनी उत्तर पाठविले नाही. बेळगावला विभाचा जन्म झाला. माझ्या वडिलांनी तार करुन सरांनी ही बातमी कळविली पण कन्येचे तोंड पहायला ते आले नाहीत.

तीन महिन्यानंतर मीच विभाला घेऊन रत्नागिरीला आले. 'महाबळेश्वर मध्ये कोण होत बरोबर? असा मी जाब विचारला, त्यावर हे काही खरं नाही. माझ्या वैयक्तिक बाबतीत लक्ष घालू नकोस. '

एवढ बोलून हा गृहस्थ घोरु लागला. त्या दिवसापासून मी त्यांच्यासोबतचे नवरा-बायकोचे नात संपवले. नाईलाजाने एका घरात रहात होतो, लहान मुलगी होती तिला वाढवायची होती. नोकरी करत होते. जेवण करत होते. रात्रौ विभाला जवळ घेऊन रडत होते. मध्येच ताई राजेंद्रला म्हणाल्या, 'राजेंद्र तू केव्हा आलास रत्नागिरीत नोकरीला?'

'९५ जून मध्ये ताई'

'बरोबर, ९६ साली तुमच्या फिजिक्स डिपार्टमेंट मध्ये लांजाजवळची एक मुलगी डेमॉस्ट्रेटर म्हणून नोकरीला आली होती तुला आठवत असेल. '

'हो ताई. पण ती दोनच महिने इथे राहिली. मग त्यानंतर कुठे नाहीशी झाली कोण

जाणे.'मी सरांना विचारले तेव्हा त्यांनी खांदे उडविले.
'सरांना खांदे उडवायला काय? सरांमुळे ती कंटाळली. चांगल्या घरातली मुलगी ती नोकरी सोडून गेली. '
'काय म्हणता? मला म्हणालेली ती इथे मला त्रास होतो म्हणून. '
'त्रास कोणामुळे?' फिजिक्स डिपार्टमेंटच्या हेडमुळे. हे तिला छळत होते. प्रॅक्टीकलच्या वेळी अंगचटीला येत होते. घाणेरडे जोक्स ऐकवत होते. ती चांगल्या घरातली मुलगी हैराण झाली. ती मला भेटायला आली. रडून रडून सर्व सांगत होती. मी तिला म्हटलं,' माझा नवरा असला तरी तो मला ऐकणारा नाही, तू प्रिन्सिपलकडे तक्रार कर. ती रडत रडत गेली आणि मग तीने नोकरीच सोडली. कुठेतरी गावाकडे गेली ती.

मी फक्त विभासाठी घरात राहात होते. तिला मोठ करायचं होत. शिक्षण द्यायच होत. हा एवढा शिक्षण घेतलेला माणूस मुलीकडे किंवा मुलीच्या अभ्यासाकडे ढुंकून बघत नव्हता. सतत स्वत:मध्ये मश्गुल. नवीन नवीन फॅशनेबल कपडे, केसांच्या स्टाईल्स, सेंटस्, बुटस् आणि नवीन मॉडेलच्या गाड्या.

मी कोल्हापुरला नात्यातल्या लग्नाला गेले तेव्हा बेळगावच्या आमच्य गल्लीतील ममता खूप वर्षांनी भेटली. कॉलेज काळात आम्ही दोघी नेहमी बरोबर असायचो. मला बाजूला घेऊन माझ्या गळयात पडून खूप रडली. तिच्या म्हणण्यानुसार सर तिला घेऊन हॉटेलात जात होते. लग्नाचे वचन देत होते. त्याचवेळी कॉलेजमधील देसाई मॅडम बरोबर फिरत होते, त्यांना लग्नाचे वचन देत होते. ममताच्या हे लक्षात आले तेव्हा ती खूप रडली आणि आत्महत्या करायला गेली पण तिच्या मोठ्या बहिणीने तिला सावरले. ती तिला मुंबईत घेऊन गेली आणि तिने तिचे नवीन आयुष्य सुरु केले. माझ्या मनात आले ममता आधी मला बोलली असती तर मी सावध झाले असते आणि माझे आयुष्य वेगळ्या मार्गाने गेले असते.

राजेंद्र तुला सांगते अजून कितीतरी स्त्रियांना तुझ्या सरांनी खेळवले असेल कोण जाणे?. एक खेळणे खेळायचे, खेळून झाले की फेकून द्यायचे की मग दुसरे खेळणे आणि त्यांच नशीब त्यांना खेळणी भेटायचीची.

हे सर्व असह्य होत होतं म्हणून मी झोपेच्या गोळ्या घ्यायला लागले. डोक शांत ठेवण्यासाठी मानसोपचार तज्ञांची मदत घेत होते मी. जगासमोर नवरा-बायकोच नाटक करायला लागायच. यात एकच समाधान . माझी विभा हुशार निघाली. सतत उत्तम मार्क्स मिळवून इंजिनिअर झाली. एम. टेक झाली, नोकरीला लागली. तिला विघ्नेश भेटला. माझ्य संमतीने त्यांनी लग्न केली आणि दोघ ऑस्ट्रेलियाला गेली. राजेंद्र, सविता तुम्हाला ही माझी कर्मकहाणी सांगत सुटले, कदाचित हे सर्व असेच

चालले असते आणि माझ तोंड बंदच राहिल असतं पण अशी एक घटना घडली की मी गप्प राहू शकत नव्हते.

'कुठली घटना?' सविताने विचारले.

'रिटायरमेंट नंतर सर त्यांच्या गावी लांजाजवळ जावू लागले होते. तेथे माझे दीर, जाऊ आणि त्यांचा मुलगा असतो. माझे दिर रेशनिंग दुकानात मापारी आहेत आणि थोडीशी आंब्याची झाडे आहेत. तशी गरीबीच आहे. मी माझ्या पगारातून माझ्या दिरांना, जावेला मदत करत असे. सर गावी जाऊन बागेत आपले मन रमवायला लागले म्हणून मी खुश होते. इथले रत्नागिरीतील प्रताप थोडे कमी होतील म्हणून पण नंतर माझ्या लक्षात आले हल्ली बरेच दिवस ते गावीच मश्गुल असतात. खरं तर एका ठिकाणी चिकटून राहणारे ते नाहीत. अस असूनही आणि एक दिवस माझ्यावर बॉम्बस्फोट झाला. कोणीतरी एका पाकिटातून काही फोटो पाठविले. या फोटोत माझी जाऊ सरांच्या मिठीत दिसत होती. नकोत्या अवस्थेत दोघांचे फोटो होते. मी आयुष्यात कधी हादरले नव्हते एवढी हादरले. प्रत्यक्ष आमच्या कुटुंबाला वाळवी लागली होती आणि या वाळवीने सार कुटुंब बेचिराख होणार होत. या कृष्णसर्पाने आमच्या कुटुंबाला वेटाळा घातला होता. या कृष्णसर्पाला ठेचायलाच हवं होतं.'

आजपर्यंतचे सारे प्रताप मी सहन केले पण हे अशक्य होते. काहीतरी करायलाच हवे होते. याचा शेवट करायलाच हवा होता आणि मी निर्णय घेतला मन घट्ट केलं आणि एकदा माझा नवरा घरी आलेला असताना रात्रौ झोपल्यानंतर सकाळी जिवंत उठणार नाही अशी तजवीज केली.

'काय ..? राजेंद्र, सविता चित्कारले.'

'होय राजेंद्र. मीच सरांना मारलं. कृष्णसर्पाला ठेचलं मी.

खोलीत स्मशान शांतता पसरली. ताई गप्प झाल्या. राजेंद्र, सविता गप्प झाली. फक्त वर फिरणाऱ्या पंख्याचा तेवढा आवाज ऐकू येत होता. दोन मिनिटानंतर ती शांतता भंग करीत ताई म्हणाल्या, 'राजेंद्र , तुला मी मुद्दाम बोलावले आहे. कारण हे सर्व कुणाला तरी सांगायच होतं, जायच्या आधी.'

' ताई , तुम्ही कुठे जाताय? ' सविताने काळजीने विचारले.

'मी आता सुटणार आहे सर्वातून .'

'ताई, जीवाचे काही बरे वाईट?'

'नाही. सविता जीवाचे बरे वाईट का करु मी? माझ्या आईने नऊ महिने मला वाढवले. ते शरीर आत्महत्या करुन नाहीसं करु?

'मग ताई तुम्ही आमच्याकडे या. आमचं मोठ्ठ घर आहे कोल्हापुरात.'

'नाही. मी कुणाकडेच जाणार नाही.'

‘मगं ?’
‘माझी व्यवस्था मी केली आहे. गेली सहा–सात महिने मी याच कामात आहे. मी आता थोडेच दिवस या रत्नागिरीत राहीन . विभाला पत्र लिहून मी सर्व कळविल आहे. माझ्या नावची सर्व संपत्ती मी दान केली आहे. सरांची संपत्ती त्यांच्या भावास दिली आहे. गावची जमीन, घर त्यांच्या भावाच्या नावे करुन दिलय. फक्त हे घर शिल्लक आहे. त्याची एक किल्ली तुमच्याकडे राहू द्या. एक किल्ली विभाला मी पाठवून दिली आहे. तुम्ही कधीतरी रत्नागिरीत याल तेव्हा या घरात राहा. विभा वर्षातून एकदा येते भारतात तेव्हा ती हे घर उघडेल आणि ती राहील इथे. ’
‘ताई, तुम्ही सर्व निरवानिरव करताय. ?’
‘होय. सविता, राजेंद्र ही तुमची माझी शेवटची भेट.  चला झोपा आता. मला पण आता झोप येतेय. सकाळी बोलू.’
वसूमती ताई उठून आपल्या बेडरुम मध्ये गेल्या आणि त्यांनी बेडरुमचे दार आतून बंद केले. राजेंद्र, सविता पण उठले आणि आपल्या बेडरुम मध्ये गेले. दोघ बेडवर पडले पण झोप येईना. मघापासून वसुमती ताई सांगत होत्या ते सत्य की भास हेच त्यांना कळत नव्हते. सरांच हे दुसरं रुप ऐकून राजेंद्र व्यथित झाला. ताईंनी नेमका काय निर्णय घेतला हेपण त्याला कळले नाही. खूप वेळ ती दोघ ताईंचा विषय बोलत राहिली. पहाटे केव्हा तरी त्यांना झोप लागली.

सकाळी थोड उशीराच त्यांना जाग आली. सविता बेडरुमच्या बाहेर पडून ताईंच्या खोलीकडे गेली तर दार बंद होते. बाहेरुन नुसती कडी लावलेली होती. तिने दार उघडले तर आत कोणी नव्हते. ती किचन मध्ये आली. किचन मध्ये शांतता होती. तिने नवऱ्याला उठविले. तो पण बाहेर आला. बंगल्याच्या आजूबाजूला पाहिले. ताई कुठेच नव्हत्या. बागेत, गच्चीत, गेटकडे, रस्त्यावर ताई कुठेच नव्हत्या. त्यांनी त्यांचा मोबाईल फोन करुन पाहिला . फोन बंद करुन त्यांच्या बेडवर ठेवला होता. राजेंद्र च्या लक्षात आले. काल रात्रौ ताईंनी ही आपली शेवटची भेट म्हणून सांगितले ते खरे केले होते.

दुपारपर्यंत वाट पाहून राजेंद्र ने घराला कुलुप लावले आणि गेटमधून गाडी बाहेर काढली.

# (शिक्षक) सेवक

प्रदिप केळुसकर – मोबा. ९४२२३८१२९९

गुड मॉर्निंग सर !

गुड मॉर्निंग ! या पाटणकर. कुठल्या गावाहून आलात?

'कोकिजरे , तालुका – वैभववाडी'.

'हा. म्हणजे सह्याद्री पट्टा. शिक्षण कोठे झाल?'

'शाळा कोकिजरे, बी.एस.सी कणकवली कॉलेज, एम.एस.सी, कोल्हापूर, बी.एड.–गारगोटी'

ठीक. म्हणजे शिवाजी विद्यापीठ, तुमच एम.एस.सी ला फिजिक्स विषय होता ना?

'हो सर.'

नाही, विचारण्याच कारण म्हणजे आमच्या शाळेत फिजिक्सची व्हेकन्सी आहे आणि तुम्ही केमस्ट्री नायतर बायोलॉजी मध्ये एम.एस.सी केलं असेल.

'नाही सर! मी फिजिक्स मध्ये एम.एस.सी केलय.'

शिकवण्याचा काही अनुभव? तेथे उपस्थित असलेल्या साळगांवकर मॅडमने विचारले.

' मॅडम, मी दोन वर्षे कणकवलीत एका क्लासमध्ये शिकवत होतो.'

'मग तेथला जॉब का सोडला?'

पैसे फार मिळत नव्हते म्हणून, पाटणकर हळूच म्हणाले.

आमच्याकडे सुद्धा शिक्षण सेवक म्हणूनच जागा आहे बरं का. सरकारी ग्रॅण्ट नाही. त्यामुळे .... काय तो विचार करा.

पण पुढे मागे सरकारी ग्रॅण्ड मिळेल ना मॅडम.

हा आमचे प्रयत्न सुरुच असतात. पण सरकारचे नियम दिवसाला बदलतात. ग्रॅण्ट मिळाली तर तुमचा फायदा होईल.

हो सर.

अकरावी– बारावी फिजिक्स बरोबर प्रॅक्टीकल पण घ्याव लागेल. शिवाय खेडेगावातील शाळा आहे. इथे प्रायव्हेट क्लास वगैरे नाही. त्यामुळे शनिवारी, रविवारी तसेच सुट्टीत जादा तास घ्यावे लागतील.

हो सर. माझी तयारी आहे. मग ठीक आहे. मुख्याध्यापक जोंधळे आहेत. त्यांना भेटा . तुमची सर्टिफिकेट्स जमा करा आणि १० जून पासून वर्ग सुरु होतील. तेव्हा हजर

व्हा.
पण सर, पगार किती मिळेल ?
ते तुम्हाला, कोळंबकर नावाचे क्लार्क आहेत, ते सांगतील.
अशारितीने पाटणकरांचा इंटरव्ह्यू पार पडला. एम.एस.सी झाल्यानंतर दोन वर्षे नोकरीसाठी शोधाशोध करुन शेवटी या गावातील शाळेत अकरावी- बारावी साठी फिजिक्स शिक्षकाची जागा खाली आहे. हे पेपर मध्ये वाचल्यानंतर पाटणकरांनी अर्ज केला आणि त्यांची निवड झाली.

चेअरमनांच्या ऑफिसमधून बाहेर पडुन पाटणकर मुख्याध्यापक जोंधळे सरांना शोधायला निघाले. जोंधळे सर त्यांच्या ऑफिसमध्ये मोबाईल मध्ये रंगात आले होते. दोन मिनिटे त्यांचे आपल्याकडे लक्ष जाते काय, हे पाटणकर पाहत राहिले. पण जोंधळे कसलासा सिनेमा पाहण्यात दंग होते. शेवटी पाटणकर त्यांच्या टेबलासमोर उभे राहिले.
सर, नमस्कार! मी नारायण पाटणकर. जोंधळे दचकले. मग सावरत म्हणाले, 'बरं मग, मी काय करु ?'
'सर, मी हायर सेकंडरी मध्ये फिजिक्स विषयासाठी अर्ज केला होता. आताच चेअरमन साहेबांनी माझा इंटरव्ह्यू घेतला. त्यांनी तुम्हाला भेटायला सांगितले. '
असं होय. इंटरव्ह्यू दिला काय आणि न्हाई दिला काय. तुम्हीच शिलेक्ट होणार. का सांगा ?
का ?
कारण ह्या खेडेगावात सहा हजार रुपड्यात यांना कोण मास्तर भेटणार ?
किती ? सहा हजार फक्त ?
मग, सहा लाख वाटले की काय? हा आता मला दीड लाख पगार हाय. सातवा आयोग बरं का.
पण, चेअरमन नी तुम्हाला भेटायला सांगितलय.
हा. भेटलात म्हणून सांगा. त्यो कोलंबकर क्लार्क हाय का बघा. त्याचेकडं सर्टिफिकेट जमा करा आणि नऊ तारखेला या. कारण आदल्या दिवशी मिटींग असते. मॅनेजमेंट आणि शिक्षक यांची.

पाटणकर बाहेर पडले आणि क्लार्क कोळंबकरला शोधू लागले. कोळंबकर मोबाईल मध्ये रमी लावत बसला होता. पाटणकर त्याच्या समोर उभे राहिले.
'कोळंबकर मी पाटणकर.' कोळंबकर रमीत व्यत्यय आला म्हणून वैतागला. त्याने चिडून विचारले, काय काम आहे ?

इथं या शाळेत फिजिक्स शिकवण्यासाठी मी १० तारीख पासून येणार आहे. मुख्याध्यापकांनी तुम्हाला भेटायला सांगितले.
होय काय. बरा बरा. हेंका नवीन नवीन बकरो बरो गावता.
'बकरो?'
नायतर काय. सहा हजारात या खेडेगावात कोण येतलो? बरा ता जावंदे. तुमची सर्टिफिकेटा घेवन येवा. पाटणकर नोकरीस हजर होण्याआधीच हैराण झाला. बायकोला काय सांगणार? तिला काल म्हटले, फिजिक्स च्या शिक्षकाची नोकरी आहे. ती खूश. ती शिक्षकांचे हल्ली लाखात पगार ऐकून होती. तिला शिक्षण सेवक हा मधला प्रकार माहीत नव्हता.

मोडक्या एम.एटी वर बसून फूर फूर करत पाटणकर आपल्या गावी निघाला. या गावाहून आपले गाव चाळीस किलोमीटर म्हणजे याच गावात बिऱ्हाड करावे लागणार. बिऱ्हाड केले की खर्च वाढणार. गावी चार माणसांत दोन माणसे खपून जात होती. आता खोलीचे भाडे, इलेक्ट्रीसिटी, मुलासाठी दूध, सर्वच विकत. आणि हे सर्व सहा हजार रुपयात भागवायचे कसे? शाळेतून बाहेर पडल्यावर काही अंतरावर त्यांना लहानशी बाजारपेठ दिसली. पाटणकरांनी फटफटी थांबविली. एक किराणा दुकान, एक लहानसे चहाचे हॉटेल, एक पानपट्टी आणि एक लाकडी खुर्चीचे सलून. सलून पाहताच पाटणकर पुढे गेले. खरंतर हा आपला पारंपरिक धंदा. आजोबा, काका वडिलांनी हाच व्यवसाय केला. पण वडिलांनी एकतरी मुलगा शिकावा म्हणून पोटाला चिमटा घेऊन आपल्याला कोल्हापूरात शिकायला पाठवले. आपला मुलगा डबल ग्रॅज्युएट झाला म्हणून वडिलांना कृतकृत्य वाटले. ज्याला त्याला मुलाची हुशारी सांगत सुटले. त्यांना वाटलं 'आपलो झील कॉलेजात शिकवतोलो. फाड फाड इंग्रजी बोलतोलो. चार चाकी गाडीतून फिरतोलो.' पण आपण झालो शिक्षण सेवक.

पाटणकर त्यातल्या त्यात मोठ्या असलेल्या किराणा दुकानदाराकडे गेला. हा नवीनच माणूस दिसतोय म्हणून किराणा दुकानदाराने चौकशी सुरु केली.
'खयसून ईलात?'
'मी पाटणकर. गांव कोकिसरे. ह्या शाळेत शिक्षक म्हणून ईलय.'
'खयचो विषय?'
'फिजिक्स. अकरावी -बारावी साठी.'
'अरे बापरे! म्हणजे तुम्ही डबल ग्रॅज्युएट शिकला असतालात आणि हय शिक्षण सेवक? सहा-सात हजारात गुंडाळतले.'
काय करतले. नोकरी खय गावता?

चेअरमन भेटलो की नाय? आणि दुसरा ता बायलमाणूस. साळगावकरीन. तेची मैत्रीण ती.
असेल. चेअरमन होते आणि त्या बाई पण होत्या. आणि हेडमास्तर जोंधळो जागो होतो का झोपलेला?.
होते ना.
एक नंबर चिकट माणूस. पाच रुपये खर्च करुचो नाय. लाखाच्या वर पगार घेता. सगळो पैसो गावात धाडता. तिकडे लातूर काय उस्मानाबाद तिकडचो आसा तो. तिकडे बंगलो बांधल्यान. शेती घेतल्यान. पण आमच्या दुकानाची उधारी देना नाय. पण तुम्ही कोकिसऱ्यातून जावन येवन करतालात? खूप लांब पडताला.
हय रवाचाच लागताला ओ. क्लास वगैरे पण घेवक हवे असा चेअरमनांनी सांगितल्यानी.
सहा हजार रुपयात दिवसभर शिकवायचा आणि शनिवारी- रविवारी क्लास घ्यायचे. अरे मेल्यानू ह्या मास्तरांका २५ हजार पगार तरी देवा. तुम्ही रात्री पार्टी करुक आठ- दहा हजार घालवतात. बरा मास्तर, जागा खय बघितलास काय?
नाय, ओ. ताच विचारुक ईल्लय.
ह्या बघा आमचो मांगर आसा. बंद असता. तुमका जमला तर रवा.
पण भाडा?
ह्या पगारात भाडा काय देतालात ओ? भाडा नको. फक्त माझो झील आसा आठवीत तेच्या अभ्यासार लक्ष ठेवा.
हो. हो. निश्चित. पण पाण्याची सोय वगैरे ?
विहीर आसा. भरपूर पाणी. मांगरात एक मोरी आसा. विठू, मास्तरांका मांगर उघडून दाखव. दुकानदार मिराशी चा नोकर विठू पुढे चालू लागला तसे मास्तर तेच्या मागून गेले. पाटणकरांनी मांगर पाहिला. जागा बरी होती. बाहेर एक खोली आत एक. त्याखोलीत मोरी. मांगराला मागचे दार होते. थोड्या अंतरावर विहीर होती. विहीरीवरुन बायका पाणी नेत होत्या. म्हणजे बायकोला वनिताला सोबतीण मिळणार. पाटणकरांना जागा बरी वाटली. त्यांनी दुकानदार मिराशींना सांगून टाकले. रविवारी सामान घेऊन येतो. मिराशी म्हणाले, भाडा नको. पण लाईट बिल तेवढा भरा. पाटणकर घरी जायला निघाले. त्यांचे लक्ष परत त्या छोट्याशा सलून कडे गेले. आता सलून मध्ये कुणीतरी दाढी करायला बसला होता. ह्या व्यवसायामुळे आपली भावंडे, आई-वडील दोन घास जेवतात. ह्या सलूनाचा पाटणकरांना आधार वाटला.

रविवारी सकाळी पाटणकरांची बायको वनिता आपल्या दोन वर्षाच्या

मुलासह एस.टी ने आली. त्याच्या आधी पाटणकर येऊन पोचले होते. मिराशींच्या दुकानातील झाडूने त्यांनी मांगर स्वच्छ केला आणि सोबत आणलेल्या कळशीने दोन बादली पाणी भरुन ठेवले. मिराशींच्या बायकोने चूल पेटवायला म्हणून सोडणे, झावळ्या, थोडी लाकडे दिली. वनिताने सोबत आणलेल्या तांदळाची पेज आणि मिराशींच्या वाट्यावर चटणी वाटली. मिराशींच्या दुभत्या म्हशी होत्या, त्यामुळे दुधाचा प्रश्न मिटला. आणि पाटणकरांचा संसार या नवीन गावात सुरु झाला.

दुसऱ्या दिवशी पाटणकर शाळेत हजर झाले. अकरावी साठी फिजिक्स शिकवायला वर्गात गेले. मुला-मुलींची ओळख करुन घेताना त्यांच्या लक्षात आले की मुलं त्यामानाने मोठी आहेत. बहुतेकजण अठरावर्षापेक्षा जास्त वयाची होती. चौकशी करताना समजले, हुशार मुलं दुसरीकडे शिकायला गेली आणि ज्या मुलांना पुढे शिकायच नव्हत ती मुलं या शाळेत येत होती. पाटणकरांनी फिजिक्स मधल सरफेस टेंशन हा धडा शिकवायला सुरुवात केली. त्यांनी फळ्यावर डायग्राम काढून थोड इंग्रजीत, थोड मराठीत शिकवायला सुरुवात केली. काही वेळा नंतर शिकवलेल्या अभ्यासाच्या नोटस् लिहायला घातल्या. सहजच, ते खाली उतरुन विद्यार्थ्यांच्या वह्या बघायला गेले तर त्यांना आश्चर्य वाटले. बहुतेक मुलांनी काहीही वहीत लिहिले नव्हते. मुलांचे म्हणणे त्यांना इंग्रजी लिपी व्यवस्थित येत नाही. त्यांनी एका मुलीला उठविले. अगं, मी घातलेले तू का लिहीत नाहीस?

सर, आमका इंग्रजी येना नाय. मराठी येता. मराठीत अभ्यास घाला.

अगं, पण परीक्षा इंग्रजीत असते. सर्व सायन्स इंग्रजीत शिकावे लागते.

पण आमका इंग्रजीची भीती वाटता.

मग दहावीत पास कसे झालात तुम्ही?

एक मुलगा मागून ओरडला. कॉपी करुन.

म्हणजे?

आमचे इंग्रजीचे शिक्षक चाळीस मार्काचा सगळ्यांका सांगत. म्हणून आम्ही पास झालो.

मग तुम्ही सायन्स ला का ॲडमिशन घेतलीत?

आमका पुढे नर्सिंग करुचा आसा. बारावी सायन्स झालव की नर्सिंग मध्ये ॲडमिशन गावतली.

मग बारावी पास व्हायला लागेल ना?

दहावी पास झालव तसे बारावी पास होतोलव.

पाटणकरांनी डोक्याला हात लावला. लेक्चर संपल्यानंतर त्यांना केमिस्ट्री शिकवणारे

सावंत सर भेटले. सावंत सर, गेली दहा वर्षे म्हणजे सुरुवातीपासून येथे केमिस्ट्री शिकवत होते.

‘सावंत सर, मी आता अकरावी वर फिजिक्स शिकवण्याचा प्रयत्न केला, पण मुलांना साधं एबीसीडी येत नाही. त्यामुळे मी नोटस् घालत होतो ती कोणी लिहून पण घेतली नाहीत.’

‘त्यात नवीन ते काय? मी गेली दहा वर्षे इथे शिकवतोय. अशीच मुले आहेत या ठिकाणी.’

‘मग, ती बारावी पास कशी होणार?’

‘नाही होईनात. आपल्याला पगार मिळण्याशी मतलब. मी परमनंट शिक्षक आहे. माझ कोणी काही करु शकत नाही आणि मॅनेजमेंटने जास्त गडबड केली तर आमची युनियन आहे. मी घाबरत नाही कोणाला. तुझ काय ते बघ कारण तू शिक्षण सेवक.’

‘होय ना, सावंत सर. मी शिक्षण सेवक आहे. मला मॅनेजमेंट विचारत राहणार.’

‘हे बघ पाटणकर, तुला इथे टिकायचे असेल तर सांगतो. तू शिकवण्याचे काम कर. प्रॅक्टीकल्स घे. सर्व चाचणी परीक्षेत मुलांना पास कर. अकरावीत सर्वांना पास कर कारण ते तुझ्या हातात आहे. बारावीत बघू, त्यांच्या काय नशिबात असेल ते. दोन वर्षांनी दुसरीकडे नोकरी बघ.’

पाटणकर गप्प झाले. शांतपणे फिजिक्स शिकवू लागले. प्रॅक्टीकल्स घेऊ लागलेत. चाचणी परीक्षेत मुलांना पास करु लागले.

पाटणकरांची बायको वनिताने आजूबाजूच्या बायकांबरोबर ओळख वाढविली. मिराशींच्या घरी तिचे जाणे येणे होतेच. काही हवे असले तर मिराशींची बायको तिला द्यायची.

संस्थेने पहिले दोन महिने पाटणकरांना सहा हजार रुपयाप्रमाणे मानधन दिले. तिसरा महिना संपला चौथ्या महिन्याची दहा तारीख आली तरी पैशाचा पत्ता नाही. वनिता नवऱ्याकडे एकसारखी पैसे मागत होती. घर सामानाला पैसे हवे होते. मिराशींची उधारी चालू होती. भाजीला पैसे हवे होते. दुधाचे पैसे द्यायचे होते. चौथ्या महिन्याची पंधरा तारीख आली तसे पाटणकर क्लार्क कोळंबकर ना भेटायला गेले.

‘कोळंबकर, अहो माझा पगार नाही दिला. आज पंधरा तारीख. मी माझा संसार कसा चालवू?’

‘अहो, पाटणकर. ह्यो सरकारचो पगार न्हय. एक तारखेक गावणारो. हेका मानधन म्हणतत. मुला जेव्हा फीचे पैसे भरतली त्यातून तुमचा मानधन.’

‘पण केव्हा मिळेल.?’

‘तुम्ही चेअरमनांका विचारा मी काय सांगू?’

दुसऱ्या दिवशी शाळा सुटल्यावर पाटणकर चेअरमनांच्या घरी गेले. तर चेअरमन सोसायटीत गेले होते. पाटणकर चौकशी करत सोसायटीत गेले. चेअरमन दोस्तांसमवेत गप्पा मारत बसले होते. पाटणकरांनी त्यांना नमस्कार केला.

‘हा काय पाटणकर इकडे कसो काय?’

‘साहेब, मागील महिन्यात पगार नाही झाला. पंधरा तारीख आली म्हणून आलो होतो.’

‘हे बघ पाटणकर, शिक्षक सेवकांचो पगार म्हणजे मानधन. एक तारखेक मिळात हेची गॅरंटी नाय. या आधी जे होते तेंका पण वेळेत कधी पैसे मिळाक नाय. मुलांकडून जसे पैसे जमतीत तसे पैसे देणार. संस्थेकडे पैसे नाहीत बाबा. नोकरी स्वीकारताना विचार करायला हवा होतास तु. ’

‘पण साहेब, माझ कुटुंब...’

‘हे बघ मी काही करु शकत नाही. तू जा. ’

पाटणकर निराश मनाने बाहेर पडले. घरी येऊन वनिताला सर्व परिस्थिती सांगितली. वनिता दुसऱ्या दिवशी भावाकडे कनेडीला गेली. तिच्या भावाचे कनेडीत आणि कणकवलीत दोन सलून होती. तिने भावाला सर्व परिस्थिती सांगितली.

‘वनिता, भावोजींका सांग. तुमका पगार देनत नाय तर नोकरी सोडा आणि बऱ्यापैकी सलून घाला. मी मदत करतय. अगो, आमच्या धंद्यात काय कमी नाय. दाढी करुक आम्ही चाळीस रुपये घेतो आणि केस कापूक शंभर रुपये. एसी सलून घातला तर केस काळे करुक पाचशे रुपये घेतो आणि लोक आनंदान देतत. दिवसाचो खर्च वजा करुन दीड दोन हजार रुपये खय गेले नाय. ’

‘सांगतय मी तेंका. पण तेंनी शिक्षण घेतला ना. डबल ग्रॅज्युएट आसत. सासऱ्यानी मोठ्या अपेक्षेन एका झीलाक कोल्हापुराक पाठवून शिकवल्यानी. तेंका काय वाटात? वनिताच्या भावाने दोन हजार रुपये दिले आणि वहिनीने तांदूळ, गहू, शेंगदाणे, कुळीथ वगैरे दिले. वनिताला खर म्हणजे भावाकडे काही मागणे कमीपणाचे वाटत होते. पण नवऱ्याचा पगार सुरु झाला की दादाचे पैसे परत करु असे तिने ठरविले.

संस्थेकडून पगाराचे असेच सुरु होते. दोन महिन्यानी सहाहजार मिळाले पुन्हा दोन महिने नाही. कसा तरी संसाराचा गाडा पाटणकर आणि वनिता ओढत होते. सरकारचे धोरण बदलेल आणि आपणास परमनंट शिक्षकाचा पगार मिळेल या आशेवर ते होते. हळूहळू दसरा, दिवाळी जवळ आली आणि वनिता च्या चुलत

बहिणीचे लग्न ठरले. पाटणकरांच्या मावस भावाचे लग्न ठरले. ही तर घरातली लग्ने. लग्नाला जायला हवेच. वनिता नवऱ्याला म्हणाली, 'आता दिवाळीत दोन लग्ना आसत. घरचीच लग्ना. दागिने जावंदे, खोटे दागिने घालूक येतत. पण कपडे तरी हवेत. माझे साडये जुने झालेत. दोन साड्या, ब्लाऊज, शाम्याक  दोन ड्रेस आणि लग्नाक अहेर करुक होयो. तेनी आपल्या लग्नात अहेर केल्यानी. पैशाची सोय करुक होयी. मागे  दादान पैसे दिल्यान, आता तेच्याकडे परत पैसे कशे मागतले?'

'नको, आता दादाकडे मागू नको. मी बघतय कोणाकडे तरी.' पाटणकरांच्या लक्षात आले. आपले दोन सहकारी आहेत. सावंत आणि जांभळे. दोघेही परमनंट आहेत शिवाय जांभळेंची बायको शिक्षिका आहे. म्हणजे पैशाचा काही प्रॉब्लेम नाही.

दुसऱ्या दिवशी त्यांनी सावंत सरांना गाठले. सावंत सरांना भेटताना त्यांच्या लक्षात आले, हे सर आता रिटायरमेंटला आले म्हणजे यांचा पगार एक लाखाच्या आजूबाजूला असणार. आपल्याला फक्त पाच हजाराची गरज आहे.

'सावंत सर, माझं एक काम होतं. '

'होय काय. पैशाचे सोडून काही काम असेल तर सांगा.'

'पैशाचेच होते. फक्त पाच हजार हवे होते. '

'नाय ओ. मीच कर्ज घेतलयं. त्याचे हप्ते भरतय आणि तुमच्या या सहा हजारात तुम्ही पैसे परत कशे करणार बाबा? नाही जमायचे.'

हिरमुसले होत पाटणकर बाहेर पडले. आता जांभळे सर म्हणजे नवरा बायकोचा पगार. म्हणजे किमान दीडलाख रुपये. हे नाही म्हणणार नाहीत असा पाटणकरांचा अंदाज होता.

'जांभळे सर, थोडं काम होत. '

'बोला पाटणकर. '

'फक्त पाच हजाराची गरज होती. पगार झाला की तुमचे पैसे निश्चित देणार'

जांभळे सर खो-खो हसत म्हणाले, पाटणकर शिक्षण सेवक कधी कुणाचे उधार घेतलेले पैसे देतो काय हो? तुमचे महिन्याचे मानधन वेळेत मिळत नाही म्हणजे तुम्ही अनेकांकडून पैसे उधार घेतलेले असणार. मग माझे देणार कसे? मी कधीच कुणाला पैसे देत नाही. पैसे कमवण्यास घाम गाळावा लागतो. पैसे काय झाडाला लागतात?'

'हो सर, बरोबर आहे तुमचं.' असं म्हणून पडेल चेहऱ्याने पाटणकर बाहेर आलेत. बाहेर पडता पडता शाळेचा प्यून मोहनने त्यांना पाहिले. मोहनला पहिल्या दिवसापासून पाटणकरांची दया येत होती. गरिबीतून हा मुलगा नोकरीस लागला तो शिक्षण सेवक म्हणून. चार वर्षे आधी शिक्षण पुरे केले असते. तर एव्हाना साठ-सत्तर

हजार मिळवले असते. मोहनने पाटणकरांना बाजूला घेतले.
'सर, काय प्रॉब्लेम होतो?'
'काही नाही ओ. असंच.'
'असंच नाही. माझ्या कानात शब्द पडलेत. या जांभळ्याकडे पैशे मागूक गेलात. अहो जांभळो म्हणजे एक नंबर चिकटो.' किती पैसे हवेत? मी देतलय. अहो माका चाळीस हजार रुपये पगार आसा माका खर्च कसलो? किती व्हयेत सांगा. उद्या आणून देतलय.
'कसं सांगणार तुम्हाला. पण पाच हजाराची गरज होती.'
'उद्या तुमका पाच हजार रुपये मिळतले.'
आणि खरोखरच मोहनने पाटणकरांना पाच हजार रुपये दिले आणि वर सांगितल पाटणकर हे पैसे परत करु नकात आणि तुम्ही दिलात तरी मी घेवचय नाय.
'पण मोहनराव असा कसा?'
मोहन तेथून दुसरीकडे निघून गेला होता. पाटणकरांचे मन भरुन आले. आपले पैसे मिळाले की मोहनचे पैसे परत करायचे हे त्यांनी मनोमन ठरविले.
पाटणकरांची बायको खुश झाली. या लग्नासाठी साड्या, ब्लाऊज, मुलासाठी कपडे आणि बळेबळे नवऱ्याला पण पॅन्ट-शर्ट घ्यायला लावले.

जानेवारी महिना उजाडला आणि अकरावी-बारावीची सहल काढण्याच टूम निघाली. या वर्षी गोव्याला जायचे ठरले. एकंदर बावीस मुला-मुलींनी सहलीला येण्याची तयारी दाखविली. सोबत शिक्षक म्हणून पाटणकर आणि खालच्या वर्गात शिकवणाऱ्या चव्हाण मॅडम जाणार होत्या. सकाळी सहाला बस मधून जायचे आणि संध्याकाळपर्यंत परत यायचे असा कार्यक्रम ठरला. कणकवलीतून बस येणार होती. एकंदर बारा मुलगे, दहा मुली, दोन शिक्षक असे चोवीस जण सहलीला निघाले.

पाटणकरांनी सहलीचा कार्यक्रम निश्चित केला आणि तसे ड्रायव्हरला सांगितले. गाडी साडे सहाला निघाली. गोव्यातील ओल्ड चर्च, शांतादुर्गा, मंगेशी देवस्थाने तसेच पणजी करत दुपारी तीन च्या सुमारास कळंगुट बीच वर आले. पाटणकरांनी आणि चव्हाण मॅडमनी मुलांना येथे एक तास दिला. समुद्रावरुन फिरुन चार वाजता पुन्हा बसकडे या. चार वाजता बस सुटेल असे निक्षून सांगितले. मुल-मुली खुशीत समुद्रावर धावली. पावणेचार झाले तसे पाटणकर आणि चव्हाण मॅडम बसकडे आले. चार ला पाच मिनिटे असताना मुल-मुली गाडीकडे येऊ लागली. चार वाजले तसा ड्रायव्हर येऊन बसला. चव्हाण मॅडमनी मुल-मुली मोजली तर वीस मुल भरली. म्हणजे दोन मुल आली नव्हती. अजून पाच दहा मिनिटे थांबून पुन्हा पाटणकर

लांबपर्यंत पाहून आले. दोन मुल आली नव्हती. कोण नाही आली याची चौकशी केली तर बारावीतील एक मुलगा आणि अकरावीतील एक मुलगी आली नव्हती. पाटणकर घाबरले. पाटणकरांनी मुलांकडे आणि चव्हाण बाईंनी मुलींकडे चौकशी केली तर मुल एकमेकांकडे बघून खुसुखुसु हसत राहिली.

चव्हाण बाई पाटणकरांना म्हणाल्या, काहीतरी गडबड आहे. ही मुलं गेली कुठे? शेवटी जबाबदारी पाटणकरांची होती. त्यांनी आपल्या जबाबदारीवर मुलांना एक तासा करिता सोडल होत. म्हणता म्हणता साडेचार वाजले तरी या दोन मुलांचा पत्ता नाही. पाटणकरांच्या घशाला कोरड पडली. काय कराव हे कळेना. त्यांनी शाळेत फोन केला आणि मुख्याध्यापकांना ही बातमी सांगितली. जोंधळे चिडले. 'तुम्हाला मुलांना समुद्रावर मोकळ सोडायला कोणी सांगितल होत? आता काय जबाब देणार पालकांना? आता तेथल्या पोलिसांना तक्रार द्या. दुसरा काही उपाय दिसत नाही मला.' अस म्हणून जोंधळेंनी खाड्कन फोन आपटला. पाटणकर घाबरले. चव्हाण मॅडम थरथरु लागल्या.

कोण मुल आलेली नाहीत याची चौकशी करताना संस्थेच्या सदस्या साळगांवकर मॅडम यांची कन्या आलेली नव्हती. पाच वाजले तरी मुलं आली नाहीत. शेवटी पाटणकरांनी कळंगुट पोलीस स्टेशनला तक्रार दिली. दोघांची नावे आणि फोटो दिले. इन्स्पेक्टर ने जवळपास कुठल्या बिचवर सतरा-अठरा वर्षाची मुलं समुद्रात बुडाली होती काय ? याची चौकशी केली. सुदैवाने त्या दिवशी संपूर्ण गोव्यात कसलीही  दुर्घटना झाली नव्हती. मग इन्सपेक्टरनी कळंगुट च्या आसपास सर्व हॉटेल्स, बीअर बार , लॉजेस मध्ये फोटो पाठवून चौकशी करण्याची ऑर्डर दिली. यावेळेपर्यंत गाडीत बसलेल्या मुलांनी आपापल्या घरी ही बातमी कळविली होती. त्यामुळे गावात सगळीकडे ही बातमी पसरली. पाटणकरांना आणि चव्हाण मॅडमना फोनवर सतत फोन येत होते. पण त्यांनी ते न घेण्याचे ठरविले.

पंधरा मिनिटांनी एका बार वाल्याचा मेसेज आला. सव्वा तीन वाजता एक मुलगा आणि एक मुली आपल्या बार मध्ये बिअर पीत बसली होती. मग ते टॅक्सीच्या शोधात रस्त्यावर फिरत होते. ताबडतोब शहरातील सर्व टॅक्सीवाल्यांची चौकशी झाली. रात्री आठ वाजता निरोप आला. एका टॅक्सीवाल्याने दोघांना कर्नाटक सीमेपर्यंत सोडल होत. तेथील आजूबाजूच्या लॉजवर चौकशी केली गेली आणि रात्री नऊ वाजता एका लॉजमध्ये हा मुलगा आणि मुली सापडली.

गावात जोरदार चर्चा सुरु झाल्या. त्यात साळगांवकर बाईंची मुलगी असल्याने जास्त खमंग चर्चा. एव्हाना गावातून दहा-बारा गाड्या माणसे भरुन

कळंगुट पोलिस स्टेशन कडे आल्या होत्या.

साळंगावकर बाई आणि तिचा नवरा पोलीस स्टेशनमध्ये आले आणि ते पाटणकरांना शिव्या घालू लागले. रात्री अकरा वाजता पोलीसांनी त्या मुलांना कळंगुट पोलिस स्टेशनवर आले. कळंगुटच्या आमदाराच्या मदतीने सर्व प्रकरण मिटवले आणि पालकांनी मुलं आपल्या ताब्यात घेतली आणि रात्री बारा वाजता सहलीसाठी बाहेर पडलेली मुलं, पाटणकर सर, चव्हाण मॅडम आणि गावाकडून आलेल्या गाड्या गावाकडे निघाल्या. पाठीमागून साळगांवकर मॅडम, साळगांवकर आणि त्यांच्या वाडीतील अनेकजण येत होते.

साळगांवकर आणि साळगांवकर मॅडम दात ओठ खात होते. अख्या गावात तोंड दाखवायला जागा नव्हती आणि हे सर्व त्या पाटणकरांमुळे. साळगांवकर बाई बडबडू लागल्या. तरी मी चेअरमनांना सांगत होते. 'त्या मुर्ख माणसाला शाळेत घेऊ नका. पण चेअरमन म्हणाले सहा हजारात या गावात कोण येणार?'

साळगांवकर, शिव्या घालत बोलू लागला. त्या चेअरमनला मग बघतो. आधी या पाटणकराला बघतो. एकतर मुलांना बीचवर एक तास सोडला आणि मग पोलिस तक्रार करतो. केवढी बेअब्रु झाली माझी. नाही या पाटणकरला ठार मारला तर नावाचा साळगांवकर नाही.

'अहो,त्याला ठार मारु नका हा. तुरुंगात जाल. मोडून ठेवा फक्त. आधीच या कार्टीची मला काळजी लागली. त्या पोराबरोबर पळून जात होती. आता हीची शाळा बंद. मुंबईला ताईकडे पाठविते हिला आणि लग्न करुन देते.'

मिराशींच्या घरात पण जोरात चर्चा सुरु होती. मिराशी बायकोला सांगत होते.

'त्या साळगांवकराचा पॉर लय चालू आसा. तेच्या बापाशीक मी सांगलेलय ह्या कोणाकोणाबरोबर फिरत असता. तेचा लवकर लगीन लावन टाक पण झाला ता बरा झाला. साळगांवकरनीचो तोरो जरा कमी होतोलो. नाहीतरी चेअरमनांच्या संगतीत हीका वाटा होता सगळी शाळा आपल्या खिशात.'

एवढ्यात भयभीत झालेली पाटणकरांची बायको वनिता आपल्या मुलाला कमरेवर मारुन आली. मिराशींना म्हणाली. 'भावोजी, शाळेकडे माणसा जमली आसत. पाटणकरांका मोडून ठेवतलव असा बडबडतत. माका भीती वाटता. '

'वहिनी घाबरु नकात . मी कसा काय ता बघतयं. मी पण शाळेकडे जातय.' अस म्हणून मिराशी आपल्या स्कूटरवर बसून शाळेकडे गेले. घाबरलेल्या वनिताने आपल्या भावाला कनेडीत फोन केला आणि त्याला ही बातमी सांगितली आणि साळगांवकरच्या वाडीतले लोक पाटणकरांना मारण्याची भाषा बोलत आहेत अशी

बातमी दिली. भाऊ म्हणाला, वनिता घाबरू नकोस. मी दहा मिनिटात गाडी घेऊन निघतय.

रात्रौ अडीच वाजता सहलीची बस शाळेकडे पोहोचली. मुलांचे पालक शाळेकडे उभे होतेच. मुल पटापट उतरली आणि आपल्या पालकांकडे गेली. पाटणकर, चव्हाण बाई उतरले. बस पाठोपाठ साळगांवकरांची गाडी आली. दारु पिऊन टाईट झालेल्या साळगावकराने कमरेचा पट्टा काढला आणि तो पाटणकरांना बडवू लागला. सर्व पालक पाटणकर पट्टयाचा मार कसा खातात याची मजा घेत होते. एवढ्यात मिराशी पुढे आले आणि साळगावकरांनी उगारलेला पट्टा त्यांनी हवेतच हातात पकडला आणि खेचून घेतला. मिराशी ओरडून म्हणाला, 'हरामखोर साळगांवकरा, या गरीब मास्तराक मारतस? तुझ्या पोरीन शेण खाल्ल्यान आणि त्या मास्तराक जबाबदार धरतस?'

'मग? त्याने मुलांना बीचवर का सोडल? आणि मग पोलिस तक्रार का केली?'

'अरे, मुलं सहलीला गेली होती ना? मनासारखं फिरु दे त्यांना म्हणून सोडली. बाकीची वीस मुलं वेळेत गाडीत आली. तुझा चेडू आणि तो फर्नांडिसाचो झील तेवढे पळाले ह्या दोघांका मी देवळाच्या पाठीमागे कितीवेळा बघलय. तुका सांगलेलय ह्या चेडवार लक्ष ठेव. आता पाटणकरांवर हात उचलशीत तर मुळासकट उपटून टाकीन लक्षात ठेव.'

साळगांवकर जळफळत होता. पाटणकरांना आई-बहिणीवरुन शिव्या देत होता. एवढ्यात कनेडीहून पाटणकरांचा मेहूणा दोन गाड्या भरुन माणसे घेऊन आला. पटापट दरवाजे उघडले गेले आणि हातात दांडे घेतलेले दहा जण बाहेर आलेत. पाटणकरांच्या मेहुण्याने हातात सुरा घेतला आणि पट्टा हातात घेतलेल्या साळगांवकराच्या मानेवर लावला.

'वा रे मुडद्या , या गरीब शिक्षकावर हात टाकतस? कित्या तो शिक्षण सेवक आसा म्हणून? पैशानं गरीब आसा म्हणून? भानगडी केल्यान तुझ्या चेडवान आणि या पट्टयान मारतस या मास्तरास. थांब तुझो कोथळो बाहेर काढतय.'

पाटणकरांच्या मेहुण्याने सुरा पोटावर लावताच साळगांवकर रडू लागला. हातापाया पडू लागला. साळगांवकरांची मित्रमंडळी एवढी सगळी दांडे हातात घेतलेली माणसे बघून पळू लागली. मिराशी पुढे झाले आणि त्यांनी मेहुण्याला थांबविले. 'रक्तपात करु नको बाबा. पोलिस मागे लागतले. एकवेळ सोड तेका.'

मेहुण्याने सुरा बाजूला केल्या आणि साळगांवकरांच्या दोन थोबाडीत दिल्या. बरोबरीच्या साथीदारानी दांड्यानी त्याच्या पाठीवर मारले. साळगांवकर गुरासारखा

ओरडू लागला. मिराशीनी दोघांना दूर केले. मग मेव्हण्याने साळगांवकरांच्या मानेला धरले आणि उचलून पाटणकरांच्या पायावर घातले.

‘‘पाया पड तेंच्या. अरे डबल ग्रॅज्युएट माणूस आसा तो. शिक्षण सेवक झालो म्हणून तुमका तेंची किंमत नाय.’’

साळगावकर लंगडत लंगडत बाजूला झाला. मग मेहुणा पाटणकरांकडे वळला. पाटणकरांची पाठ, मान, दंड रक्ताने माखले होते.

‘चला भावोजी, तुमका डॉक्टरकडे नेऊन मलमपट्टी करुक होयी आणि आजपासून ह्या गाव आणि ही शिक्षण सेवकाची नोकरी सोडायची. तुम्ही कितीही हुशार असलात कितीही शिक्षण घेतलात तरी तुम्ही शिक्षण सेवक झालात की तुमची किंमत शून्य. ही असली नोकरी करण्यापेक्षा मी तुमका धंदो काढून देतय.’

मेहुण्याने पाटणकरांना गाडीत घेतले. वाटेत बहिणीच्या घरी जाऊन घरातील सर्व सामान आणि बहिणीला आणि तिच्या मुलाला घेऊन कणकवली गाठली.

पंधरा दिवसांनी कणकवलीत ‘पाटणकर हेअर कटींग सलून एसी’ सुरु झाला. पाटणकरांच्या मेहुण्याने आपला अनुभवी कारागिर सोबत दिला. हळूहळू पाटणकरांनी सर्व शिकून घेतले. दोन महिन्यांनी ते सलून मध्ये व्यवस्थित काम करु लागले. पाटणकर हेअर कटींग सलून ला लोकांचा चांगला रिस्पॉन्स मिळाला. एका वर्षात दुसरे सलून कणकवली स्टेशनजवळ काढले.

आता पाटणकर मजेत आहेत. व्यवसायात चांगले पैसे मिळवत आहे. बायको –मुलगा खुश आहेत. तरीपण पाटणकरांना झोपेत आर्किमिडीज, न्यूटन येतो. स्पेक्ट्रम थिअरी येते. सरफेस टेंशन येते आणि मग अजून आपण शिक्षण सेवक असल्याचे त्यांच्या स्वप्नात येते आणि ते घाबरतात. मग जाग आल्यावर आपण पाटणकर हेअर कटींग सलून चे मालक असल्याचे तेंच्या लक्षात येते आणि ते कुशीवर वळतात आणि ते गाढ झोपी जातात.

# आंब्याची बाग

प्रदिप केळूसकर - मोबा. ९४२२३८१२९९/ ९३०७५२११५२

धवन आणि व्यंकटेश सेल्स फिगर घेऊन बसले होते. धवनचे म्हणणे होते, या किटकनाशकांच्या व्यवसायात फारसे फ्युचर नाही. गॅट करारामुळे अनेक संधी साधू परदेशी कंपन्या भारतात घुसल्या आहेत आणि जाहिरातींचा भडीमार करुन आणि सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांनी मार्केट पकडलं आहे. या परदेशी कंपन्यांबरोबर स्पर्धा करणे सोपे नाही. या ऐवजी आपण दुसऱ्या व्यवसायात शिरकाव करावा. व्यंकटेशचं म्हणणं होतं आपला आयडीयल ग्रुप किटकनाशकांच्या आणि खतांच्या मार्केटमध्ये चांगलं काम करत होता. परंतु परदेशी कंपन्यांचे आक्रमण मोठे असले तरी आपलेही काहीतरी चुकते आहे. आपण जर आपल्यात सुधारणा केली तर अजूनही धंदा मिळू शकतो.

व्यंकटेश राणे हा सेल्स मॅनेजर गेली १५ वर्षे आयडीयल मध्ये सेल्स रिप्रेझेंटेटीव्ह ते सेल्स मॅनेजरपर्यंत पोहोचला होता. त्याला कल्पना होती कोकणात आपण नंबर वन होतो पण आता पहिल्या विसात नाही. रत्नागिरी, सिंधुदुर्ग या हापूस आंब्याच्या पट्टयात आपली जोरदार घसरण झाली आहे. त्याची कारणे शोधली पाहिजेत. खरंतर व्यंकटेश हा मूळ मालवण तालुक्यातला होता. त्याच्या घरची आंबा बाग होती. त्याच्या वडिलांनी आणि काकानी ४० वर्षापूर्वी मोठ्या कष्टाने आंबा बाग उभी केली होती. वडिलांनंतर त्याचे काका आंबा बाग पाहत होते.

धवन याने २५ वर्षापूर्वी आयडियल ही कंपनी स्थापन केली. फळझाडांची खते आणि मायक्रोन्युट्रियन्स तयार करण्याचा आणि विकण्याचा त्यांचा व्यवसाय होता. विशेषतः कोकणातील आंबा पिकांवर त्यांचे लक्ष होते. सुरुवातीला रडतखडत चालणारा धंदा व्यंकटेश राणे हा सेल्स मॅनेजर आल्यापासून सुसाट धावत होता. विशेषतः आंब्याच्या पालवीसाठी आणि पालवी टिकवण्यासाठी त्यानी जी पावडर मार्केटमध्ये आणली होती त्याने भरपूर धंदा केला होता. याआधी लिक्विड स्वरुपात केमिकल्स उपलब्ध होती. त्याचे शेतकरी पावसाळा संपल्यानंतर तीन वेळा फवारणी करत होते. तरीही वेगवेगळे किटक त्यांना दाद देत नव्हते. परंतु आयडियल ग्रुपने आणलेली नवीन पावडर एकदाच झाडावर, पानांवर, बुंध्यावर टाकली की किटकांचे प्रमाण कमी होत होते. त्यामुळे त्यांचा धंदा जोरदार झाला. शिवाय आयडियलच्या पुण्यातील लॅबरोटरीने शोधलेले नवीन मायक्रो न्युट्रियन्सने बागायतदारांचे मन जिंकले होते. रत्नागिरी-सिंधुदुर्ग पट्ट्यात गेली ८ वर्षे हे मायक्रो न्युट्रियन्स जोरात खपत होते.

आयडियलच्या सर्व स्टॉकिस्टनी भरपूर धंदा केला. व्यंकटेशच्या काकांनीपण आपल्या सहाशे कलमांच्या बागेत गेली ८ वर्षे हे वापरले आणि ते खुश होते. पण गेली दोन वर्षे या औषधाचा फायदा होत नाही असे बागायतदारांचे म्हणणे होते. त्यावर वारंवार पेपरमध्ये छापून येत होते. त्यामुळे आयडियल ग्रुपचे नाव खराब झाले होते.

धवन जरी व्यवसाय बदलावा असे सुचवत होते तरी व्यंकटेशने अजून दोन वर्षे थांबुया असे म्हटले. धवन व्यंकटेशला म्हणाले, ‘‘तू पूर्वीचा सेल मिळवून दिलास, तर तुला घसघसीत पगार वाढ देईन पण आता काहीतरी वेगळे करायला हवे.’’

दोन दिवसांनी व्यंकटेश पुण्यामधील आयडियल लॅब्रोटरीमध्ये होता. लॅबमधील प्रमुख केमिस्ट राहुल बरोबर या बिघडलेल्या सेल्स फिगरबद्दल बोलत होता.

‘‘राहुल, कोकण पट्टीत आपले आंब्यासाठीचे न्युट्रियन्स खूपच मागे पडले आहे. बागायतदारांचे म्हणणे गेली दोन वर्षे फारशी फलधारणा होत नाही. आपले एजंट नाराज झालेत. वर्तमानपत्रात वाईट बातम्या छापून येत आहेत. आपले स्टॉकिस्ट म्हणतायेत आपले न्युट्रियल लॅबमध्ये टेस्ट करुन घेणार, त्यांना खात्री करुन घ्यायची आहे आपली जुनी केमिकल्स तीच आहेत की बदलली आहेत.
काय करावे ?’’

‘‘सर, त्यांना सांगा भारतातील कुठल्याही लॅबमधून आपल्या केमिकल्सची तपासणी करा. जर काही कमी असेल तर शंभरपट भरपाई देतो म्हणून आव्हान द्या. शेवटी इथे मी आहे, आणि माझ्या नजरेखाली सर्व केमिकल्स तयार होतात.’’

‘‘पण राहुल, मागे तुझ्या एका मित्राने हा फॉर्म्युला दिला होता तो यशस्वी झाला. त्याला विचार काय प्रॉब्लेम आहे ? काही तरी जादू पाहिजे. नाहीतर एवढ्या परदेशी कंपन्यांच्या स्पर्धेत आपण टिकणार नाही.’’

‘‘ठीक आहे सर मी उद्या माझ्या मित्रास भेटण्यास जातो.’’

राहुल दुसऱ्या दिवशी विनयला भेटायला गेला. विनय हा राहुलचा मित्र. केमिस्ट्रीमध्ये एम.एस.सी., पी.एच.डी, युनिव्हर्सिटीमध्ये फर्स्ट आलेला. अत्यंत हुशार. परंतु एका कॉलेजमध्ये केमिस्ट्रीचा प्रोफेसर म्हणून नोकरी करणारा. पण त्याचे नॉलेज अद्ययावत. नेहमी देशी परदेशी जरनलर्सचे वाचन करणारा. त्यात लेख लिहिणारा. आठ वर्षापूर्वी याच विनयने राहुलला आयडियल कंपनीसाठी फॉर्म्युला दिला होता. त्याच फॉर्म्युल्याने राहुलने मायक्रो न्युट्रियन्स तयार केली आणि आयडियल कंपनीने भरपूर पैसा केला.

परंतु विनय तसा फकीर. आयडियल कंपनी त्याला घसघशीत रक्कम देत होती पण त्याने राहुलच्या मैत्री खातर फक्त १ रुपया घेतला होता. त्याच विनयकडे राहुल पुन्हा आला. राहुल विनयला भेटायला आला तेव्हा विनय नुकताच लेक्चर घेऊन आपल्या केबिनमध्ये आलेला.

राहुलला पाहून तो जोरात ओरडला – ''या आयडियलवाले, पेपरमध्ये बरेच काही येतय तुमच्या कंपनीबद्दल.''

होय बाबा, तेच बोलायला आलो होतो. मागे तू न्युट्रियन्सचा फॉर्म्युला दिला होतास त्याचेच प्रॉडक्शन सुरु आहे. त्यात काही सुध्दा बदल नाही. पण बागायतदारांना गेली दोन वर्षे रिझल्ट का मिळत नाहीत. त्यामुळे आमचे रत्नागिरी, देवगडचे स्टॉकिस्ट नाराज झालेत. बागायतदार त्यांना धारेवर धरतात. आमची औषधे वापरल्याने त्यांची दोन वर्षे फुकट गेली म्हणतात. त्या स्टॉकिस्टनी आमच्या कंपनीला कोर्टात खेचायची तयार केली आहे.

**विनय -** अरे झाडे तेच तेच अन्न खाऊन कंटालळीत. आपण नाही का रोजचा वरणभात खायचा कंटाळा करतो. आणि दुसरं म्हणजे काही वर्षांनी या केमिकल्सचा रेझिस्टन्स तयार होतो. आपण नाहीका एखादे औषध वारंवार घेऊ लागलो तर काही दिवसांनी त्या औषधाचा परिणाम होत नाही. तसेच इथे झाले आहे. बाकी काही नाही.

**राहुल -** मग आता ?

**विनय -** फॉर्म्युल्यात थोडा बदल करुया. आता ह्या जुन्या फॉर्म्युलात पोटॅश–K आणि फॉस्फरस – P घेऊन नवा फॉर्म्युला बनवूया. नायट्रोजन पहिल्यापासून आहेच आणि जुन्यातले काही एलिमेंटस् बाहेर काढू.

विनयने ताबडतोब नवा फॉर्म्युला कागदावर लिहून दिला.

**विनय -** आता या फॉर्म्युल्यानुसार नवीन प्रोडक्ट बनवा. वाटल्यास नवीन नाव द्या आणि ठराविक बागायतदारांकडे देऊन ट्राय करा. माझा अंदाज आहे या फॉर्म्युल्याने तुमचा प्रोडक्ट शेतकऱ्यांना खुश करणार.

राहुलने कागद हातात घेतला, ताबडतोब धवन सरांना व्हॉटस्ॲपवरुन फॉर्म्युला कळविला. या फॉर्म्युल्याबद्दल विनयला खात्री असल्याचे कळविले. धवनना विनयच्या केमिस्ट्रीबद्दल माहिती होती. तो माणूस साधा राहतो, कॉलेजमध्ये नोकरी करतो पण अतिशय बुध्दिमान आहे याची त्यांना कल्पना होती. धवनने या फॉर्म्युल्याप्रमाणे प्रोडक्ट बनवायला सांगितला. एका महिन्यात तयार झालेला माल कोकण पट्टीत नवीन नावाने वितरीत झाला. आयडियल कंपनीने नेहमी वापरणाऱ्या फक्त पन्नास बागायतदारांना याचा पुरवठा केला.

व्यंकटेशच्या काकांनीपण हे केमिकल वापरले. या पन्नास बागायतदारांची झाडे ऑगस्टमध्ये काळपट हिरवीगार आणि झाडाचे पान लांबट दिसायला लागले. या बागायतदारांच्या लक्षात आले दरवर्षीपेक्षा यंदा झाडे सशक्त दिसत आहेत. नोव्हेंबर मध्ये यातील काही झाडांना मोहोर दिसू लागला. डिसेंबरमध्ये बहुतेक झाडांना मोहोर आला आणि जानेवारीमध्ये लहान लहान फळे दिसायला लागली. गुढीपाडव्याआधी आंब्याची तोड झाली. या सर्व लोकांचा आंबा लवकर मार्केटमध्ये गेला आणि चांगला दर मिळाल्याने सर्वजण खूश झाले. याउलट इतर बागायतदारांचा आंबा फारसा आला नाही, आला तो उशिरा आला. त्यामुळे आंबा पट्ट्यात आयडियलच्या केमिकल्सची जोरदार चर्चा झाली. अनेक लहान मोठे बागायतदार आयडियलच्या स्टॉकिस्टकडे या केमिकलची चौकशी करायला लागले. अनेकांनी अॅडव्हान्स ऑर्डर देऊन ठेवल्या.

व्यंकटेश सर्व पाहत होता. राहुल आणि विनय या जोडीने जो नवा फॉर्म्युला आणला होता तो चांगला सेट झाला होता. त्याच्या लक्षात आले यावर्षी बम्पर धंदा होईल. पाऊस सुरु झाला आणि सर्व स्टॉकिस्टकडून भरपूर ऑर्डस सुरु झाल्या. रोज ट्रक भरुन भरुन माल कोकणात जात होते आणि दोन दिवसांत संपत होते. ऑगस्टपर्यंत कंपनीने आजपर्यंतचा सर्वात जास्त धंदा केला. मालक धवन खुश होते. कंपनीने दोन वर्षाचे नुकसान एका वर्षात भरुन काढले होते. त्यांना माहीत होते आता माऊथ पब्लिसिटीने पुढील काही वर्षे याच्या डबल, टिबल धंदा होईल. त्यांनी सेल्स मॅनेजर व्यंकटेश आणि सेल्स टिम तसेच पुणे लॅबमधील केमिस्ट राहुल यांना भरपूर पगारवाढ केली. पुढील पाच वर्षे आयडियल ग्रुपला खूपच भरभराटीची गेली. आंब्याबरोबर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात संत्री, मोसंबी, केळी, द्राक्षे यांनापण हे न्युट्रिशन्स वापरले जाऊ लागले.

याच दरम्याने गॅट करारामुळे भारतात आलेल्या परदेशी कंपनीने कल्टार हे औषध बाजारात आणले. कल्टार हे बाजारात आले किटकनाशक म्हणून पण नंतर लक्षात आले हे झाडांचे वृध्दीरोधक आहे. पण फळे आणि फुले यांची वाढ जोरात होत आहे. याआधी आंब्याची झाडे एका वर्षाआड उत्पन्न देत असत पण कल्टारमुळे दरवर्षी उत्पन्न मिळू लागले. जी झाडे फुटत नव्हती, उत्पन्न देत नव्हती ती कल्टारमुळे उत्पन्न देऊ लागली. त्यामुळे भारतात सर्वत्र कल्टारने मार्केट ताब्यात घेतले. सुरवातीला दर कमी करुन आणि कृषी विद्यापीठे, कृषी अधिकारी यांना हाताशी धरुन कल्टार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले. आयडियलच्या न्युट्रियन्सपेक्षा बागायतदारांना कल्टार चांगले परिणामकारक वाटू लागले आणि आयडियलच्या केमिकलचा व्यवसाय एकदम खाली आला. जिकडे तिकडे कल्टारची हवा झाली आणि पुन्हा

एकदा मालक धवन, सेल्स मॅनेजर व्यंकटेश राणे या वादळाला कसे तोंड द्यायचे याचा विचार करु लागले.

व्यंकटेश पुन्हा एकदा मुख्य केमिस्ट राहुल याला भेटायला गेला. दोघे मिळून विनयला भेटायला गेले. मागच्या वेळी विनयने दिलेल्या फॉर्म्युल्याने आयडियलची नाव पैलतीरी पोहोचली होती. पुन्हा एकदा आयडियल गुप अडचणीत होता. व्यंकटेश आणि राहुल विनयला भेटले.

**राहुल -** विनय, कल्टारने फळबागायतदारांना पकडून ठेवलयं. आमचा बहुतेक धंदा कल्टारने पळवला. या मल्टिनॅशनल कंपनीला कसे तोंड द्यायचे ?

**विनय -** कल्टारचा हा फुगा जसा वर गेला तसा खाली येईल. कल्टारने उत्पन्न वाढते हे खरे पण कल्टार झाडांची वाढ रोखून धरते. त्यामुळे ४-५ वर्षात झाडे कमकुवत होतात. काही वर्षांनी या बागायतदारांच्या हे लक्षात येईल तेव्हा ते पारंपरिक खतांकडे वळतील. शिवाय कल्टार घातलेल्या झाडांची फळे आरोग्यास हानीकारक आहेत, सध्या युरोपमध्ये कल्टारची बोंबाबोंब सुरु आहे. भारतात पण लवकरच ती बातमी पोहोचेल.

**व्यंकटेश -** पण विनय, एकदा जो शेतकरी कल्टार घालतो त्याला दरवर्षी भरपूर फलधारणेची सवय होते. मग कल्टार कितीही झाडासाठी त्रासदायक असेना तो पटकन कल्टार सोडून दुसऱ्या केमिकलकडे जायला तयार होणार नाही. थोडक्यात आपल्या कंपनीला असे काही तरी केमिकल हवे जे दरवर्षी फलधारणा करेल पण कल्टारसारखे दुष्परिणाम असता नये.

**विनय -** हल्ली इस्त्राईलमध्ये खत किंवा न्युट्रियन्स देण्याची नवीन पध्दत वापरात आली आहे. ती फार यशस्वी झाली असे त्यांचे म्हणणे. अर्थात कुठल्याही केमिकल किंवा न्युट्रियन्स आणि वापरण्याची पध्दत यांचे फायदे तोटे सहा वर्षानंतरच कळतात. या इस्त्रायली पध्दतीमध्ये एक पॉलिथीनची बॅग झाडाच्या खांदीला जमिनीपासून काही अंतरावर टांगायची आणि झाडाच्या खोडामध्ये भोक पाडून लहानशी लोखंडी नळी खोडामध्ये घुसवून ते केमिकल थेंब थेंब सोडायचे. या पध्दतीमुळे केमिकल जमिनीमध्ये न जाता सरळ झाडाच्या खोडामध्ये जाते. त्यामुळे त्याचे शंभरटक्के शोषण होते.

**व्यंकटेश -** म्हणजेच थोडक्यात सलाईन सारखे. थेंब थेंब झाडाच्या खोडात जाणारे, बरोबर ?

**विनय -** हो बरोबर. सलाईनच. पण न्युट्रिशन्स तयार करताना फार काळजीपूर्वक तयार करायला हवे. ते पॉलिथीन पिशवीमधून लोखंडी नळीमार्फत खोडात जायला हवे.

**व्यंकटेश -** विनय हे इंटरेस्टींग आहे. भारतात नवीन आहे. याबाबत सर्व माहिती मिळव आणि केमिकल कुठलं वापरणार ?

**विनय -** यावेळी कल्टारच्या जवळ जाणारे पण कमीत कमी साईड इफेक्टस् असलेल्या केमिकलचा फॉर्म्युला मी देतो. तो सलाईनमार्फत खोडात गेला तर कल्टारपेक्षा कितीतरी जास्त इफेक्टिव्ह होईल. बघा माझ्यावर विश्वास असेल तर !

**व्यंकटेश -** तुझ्यावर शंभर टक्के विश्वास आहे. मागच्यावेळी तू दिलेल्या फॉर्म्युल्याने आयडियलचे नशीब फळफळले.

विनयकडून हे आश्वासन मिळाल्यानंतर आयडियल कंपनी झटपट कामाला लागली. इस्त्राईलमध्ये वापरलेल्या सलाईनचे फोटो पाहून तसे सलाईलन बनवले गेले. विनयने दिलेल्या नवीन फॉर्म्युल्यानुसार फॅक्टरीमध्ये नवीन केमिकल तयार केले गेले. आणि सुरुवातीला फक्त पन्नास बागायतदारांसाठी हा सलाईनचा डेमो आयोजित केला गेला. स्वतः विनय, राहुल व्यंकटेशसह कोकणात फिरले. देवगडात आयोजित केलेल्या प्रात्यक्षिकाच्यावेळी व्यंकटेशचे काका पण हजर होते. देवगड भागातील मोठे बागायतदार या प्रात्यक्षिकावर खुश होते कारण कल्टारला पर्याय मिळाला होता. व्यंकटेशचे काका मात्र काहीही प्रतिक्रिया न देता व्यंकटेश, विनय यांना न भेटता गावी परतले. व्यंकटेशला हे खटकले. काकांच्या काहीतरी मनात असल्याशिवाय ते आपल्याशी बोलल्याशिवाय राहणार नाहीत हे त्याला माहीत होते.

दोन दिवस दौरा करुन विनय, राहुल हे पुण्याला परतले आणि आयडियल कंपनीचा सेल्स मॅनेजर व्यंकटेश काका-काकींना भेटण्यासाठी कांदळगांवला आला. गाडी चालवता चालवता त्याला आपल्या कुटुंबीयांची सुमारे सहाशे कलमांची बाग दिसली. पाच मिनिटे थांबून आपल्या वडिलांनी आणि काकांनी कष्टाने उभी केलेली आंब्याची झाडे बघून त्याला शांत शांत वाटले. त्याला वाटले या झाडामधून आपले आईवडील आपल्याकडे पाहत आहेत. पुढे आल्यावर त्याला कांदळगांवचे ग्रामदैवत रामेश्वर मंदिर लागले. आपल्या वडिलांची, काकांची किती श्रध्दा या रामेश्वरावर!

दरवर्षी आंब्याची पहिली पेटी रामेश्वराला दाखविल्याशिवाय ते आंबा स्वतः खात नसत की मार्केटमध्ये पाठवत नसत. व्यंकटेश घरी आला तर काका पूजा करत होते आणि काकी विहिरीवरुन पाणी आणत होती. काकीने त्याला पाहिले आणि ती लगबगीने पुढे आली.

''इलस रे व्यंकटेशा , मी कालपासून तुझी वाट बघीत होतयं. हे म्हणाले परवा तू देवगडात होतस तुझ्या कंपनीच्या माणसांबरोबर. म्हटला काल येशीत.''

''नाही, काल कणकवली, कुडाळ या भागात गेलो. आपले स्टॉकिस्टस् आहेत ना त्या भागात त्यांना भेटून आलो.''

‘‘आणि बाकीचे कंपनीतले?’’

‘‘ते गेले आज सकाळी पुण्याला. मी आता इथून मुंबईला जाईन सरळ.’’

‘‘जाशीत रे ! आता रव चार दिवस इल्यासारखो’’

‘‘छे, छे उद्या मुंबईत जायलाच हवं आता कंपनीचे नवीन प्रोडक्ट आलयं ना त्याची कामं आहेत.’’

तेवढ्यात काकांची पूजा संपली आणि ते देवखोली बाहेर आले.

‘‘अरे माका वाटला तू काल येशीत?’’ बरा आंघोळ करुची आसा की जेवक बसाया?’’

‘‘दुपारचा आलोय तर आंघोळ करतो विहिरीवर’’ असे म्हणत व्यंकटेशने बॅगेतून टॉवेल काढला आणि तो विहिरीवर आंघोळ करायला गेला. चार-पाच गार पाण्याच्या कळशा डोक्यावरुन ओतल्यावर त्याला तरतरीत वाटले. तोपर्यंत काकीने साबण आणून ठेवला होता. तो लावून आणखी दहा-बारा गार पाण्याच्या कळशा डोक्यावर ओतल्यावर आता कितीतरी वर्षांनी खरी आंघोळ केल्यासारखे त्याला वाटले. आंघोळ करुन टॉवेल गुंडाळून तो ओसरीवर आला तर काका-काकी जेवणासाठी वाटच बघत होते. व्यंकटेशला आवडते म्हणून काकीने परड्यातील केळीची पाने कापून त्यावर जेवण वाढले. गरमा गरम भात आणि आंबाड्याची आमटी. तोंडाला ताज्या कैरीचे करकरीत लोणचे. घरी घातलेले पापड. काकीना माहीत होते व्यंकटेश सुट्टीत आईबरोबर यायचा तेव्हा त्याला आंबाड्याची आमटी फार आवडायची. व्यंकटेश आणि काका भरपूर जेवले. खरंतर व्यंकटेशला काकांबरोबर बोलायचे होते पण एवढे आवडीचे जेवण समोर आल्यावर त्याने बोलणे पुढे ढकलले आणि तो मनसोक्त जेवू लागला.

जेवणानंतर काका वामकुक्षी करायला गेले त्यामुळे व्यंकटेशला पुन्हा एकदा काकांशी बोलता आले नाही. परवा जो देवगडमध्ये डेमो केला त्याबद्दल त्याला काकांचे म्हणणे हवे होते. काका उठेपर्यंत त्याने अंगणातल्या बाकावर थोडस लोळून घेतलं. स्वयंपाकघरातून काकीच्या कपबशींचा आवाज ऐकू येऊ लागला तसे काका उठले आणि तोंड धुऊन चहा घ्यायला बसले. व्यंकटेशपण पाट घेऊन त्यांच्याबरोबर बसला. चहा घेता घेता काका व्यंकटेशशी बोलू लागले.

‘‘व्यंकटेशा, ह्या अंगणात याक मोठ्ठा आंब्याचा कलम होता. त्याकाळी कोकण पट्टीत सगळ्यांची गरिबी. जामसांड्याचे गोगटे थोडेशे सधन. त्यांचे आंब्याचे बागो होते. आंबा ट्रान्सपोर्ट व्होता. आम्ही गरीब लोक त्यांच्याकडे पैसे मागूक जाव. गोगटे प्रत्येकाक पाच-पाच कलमा देयत आणि सांगत तुझ्या जमिनीत ही कलमा लाव, पाचाची पन्नास कर, पन्नासाची पाचशे कर. बागायतदार हो. लक्ष्मी तुमच्याकडे

येतली. कोणाकडे पैसे मागू नकात. तर त्या पाच कलमांतला एक कलाम तुझ्या बापाशीन या दारात लावला. बाकीची सड्यार लावली. मग आम्ही दोघांनी सड्यावरचा काप फोडून खड्डे मारले, खांद्यावरसून एका मैलावरसून माती हाडली, त्या खड्ड्यात मग कलमा लावली. पाणी कावडीनं गावातून नेऊन घातला.''

''काका, हे सर्व मला माहिती आहे. तुम्ही आणि बाबांनी खूप कष्टाने ही बाग उभी केलीत हे माहिती आहे मला.''

''ह्या तुका ठावकं आसा, पण ह्या अंगणातल्या कलमाचा काय झाला ता तुका म्हायती नाय! तुझ्या बापाशीन अंगणात कपडे सुकत घालूची दोरी बांधल्यान, त्याचा एक टोक गोगट्यांनी दिलेल्या कलमाच्या खोडात लोखंडी खिळो मारुन तेका बांधल्यान दुसरा टोक माटवाच्या मेडीक बांधल्यान. दरवर्षी पावसात माटव काढलो तरी कलमात मारलेलो लोखंडी खिळो तसोच रवा. हळूहळू तेका गंज पकडू लागलो. आणि आंब्याचा कलाम रोग लागल्यासारख्या खंगत गेला आणि शेवटी मरान गेला. तू काल जो तुझ्या कंपनीच्या नवीन प्रोडक्टचो डेमो केलस ना बाबारे माका ही भीती वाटता म्हणून त्या मेळाव्यात न बोलता मी घराक इलय.''

एवढं बोलून काका बागेत निघून गेले. व्यंकटेश आतल्या आत धुमसत राहिला. एक आंब्याचं झाडं खराब झाल ते इतर रोगांमुळे सुध्दा होऊ शकतं. लोखंडाच्या पाईपमुळे झालं कशावरुन ? कंपनीच्या लॅबमध्ये तयार केलेला हा फॉर्म्युला खोटा कसा असेल ? व्यंकटेशच्या लक्षात आलं. काकांना आपल्या बागेत हे औषध वापरायचं नसेल. नको वापरु दे. या कोकणपट्टीत हजारो बागायतदार आहेत ते कालच्या डेमोवर खूश आहेत. संध्याकाळी काका घरी आले तेव्हा व्यंकटेश बेलवलकरांच्या घरी गेला होता. बेलवलकरांच्या घरी रोज रात्री भजन असे. व्यंकटेश त्या भजनासाठी थांबला. त्यामुळे त्याला रात्री घरी यायला उशीर झाला. काकी जेवणाची वाट पाहत होती. काका झोपले होते. व्यंकटेश जेवताना गप्प गप्प होता. काकी त्याला काही काही विचारात होती तेवढ्यास तेवढे उत्तर देत होता. जेवल्यावर व्यंकटेश माडीवर झोपायला गेला. झोपेतही व्यंकटेशच्या स्वप्नात काकांचे बोलणे येत होते.

सकाळी थोडा उशीरा उठलेला व्यंकटेश चहा घेताना काकीला म्हणाला, ''काकी, मी मुंबईला जायला निघतो.''

''अरे आत्ता निघालं ? बर हेंका सांगूनतरी जा.''

''नाही जायलाच हवं, मी करेन मग फोन त्यांना.''

''अरे सुगंधाक हातातून तरी कायतरी देतयं''

''काही नको आता, मी फिरत फिरत मुंबईक जाणार''

‘‘फिरत फिरत जा पण गाडीत ठेवलस तर काय बिघडात?’’

काकीने सुगंधासाठी (व्यंकटेशची बायको) कुळीथाची पिठीची पुडी आणि काजूची पुडी गाडीत ठेवली. व्यंकटेशने गाडी स्टार्ट केली आणि नेहमी काका-काकींना नमस्कार करण्याची सवय ते विसरुन आणि गाव सोडताना रामेश्वराच्या देवळात जाऊन त्याला नारळ ठेवून गाव सोडण्याची सवय. पण आज रागाच्या भरात व्यंकटेश सर्व विसरला आणि मुंबईला यायला निघाला.

दीड वर्षानंतर मुंबईच्या हॉटेल सन ॲण्ड सॅन्ड मध्ये आयडियल कंपनीची पार्टी होती. कंपनीने दीड वर्षापूर्वी लॉन्च केलेले सलाईन न्युट्रियन्स कमालीचे यशस्वी झाले होते. कोकणपट्टीत आणि सर्वत्र कल्टारला टक्कर देत आयडियल कंपनीचा सेल चौपट वाढला होता. पार्टीला मालक धवन, त्यांचे कुटुंबीय, सेल्स मॅनेजर व्यंकटेश आणि सेल्स टिम, तसेच पुण्याच्या लॅबमधील राहुल आणि सर्व स्टाफ आणि विशेष निमंत्रक म्हणून विनय उपस्थित होता. विनयने इस्त्राईलमध्ये यशस्वी झालेला फॉर्म्युला आयडियल कंपनीला दिला होता आणि व्यंकटेश आणि त्याच्या टिमने तो भारतात यशस्वी केला होता. प्रत्येकाच्या पोटात त्या इंपोर्टेड व्हिस्कीचे दोन-दोन पेग गेल्यानंतर विनयने व्यंकटेशला विचारले - ‘‘मग कोकणात कांदळगावच्या बागेत तू हे न्युट्रियन्स वापरलेस की नाही?’’

कांदळगांवचा उल्लेख झाल्यावर व्यंकटेशचा चेहरा वाकडा तिकडा झाला. तो म्हणाला,

‘‘नाही, अजून गावात काकांचेच म्हणणे चालते.’’ असे म्हणून काकांनी अंगणातल्या आंब्याच्या कलमाची आणि त्याला कपडे सुकत घालण्यासाठी मारलेल्या लोखंडी पाईपची गोष्टी विनयला सांगितली.

‘‘काय करणार ? काका जुन्या विचाराचे आहेत ना ? त्यांना या वयात दुखवायला नको म्हणून गप्प बसलो.’’ विनय गंभीर होत म्हणाला -

‘‘काकांचे काही चुकले नाहीच, मी तुला म्हणालो होतो इस्त्राईलमध्ये ही पध्दत नवीच आहे. त्याचा रिझल्ट कळायला ४-५ वर्षे लागतील. इस्त्राईलमध्ये झाडांच्या खोडात पाईप घातल्याचे वाईट परिणाम पुढे आलेत आणि प्रोडक्ट आणणाऱ्या कंपनीच्या विरोधात तिकडे निदर्शने सुरु झाली आहेत. आणि खरं सांगायचं म्हणजे खोडात पाईप घातलेली झाडे हळूहळू मरु लागलीत.’’

व्यंकटेशच्या कण्यातून एक कळ सळसळत डोक्यापर्यंत गेली. मग तो चाचरत म्हणाला ‘‘मग आता भारतात काय होणार ?’’

**विनय -** भारतात पण हा धोका आहेच. तेव्हा मला वाटते लवकरात लवकर हा प्रोडक्ट मार्केटमधून बाहेर काढणे चांगले. प्रोडक्ट आयडियलला देताना खोडाला

पडणारे भोक आणि त्यात पाईप आकर्षक वाटले तरी ते भोक बंद कसे करायचे याचा मी विचारच नाही केला. व्यंकटेशने त्या थंडगार हवेत मानेवरुन ओघळणारा घाम टिपला. व्यंकटेश विनयला हळूच म्हणाला - ''अरे बापरे, केवढा हाहाकार माजेल?'' व्यंकटेशच्या डोळ्यासमोर एक-एक मरत चाललेले आंब्याचे झाड येत होते. व्यंकटेशला काकांनी सांगितलेली अंगणातल्या आंब्याची आठवण झाली. व्यंकटेश विनयला म्हणाला -''पण झाडांची अशी अवस्था व्हायला किती वर्षे जातील ?''

**विनय -** इस्त्राईलचा अनुभव घेतला तर आठ वर्षानंतर. कारण तेथे गेल्यावर्षीपासून झाडांना त्रास दिसू लागलाय.

व्यंकटेश विचार करु लागला. आत्तापासून प्रोडक्ट बाजारातून काढून घेतलं तर बरचसं नुकसान वाचेल. पार्टी संपली. व्यंकटेश घरी गेला. पण दोन पेग पोटात जाऊनही त्याला झोप येईना. कधी एकदा उद्या ऑफिसात जाऊन मालकांशी बोलतो आणि हा प्रोडक्ट बंद करतो असे त्याला झाले. दुसऱ्या दिवशी ठीक दहा वाजता व्यंकटेश कंपनीचे मालक धवन यांच्या ऑफिसमध्ये गेला.

''गुड मॉर्निंग सर.''

''गुड मॉर्निंग व्यंकटेश, कशी झाली पार्टी ?''

''पार्टी छान झाली सर, पण एका महत्वाच्या बाबीकडे आपण लक्ष द्यायला पाहिजे. आपण जो प्रोडक्ट मार्केटमध्ये आणला तो इस्त्राईल या देशातील प्रोडक्ट पाहून खोडात पाईप टाकून सलाईनमार्फत केमिकल आत सोडण्याची पध्दत त्यांची. पण त्यामुळे लक्षात येतय की आठ-दहा वर्षात झाड कमकुवत होत होत मरु लागली. पुण्याचा एक्स्पर्ट विनय याचे म्हणणे आहे की, हा प्रोडक्ट मार्केटमधून काढून घ्यावा नाहीतर बागायतदारांचे फार नुकसान होईल आणि आयडियलचे नाव खराब होईल आणि पुन्हा आयडियला उभे राहणे कठीण होईल.

**धवन -** आठ-दहा वर्षानंतर झाडे कमकुवत होतील? हु केअर्स ? अरे व्यंकटेश इथे या धंद्यात आजचा दिवस महत्त्वाचा. उद्याचं कोणी पाहिलयं? इथे जीवघेणी स्पर्धा असते रे बाबा. कल्टारने नुकसान केलयं ना शेतकऱ्याचं मग त्या कंपनीच्या विरोधात कोणी कार्टात गेलयं ? उलट पाच वर्षापूर्वी कल्टार ३०० रुपये लिटर होतं तेच आज २४०० रुपये लिटर आहे. तरी कल्टार भरपूर खपतं. सरकारला हे सर्व माहीत असतं. उघडपणे कल्टारवर बंदी आहे पण सर्व एजंट कल्टार गुपचूप विकतात. कारण त्यांना त्याच्यात जास्त प्रॉफिट असतं. आठ वर्षाच सोड रे व्यंकटेश. सध्या या प्रोडक्टमुळे आपण नुसत्या नोटा छापतोय. आणखी दोन वर्षांनी आपल सर्व कर्ज फिटेल. मग नुसतं प्रॉफिट आणि प्रॉफिट. मग दहा वर्षांनी कंपनी बंद पडली तरी हरकत नाही. पाच

पिढ्या बसून खातील एवढे पैसे मी मिळवीन आणि तुम्ही सेल्स लाईनमधली लोक भरपूर पैसे मिळवाल. तेव्हा प्रोडक्ट बंद करण्याची बात सोड. उलट हा प्रोडक्ट भारतात गावागावात पोहोचू दे. चला कामाला लागा.

व्यंकटेश एवढेसे तोंड करुन बाहेर पडला. त्याला प्रचंड बेचैनी आली. आपण या विरुध्द काय करु शकतो? शेवटी हा प्रोडक्ट मार्केटमध्ये आणण्यामागे आपलाही हात होता. आपण ही जबाबदारी कशी टाळू शकतो ? व्यंकटेशने कोकणातील स्टॉकिस्ट, एजंटना फोन लावले आणि या प्रोडक्टमुळे होणारे धोके त्यांच्या कानी घातले. पण हे स्टॉकिस्ट, एजंट व्यंकटेशचे म्हणणे ऐकेनात. प्रत्येकाचे म्हणणे आम्हाला सध्या या प्रोडक्टमुळे भरपूर धंदा आहे. शेतकरी, बागायतदार या प्रोडक्टवर खुश आहेत. त्यांचे पैसे मिळवण्याचे दिवस आलेत. त्यांच्या आगावू ऑर्डर्स आमच्याकडे आलेल्या आहेत. आम्ही हा प्रोडक्ट बंद करणार नाही. उलट यावर्षी डबल ऑर्डर्स देणार.

व्यंकटेशने महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील स्टॉकिस्टना फोन करुन संकटाची कल्पना दिली. पण कोणीही व्यंकटेशला साथ दिली नाही.

रात्रौ घरी गेल्यावर व्यंकटेश पत्नी सुगंधाशी याबाबतीत बोलला. ''माझे आता लक्ष लागत नाही या कंपनीत. मी उद्याच कंपनीचा राजीनामा देतो. झाडांना मारुन पैसे मिळविणे मला जमणार नाही. माझ्या वडिलांनी, काकांनी डोंगर फोडून झाडे लावली ती मारण्यासाठी नाहीत.''

''मग काय करणार आहात तुम्ही ? पंचवीस वर्षे या लाईनमध्ये गेली तुमची. दुसरी कंपनी पकडलीत तरी हेच असणार. एकतर कल्टार विका नाहीतर झाडांना मारणारी औषधे विका. पण पैसे मिळवा.''

''खर आहे तुझं सुगंधा. पण माझा जीव गुदमरतोय.''

''आपण कांदळगांवला जाऊ. काका-काकी तिकडे एकटे पडलेत. त्यांचा मुलगा नितीन पक्का चाकरमानी झालाय. गणपतीला पण गावी येत नाही. काकांना आपल्याकडून अपेक्षा आहेत. मला ही मुंबई कधीच आवडली नाही. श्रध्दा पण आता लग्नाची झालीय. तिचं लग्न सहज जमेल. मग आपल्यावर जबाबदारी ती कसली ?''

''बरोबर बोललीस सुगंधा, मी उद्याच कांदळगांवला जातो. काका-काकींच्या पायावर डोकं ठेवतो. मागच्यावेळी येताना त्यांना नमस्कार केला नाही. आणि रामेश्वराला नारळ ठेवला नाही. माझ्या वडिलांना आणि काकांनी कष्टाने उभी केलेली आंब्याची बाग माझी वाट पाहतय. काका आहेत तोपर्यंत ठीक नाहीतर एखादी कल्टार विकणारी कंपनी किंवा आयडियलसारखी सलाईनमधून केमिकल

देण्याची कल्पना गळ्यात उतरवणारी कंपनी या बागेचा कोळसा करायला वेळ लावणार नाही.

# चळवळ

प्रदीप केळूसकर– मोबा. ९४२२३८१२९९/९३०७५२११५२

माधुरीने आपली स्कूटर नेने असोशिएटस्च्या पार्किंग लॉटमध्ये लावली आणि ती ऑफिसचे दार ढकलून केबिनमध्ये जाण्यासाठी वळली, एवढ्यात कॉम्प्युटरवर काम करणारी मनाली तिला म्हणाली, ''मॅडम, सरांनी केबिनमध्ये बोलावलयं.'' आपल्या केबिनच्या दिशेने वळणारी माधुरी मागे वळली आणि पहिल्या मजल्यावरील ॲड. सुरेश नेनेंच्या केबिनच्या दिशेने चालू लागली. नेनेंच्या ऑफिसमधून बोलण्याचे आवाज ऐकू येत होते. तरी सुध्दा माधुरीने केबिनचा दरवाजा उघडला आणि नेनेंच्या दिशेने पाहत ''गुड मॉर्निंग सर'' म्हणताच, नेनेंनी गुड मॉर्निंग म्हणत समोरची खुर्ची दाखवली. माधुरी नेने सरांच्या समोरच्या खुर्चीत बसताच केबिनमधील अशिलांनी आपले बोलणे आवरले आणि ते जायला निघाले. ते बाहेर जाताच नेनेंनी खालच्या कप्प्यातून एक फाईल काढली आणि ती उघडत माधुरीशी बोलायला लागले.

''माधुरी, दोन महिन्यापूर्वी सोलापूर रोडवर माजी पोलीस अधिक्षक विजयकुमार चौहान यांची झालेली हत्या आठवतेय?''

''हो सर, कशी नाही आठवणार ? हायवेवर गाडी थांबवून केलेली हत्या, ती सुध्दा बंगालच्या माजी पोलीस अधिक्षकांची ? भर रस्त्यात ? पण त्याचा खुनी मारला गेला ना स्पॉटवर ?''

''हो, त्यांच्या अंगरक्षकाने केलेल्या गोळीबारात एक खुनी मारला गेला आणि एक सापडला. त्याचे नाव जय. जय सरकार. नक्षलवादी आहे.''

फाईलमधील एक फोटो माधुरीला दाखवत नेने म्हणाले, ''आत्ता ती केस कोर्टात उभी राहणार आहे. पण प्रश्न असा आहे की, पकडल्या गेलेल्या जय सरकारने पोलिसांकडे आपला गुन्हा मान्य केला आहे. ''

''मग कोर्ट निर्णय द्यायला मोकळे '' – माधुरी म्हणाली.

''तसं करता येत नाही. त्याने गुन्हा मान्य केला असला तरी कोर्टात केस उभी राहणार, सरकारी वकील आणि आरोपींचा वकील आपली बाजू मांडणार, पुरावे तपासणार. हे सर्व करावेच लागते. काही वेळा पोलिसांसमोर गुन्हा मान्य केला असला तरी आरोपी कोर्टात नाकबूल करतो.''

''असं असतं का?'' माधुरी उद्गारली.

''हो असचं असतं. आरोपीला आपल्या वकीलांसह केस लढवावी लागते. पण या

केसमध्ये अडचण झाली आहे ती म्हणजे, आरोपी जय सरकारने किंवा त्याच्या कुटुंबाने वकील दिलेला नाही.''

मग ? – माधुरीने विचारले.

''अशा वेळी कोर्ट आरोपीच्या वकीलाची व्यवस्था करते, या वेळीपण कोर्टाने आपल्याला म्हणजेच नेने असोशिएटस्ना आरोपी जय सरकार याचे वकीलपत्र घेण्याची विनंती केली आहे आणि आपण माननीय कोर्टाला नाही म्हणू शकत नाही. कोर्टाकडून अगदी नगण्य फी मिळते पण फीसाठी म्हणून नाही, पण माननीय कोर्टाचा मान ठेवावा म्हणून वकीलपत्र घ्यावे लागते. नेने असोशिएटस् ते वकीलपत्र घेईलच पण कोर्टात जय सरकारची बाजू तू मांडावीस अशी माझी इच्छा आहे. अर्थात माझे लक्ष आहेच. काही तशीच परिस्थिती आली तर मी पण कोर्टात येईन.

''पण सर मी ? मी नवीन....''

हो, प्रत्येकजण नवीनच असतो. वकिली व्यवसायाच्या सुरुवातीला अशी केस मिळाली की अनुभव मिळतो. आत्मविश्वास येतो आणि संपूर्ण नेने असोशिएटस् तुझ्या पाठीशी आहेतच. पण एक लक्षात ठेव. आरोपीने गुन्हा मान्य केला आहे म्हणून तो खुनी आहे असा दृष्टिकोन ठेवायचा नसतो. तर तो खुनी नसून दुसराच कुणीतरी आहे आणि त्याला सहीसलामत सोडवायचं आहे असा वकिलाचा दृष्टिकोन असावा लागतो. या केसचे पैसे किती मिळणार हे महत्वाचे नाही. प्रत्येक केस गांभीर्याने लढणे हे महत्वाचे. आरोपी जय सरकार जेलमध्ये आहे. उद्या तूआणि मी जेलमध्ये त्याला भेटायला जातोय. जेल सुपरिंटेंडेंटकडून मी भेट मागितली आहे. तेव्हा या केसची ही फाईल तुझ्या ताब्यात घे आणि त्याचा अभ्यास कर व उद्या दहा वाजता जेलमध्ये जाण्यासाठी तयारीत रहा. नेने सरांनी दिलेली फाईल घेऊन माधुरी आपल्या केबिनमध्ये आली.

आपल्या केबिनमध्ये येऊन माधुरीने फाईल उघडली आणि ती केसचा अभ्यास करु लागली. विजयकुमार चौहान, वय ६१ वर्षे, बहुतेक नोकरी कलकत्ता आणि आजूबाजूला केलेली. नोकरीत बरीच वादग्रस्त प्रकरणे होती. पण राजकीय पाठिंब्यामुळे सहीसलामत सुटले. एका कंपनीच्या जमीन अधिगृहणाच्या विरुध्द निदर्शने करणाऱ्या मोर्च्यावर बेछुट गोळीबार करण्याची ऑर्डर, यात हकनाक ३० माणसे मृत. त्यात कॉलेज विद्यार्थ्यांची संख्या मोठी. त्यामुळे चौकशी होऊन सहा महिने लवकर कार्यमुक्त. त्यानंतर दिल्ली येथे दोन वर्षे आणि मग पुण्यात कायमचे वास्तव्य. मुलगा-मुलगी अमेरिकेत, कोरेगांव पार्कमध्ये स्वतःचे घर, रोज स्वतःच्याच गाडीने सोलापूर रस्त्याने जाताना दोन बुरखाधारक मोटरसायकलस्वारांनी मोटरसायकल गाडीसमोर आणली आणि गाडी थोडी स्लो झाल्यावर पिस्तुलातून

गोळीबार केला. त्यात चौहान साहेबांना चार गोळ्या लागल्या, बाजूला असलेल्या सुरक्षा रक्षकाने केलेल्या गोळीबारात मोटरसायकल चालवणारा जागेवरच ठार झाला. तर मोटरसायकलवरील मागे बसलेल्या व्यक्तीने केलेल्या गोळीबारात चौहान साहेबांच्या सुरक्षा रक्षकाचा दोन गोळ्या लागून मृत्यु. मोटरसायकल घेऊन पळणाऱ्या दुसऱ्या मारेकऱ्याला लोकांनी पकडले आणि पोलीसांच्या ताब्यात दिले. तोच सध्या तुरुंगात असलेला – जय सरकार.

माधुरीने जय सरकारचा फोटो पाहिला. तरुण होता, गाव पश्चिम बंगालमधील एक जिल्हा. शिक्षण यु.पी.एस.सी मध्ये भारतात पंचेचाळीसावा नंबर. यु.पी.एस.सी परीक्षा दिल्यानंतर तीन वर्षे नक्षलवादी चळवळीत भूमिगत. त्यानंतर पुण्यामध्ये आल्यानंतर विमानाचा, पुण्यातील वास्तव्याचा तपशील होता. पुणे पोलिसांचा तपास आणि पुरावे इत्यादी. माधुरीच्या मनात आलं. या जयने पुण्यात येऊन चौहान साहेबांचा का खून केला असेल ? आणि त्याचा साथीदार विश्वास जो जागच्या जागीच मृत झाला तो कोण? हे सर्व उद्या कळेल. जयला विचारण्यासाठी तिने प्रश्नावली तयार केली. त्याच्या विरुध्द घेतलेले सर्व पुरावे काळजीपूर्वक वाचले. तिच्या मनात शंका आली. रस्त्यावर झालेल्या खुन्याचे वकीलपत्र घेतले म्हणून समाज काय म्हणेल? याची पण तिला चिंता वाटली. उद्या सकाळी सरांची भेट झाली की हा प्रश्न विचारायचा असे माधुरीने ठरविले.

**माधुरी -**

उद्या तुरुंगात जाऊन चौहान साहेबांच्या आणि त्यांच्या सुरक्षा रक्षकाच्या खुन्याला प्रत्यक्ष भेटायचे होते. नेने सर सोबत आहेतच, तरीपण भीती वाटते आहे. कसा असेल जय सरकार? नावावरुन बंगाली वाटतो आणि फोटोवरुन देखणा वाटतो. यु.पी.एस.सी परीक्षेत भारतात पहिल्या पन्नासात आला आहे. म्हणजे असामान्य हुशार असणार. मग चौहान साहेबांचा माग काढत बंगालमधून पुण्यापर्यंत का आला? आणि दुसरा मृत झालेला कोण तो नवीन चक्रवर्ती? तो पण याच्या एवढ्या वयाचा. त्याच्या फोटोवरुन तो पण देखणा, हुशार होता असे वाटते. मग एवढा टोकाचा निर्णय का घेतला या दोहांनी ? नेने सरांनी ही केस माण्याकडे दिली आहे. आपल्या अशिलासाठी शेवटपर्यंत लढायचे हा नेने असोशिएटस्‌चा बाणा. प्रत्येक केसमध्ये जीव ओतायचा. पण या जय सरकारने हत्येचा कबुली जबाब पोलीसांकडे दिलाय. मग केस कशी लढवणार ?

विचार करत करत माधुरी झोपी गेली. नेने सरांबरोबर तुरुंगात जायचे आहे म्हणून सकाळी ९ वाजताच ती ऑफिसमध्ये पोहोचली. नेने सर आधीच आले होते. आणि कॉम्प्युटरवर चौहान खुनाच्या जुन्या बातम्या पुन्हा वाचत होते. काही नोंदी घेत

होते. या वयातही प्रत्येक केससाठी बारीक-सारीक माहिती मिळवून केस लढणाऱ्या नेने सरांबद्दल तिला कौतुक वाटले. नेने सरांनी तिला जवळ बोलावून सोलापूर रोडवर झालेला खुनी हल्ला आणि त्यात चौहान साहेब त्यांचा अंगरक्षक आणि जयसरकारचा साथीदार यांचे रस्त्यावरील मृत फोटो दाखविले. दुसरा गुन्हेगार म्हणजे बहुतेक जय असावा, त्याच्या तोंडावर बुरखा होता, निळे जॅकेट अंगावर होते. पायात कॅनव्हास बुट दिसत होते. नेने सर माधुरीला म्हणाले, या बातम्या वाच पोलिसांचा पंचनामा वाच. साक्षीदारांचे म्हणणे वाच, कुठेतरी विसंगती मिळेलच. लक्षात ठेव, कितीही कडेकोट तुरुंग असला तरी कुठेतरी फट राहतेच. वकीलाला ती फट शोधावी लागते.

दहा वाजता नेने सरांच्या गाडीतून माधुरी आणि नेने जेलच्या दिशेने निघाले. अचानक माधुरीला आठवण झाली तशी ती म्हणाली, ''सर, आरोपीचे वकिलपत्र घेतले म्हणून समाजातून टिका नाही का होणार?

याची मला कल्पना आहेच म्हणून आज सकाळीच ही केस कोणत्याही परिस्थितीत नेने असोशिएटस्‌कडे आली याचा खुलासा पुण्यातील सर्व वर्तमानपत्रात दिला आहे.

माधुरीचे समाधान झाले. कारण कोर्टात जय सरकारची वकील म्हणून ती उभी राहणार होती आणि कारकिर्दीच्याच सुरुवातीला तिच्यावर चारही बाजूंनी टिका झाली असती.

नेने सरांची गाडी जेलमध्ये शिरली आणि जेलरसाहेबांकडे वेळ घेतल्याने सर्व कागदपत्रे पाहून दरवानाने दोघांना आत घेतले. कैद्यांना भेटण्याच्या जागी त्या दोघांना बसविण्यात आले. ५ मिनिटात सशस्त्र पोलीसांच्या पहाऱ्यात जय सरकार त्यांच्या समोर हजर झाला.. जयला पाहताच माधुरी उठालीच. जय एवढा देखणा, बांधेसूद असेल याची तिला कल्पनाच नव्हती. तिचे डोळे त्याच्यावर खिळले. दोघांना नमस्कार करत जय अस्खलित इंग्रजीत बोलू लागला. - ''आय ॲम जय. जय सरकार''.

ॲड. नेने त्याच्याशी इंग्रजीत बोलू लागले. ''मी सुरेश नेने, नेने असोशिएट्स या लॉ फर्मचा पार्टनर आणि ही माधुरी सामंत, माझी सहकारी. तुम्ही कोर्टात वकील न दिल्याने मा. कोर्टाने आमच्या फर्मला तुमचे वकीलपत्र घेण्याची विनंती केली. माझी ही तरुण सहकारी नेने असोशिएटस्‌च्या वतीने तुमची बाजू कोर्टात मांडणार आहे. तुम्ही पोलीसांना हत्येचा कबूली जबाब दिला असला तरी, आम्ही तुमची बाजू कोर्टात व्यवस्थित मांडणार. आपल्याला फक्त दहा मिनिटाची वेळ दिलेली आहे. तेव्हा तुम्ही आणि तुमचा साक्षीदार विश्वास चक्रवर्ती बंगालमधून पुण्याला का आला हे मला कळणे महत्त्वाचे आहे.

**जय सरकार -**

नेने असोशिएट्सच्या सुरेश नेनेंनी प्रश्न केला तुम्ही आणि तुमचा साथीदार विश्वास चक्रवर्ती बंगालमधून पुण्याला का आलात ? याकरिता सहा वर्षापूर्वीचा काळ डोळ्यासमोर आणावा लागेल.

बंगालमधील एका लहान शहरात माझे आईबाबा राहत आहेत. दोघेही तेथील कॉलेजमध्ये प्रोफेसर. मी जय आणि छोटी कॉलेजमध्ये जाणारी बहीण तनुजा. आई वडील प्रोफेसरस् असले तरी चळवळीतील होते. आंदोलनात भाग घेत होते. अन्यायाविरुध्द बोलत होते. लिहित होते. आमच्या घरी आंदोलनकर्त्यांची उठबस असायची. थोडक्यात आंदोलनकर्त्यांचे मुख्य केंद्र आमचे घर होते. सहा वर्षापूर्वी बंगालमध्ये मुंबईच्या उद्योगपतीने मोटर कारखाना सुरु करण्याचे ठरविले. त्याकरिता बंगाल सरकारने जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. त्या विरुध्द आंदोलन झाले. माझे आईबाबा आंदोलनात सक्रिय होते. एकदा जिल्हाधिकाऱ्याकडे या जमिनींबद्दल मोर्चा होता. हजारो लोक मोर्च्यात सामील झाले होते. माझ्या आईवडिलांना आधीच स्थानबध्द केले होते, पण माझी कॉलेजमध्ये जाणारी बहीण तनुजा. तिचा कॉलेजमधील मित्र विश्वास चक्रवर्ती आणि शेकडो कॉलेज विद्यार्थी या मोर्चात सामील झाले होते. यावेळी पोलीस अधिक्षक होत विजयकुमार चौहान. मोर्चा मोडून काढण्याचा त्याने हुकूम केला. पहिल्यांदा अश्रूधुर आणि नंतर गोळीबार करण्याची ऑर्डर दिली. त्यात तीस माणसे गोळी लागून मृत झाली. माझी १९ वर्षाची बहीण तनुजा त्यापैकी एक होती. विश्वासच्या दंडाला गोळी लागली पण तो बचावला. आम्हा सर्वांची लाडकी बहीण एवढ्या तरुण वयात आम्हाला सोडून गेली.

माझ्या आईवडीलांवर आणि अशा कित्येक पालकांवर असा मोठा प्रसंग आला. विश्वास चक्रवर्तींची तनुजा खास मैत्रीण. दोघांचे एकमेकांवर विलक्षण प्रेम होते. मोर्चात विश्वास आणि तनुजा बाजूबाजूला होते. विश्वास थोडक्यात बचावला. त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यानंतर माझा हात हातात घेऊन त्याने पोलीस अधिक्षक चौहान यांना ठार मारण्याची प्रतिज्ञा केली आणि त्यासाठी माझे सहाय्य मागितले आणि मी त्याला शब्द दिला. पण चौहानला मारणे तेवढे सोपे नव्हते. त्यांना कडेकोट पोलीस संरक्षण होते. म्हणून मी आणि विश्वास नक्षलवादी संघटनेत सामील झालो.

नक्षलवाद्यांकडे संघटना होती. कार्यकर्ते होते, हत्यारे होती, पैसा होता. समाजातील अनेक प्रतिष्ठित लोकांची त्यांना सहानुभूती होती. आमच्या मनाची तडफड त्यांना समजली. त्यांनी सर्व प्रकारचे मदत करण्याचा शब्द दिला. दरम्यान

चौहान पुण्याला स्थायिक झाल्याचे कळले. आमचे कार्यकर्ते त्यांच्या मागावर होतेच. मी आणि विश्वास या आधी चार वेळा पुण्याला येऊन गेलो. चौहानांचे घर, त्यांची सोलापूर रोडला असलेली शेतजमीन, याची माहिती, नकाशे आमच्याकडे होते. चौहान रोज सकाळी साडेनऊला आपल्या घरातून बाहेर पडतात आणि दहा वाजता आपल्या शेताकडे पोहोचतात हे माहीत झाले होते. तसेच त्यांच्या गाडीत एक अंगरक्षक असतो हे कळले होते. पुण्यातून सोलापूर रोडला वळून दोन मिनिटावर स्पॉट निश्चित झाला होता. विश्वास मोटरसायकल चालवणार होता आणि मी पिस्तुल घेऊन मागे बसलो होतो. दोघांच्याही अंगात निळे जॅकेट होते. प्लॅननुसार सर्व पार पडले. पण अंगरक्षकाने गोळीबार केला आणि विश्वासला वर्मी गोळी लागली आणि त्याचा गाडीवरील ताबा सुटला. मी रस्त्यावर पडलो आणि पळण्याचा प्रयत्न करत होतो परंतु लोकांच्या तावडीत सापडलो. खरतर माझ्या पिस्तुलात भरपूर गोळ्या होत्या, त्या रस्त्यावरील लोकांवर मी वापरल्या नाहीत, कारण ते माझे दुश्मन नव्हते. दुश्मन फक्त चौहान होता. त्याला संपवायचे होते. तो संपला पण तनुजानंतर तिचा आणि माझा जवळचा मित्र विश्वासपण गेला.

जय नेनेंकडे वळून म्हणाला – ''मी पोलिसांकडे हत्येचा कबुली जबाब लिहून दिलेला आहेच, तेव्हा वकीलसाहेब तुमची ही तरुण सहकारी माझा कसला बचाव करणार? आता मला जगायचे नाही, माझी लाडकी बहीण मारली गेली, मित्र विश्वास मारला गेला आमच्या घरी माझे आईवडिल जिवंत आहेत फक्त, खरंतर त्यांच्यातला जीव कधीच गेलाय.'' जय बोलायचा थांबला. नेनेसाहेब स्तब्ध झाले होते. माधुरी स्तब्ध होती.

''ओके. तरीपण वकील म्हणून आमचे कर्तव्य आहे, तुम्हाला या हत्येच्या आरोपातून मुक्त करणे. गरज पडेल तेव्हा माधुरी तुम्हाला भेटेलच. तिला सहकार्य करा. आम्ही तुमची केस कोर्टात लढणार. एवढे बोलून नेने आणि माधुरी बाहेर पडली.

नेनेंची गाडी जेलमधून निघाली आणि पाच मिनिटानंतर गाडी एका बाजूला उभी करुन नेने म्हणाले, माधुरी या जयची कथा विलक्षण आहे, चुटपुट लावणारी आहे. यु.पी.एस.सी परीक्षेत देशात पंचेचाळीसावा आलेला तरुण आज हत्येच्या आरोपाखाली तुरुंगात आहे आणि त्याला फाशी होण्याची शक्यता आहे. सरकार आणि पोलीस यंत्रणा त्यांच्या हातात असलेल्या अधिकाराने कायदा धाब्यावर बसवतात आणि चौहानांसारखे पोलिसांमधील अधिकारी सत्ता राबवतात. आंदोलने चिरडतात आणि त्यातून तनुजासारखे कोवळे जीव नाहक मरतात. काही वेळा आपल्या देशात लोकशाही आहे की हिटलरशाही असा प्रश्न पडतो.''

माधुरी गप्प होती. जयच्या व्यक्तिमत्त्वाने माधुरी दिपून गेली होती. त्याचे दिसणे, त्याचे बोलणे, त्याचे सद्गतीत होणे सारेच वेगळे. नेने सरांनी गाडी पुन्हा सुरु केली. ''माधुरी नितीनला सांगून या केसविषयी लागतील ती कागदपत्रं मिळवं. जय आणि विश्वासचे विमान तिकीट, हॉटेलमधील वास्तव्य, त्यांनी वापरलेली गाडी, सोलापूर रोडवरील साक्ष दिलेले लोक यांची भेट घे. पोलीसांच्या तपासात चुका या होतातच. त्या चुकांवर लक्ष दे. शिवाय बंगालमध्ये जाऊन त्याच्या नातेवाईकांना भेट. त्याकरिता कलकत्त्याला जावे लागले तरी हरकत नाही आणि वेळोवेळी मला रिपोर्ट देत जा. पण माधुरी तुला सांगतो मला हा जय सरकार फार फार आवडला. खरंतर तो एक आदर्श, हुशार सरकारी अधिकारी व्हायचा ते सोडून काय झाले बघ!''

गाडी ऑफिसजवळ आली आणि माधुरी गाडीतून उतरुन आपल्या केबिनमध्ये गेली. खुर्चीत बसली आणि तिच्या डोळ्यासमोर आला तरुण, रुबाबदार जय सरकार. तिने मोबाईलमध्ये पाहिले. प्रतीक, तिच्या चार महिन्यानंतर होणाऱ्या नवऱ्याचे दोन मिसकॉल होते. मघा तुरुंगात जय समोर असताना मोबाईल स्विचऑफ केला होता. तिने तो चालू केला. प्रतीकचा मेसेजपण आला होता फोन करण्यासाठी. पण माधुरीने त्याकडे दुर्लक्ष केले. यावेळी तिच्या डोळ्यासमोर होता जय.

माधुरीने नितीनला बोलावले आणि चौहान हत्येसंबंधी सर्व पुरावे जमा करायला सांगितले. तसे जेट विमान ऑफिसमध्ये जाऊन जय आणि विश्वास यांच्या आगमनाची तारीख, हॉटेलमधील वास्तव्य, खरेदी केलेली मोटरसायकल, पेट्रोल भरण्याची जागा इत्यादी सर्वांची खात्री करायला सांगितली. ती स्वतः शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये गेली. आणि इन्स्पेक्टर कोल्हेंकडून हत्येची माहिती घेतली.

सायंकाळी थकून माधुरी घरी पोहोचली. तेव्हा तिच्या अवतीभवती जय होता. प्रतीकला फोन करण्याची तिला इच्छा होईना.

वॉश घेऊन माधुरी गॅलरीत बसली तेव्हा तिला तुरुंगात जय बोलत असतानाचा शब्दंशब्द आठवत होता. कल्पनेनेच तिला जयचे आईवडील, चळवळीतील त्याचे सहकारी, कॉलेजमध्ये जाणारी लहान बहीण तनुजा, तिचा मित्र विश्वास चक्रवर्ती सारे कसे डोळ्यासमोर येत राहिले. यु.पी.एस.सीचा अभ्यास करणारा जय, यु.पी.एस.सीची परीक्षा देणारा जय आणि नंतर तनुजाच्या मृत्युने कोळसलेले जय आणि त्याचे आईबाबा, विश्वास सारे सारे कल्पनेनेच डोळ्यासमोर येत होते. मग जय आणि विश्वास यांचे नक्षली चळवळीत सामील होणे, वारंवार पुण्याला येणे, चौहानांचा पाठलाग करणे, मोटरसायकलवरुन चौहानांवर गोळ्या मारणे आणि मग विश्वासचा डोळ्यासमोर मृत्यु पाहणे, मग लोकांकडून आणि मग पोलीसांकडून पकडले जाणे, किती मार खाल्ला असेल जयने? पोलीस अधिक्षकांची

हत्या करणाऱ्याला पोलिसांनी किती छळले असेल? कल्पनेनेच माधुरीच्या डोळ्यात पाणी आले. गळ्यात हुंदका आला. आता काय करु शकते मी जयसाठी ? मी त्याला सोडवू शकते का? माधुरीच्या जीवाची घालमेल होत होती. दोन वेळा जेवणासाठी आई हाक मारुन गेली पण माधुरीचे लक्ष नव्हते.

रात्री जेवताना आईशी ती जय सरकारबद्दल बोलली. तिचा प्रत्येक घास जयच्या आठवणीतून तोंडात जात होता. तुरुंगात जयला कसले अन्न मिळत असेल? या विचाराने तिचा घास घशात अडकत होता. दुसऱ्या दिवशी वकीलरुममध्ये तिची मैत्रिणी सुवर्णा भेटली.

**सुवर्णा-** ''काय गं माधुरी, काल चौहान हत्येच्या खुन्याला भेटायला गेलेलीस ना तुरुंगात? भीती नाही वाटली?''

**माधुरी -** ''भीती! कदाचित कालची भेट आयुष्यातील सर्वोत्तम भेट ठरावी. मी भेटायला गेलेला तरुण गुन्हेगार खराच पण यु.पी.एस.सी. परीक्षेत देशात पंचेचाळीसावा आलेला, सुशिक्षित आईबाबांचा मुलगा, तरुण, देखणा, अतिशय संवेदनाशील असा अठ्ठावीस वर्षाचा तरुण होता. त्याला भेटणे ही अविस्मरणीय घटना ठरली माझ्या आयुष्यात.'' आणि माधुरी सुवर्णाला जय सरकारबद्दल सांगत सुटली. माधुरी कोसळणाऱ्या धबधब्यासारखी बोलत राहिली आणि सुवर्णा ऐकत राहिली. एवढं ऐकून घेतल्यावर सुवर्णा म्हणाली – ''माधुरी तु जयच्या प्रेमात पडली की काय?'' तिच्या या प्रश्नाने माधुरी भानावर आली.

''नाही गं, काय तरी काय?'' असे म्हणत माधुरीने फाईलमध्ये लक्ष घातले. पण त्या फाईलमध्ये तिचे लक्ष कोठे लागायला ? माधुरीच्या लक्षात आल प्रतीकचे दोन फोन येऊन गेले कालपासून या गडबडीत त्याचा फोन घेणे काही जमले नाही. तिने त्याला सायंकाळी ५ वाजता वैशाली कॅफेमध्ये भेटूया असा मेसेज केला.

सायंकाळी माधुरी वैशालीवर पोहोचली तेव्हा प्रतीक तिची वाटच पाहत होता. ती दिसताच त्याने कॉफीची ऑर्डर दिली. त्याच्या समोर बसताच माधुरी बोलू लागली, ''सॉरी प्रतीक, कालपासून कामात होते, नेने सरांनी एका केसची जबाबदारी माझ्यावर सोपवलीय, तुला आठवत असेल दोन महिन्यापूर्वी सोलापूर रोडवर सकाळच्यावेळी माजी पोलीस अधिक्षक चौहान साहेबांची झालेली हत्या,''

''हो तर, आठवतं तर! मी रोज त्याच रोडने ऑफिसला जातो. हत्येमुळे त्या दिवशी रस्ता बंद केलेला त्यामुळे मी दोन तास उशिरा पोहोचलो ऑफिसात.''

''त्याच हत्येमधील पकडलेला आरोपी जय सरकारची केस कोर्टाने नेने असोशिएटस्कडे पाठविली आहे आणि नेने सरांनी ती केस माझ्याकडे दिली आहे. म्हणजे कोर्टात मी जयची बाजू मांडणार''

''मग त्याकरिता त्या खुन्याला तुला भेटावं लागणार?'' – प्रतिक
''होय, काल नेनेसरांबरोबर भेटले मी त्याला. विलक्षण अनुभव होता तो. आणि माधुरी जयची पार्श्वभूमी, कलकत्यातील आंदोलन चिरडणारे अधिक्षक चौहान आणि गोळीबारात तीसजण मृत्युमुखी, त्यात जयची बहीण तनुजा मृत्युमुखी आणि त्याचा बदला घेण्यासाठी पुण्यात आलेले विश्वास आणि जय हे सर्व प्रतीकला सांगत सुटली. हे बोलताना जय बद्दल माधुरी एवढे भरभरुन बोलायला लागली की तिला त्याचे भानच नव्हते. तिचे दहा मिनिटे जय बद्दल भरभरुन बोलणे ऐकून प्रतीक उद्गारला, ''माधुरी तु एका खुन्याबद्दल बोलते आहेस की प्रियकराबद्दल?''
माधुरी दचकली. मग हळूच म्हणाली, ''खरचं प्रतीक, कुणीही प्रेमात पडाव असाच आहे जय'' एवढं म्हणून माधुरी गप्प झाली. मग ती आपल्याच विचारात मग्न झाली. प्रतीकच्या लक्षात आले. आता माधुरी मुडमध्ये नाहीय. तोपण गप्प राहिला.

रात्रौ बेडवर पडल्यापडल्या माधुरी सकाळचे सुवर्णाचे बोलणे आठवू लागली – ''माधुरी तू जयच्या प्रेमात पडलीस की काय?'' सायंकाळी प्रतीक म्हणाला, ''माधुरी तू एका खुन्याबद्दल बोलते आहेस की प्रियकराबद्दल?''

माधुरी विचार करु लागली. खरंच मी जयच्या प्रेमात पडले की काय? जयच्या आठवणीने ती मोहरली. त्याच्या सोबतच्या काल्पनिक विश्वात रमली. एवढ्यात तिला आठवले. अरे ! जय चौहान हत्येतील आरोपी आहे आणि काही आश्चर्य झाले नाही तर त्याला फाशी..... माधुरी दचकली. आपले लग्न प्रतीकशी ठरले आहे. मग आपल्या मनाची अशी द्विधा परिस्थिती का झाली आहे? छे ! छे !! जयचा विचार मनातून काढून टाकायला हवा.

माधुरीने एक पुस्तक वाचायला घेतलं. पुस्तक वाचता वाचता झोप यावी म्हणून, पण आज झोपही तिच्यावर रुसली. नेहमी तिच्यावर प्रसन्न असलेल्या झोपेचा आज लपंडाव सुरु होता आणि रात्रभर जय तिचा पिच्छा सोडत नव्हता.

पहाटे चारच्या सुमारास ती दचकून जागी झाली. तेव्हा तिच्या स्वप्नात आपण जयसोबत वैशालीमध्ये कॉफी पित होतो असे होते. मग तिला आठवले आज सायंकाळी प्रतीकसोबत आपण वैशालीमध्ये कॉफी प्यायलो. मग स्वप्नात प्रतीक यायचा सोडून जय का आला ? फक्त एकदाच जय तुरुंगात सशस्त्र पोलीसांसोबत आणि नेनेसरांसोबत भेटला. त्यातील दोन किंवा तीन वाक्ये आपल्यासोबत बोलला असेल तरीही पूर्ण शरीरभर मनभर तो व्यापून का गेला? असे का व्हावे ? तो देखणा होता म्हणून ? अत्यंत कुशाग्र बुध्दीचा होता म्हणून ? छे छे ! आपली आयुष्याची सव्वीस वर्षे पुण्यासारख्या शहरात गेली. नुतन मराठी सारखी शाळा, एस.पी. सारखं कॉलेज, प्रायोगिक नाट्य गुप्स, लॉ–कॉलेज मध्ये कितीतरी देखणे, हुशार, श्रीमंत

तरुण आजुबाजूला होते. कित्येकजण मित्र होते. अनेकांना आपल्याशी मैत्री वाढवायची होती. पण आपण कुठेच अडकलो नाही. दोन महिन्यापूर्वीच नात्यातल्या प्रतीकचे स्थळ आले आणि त्याचे आईबाबा आणि आपले आईबाबा यांच्या संमत्तीने प्रतीकशी लग्न ठरले. आपले आजपर्यंतचे आयुष्य सरळ रेषेत गेलेले. पण दोन दिवसापूर्वी जय समोर आला आणि मनातल्या समुद्रात वादळ शिरले.

सकाळी उठल्याबरोबर माधुरीने निश्चय केला आपल्याला जयच्या आठवणीपासून दूर जायला हवे, तो आपला अशिल आहे एवढेच लक्षात ठेवायचे. ऑफिसमध्ये गेल्यागेल्या तिने नितीनला भेटायला बोलावले आणि जय आणि विश्वास संबंधात जी कागदपत्रे जमवायला सांगितली होती त्यासंबंधी आढावा घेतला. अजूनही पुराव्यातल्या त्रुटी शोधायला सांगितल्या. नेने सरांचा तिला मेसेज आला. बहुतेक चौहान हत्येची केस पंधरा दिवसात स्टॅण्ड होणार. त्यामुळे आपली तयारी लवकर करायला हवी. माधुरीला वाटायला लागले आपण जयच्या आईवडिलांना भेटायला हवे. त्याचे आणखी कोण जवळची मंडळी असतील त्यांना भेटायला हवे. कोण जाणे काही तरी नवीन माहिती मिळायची. माधुरी नेने सरांच्या केबिनमध्ये गेली. ''सर, मला वाटतं मी बंगालमध्ये जाऊन जयच्या आईवडिलांना भेटायला हवे. त्याची कोण जवळची मंडळी असतील त्यांनासुध्दा भेटायला हवे.''

''माधुरी, तुला मी मागेच बोललो होतो, जयच्या नातेवाईकांना एकदा भेटणे योग्यच. तू येत्या शनिवारी कलकत्त्याला जाऊ शकतेस काय? कलकत्त्यात माझे मित्र आहेत सुब्रतो नावाचे. त्यांची लॉ फर्म आहे. ते सर्व व्यवस्था करतील. मी मनालीला सांगतो तुझी तिकिटे बुक करायला. मला उद्या भेट.'' दुसऱ्या दिवशी मनालीने माधुरीची कलकत्ता जायची यायची तिकिटे तिच्याकडे दिली.

माधुरी शनिवारी सायंकाळी ५च्या सुमारास कलकत्ता विमानतळाबाहेर आली तेव्हा सुब्रतोंची सेक्रेटरी सुप्रिया तिची वाटच पाहत होती. सुप्रियाने तिला हॉटेलपाशी नेले आणि जयच्या गावी जाण्यासाठी सहावाजता गाडी घेऊन येते, प्रवास चार तासांचा आहे आणि जयच्या आईवडिलांना पुण्याहून नेने असोशिएटस् तर्फे माधुरी सामंत भेटायला येणार असल्याचे कळविल्याचे सुप्रिया म्हणाली.

सकाळी ६ वाजता सुप्रिया ड्रायव्हरसह हजर झाली तेव्हा माधुरी तयारच होती. माधुरी सुप्रियाशी हिंदीत बोलायला लागली. ''सुप्रिया पुण्यामध्ये जी पोलीस अधीक्षक चौहान यांची भररस्त्यात जी हत्या झाली आणि विश्वास चक्रवर्ती जागेवरच मारला गेला आणि जय सरकार पकडला गेला याबाबत इकडची प्रतिक्रिया काय?''

**सुप्रिया** – ''माधुरी खरं सांगू, चौहानांबद्दल बंगालच्या लोकांना कमालीचा राग होता, त्यांची पोलीस अधीक्षक कारकीर्द अरेरावीची होती. मोटर कारखान्यांच्या

विरोधात जे आंदोलन झाले ते चिरडून टाकण्यासाठी त्यांनी गोळीबाराची ऑर्डर दिली आणि तरुण कॉलेजमधली मुलं मारली गेली. चौहानांचा खून झाल्याचे कळताच लोकांना आनंद झाला पण विश्वास, जय सारखी तरुण मुलं पोलिसांच्या तावडीत मिळाली याचे लोकांना वाईट वाटले.

चार तासांचा प्रवास करुन माधुरी आणि सुप्रियाने जयच्या गावात प्रवेश केला आणि थोडीफार चौकशी केल्यानंतर त्यांची गाडी त्याच्या घरासमोर आली. त्या घराकडे माधुरी एकटक पाहत राहिली. छोटासा बंगला होता. बाहेर हिरवळीवर तरुण मुलं-मुली हातात कागदपेन घेऊन बसले होते. काहीजण घरातून बाहेर ये-जा करत होते.

माधुरी आणि सुप्रिया हिरवळीवरुन चालत घराच्या दिशेने निघाल्या तेव्हा एक तरुण मुलगी बाहेर आली आणि सुप्रियाशी बंगालीत बोलू लागली आणि दोघींना आत बेडरुमध्ये घेऊन गेली. माधुरी बसलेल्या खोलीचे निरीक्षण करत होती. रविंद्रनाथ टागोरांचा एक मोठा फोटो होता. त्याच्याकडे पाहत असतानाच जयचे आईबाबा खोलीत आले. माधुरीच्या लक्षात आले. जयने आईचा तोंडवळा आणि बाबांची उंची घेतली आहे.

''नमस्कार, मी माधुरी सामंत, पुण्याच्या नेने असोशिएट्स मधील वकील'' नमस्ते, तुम्ही येणार याची कल्पना सुब्रतोच्या ऑफिसमधून दिली होती. तुम्ही जयचे वकीलपत्र घेतले? का ? त्याने चौहानांच्या हत्येचा कबुलीजबाब दिला आहे ना पोलिसांकडे ?

''जयने कबुली जबाब दिला असला तरी माननीय कोर्टाने जयच्या वतीने कोर्टात केस चालविण्याची आम्हाला विनंती केली आणि नेने असोशिएटस्‌ने ही केस चालविण्यासाठी माझी नियुक्ती केली.

जयचे वडील म्हणाले, पण एवढे लांब येण्याचे कारण?

''आम्ही जयच्या सुटकेसाठी सर्व प्रयत्न करणार. चौहान हत्येसंबंधात काही नवीन माहिती मिळते का याकरिता मी इकडे आले.''

''या माहितीचा फारसा उपयोग होणार नाही माधुरी. जयने पोलिसांकडे हत्येचा कबुली जबाब दिला आहे आणि कोर्टात सुध्दा तो हत्येची कबूली देईल. तो बंगालमधील सरकार घराण्यातील मुलगा आहे आणि आम्ही मरणाला घाबरत नसतो. माधुरीचा नाईलाज झाला. या हत्येबद्दल जयचे आईबाबा फारसे बोलायला उत्सुक नव्हते. मग माधुरीच आजुबाजूला जमलेल्या तरुण मुलांकडे पाहून म्हणाली, ''ही तरुण मंडळी कशाला जमली आहेत?''

जयची आई उद्गारली, ''आमच्या बाजूच्या जिल्ह्यात एका मोठ्या नदीवर नवीन धरण बांधण्याचे सरकारने ठरविले. या धरणाने कितीजणांना विस्थापित केले

जाणार आहे याची सरकारला कल्पना नाही. बहुतेकजण आदिवासी लोक, त्यांनी कुठे जायचे? सरकार त्यांना आसामच्या बॉर्डरवर घर देऊ इच्छिते पण ते आपले गाव सोडून जायला इच्छुक नाहीत. आता त्यांना जबरदस्तीने हाकलले जाऊ शकते. त्या विरुध्द आंदोलन सुरु केले आहे. त्या आंदोलनाची तयारी येथे सुरु आहे. या आमच्या घरात सायंकाळी आंदोलनातील नेते जमतात. रोज चर्चा सुरु आहे. सरकार चर्चेसाठी बोलावते का बघायचे. मागे मोटर कारखान्याच्या विरोधात आंदोलन झाले त्यात ३० तरुण मुलं मारली गेली. आमची कन्या, होणारा जावई, मुलगा सर्व या मोटर कारखान्यामुळे....

जयचे वडील बोलता बोलता थांबले. क्षणभर थांबून ते जोराने म्हणाले, ''पण मोटर कारखाना इथून दुसऱ्या राज्यात गेला हे महत्त्वाचे. आमच्या गरीब लोकांच्या जमिनी परत मिळाल्या. आम्ही विजय मिळविलाच. या धरणालापण आमचा विरोध आहेच. या धरणाची गरज नाही आम्हाला. सरकारला तो निर्णय रद्द करावाच लागेल. त्यासाठी कोणतीही किंमत मोजायला तयार आहोत. अगदी आमचे प्राण.... बोलता बोलता जयचे बाबा थांबले. माधुरीच्या लक्षात आले. बहुतेक त्यांना आपल्या मुलांची आठवण आली असणार. जयची आई हळूच माधुरीला म्हणाली, ''माधुरी, जयला भेटलेलीस इतक्यात?''

''होय आई'' माधुरी म्हणाली.

आई चटकन आत गेली आणि एक मिठाई बॉक्स घेऊन आली.

''माधुरी, माझं एक काम कर, ही संदेश बंगाली मिठाई आहे. जयला फार आवडते संदेश मिठाई. पुण्याला गेलीस की जयला भेटून ही मिठाई दे. म्हणावं, आईकडून ही शेवटची मिठाई.... कदाचित.....''

आईला मोठा हुंदका आला. माधुरी पुढे गेली. आईच्या खांद्याभोवती हात घालून तिने आईला जवळ घेतले. क्षण दोन क्षण त्या दोघी एकमेकांच्या मिठीत अश्रू ढाळत होत्या. दुसऱ्या क्षणी आई बाजूला झाल्या. माधुरीला म्हणाल्या, ''जयला सांग एक मोठ्ठं धरण बोडक्यावर मारलंय सरकारनं, त्याच्या विरुध्द आंदोलन सुरु होत आहे. त्याची जुळवाजुळव सुरु आहे. त्यामुळे तुझ्या आईबाबांना अजिबात वेळ नाही.'' एवढं बोलून आई झटकन आत गेली. जयचे बाबापण उभे राहिले. माधुरी त्यांना नमस्कार करुन निघाली. माधुरीने बाहेर पडतापडता पाहिले, मघा आत गेलेली जयची आई बाहेर महिला कार्यकर्त्यांच्या गराड्यात बोलत होती.

माधुरी आणि सुप्रिया गाडीत गप्पगप्प होत्या. काहीवेळानंतर माधुरी सुप्रियाला म्हणाली, ''सुप्रिया चळवळ म्हणजे काय? चळवळीतले कार्यकर्ते कसे असतात हे आज मला कळाले, मी इथे आले नसते तर कदाचित कळलेच नसते.''

रात्रौच्या विमानाने माधुरी पुण्यात पोहोचली. दुसऱ्या दिवशी नेने सरांना भेटून तिने सर्व वृत्तांत सांगितला. नेने असोशिएटस् तर्फे तुरुंगाधिकाऱ्याकडे जयची भेट मागितली गेली आणि यावेळी माधुरी एकटीच तुरुंगात पोहोचली. थोड्यावेळाने मागच्या वेळेसारखाच सशस्त्र पोलीस बंदोबस्तात जय बाहेर आला. ''हाय माधुरी, काही काम होत का? केस केव्हा सुरु होणार?''

''बहुतेक पंधरा दिवसात''

''नाही, माझं आयुष्य किती शिल्लक राहिलं याचा हिशेब करतोय.''

माधुरी आवेगाने म्हणाली, ''असं बोलू नकोस जय, मला यातना होतात.''

''एवढी इमोशनल होऊ नकोस माधुरी, माझ्या मनाची तयारी झाली आहे. का आली होतीस?''

''मी तुझ्या घरी जाऊन आले, तुझ्या आईबाबांना भेटून आले.''

''कशाला गेली होतीस ? केस संदर्भात ? अजून या केसमधून मी सुटेन अशी आशा वाटते का तुला?''

''वकीलाने आपल्या अशिलाच्या सुटकेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करायलाच हवे जय, आणि दुसरं म्हणजे बंगालमधील चळवळीतील तुझ्या आईबाबांनापण समजून घ्यायचं होत.''

''हो, आमचं कुटुंब चळवळीतीलं, आम्ही आमचा स्वार्थ कधी पाहिलाच नाही. आईबाबांना नोकरीत पगार मिळायचा तोपण निराधार कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी खर्च व्हायचा. माझ्या आईबाबांना आम्ही दोनच मुलं नव्हतो, अशी शेकडो मुलं आमची भावंडं होती.''

''जय, आजुबाजूला स्वार्थी माणसांची डबकी पाहिली की तुझे आईबाबा उत्तुंग वाटतात रे! अशी माणसं अजून या जगात आहेत हे खरं वाटत नाही. जय बंगालमध्ये एका धरणाविरुध्द आंदोलन सुरु झाले आहे आणि तुझे आईबाबा त्या आंदोलनात पुन्हा सक्रिय झाले आहेत. तुमच्या घरात कार्यकर्त्यांची लगबग सुरु होती. त्यांना माझ्याशी बोलायला सुध्दा वेळ नव्हता.''

''छान आहे, चळवळ, कार्यकर्ते हा त्यांचा श्वास आहे. मागच्या आंदोलनात मोटर कारखान्याच्या मालकाला शेवटी कारखाना बाहेर न्यावाच लागला. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या.''

''पण जय, त्यासाठी किती किंमत मोजावी लागली ? तीस मुलं जागच्या जागीच मृत्युमुखी, त्याशिवाय....''

''त्याशिवाय तनुजा, विश्वास, मी असंच म्हणायचं आहे ना माधुरी ? चळवळीतील लोक जीवाची पर्वा करत नाहीत.

एवढ्यात माधुरीला आठवण झाली. तिने पर्समधील जयच्या आईने दिलेला संदेश मिठाईचा बॉक्स बाहेर काढला, तो जयसमोर धरुन माधुरी म्हणाली, ''जय तुझ्या आईने तुझ्या आवडीची संदेश मिठाई पाठविली आहे.''

''संदेश मिठाई ? ही मिठाई मला फार आवडते. '' तो मिठाईचा बॉक्स जयने हातात घेतला, बॉक्स गोंजारला, ''माधुरी, गेले दोन महिने तुरुंगातील अन्न खाऊन शरीराला त्याची सवय झालीय, त्या शरीराला ही तुपातली संदेश मिठाई खाऊन पुन्हा ती सवय मोडायला नको. माधुरी ही मिठाई माझ्यातर्फे तुला भेट. नाहीतरी माझ्यासाठी तू एवढे करतेस याचा उतराई मी कसा होऊ?''

''जय असं बोलू नकोस रे !''

''मला समजतयं माधुरी, मी पण तरुण आहे, तरुणाईच्या सर्व संवेदना माझ्याही मनात आहेत. तुझ्या डोळ्यात माझ्याबद्दलचे प्रेम दिसत आहे पण ही वेळ चुकीची आहे. तुझं लग्न ज्या तरुणाशी ठरलयं त्याच्याशी लग्न कर आणि सुखी हो.'' एवढं म्हणून जय आत निघून गेला. तो संदेश मिठाईचा बॉक्स हातात घेऊन माधुरी बाहेर पडली.

पंधरा दिवसानंतर विजयकुमार चौहान हत्येची सुनावणी चालू झाली. प्रतिकला कल्पना होती, माधुरी नुसती जय सरकारची वकील नव्हती ती मनाने त्याच्यात अडकली होती. त्यामुळे प्रतीक रोज कोर्टात हजर राहत होता. सकाळी तो आपल्या गाडीतून माधुरीला आणत होता, सायंकाळी घेऊन जात होता.

सरकारी वकिलांनी अनेक पुरावे दाखल करुन जय सरकारला फाशी देण्याची विनंती केली.

माधुरीने पुराव्यातील त्रुटी दाखवून जयचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. फाशी ऐवजी कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केली.

जय ने विजयकुमार चौहान व त्याच्या अंगरक्षकाची गोळी मारुन हत्या केल्याचे मान्य केले.

कोर्टाने जय सरकारला मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली.

माधुरी शांत होती. तिने शांतपणे कोर्टाचा निकाल ऐकला. पोलीस बंदोबस्तात जयला नेत असताना माधुरी आणि प्रतीक त्याला समोरे गेले. जय म्हणाला, ''माधुरी, एक महिन्यापूर्वी तुझी ओळख नव्हती. पण माझ्यासाठी तु जी धडपड केलीस त्याला तोड नाही. आता माझ्यासाठी एकच कर, मी जिवंत असेपर्यंत तुझे आणि या तरुणाचे लग्न होऊ दे. ती बातमी मला ऐकू दे. ही माझी शेवटची इच्छा समज.''

पोलीस जयला घेऊन गेले.

२ डिसेंबर रोजी प्रतीक आणि माधुरी यांचे लग्न झाले. दुसऱ्या दिवशी माधुरी

प्रतीकसह जयला तुरुंगात भेटून आली. तिघांनी नेहमी मित्र गप्पा मारतात तशा गप्पा मारल्यात. बाहेर पडताना माधुरीने जयला पाहून घेतले. जयने हसत हसत माधुरी–प्रतिकला निरोप दिला.

२१ डिसेंबर रोजी विजयकुमार चौहान हत्येबद्दल जय सरकारला फाशी दिले गेले.

बंगालमधील धरणाच्या विरोधातील आंदोलन सुरुच आहे. भारतात आणि जगात भूमीपुत्र आपल्या हक्कांसाठी सरकारबरोबर आणि उद्योगपतींसोबत लढतच आहेत. आंदोलने करतच आहेत. चौहानांसारखे पोलीस अधिकारी अधिकारांचा वापर करुन निरपराधा लोकांवर गोळीबार करीतच आहेत. त्यात तनुजा सारखी तरुण मुल हकनाक मरतच आहेत, विश्वास सारखे तरुण रस्त्यात गोळी खातच आहेत आणि जय सारखे फासावर जातच आहेत. सरकारची दडपशाही सुरुच आहे. आंदोलने सुरुच आहेत. पुन्हा गोळीबार... पुन्हा फाशी... सारे चालूच राहणार आहे.....

।। ॐ शांती शांती ।।

# श्रीमंत

प्रदिप केळूसकर - मोबा. ९४२२३८१२९९/ ९३०७५२११५२

सकाळी ऑफिसला जाण्यासाठी तयार होत होतो. एवढ्यात सेलफोन वाजला म्हणून पाहिले तर अनोळखी नंबर. फोन चालू केला तर कोणीतरी स्त्री बोलत होती.

''मनोहरचा फोन काय रे ?''

''होय, मनोहर बोलतोय, कोण बोलतोय ?''

''मी सविता, सविता चौगुले, कोल्हापूरात एम.ए. वर्गातली''

''अरे हो सविता ! किती वर्षांनी ? कुठे असतेस ? आणि माझा नंबर कोणी दिला ?''

''अरे मी पुण्यात असते, आणि तुझा चुलत भाऊ आहे ना जगदीश तो कोल्हापूरात आपल्या कॉलेजला होता, तो मला भेटतो पुण्यात. त्याचेकडून नंबर घेतला''

''अच्छा, तू पुण्यात असतेस का? वर्गातील कोणीच भेटत नाही मला. मी गेली पंचवीस वर्षे दिल्लीत आहे सरकारी नोकरीत.''

''हो, जगदिश म्हणाला मला तू दिल्लीत असतोस म्हणून, बरं फोन अशा करिता केला होता, आपले सर फार आजारी आहेत, वैद्य सर ! तुझी आठवण काढतात नेहमी म्हणून फोन केला.''

''वैद्य सर आजारी आहेत ? कुठे असतात वैद्य सर ? आणि काय आजारी आहेत ?''

''वैद्य सर पुण्यात राहतात, एकटे. तुला माहिती असेल अरुणा लग्न करुन गेली त्यापासून वैद्य सर एकटे झाले. पुण्यात सदाशिव पेठेत राहतात.''

''बरं, आता सर कुठे आहेत ?''

''सरांना दिनानाथ हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलयं काल रात्री, स्ट्रोक येण्याची शक्यता होती पण वाचले, पॅरालिसीस ॲटॅक आलाय, पण फार घाबरलेत, तोंडात तुझे नाव सतत आहे, अरुणाला पण कळविले आहे. ती नागपूरला असते.''

''मी निघतोच, गेली पंचवीस वर्षे सरांशी संपर्क नाही. पण आता मी सरांना भेटल्याशिवाय राहू शकत नाही. मी दुपारच्या विमानाने निघतो. तू हॉस्पिटलमध्ये आहेस का ?''

''तुम्ही लवकर आलात तर बर होईल, मी आहे इथे पण माझे सासरे आजारी असतात. त्यांचे औषधपाणी पहावे लागते. शिवाय घरचं जेवण वगैरे....''

‘‘ठीक आहे, मी पाच वाजेपर्यंत पोहोचतोच.’’

मी सेक्रेटरीला सांगून दुपारच्या पुणे विमानाचे तिकीट बुक केले. ऑफिसमध्ये जाऊन सुहासकडे चार्ज दिला, दोन चार कपडे बॅगेत भरले आणि विमानतळावर पोहोचलो. आता कधी एकदा पुण्याला पोहोचतो आणि सरांना पाहतो असे झाले. विमानात बसलो आणि आठवले सरांना शेवटचं भेटून पंचवीस वर्षे झाली. सरांना शेवटचे पाहिले तेव्हा सर माझ्यावर फार चिडलेले होते.

‘‘इथून ताबडतोब निघून जा. मला तोंड दाखवू नकोस.’’ खरचं मी गेली पंचवीस वर्षे सरांना तोंड दाखविलं नाही.

विमानात बसल्या बसल्या कोल्हापूरातील दिवस आठवले. कुरुंदवाडसारख्या त्यावेळच्या लहान गावातून बी.ए. केल्यानंतर इंग्लिशमधून पोस्ट ग्रॅज्युएशन करण्यासाठी कोल्हापूरात आलो. घरची अत्यंत गरिबी, अंगावरचा एक ड्रेस आणि पायात फाटके स्लीपर घालून शेजारच्या कोंडिबा बरोबर कोल्हापूरात आलो. कोंडिबाच्या ओळखीमुळे हॉस्टेलमध्ये सोय झाली. फी माफी होती म्हणून शिक्षण करु शकत होतो. जयसिंगपूर कॉलेजमधून बी.ए. ला पहिला आलो होतो. इंग्रजी जास्त आवडायचे. कोल्हापूर मोठे शहर, कोणीच ओळखीचे नव्हते. रुम पार्टनर कोकणातला होता. मला सांभाळून घ्यायचा. हॉस्टेलमध्ये वरच्या वर्गातील मुलं होती ती पण सांभाळून घ्यायची. कॉलेजमधील प्रोफेसरांची भीती वाटायची. सिनियर मित्र सांगायचे –‘‘अजून वैद्य सरांना भेटला नाहीस तू, या युनिव्हर्सिटीमध्ये इंग्रजी विभागामाध्ये गर्दी होते ती वैद्य सरांमुळे. सरांचे वाचन, शिकविण्याची पध्दत, मुलांवरचे प्रेम वगैरे गोष्टी ऐकत होतो.

कॉलेजमध्ये गेल्यानंतर वैद्य सरांच्या केबिनबाहेरुन जाताना नेहमी व्यवस्थित कपड्यांतील वैद्य सर दिसायचे. समोर टेबलावर नवीन नवीन पुस्तके दिसायची. एकदा तरी सरांनी वर्गात येऊन एखादे लेक्चर घ्यावे असे वाटत होते. पण सर नेहमी दुसऱ्या वर्गाला शिकवायचे. सहामाही परीक्षेचा रिझल्ट लागला आणि अचानक वैद्य सरांकडून मला बोलावणे आले. मी प्रथम घाबरलो. माझे काय चुकले आहे हे लक्षात येईना. घाबरत घाबरत सरांच्या केबिनमध्ये गेलो सरांपुढे उभे राहून म्हणालो –

‘‘सर मी मनोहर शिंदे, पहिल्या वर्षाला आहे.’’

सरांनी माझ्याकडे वरपासून पायापर्यंत पाहून घेतले. मग मला म्हणाले,

‘‘शिंदे, तुमचा सहामाहीचा इंग्लिश पेपर आत्ता पाटील सरांनी दाखविला, चांगला लिहिला आहेस. तुला सर्वात जास्त मार्क्स आहेत. मी येथील प्रोफेसर्स क्वॉटर्समध्ये राहतो. संध्याकाळी घरी ये.’’

मी मान हलवून बाहेर पडलो. सरांच्या घरी जायचे, बापरे ! सरांच्या घरी

कोण कोण असतील, माझ्या अंगावर कपडे हे असे, एकच जुना ड्रेस, पायात फाटके स्लीपर्स. मी रुमवर आलो, माझा रुमपार्टनर उमेश पण रुमवर होता. त्याला म्हटले –

''मला वैद्य सरांनी घरी बोलावलयं, पण माझे हे असे कपडे आणि चप्पल, मला एक दिवस तुझे कपडे देतोस का घालायला ? त्यांच्याकडून आलो की धुऊन देतो तुला.''

उमेशकडे पण दोनच शर्ट होती. त्याने ताबडतोब एक शर्ट दिला. माझे चप्पल घाल म्हणाला. मी उमेशचा शर्ट घातला. मी तब्बेतीनं किरकोळ. तो तब्बेतीनं मध्यम. त्याचा शर्ट मला ढिला होत होता. उंचीला आखूड होत होता. पण शेवटी घातलाच. त्याचे चप्पलपण झिजले होते पण माझ्यापेक्षा बरे होते. शेवटी उमेशचे कपडे, चप्पल घालून मी प्रोफेसर्स क्वॉटर्सच्या दिशेने निघालो. ओळीने बंगले होते. चौकशी करत करत वैद्य सरांच्या घराजवळ आलो. त्यांच्या घराजवळ पोहोचलो तर वैद्य सर पांढरा लेंगा झब्बा घालून बाहेरच पडत होते. मला पाहून म्हणाले –

''अरे मनोहर, मी फिरायलाच बाहेर पडतोय. चल माझ्याबरोबर.''

मी पण त्यांच्या समवेत चालू लागलो. सरांनी पुन्हा एकदा कपड्यांकडे पाहिलं आणि माझी चौकशी सुरु केली.

''गांव कोणतं ?''

''कुरुंदवाड, वाडीजवळचं''

''हो, हो माहीत आहे, कुरुंदवाडची बासुंदी प्रसिध्द, घरी कोण कोण असतं ?''

''आई–बाबा, मागची तीन भावंडं''

''बाबा काय करतात ?''

''पाटलाच्या शेतात कामाला जात्यातं, आये बी कामाला जाते, मागची भावंडं शाळत जात्यात''

''मनोहर आता तू शहरात राहतोस, एम.ए. इंग्रजी करतोस, आपली भाषा बदलावी लागेल. आपली गावाकडची भाषा वाईट असते असे नव्हे. पण शहरात शुध्द मराठी बोलणं बरं. इंग्रजीपण बोलता यायला पाहिजे., जर आयुष्यात मोठं व्हायचं असेल तर चांगल्या भाषा बोलता यायला पाहिजेत. ''

''व्हयं सर''

''होय सर म्हणावं, भाषेला वळण लाव, एम.ए. ला इंग्रजी स्पेशल घेतलस तर वाचन हवं. मराठी काही वाचतोस की नाही ?''

''थोडफार, अण्णाभाऊ साठे, बाबा कदम वाचलेत सर''

''ते ठीक आहे, माझ्याकडून पुस्तके घेऊन जा. सत्यकथेचे जुने अंक आहेत ते वाच. एकाच प्रकारचे वाचन करायचे नाही. शहरी, ग्रामीण, दलित सर्व वाचायचं. यंदा मराठी वाचन सुरु कर. पुढच्या वर्षी इंग्रजी साहित्य.''

‘‘हो सर’’

फिरुन आल्यावर सरांनी नरहर कुरुंदकरांचे एक पुस्तक दिलं. शांता शेळके यांचा कविता संग्रह दिला. ही पुस्तके वाचून दोन दिवसांनी परत करायची आणि आणखी दोन पुस्तके न्यायची.’’

‘‘हो सर’’

मी पुस्तके घेऊन रुमवर गेलो आणि अधाशासारखा पुस्तकावर तुटून पडलो. सरांनी पुस्तके वाचायला दोन दिवस दिले होते. मी ती पुस्तके वाचून दुसऱ्याच दिवशी पुस्तके परत करायला गेलो. सर घराच्या दारात बाहेर जायच्या तयारीत उभे. मी त्यांना पुस्तके दिली. त्यांनी कौतुकाने घेतली आणि घरात ठेवली. मला म्हणाले –

‘‘मनोहर, चल आपण गावात जाऊ’’

मी त्यांच्याबरोबर चालू लागलो. कॅम्पस बाहेर येताच त्यांनी रिक्षा थांबवली आणि महाद्वार रोडला रिक्षा घेण्यास सांगितले. उतरल्यावर एका कापड दुकानात मला घेऊन गेले. तिथल्या सेल्समनला सांगून माझ्यासाठी दोन पॅन्टीची आणि दोन शर्टाची कापडे विकत घेतली. मी पाहत राहिलो.

‘‘सर हे कशासाठी ?’’ असं म्हणताच, अरे युनिव्हर्सिटीमध्ये शिकताना बरे कपडे हवेच असं म्हणून माझं तोंड बंद केलं. जवळच्या ज्योतिबा रोडवरील टेलरकडे जाऊन माझ्या पॅन्ट, शर्टचे माफ घ्यायला लावले. तिथल्या जवळच्या रेडिमेड कपड्याचा दुकानात जाऊन अंडरवेअर, बनियन विकत घेतले. आणि चप्पलांच्या दुकानात जाऊन कॅनव्हास बुट, सॉक्सपण घेतले. परत रिक्षात बसताना मी गप्प गप्प होतो. उपकाराच्या ओझ्याने शरमिंदा झालो होतो. रिक्षातून मला हॉस्टेलकडे सोडताना सर मला म्हणाले – ‘‘उद्या रविवार. मेसमध्ये जेवण नसतं ना ? उद्या दुपारी घरी जेवायला ये. तुझा अभ्यास वगैरे आटप आणि बाराच्या सुमारास ये. असं म्हणून सरांची रिक्षा घराच्या दिशेने वळली.

दुसऱ्या दिवशी मी घाबरत घाबरत सरांच्या घराकडे गेलो तर सर आणि एक तरुण मुलगी हॉलमध्ये कॅरम खेळत होती. मला पाहताच सर म्हणाले,

‘‘ये रे मनोहर ! रविवारचा आमचा थोडासा कॅरम असतो. हिला ओळखतोस की नाही ?’’

मी म्हटलं नाही.’’

अरे ही माझी धाकटी बहीण अरुणा, आम्ही दोघचं असतो या घरात. ही माझ्यापेक्षा पंधरा वर्षांनी लहान. मी लग्न केलं नाही. जो पर्यंत हिचं लग्न होत नाही तो पर्यंत ही सोबत आहेच. जेवण करायला एक बाई येतात. अरुणापण करते जेवण पण ती युनिव्हर्सिटीमध्ये इतिहास घेऊन एम.ए. करतेय. तिला लेक्चर्स असतात. तिला

गाण्याची फार आवड. त्यामुळे गाणं पण शिकतेय. म्हणून एक बाई येतात, घरातील सर्व आवरतात, जेवण करतात आणि आत्तापण बाई आतमध्ये स्वयंपाक करत आहेत. सरांनी माझ्या हातातील पुस्तके घेऊन शेल्फवर ठेवली. मी सरांच्या शेल्फकडे पाहत राहिलो. शेकडो पुस्तके होती. मराठी, इंग्रजी सर्व व्यवस्थित लावली होती. आत गेलेल्या अरुणाने पाणी आणून ठेवल. सरांनी तिची माझ्याशी ओळख करुन दिली.

''अरुणा, हा मनोहर शिंदे, कुरुंदवाडचा आहे. इंग्रजीत एम.ए. करतोय. हुशार आहे. त्याचा सहामाहीचा पेपर मी पाहिला. छान लिहिलाय. मनोहर पुढच्या वर्षी मी तुला शिकवायला असणार.''

ही अरुणाची पहिली भेट, तिचे फॅशनबेल कपडे पाहून मला न्यूनगंड आला. सर आणि अरुणा दोघे घरात स्लीपर्स वापरत होते. मला आणि माझ्या भावंडांना बाहेर जाताना फाटके स्लीपर्स मिळत नव्हते. मग सरांनी आपल्या कुटुंबाबद्दल बोलायला सुरुवात केली.

''आम्ही मुळ गोव्याचे, आम्ही दोन भावंडे, आई-वडील हयात नाहीत. नोकरीच्या निमित्ताने पंधरावर्षे कोल्हापूरात राहतो. अरुणाने जेवण वाढल्याची सूचना केली आणि सरांनी मनोहरला आत बोलावले. अरुणापण जेवायला बसली. समोर जेवणाची भांडी ठेवलेली होती. प्रत्येकाने हवे ते वाढून घ्यायचे. सुरुवातीला ताटात सॅलेड, मग चपाती, अंडा मसाला वगैरे. मला असे सुरुवातीला सॅलेड वगैरे खाण्याची सवय नव्हती. मी हळूहळू सरांकडे आणि अरुणाकडे बघून जेवत होतो.

सरांचे माझ्याकडे लक्ष होतेच. ते 'कसे जेवावे' हे मला जणू शिकवत होते. सुरुवातीला सॅलेडकडे नजर गेली. मी सॅलड खायला लागलो. मग चपाती अंडा मसालामध्ये बुडवून घ्यायला लागलो. तोंडात घास गेल्यानंतर तोंडाचा आवाज येऊ नये, घास चावून खावा, जेवण झाल्यानंतर पाणी प्यावे, मध्येच पिऊ नये इत्यादी मी सरांकडून शिकत होतो. जेवण झाल्यावर सरांनी आपलं ताट उचललं, बाजूचं उष्ट ताटात टाकलं आणि ताट बेसीनमध्ये ठेवलं, मी पण तस्स केलं. गेली २५ वर्षे मी नोकरी निमित्त दिल्ली आहे. सरांनी दिलेली ही जेवण जेवणाची सवय अजून गेली नाही.

कॉलेज संपल्यावर रोज सायंकाळी, सरांबरोबर युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये चालणे सुरु होतेच. कॉलेजच्या पहिल्यावर्षाला सरांनी फक्त मराठी आणि हिंदी साहित्याबद्दल गप्पा मारल्या. त्यात नाटककार विजय तेंडुलकर, गो.पु. देशपांडे, मोहन राकेश, अमृता प्रितम, भालचंद्र नेमाडे, अरुण साधू कवितेमध्ये कुसुमाग्रज, शांता शेळके, पाडगांवकर असे अनेक रोज एका लेखकाची माहिती सांगायची,

जाताना त्या लेखकाचे किंवा कवींची पुस्तके द्यायची. दुसऱ्या दिवशी कालची पुस्तके वाचली की नाही याची खात्री करायची. दर रविवारी माझे सरांकडचे जेवण ठरलेलं, त्यावेळी अरुणाची भेट व्हायची.

आता हळूहळू माझी भाषा सुधारु लागली होती. कॉलेजमध्ये इंग्लिश ऐकून ऐकून तोंडात इंग्रजी पण बसली होती. त्यामुळे अरुणाशी थोडथोड बोलण्याचे मी धाडस करत होतो. एकदा सप्टेंबर अचानक पाऊस सुरु झाला. छत्री नव्हती त्यामुळे मी भरपूर भिजलो. रात्रौ जोराचा ताप आला. नेमका माझा पार्टनर गावी गेलेला. मी कॉलेजमध्ये आलो नाही म्हणून सर हॉस्टेलमध्ये आले आणि मी पांघरुण घेऊन झोपलेला. सरांनी मला डॉक्टरकडे नेले आणि विश्रांतीसाठी आपल्या घरी घेऊन आले. ते दोन दिवस अरुणाने अगदी गरम पाणी, पातळ पेज देण्यापासून सर्वकाही केले.

मी बरा झालो आणि परत हॉस्टेलवर आलो. पण डोळ्यासमोर अरुणा यायची. अर्थात अरुणाचा विचार मनात आणणे हे चुकीचे आहे हे समजत होते. एकतर ती श्रीमंत कुटुंबातील आणि माझे उपकारकर्ते वैद्य सरांची लाडकी बहीण होती. जातीचा विचार केला तरी ती उच्च जातीतील होती आणि मी कुठेच नव्हतो. माझ्यावर मागच्या तीन भावंडांची जबाबदारी होती. आमचं ना धड शेती ना घर. छे ! छे !

अरुणाचा विचार मनात आणायचा नाही असे बजावले तरी अरुणा स्कूटीवरुन आमच्या हॉस्टेलसमोरुन कॉलेजला जायची त्यावेळी मी गच्चीत यायचोच. ती दिसेनाशी झाली की रुममध्ये यायचो. सायंकाळी सरांकडे जायचो तेव्हा अरुणाची जाग लागते का हे पहायचो. रविवारी जेवायला गेलो की ती आजुबाजूला असायची. तेव्हा तिला पहात रहायला आवडायचे. अरुणाचे हसणे, बोलणे, माझ्या आणि सरांच्या पुस्तकांच्या गप्पात सहभागी होणे, मधूनच चहा आणून देणे सर्वच आवडायचे. एवढे दिवस सरांकडे जाणे-येणे झाल्याने एक लक्षात आले सरांचे अरुणावर फार प्रेम आहे.

पहिल्या वर्षाला मी कॉलेजमध्ये पहिला आलो तेव्हा सरांना फार आनंद झाला. मग सरांनी मला आणि अरुणाला घेऊन हॉटेल ओपल मध्ये जेवायला नेले. सुट्टीत मी गावी गेलो तेव्हा सरांनी वाचायला भरपूर पुस्तके सोबत दिली. कॉलेजचे दुसरे वर्ष सुरु झाले आणि सर वर्गात इंग्लिश साहित्य शिकवायला लागले. सरांचा तास कधी सुरु व्हायचा आणि कधी संपायचा हे लक्षात यायचे नाही. शेक्सस्पिअरची नाटके हॅम्लेट, अथेल्लो, ज्युलिअर सिझर, किंग लिअर तसेच इंग्रजी कादंबऱ्या सरांनी शिकविल्या. माझा आणखी फायदा म्हणजे सायंकाळी याच कथांवर सर माझ्याशी

पुन्हा चर्चा करायचे. एकंदरीत मी सर आणि सरांच्या घरात घरचा झालो होतो.

एका रविवारी मी सरांकडे जेवायला गेलो तेव्हा लक्षात आले अरुणा घरात नाही. मग सरच म्हणाले, ''अरे अरुणाला गाण्याची फार आवड, इथे गावात स्वरशिल्प नावाचा एक नाटकाचा ग्रुप आहे. त्यांनी गाण्यांचा कार्यक्रम सुरु केलाय, थोडक्यात ऑक्रेस्ट्रा. अरुणाला त्यांनी बोलावलेय. सध्या अरुणा रोज संध्याकाळी आणि रविवारी त्यांच्या सरावाला जाते. मग हळूहळू लक्षात यायला लागले अरुणा नेहमीच घरात नसते. एक दिवस सर म्हणाले, मनोहर अरुणाच्या ग्रुपचा पहिला कार्यक्रम दसरा चौकात, शाहू स्मारक भवनमध्ये रविवारी रात्री आहे. अरुणाने दोन तिकिटे ठेवली आहेत. तेव्हा येत्या शनिवारी आपल्याला कार्यक्रमाला जायचे आहे. मी आनंदाने हो म्हणालो.

शनिवारी मी आणि सर शाहू स्मारक भवनमध्ये स्वरशिल्प ग्रुपच्या सुरसंगम कार्यक्रमाला गेलो. हॉल फुल्ल होता. कॉलेजमधील मुलं, त्यांचे आईवडील, नातेवाईक यांनी गर्दी केली होती. कार्यक्रम सुरु झाला अरुणा आणि विनोद नगरकर यांची जोडीने गाणी होती. शिवाय इतर मंडळींची होती. पण जास्त शिट्टया, टाळ्या आणि वन्समोर विनोद नगरकरला मिळत होत्या. विनोद होता पण देखणा, रुबाबदार कपडे आणि स्टायलिश बोलणे. एकंदरीत या ग्रुपमध्ये तोच लक्षात राहणारा होता. कार्यक्रम संपला आणि मी आणि सर आतमध्ये भेटायला गेलो. सर्वांचे कौतुक केले. एवढ्यात अरुणा पुढे आली आणि सरांशी सर्व मंडळीची ओळख करुन दिली. विशेषतः विनोदची अगदी हसून प्रेमाने ओळख करुन दिली.

जस जशी वार्षिक परीक्षा जवळ येऊ लागली तस तसा मी अभ्यासात रमलो. कोणत्याही परिस्थितीत विशेष प्राविण्यासह पास व्हायचं होतं तरच माझ पुढचं भवितव्य होतं. आणि माझ्या लहान भावंडांना शिकवून मोठं करायचं होतं. अभ्यासामुळे सरांबरोबर सायंकाळी फिरणं बंद केलं. मात्र सरांकडे रविवारी जेवायला जायचो पण अरुणा दिसायची नाही. ती गाणे, आणि गाण्याचे कार्यक्रम यांच्यात अडकली होती. हल्ली बऱ्याचवेळा विनोद नगरकर युनिव्हर्सिटीत दिसायला लागला. दोन-तीन वेळा अरुणा विनोदच्या मोटरसायकलवर बसून युनिव्हर्सिटीत दिसली. सरांचे याकडे लक्ष होते का कोण जाणे ? मी मात्र गप्प होतो.

फायनल परीक्षा झाली आणि मी भरपूर पुस्तके घेऊन गावाकडे गेलो. माझा मागचा भाऊ अकरावीत होता. त्याच्या मागचा नववीत होता. बहीण पाचवीत होती. आता लवकरात लवकर नोकरीला लागायचे आणि मागच्या भावंडांचे शिक्षण करायचे हे ठरविलेच होते. गावी येऊन जेमतेम पंधरा दिवस झाले असतील नसतील. एवढ्यात सरांची तार आली.

''ताबडतोब येऊन घरी भेट''
मी घाबरलो, म्हटले रिझल्टला अजून पंधरा दिवस बाकी आहेत. मग सरांनी तातडीने का बोलावले. ?

मी दुसऱ्याच दिवशी एसटीत बसलो आणि सरांकडे पोहोचलो. सर हॉलमध्ये जोराजोरात फेऱ्या घालत होते. मी गेट उघडून आत गेलो सरांनी मला पाहिले आणि दार उघडून आत घेतले. मी आत येताच दार बंद केले आणि मला घेऊन बेडरुममध्ये आले. मी सरांच्या बेडरुममध्ये कधीच आलो नव्हतो. मी सरांकडे पाहिले, सरांचा असा अवतार मी कधीच पाहिला नसावा. कदाचित एक दोन दिवस सर धड झोपले नसावेत. कपडे चुरगळलेले होते. दाढी वाढलेली होती. मी बेडमधील खुर्चीत बसल्याक्षणी सरांनी चिडून बोलायला सुरुवात केली.

''मनोहर, मला तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती. गरीब पण हुशार मुलगा म्हणून मी तुला जवळ केले. तुला घरी घेतले. कधीही घरी येण्याची मुभा दिली. पण तू गैरफायदा घेतलास. मला अडचणीत आणलेस.''

''सर, काय झालं ?'' मला शब्द फुटेना.

''अरुणा दोन महिन्यांची गरोदर आहे.''

''काय ?''

''होय, आणि तिने तुझे नाव घेतले''

''माझं ?''

''होय तुझं''

''पण मी.... माझा काही संबंध नाही ओ सर...''

''नाही कसा, नाहीतर या घरात दुसरं कोण येतं ?''

''मला कल्पना नाही सर, पण मी नाही''

''तूच असणार, ती तुझ नाव घेते, ती उगाचच नाव का घेईल. आता एकच उपाय ताबडतोब अरुणाशी लग्न कर आणि दुसऱ्या शहरात नोकरीला जा.''

''सर कस शक्य आहे ? सर तुम्ही नसताना मी फारसा येत नाही आणि आलोच तर पुस्तकं द्यायला, पण हॉलच्या आतमध्ये कधी जात नाही. ''

''खोट बोलू नकोस, माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या अब्रूचा प्रश्न आहे. पुढील आठवड्यात तुमचे लग्न करुया आणि मग तुला जिल्ह्यातील कोणत्यातरी कॉलेजमध्ये लेक्चरर्सची नोकरी मिळविण्याची व्यवस्था करतो.''

''नाही, सर, हा माझ्यावर विनाकारण आळ आला आहे. मी गरीब आईवडिलांचा मुलगा आहे. माझ्यावर माझ्या भावंडांची जबाबदारी आहे. मी यावेळी कुणाशीही लग्न करु शकत नाही.''

‘‘मग चालता हो, आणि पुन्हा मला तोंड दाखवू नकोस.’’ सर कडाडले आणि रागाने थरथरत सरांनी मला धक्के मारत बाहेर काढले आणि दार बंद करुन घेतले.
सरांच्या घराचे दार माझ्यासारख्या खेडेगावातील विद्यार्थ्याला सताड उघडे होते तेच दार माझ्यासाठी कायमचे बंद झाले होते. मी थरथरत होतो. कसला आरोप सरांनी माझ्यावर केला ? आणि अरुणाने माझे नांव का घ्यावे? मी गरीब आहे म्हणून ? मी खालच्या जातीचा आहे म्हणून ? कि माझ्या कुटुंबातील कोणी जाब विचारणारा नाही म्हणून ? मला रडू येत होते. सरांची कशी समजूत घालू मी ? पण सरांचे वेगळे वेगळे रुपही पाहिले होते मी. माझे फाटके कपडे पाहून नवीन कपडे शिवणारे सर, मी आजारी पडलो तेव्हा घरी घेऊन जाणारे सर, रोज सोबत फिरायला नेणारे सर, मला हवी ती पुस्तके देणारे सर... सरांची अशी अनेक रुपे मनाला आनंद देत होती. पण आजचे सरांचे रुप... ?

मी गावी आलो. पंधरा दिवसांनी अंतिम रिझल्ट लागला. मी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालो. माझ्या आईवडिलांना खूप आनंद झाला. वेगळी परिस्थिती असती तर मी पेढे घेऊन सरांकडे गेलो असतो. सरांना किती आनंद झाला असता ? सरांना कदाचित माझा रिझल्ट कळलाही असेल. अरुणाचे पुढे काय ? अनेक प्रश्न.

मी दोन दिवसांनी पुण्याला आलो. पुण्याला एका ट्युशन क्लासमध्ये इंग्रजी शिकवू लागलो आणि नोकरीसाठी अर्ज, परीक्षा देऊ लागलो. दोन महिन्यात भारत सरकारच्या संरक्षण खात्यात माझी निवड झाली आणि मी दिल्लीला आलो. माझा पगार सुरु झाला. त्यामुळे भावंडांची शिक्षणे झाली. माझी हुशारी, प्रामाणिकपणा यांनी नोकरीत भरभर वर चढत गेलो. पण हे सर्व वैद्य सरांमुळे, याची जाणीव होती. वैद्य सरांनी जगात कसे वागायचे हे शिकवले, नाहीतर आपले काय झाले असते ? मागच्या भावंडांची लग्ने झाली, ती स्थिरस्थावर झाली पण मी मात्र लग्नावाचून राहिलो. आईवडिल होते तापर्यंत लग्नासाठी मागे लागत होते. पण कोल्हापूरात मला लागलेला डाग, त्याचे काय ? त्या आरोपातून मी कसा मोकळा होणार ?

गेली पंचवीस वर्षे मी दिल्लीत आहे आणि आज अचानक, सविता चौगुलेचा फोन. ‘‘सर आजारी आहेत आणि सर माझी आठवण काढतात म्हणून.’’

सर माझी आठवण काढतात कि तिरस्कार करतात ? सरांना सत्य काही कळलं का ? पंचवीस वर्षे मी एका आरोपाखाली दबून गेलोय, त्या आरोपातून माझी सुटका होईल ? विमान पुण्याच्या दिशेने उडत होते. विमानतळावरुन मी सरळ दिनानाथमध्ये गेलो. सर ज्या विभागात ॲडमिट होते त्या विभागात गेलो. सविता माझी वाटच पाहत होती. तिच्याकडे मी सरांच्या तब्बेतीविषयी चर्चा केली. सात

वाजता सरांना भेटण्याची वेळ होती. सविताकडे मी सरांवर उपचार करणारे डॉक्टर्स, येथील सुविधा, जेवण वगैरेची चौकशी केली. सविताने सर ज्या सदाशिव पेठेत राहतात त्या जागेची किल्ली आणि पत्ता माझ्याकडे दिला आणि ती घरी गेली. साडेसातला डॉक्टर नाडकर्णी राऊंडवर आले आणि त्यांच्याबरोबर मी सरांच्या खोलीत गेलो. पंचवीस वर्षानंतर सर मला दिसत होते. सलाईन लावलं होत, ऑक्सिजन लावला होता. बाजूला जोडीला मॉनिटर पल्सरेट दाखवत होता. डॉक्टरनी पेशंटला तपासले. औषधे लिहून दिली. नर्सला सूचना दिल्या. मी डॉक्टरांकडे सरांच्या तब्ब्येतीविषयी विचारले. डॉक्टर म्हणाले, तब्बेतील सुधारणा आहे. ब्लड प्रेशर नॉर्मल होते आहे. पल्सरेट व्यवस्थित येतो आहे. सध्या ऑक्सिजन लावला आहे उद्या तो काढुया मग पेशंट कसा रिस्पॉन्स देतो पाहू.

डॉक्टर गेल्यानंतर मी सरांच्या बाजूला स्टूलवर बसलो. किती वर्षांनी सरांना जवळून पाहत होतो. शेवटचे पाहिले तेव्हा सरांनी मला धक्के मारुन घराबाहेर काढले होते. पण त्या आधी सरांनी मला किती प्रेम दिले ? खेडेगावातील एका शेतमजूराच्या मुलाला वैद्य सर भेटले म्हणून तो भारत सरकारमध्ये एवढ्या मोठ्या पदावर पोहोचला. गैरसमजामुळे शेवटी सर कसेही वागले असले तरी दोन वर्षे सरांनी दिलेले प्रेम कसे विसरायचे ? या आणि अशा विचारात गुरफटलो असताना अचानक छोटी सुटकेस घेऊन एक स्त्री सरांच्या कॉटजवळ आली. मी चमकून पाहिले आणि ओळखले – अरुणा. जिच्यामुळे मी सरांच्या घरातून हाकललो गेलो आणि गेली पंचवीस वर्षे अपमानाच्या आगीत जळलो आहे ती अरुणा समोर उभी.

''मनोहर केव्हा आलास ? कुठे असतोस ?''

''संध्याकाळी आलो, दिल्लीला असतो.''

''दादाला काय बरं नाही ? मला सविता चौगुलेने फोन केला.''

''मला पण सविताने फोन केला, सरांना पॅरालिसीस अॅटॅक आलाय.''

''डॉक्टर काय म्हणतायत ?''

''बघु. उद्या ऑक्सिजन काढायचा आहे, मग निश्चित काय ते कळेल.'' मी गप्प झालो ती गप्प झाली. दहा मिनिटे अशीच गेल्यावर ती म्हणाली –

''रात्रीचं काय करायचं ? मी थांबू का इथे ?''

''नको, मी थांबेन. तू सरांच्या घरी जाऊन आराम कर. ही किल्ली घे. सविताने मघा ही किल्ली माझ्याकडे दिली. सदाशिव पेठेत बापट ऑप्टिक्स म्हणून चष्म्याचे दुकान आहे. त्याच्यावर सर राहतात असे सविता म्हणाली.''

किल्ली घेऊन अरुणा गेली. माझ्या चुलत भाऊ जगदिश पुण्याला राहतो. मी त्याला फोन करुन वैद्य सरांना दिनानाथमध्ये अॅडमिट केल्याचे सांगितले. तो लगेच

हॉस्पिटलमध्ये यायला निघाला होता पण मी म्हटले, तू येऊ नकोस. मी सकाळी घरी येतो. आंघोळ करुन पुन्हा हॉस्पिटला येईन.

डॉक्टर सकाळी दहा वाजता राऊंडला येणार होते म्हणून सकाळीच लवकर जगदिशकडे गेलो. त्याच्याकडे आंघोळ, नाश्ता करुन पुन्हा हॉस्पिटलमध्ये आलो तर अरुणा आधीच येऊन कॉटशेजारी बसली होती. मी तिच्याकडे दुर्लक्ष केले आणि जवळच असलेल्या नर्सला सरांच्या तब्बेतीविषयी विचारले. दहा वाजता डॉक्टर आले. त्यांनी ऑक्सिजन दूर केला आणि मॉनिटर पाहत राहिले. डॉक्टरांच्या लक्षात आले ऑक्सिजन शिवाय सर व्यवस्थित श्वास घेत आहेत. सरांचा इसीजी व्यवस्थित येतो आहे. ब्लडप्रेशर नॉर्मल आहे. तेव्हा डॉक्टर मला म्हणाले – ''आता यांची तब्बेत व्यवस्थित आहे. उद्यापासून हाताला आणि पायाला फिजिओ करण्याची गरज आहे. मग पाहू कसा रिस्पॉन्स देतात ते.''

डॉक्टर आणि नर्स दुसऱ्या रुममध्ये गेले. सर अजून बेशुध्द होते. खोलीत राहिलो मी आणि अरुणा. मी खुर्चीवर बसून सोबतचं पुस्तक वाचू लागलो. अचानक अरुणा बोलू लागली –

''मनोहर मला क्षमा कर, माझ्या मुळे तुला खूप त्रास झाला. मी फक्त मान वर करुन तिच्याकडे पाहिलं आणि पुन्हा पुस्तक वाचू लागलो. ''मनोहर तुला केव्हातरी खरं काय ते कळायलाच हवं. कोल्हापूरात गाण्याच्या कार्यक्रमामुळे विनोद आणि मी फार जवळ आलो. त्याची आणि माझी द्वंद्वगीते सगळीकडे जोरदार कौतुक होऊ लागलं. आमचे काही कार्यक्रम बाहेरगावीपण असायचे. विनोद धिटाईने माझा हात हातात घ्यायचा. हॉटेलमध्ये खायला न्यायचा. दादाच्या करड्या शिस्तीत हे शक्य नव्हते म्हणून मला ते आवडू लागले. तो मला वेगवेगळी स्वप्ने दाखवू लागला. आपण दोघे स्वतःचा ऑकेस्ट्रा काढू. नाहीतरी मला अभ्यासाचा कंटाळाच होता. मला तो माझा राजकुमार वाटू लागला.

नाहीतर दादा कदाचित माझे तुझ्याशी लग्न लावून देईल अशी भीती वाटत होती कारण दादाचा तुझ्यावर प्रचंड विश्वास होता. पण मला असा कोंदट संसार नको होता. घरच्या जबाबदाऱ्या नको होत्या. हळूहळू विनोद मला त्याच्या रुमवर नेऊ लागला. आमचे संबंध येऊ लागले. मला त्याची गोडी वाटायला लागली आणि नंतर एका बेसावधक्षणी कसलीही काळजी न घेता संबंध आला आणि नंतर उलट्या होऊ लागल्या. पोटात काही टिकेना. दादाने कॅम्पसमधील डॉक्टरना घरी बोलावले. त्यांनी तपासणी केली आणि दादाकडे स्फोट केला.

दादा हवालदिल झाला. आता काय करावे हे त्याला कळेना. मला नाव विचारु लागला. मी विनोदचे नाव सांगितले असते तर माझी धडगत नव्हती. तुझ्यावर

त्याचा विश्वास म्हणून तुझे नाव घेतले. कारण मला वाटले होते तो फार चिडणार नाही पण तुझ्यावर मी अन्याय केला. विनोदच्या प्रेमात मी पागल झाले होते. विनोदला काही त्रास होऊ नये म्हणून त्याला वाचवायला गेले आणि तुझा बळी गेला.

मी काहीही न बोलता फक्त मान वर करुन तिच्याकडे एकदा पाहिले आणि परत पुस्तकात मान घातली.

''मनोहर, तू निर्विकारपणे ऐकतो आहेस असे दाखवतोस, पण तुला किती मनस्ताप झाला असेल याची कल्पना आहे मला. माझा दादा म्हणजे तुझा देव होता. त्या देवाने तुला घराबाहेर काढला. तुझा धिक्कार केला आणि मी दादाला आणि तुला दोघांनाही मनस्ताप दिला.

कॅम्पसमधील डॉक्टरांच्या सहाय्याने दादाने मला मोकळी केली. पण माझे डोळे उघडले नाहीत. सहा महिन्यानंतर मी विनोद बरोबर पळून नागपूरला गेले. तेव्हा दादाला माझा खरा प्रियकर कोण हे कळले असेलच. तेव्हा पासून मी नागपूरला आहे. विनोदने ऑकेस्ट्रा काढला पण दोन वर्षात तो बंद पडला. आता दोघेही दुसऱ्या ऑकेस्ट्रामध्ये गाणी म्हणून संसार चालवतोय. खर तर संसार मी चालवते. विनोद दारू आणि जुगारात पैसे उडवतो. मला एक मुलगी झाली पण तिच्यावर चांगले संस्कार झाले नाहीत. दोन वर्षापूर्वी तिने पळून लग्न केलं. एकंदरीत तिच्या आईने केलं तेच तिने केलं. आता आहे मी नागपूरात, संसार ओढतेय. पण मनोहर असा एक दिवस गेला नाही त्यादिवशी तुझी आणि दादाची आठवण नाही आली. खरं तर तुम्ही दोघेही देवमाणसं. पण विनोदच्या नादाला लागले आणि आपले संस्कार विसरले. आता दादा बरा झाला की, दादाची माफी मागायची आहे आणि दादाला उतारवयात माझ्याकडे न्यायचे आहे.''

मी वाचायचे सोंग करत अरुणाचे बोलणे ऐकत होतो. मी काहीही उत्तर देत नाही हे पाहून अरुणा म्हणाली, ''मनोहर, काय तरी बोल रे! मी तुला दिलेल्या त्रासाबद्दल माझा धिक्कार कर, पण काही तरी बोल. तुझ्या अबोल्याचा मला फारफार त्रास होतोय.''

''अरुणा, काय बोलू ? माझ्या आयुष्यातील सर्वात आदरणीय व्यक्ती म्हणजे वैद्य सर. पण त्यांनीच हाताला धरुन मला घराबाहेर काढला. एवढी मानहानी, एवढे दुःख कुणाच्या वाट्याला येऊ नये आणि तेही काहीही कारण नसताना. तू विनोदला वाचवायला गेलीस पण माझा बळी दिलास. गेली पंचवीस वर्षे ते दुःख काळजात घुसलयं त्याने माझं काळीज रक्तबंबाळ झालयं आणि जगातला कोणीही डॉक्टर किंवा कोणतेही औषध ते बरे करु शकणार नाही.

अरुणा अस का केलसं तू? माझेच नाव का घेतलेस ? मी खेड्यातला गरीब

मुलगा होतो म्हणून ? कि माझा तिरस्कार करत होतीस म्हणून ?''

''तस नाही रे मनोहर. पण त्या घाबरलेल्या अवस्थेत तुझ नाव आलं खरं.'' हे वाक्य संपायच्या आधीच नर्स आत आली. तिने मॉनिटर बघून पल्सरेट, ब्लडप्रेशर चेक केलं आणि पेशंटला विश्रांती हवी आहे, तुम्ही बाहेर बसा अशी खुण केली. मनोहर आणि अरुणा बाहेर आली. तर मनोहरचा चुलत भाऊ जगदिश आणि त्याची पत्नी सरांना भेटायला आली होती. मनोहर त्याला सरांच्या तब्बेतीबद्दल सांगत राहिला. अरुणाला खूप काही बोलायचं होतं पण ते अर्धवट राहिलं.

सरांच्या आजारपणाची बातमी त्यांच्या विद्यार्थ्यांत, सहकाऱ्यात पसरली तसे अनेकजण हॉस्पिटलमध्ये येत राहिले. सायंकाळपर्यंत सरांच्या तब्ब्येतीत सुधारणा दिसू लागली. सर डोळे उघडून पाहत होते. कोल्हापूरमधील काही मित्रमंडळी त्यांना भेटायला आले म्हणून मी त्यांना घेऊन सरांच्या बेडकडे आलो. सरांनी सर्वांच्या चेहऱ्याकडे पाहता पाहता माझ्या चेहऱ्याकडे पाहिले आणि क्षणात त्यांच्या चेहऱ्यावर ओळख दिसू लागली. मनोहर... असे ते पुटपुटले. मी त्यांच्या जवळ गेलो आणि त्यांचा थरथरता हात हातात घेतला. एवढी इतर मंडळी असताना सुध्दा सर माझ्याचकडे पाहत होते, काहीतरी बोलू इच्छित होते. पण व्यवस्थित शब्द बाहेर पडत नव्हते. मी आता सरांच्या शेजारी बसूनच होतो. अधून मधून अरुणा बेडजवळ येत होती, बाहेर जात होती.

रात्रौ डॉक्टर पुन्हा राऊंडला आले. सरांच्या तब्ब्येतीविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले. उद्यापासून दोन दिवस हॉस्पिटलमधील फिजिओ ट्रिटमेंट देईल त्यानंतर घरी गेल्यावर फिजिओला बोलावून ट्रिटमेंट घ्या. आता फारशी काळजी करण्याची गरज नाही असा सल्ला दिला. सर डॉक्टरांचे म्हणणे ऐकत होते. कदाचित सरांना वाटत असावे, दोन दिवसांनी हॉस्पिटलमधून डिस्चार्ज दिला तर मग जायचे कुठे ?

सर दुसऱ्या दिवशी सकाळी तरतरीत दिसत होते. मी त्यांना भेटायला गेल्यावर मला आपल्या शेजारी बसण्याची खुणा केली. मी त्यांच्या शेजारी बेडवर बसलो. अचानक सर हळू आवाजात बोलू लागले. मनोहर, मला क्षमा कर. मी फार मोठी चुक केली. माझ्या कानात सरांचे हे शब्द पडताच. मी सरांचे हात हातात घेतले. मी म्हणालो, ''सर बोलू नका, मला सर्व समजले. तुम्ही विश्रांती घ्या. व्हायचे ते झाले.''

''नाही रे मनोहर, मी तुझा अपराधी आहे. अरुणाच्या सांगण्यावरुन मी तुझे नाव घेतले. खरंतर शहानिशा करुन तुझ्यावर आरोप करायला हवे होते.''

''तुम्हाला विश्रांती हवी सर''

''मला बोलू दे मनोहर, तुझ्यासारखा आदर्श विद्यार्थी मला पुन्हा मिळाला नाही. पण

माझ्या नालायक बहीणीवर विश्वास ठेवून तुला दुखवल मी.''
‘‘झालं ते झालं. शेवटी तुम्हाला सत्य कळलं हे महत्त्वाचं. तुमच्या मनात माझ्याबद्दल काही राहता नये. कारण माझ्या आयुष्यात तुमचे माझ्यावरील उपकार कधीही न विसरण्यासारखे''
‘‘अरुणाने फसवलं रे मला, आपल्या याराचे नाव न घेता तुला पुढे केला आणि शेवटी याराबरोबर पळून गेली ती काल दिसली. एवढ्या दिवसात आपल्या दादाचं काय झालं ? याची साधी चौकशीपण केली नाही तिने.''
‘‘जाऊ दे सर, पण आता तुम्हाला आपल्याबरोबर नागपूरला नेणार आहे.''
सर चिडून म्हणाले – ‘‘ती भले नेईलही, पण तिच्याबरोबर कोण जाईल ? मनोहर, माझी बहीण माझ्या मनातून पार उतरली रे.''
‘‘पण सर, मग तुम्ही ..... ?''
‘‘मी तुझ्याबरोबर येणार मनोहर. तुझ्या एवढा मला जवळचा कोण आहे ?''
‘‘सर, खरंच तुम्ही माझ्याबरोबर येणार ? ''
‘‘तुला काही अडचण आहे का?''

‘‘नाही सर, काहीच नाही. खरंतर तुम्ही माझ्या मनातलं बोलत आहात. तुम्ही माझ्याबरोबर या सर. तुमचं पुढील आयुष्य किती आनंदात जाईल पहा. मी लग्न केलं नाही पण तुमच्या आशीर्वादाने भारत सरकारकडून मोठ्ठं घर, नोकरचाकर सर्व काही आहे आणि निवृत्तीनंतरही मोठ्या घराची व्यवस्था करुन ठेवली आहे. चांगली लायब्ररी आहे, म्युझिक रुम आहे, बाग आहे. पण घरात मोठं कोण नाही याची खंत आहे. सर, तुम्ही मला हवे आहात. माझ्या आईवडिलानंतर तुम्हीच माझे आईवडील व्हा, मार्गदर्शक व्हा.''
सरांनी माझ्या हातावर डोकं ठेकवलं.

चार दिवसांनी मी इंडिगो विमानात बसलो होतो. विमानात दिल्लीला जाण्यासाठी अनेक व्ही.आय.पी., बिझनेसमन, श्रीमंत माणसे बसली होती. पण मला वाटते आज या विमानात सर्वात श्रीमंत मीच आहे कारण माझ्या हातात सरांचा हात आहे. सर माझ्या समवेत दिल्लीला येत आहेत, कायमचे.

# बासरी

प्रदीप केळुसकर – मोबा. ९४२२३८१२९९/९३०७५२११५२

झपझप चालत बापट बाई सहावीच्या वर्गात आल्या. मुलांनी गुड मॉर्निंग मॅडम म्हणत बाईंचे स्वागत केले. बाईनी पण गुड मॉर्निंग म्हणत मुलांना बसायला सांगितले. बाईंनी डस्टर, खडू टेबलावर ठेवले आणि मुलांशी संवाद साधायला सुरुवात केली. हा वर्ग त्यांच्या विशेष आवडीचा. गेल्यावर्षी पण पाचवीत बापट बाईच या वर्गाच्या क्लास टीचर होत्या. तोच वर्ग पाचवी पास करत सहावीत आला. सर्व मुले त्यांच्या ओळखीची. फक्त एक सोडून....

बाईंच्या कपाळावर आठी आली. या मुलाचे काय करायचे ? यंदाच दुसऱ्या शाळेतून आलेला हा मुलगा इतर मुलांमध्ये मिसळत नव्हता. अभ्यास करत नव्हता. बोलत नव्हता. गप्प राहून फक्त बघत रहायचा. बापट बाईंना कळेना या मुलाला हसता खेळता कसे करावे ? आज बापट बाई डेस्कवरुन उतरुन खाली आल्या. त्या शेवटच्या बाकावर बसलेल्या मुलाला म्हणाल्या,

''अरे मुला, बोल काहीतरी, नाव काय तुझे ?''

''कृष्णा, कृष्णा सदाशिव शिंदे''

'' गेल्यावर्षी कुठल्या शाळेत होतास तू?''

''देवबाग हायस्कूल''

''मग यंदा मालवणला कसा काय आलास ?''

''वडिलांनी तिकडंच काम सोडलं, आत्ता इथ काम धरलयां''

''कुठ काम करतात तुझे वडील?''

''तेलींच्या गोडावूनमध्ये हमाल हाय.''

''बरं! तू आता पुढे बसशील का ?''

आणि कृष्णा पुढून दुसऱ्या बेंचवर बसू लागला. बाईंनी गणित शिकवायला सुरुवात केली. अधून मधुन त्यांचं कृष्णाकडे लक्ष जात होतं. कृष्णा स्थिर नजरेने पाहत होता. बाकीची मुलं वहीत लिहून घेत होती कृष्णाने वही उघडली नव्हती. मध्येच बाई थांबल्या. कृष्णाला म्हणाल्या –

''कृष्णा ! बोर्डवरचं लिहून घेत नाहीस?''

हू नाही की चू नाही. बाईंनी पुन्हा शिकवायला सुरुवात केली. कृष्णा तसाच बघत राहिला. बापट बाईंचा वर्ग संपला तसा कृष्णा पुन्हा शेवटच्या बाकावर बसायला गेला. मधल्या सुट्टीत बापट बाई मुख्याध्यापक सामंत सरांना भेटायला

गेल्या.

''सर, सहावीतील एका मुलाबद्दल बोलायचं होतं.''

''हा, कुठला मुलगा ?''

''कृष्णा शिंदे, देवबाग हायस्कूलला पाचवीत होता. यंदा सहावीत आपल्या शाळेत आला. तो काही वेगळाच आहे. निर्विकार डोळ्यांनी समोर पाहत असतो. वही उघडत नाही की पुस्तक उघडत नाही. बोर्डावरचे काही लिहून घेत नाही. इतर मुलांमध्ये मिसळत नाही. खेळायला जात नाही. काय करायचं या मुलाचं ?''

''देवबाग हायस्कूलमधून आलाय का? माझी वहिनी त्याच शाळेत नोकरी करते. एक दोन दिवसात मी वहिनीची भेट घेतो आणि कृष्णाची चौकशी करतो.''

बापट बाई गेल्या. शाळा संपवून घरी गेल्या. बाई आणि बाईंचा मुलगा अवीदोघेच मालवणात रहायचे. बाईंचे मिस्टर पुण्याला बँकेत होते. रोजसारखी बाईंची घरकामे सुरु झाली. त्यांनी देवाला निरंजन लावले. चौथीत असलेल्या अवीचा स्कॉलरशीपचा अभ्यास घेतला. बाई सर्वकाही करत होत्या पण डोळ्यासमोर होता शेवटच्या बाकावर बसलेला आणि निर्विकार डोळ्यांनी पाहणारा कृष्णा.

दोन दिवसानंतर बाई शाळेत पोहोचल्या. तेवढ्यात प्युनने सामंत सर बोलवल्याचा बाईंना निरोप दिला. बाईंनी आपली पर्स लॉकर्समध्ये ठेवली आणि त्या मुख्याध्यापकांच्या रुममध्ये गेल्या.

''या बापट बाई ! तुम्ही त्या कृष्णा शिंदेची चौकशी करायला सांगितलेली ना ? माझी वहिनी देवबाग हायस्कूलमध्ये शिकवते. तिच्याकडे चौकशी केली या कृष्णा बद्दल.''

''हो का ? मग ?''

''अहो, हा कृष्णा दोन वर्ष सतत पहिल्या नंबरावर होता. अत्यंत हुशार मुलगा पण...''

''पण काय ? ''

''फार वाईट वाटते सांगायला. हे शिंदे तिकडे सातारकडचे. मासे पकडायला समुद्रात बोटी जातात ना तशा बोटीवर शिंदे कामाला होता. या बोटीवरील खलाशांचे जेवण या शिंदेची बायको म्हणजे कृष्णाची आई करायची. जेव्हा बोट किनाऱ्यावर असेल तेव्हा खलाशी घरी जेवायला येत किंवा बोटीवर जाताना डबे घेऊन जात. त्यातील एका मलबारी खलाशाबरोबर कृष्णाची आई पळून गेली.''

''काय?'' बापट बाई किंचाळत बोलल्या.

''होय बाई आणि या कृष्णाला एक लहान बहिण आहे चार वर्षाची. तिला ती बरोबर घेऊन गेली. याचा बाप बिचारा रडला, भेकला पण यांना कुठे शोधणार तो? ती दोघ केरळच्या बाजूला गेल्याची बातमी होती. त्याने ७-८ दिवस वाट

पाहिली आणि बोटीवरची नोकरी सोडली आणि इथे मालवणात तेलींच्या गोडाऊनमध्ये नोकरी पकडली. या कृष्णाला घेऊन तो मालवणात आला आणि आपल्या शाळेत त्याचं नाव घातलं.''

''अरे बाप रे ! काय सोसतोय हा पोरगा.'' बाई कळवळून म्हणाल्या.

''होय बाई, कोवळ्या वयात मोठा आघात बसलाय या कृष्णावर म्हणून तो निश्चल झालाय. रोज डोळ्यासमोर असणारी आई आणि छोटी बहिण नाहीशी होणे हे किती भयानक आहे ? बाई आपण या मुलाला पुन्हा हसता खेळता करायला हवा आणि त्याकरिता तुम्हाला त्याच्या बाई नव्हे आई व्हायला लागेल.''

''हो सर, माझ्या लक्षात आलय ते, मी प्रयत्न करणारच. येते सर !''

बापट बाई स्टाफरुममध्ये आल्या आणि आपल्या खुर्चीत बसल्या. त्यांच्या डोळ्यासमोर कृष्णाचा चेहरा येत राहिला. काय निष्पाप पोर हे, या वयात काय काय सोसावं लागतयं या मुलाला. बाईंना आपला चौथीतला आपला मुलगा अवी आठवला. अवी पेक्षा हा फक्त दोन वर्षांनी मोठा. या मुलाला मायेची गरज आहे. आईची गरज आहे हे त्यांच्या लक्षात आलं. बाईंनी रुमालाने तोंड पुसले आणि बेल झाली तशा त्या सहावीच्या वर्गात गेल्या. नेहमीप्रमाणे गुड मॉर्निंग वगैरे झाल्यावर त्यांचे कृष्णाकडे लक्ष गेले. गेले दोन दिवस कृष्णा त्यांच्या तासाला दोन नंबरच्या बेंचवर बसत होता. बाई कृष्णा जवळ आल्या. त्यांनी त्याच्या पाठीवर हात ठेवला बाई म्हणाल्या –

''कृष्णा दाखव तुझं दप्तर, पुस्तक, वही वगैरे काही आणलेस का?''

कृष्णा खाली मान घालून गप्प बसून होता. बाईंनी त्याचे दप्तर पाहिले. दप्तरात पाचवीची एक वही होती आणि एक जुनं पेन होतं.

''अरे आता तू सहावीत आहेस बाळा !
सहावीची पुस्तकं–वह्या घेतली नाहीस का ? ''

''नाही.''

''ठीक आहे, तोपर्यंत या राहुलच्या पुस्तकात बघ, उद्या आपण वह्या पुस्तकांचा बंदोबस्त करुया.'' अस म्हणत बाई पटकन स्टाफरुममध्ये गेल्या आणि एक वही आणि एक पेन घेऊन आल्या.

''कृष्णा, ही वही घे आणि पेन. आता मी बोर्डवर लिहीते ते वहीमध्ये लिही मग मी तुझी वही तपासणार''असं म्हणत बाई गणित शिकवू लागल्या. त्यांच लक्ष होतं. कृष्णा बोर्डावरचे लिहून घेत होता. शिकवता शिकवता बाई डायसवरुन खाली आल्या आणि कृष्णाची वही पाहू लागल्या. कृष्णा वहीत लिहित होता. बाईंनी पाहिले कृष्णाचे अक्षर मोत्यासारखे होते. लिहिण्यात टापटीपी होती. भूमितीची पदे

व्यवस्थित एकाखाली एक लिहिली होती. बाईंनी कृष्णाची वही हातात घेतली आणि सर्व मुलांना कौतुकाने दाखवली.
''बघा मुलांनो, या कृष्णाची वही पहा. काय टापटीप आहे. अक्षर मोत्यासारखं आहे. बघा !''

मुलं पाहू लागली. एवढ्या दिवसात हा बावळट वाटणाऱ्या मुलाबद्दल त्यांनाही कौतुक वाटू लागलं. मुलांची कृष्णाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. कृष्णापण खुश झाला. या नवीन शाळेत त्याच्या कोणी ओळखीचे नव्हते. वर्ग संपला तशा बापट बाई वर्गाबाहेर गेल्या. पण नवीन तास घेणाऱ्या शिक्षकांना कृष्णाबद्दल सांगून त्याच्याकडे विशेष लक्ष देण्यास सांगत होत्या. अस करता करता सर्वच शिक्षकांमध्ये कृष्णाबद्दल चर्चा होत गेली आणि सर्वजण त्याच्याकडे विशेष लक्ष देऊ लागले.

मधल्या सुट्टीत वर्गातील सर्व मुले आपआपले डबे घेऊन बाहेर पडले. एकटा कृष्णा वर्गात बसून होता. एवढ्यात बापट बाई डबा आणि त्यांचा चौथीत शिकणारा मुलगा अवी याचा हात धरुन वर्गात आल्या आणि एकट्या बसलेल्या कृष्णाकडे पाहून म्हणाल्या –
''कृष्णा ! डब्यातून काही आणलसं का रे ?''
कृष्णाने मान हलवली. बापट बाईंनी पाहिले कृष्णाच्या डोळ्यात पाणी जमा झाले होते.
''हरकत नाही. हा बघ माझा मुलगा अवी. हा चौथीत आहे. चला आपण डबा खाऊ. कृष्णा या अवी सोबत बाहेर जा. हातपाय धुऊन या तोपर्यंत मी डबा उघडते. अवीने कृष्णाचा हात पकडला आणि ते दोघे बाथरुममध्ये गेले. तोपर्यंत बाईंनी आपला आणि अवीचा डबा उघडला आणि दोन डब्याचे तीन डबे केले. कृष्णाला जास्त जेवण ठेवलं. दोघेही येताच त्यांच्या हातात एक-एक डबा दिला आणि आपल्या हातात एक डबा घेतला. कृष्णा डब्यातले अन्न खायला संकोचू लागला तेव्हा बाई ओरडल्या.
''कृष्णा आता मी रागवेन. झटपट डबा संपवायचा. मला पुन्हा पुढल्या तासाला जायचयं.''
तसा कृष्णा डब्यातली चपाती भाजी खाऊ लागला. अवीला नेहमीची सवय होतीच. त्यामुळे त्याने झटपट डबा संपवला. बाईंनी कृष्णाला दाखवले –
''हे बघ, चपाती आणि भाजी एकत्र खाल्ली की मध्ये मध्ये लोणच्याची फोड तोंडात घालायची. लोणच्याने तोंडाला चव येते. तहान लागली की पाणी प्यायचं.'' बापट बाईंनी पाहिलं कृष्णाजवळ पाण्याची बाटली नव्हती. बाईंनी आपली बाटली कृष्णाला दिली.

''पी हे पाणी, भरपूर पाणी प्यायला हवं, आणि वर्गात नुसतं बसून रहायचं नाही. इतर मुलांबरोबर थोडं बाहेर जायचं, बाथरुमला जाऊन यायचं, कळलं का ?''

अस म्हणत बाईंनी डबा आवरला आणि त्या अवीच्या हाताला धरुन बाहेर गेल्या. कृष्णा विचार करु लागला.

''माय व्हती तवा डबा दित होती, आज खूप दिसानी चांगलं चुंगलं खायाला मिळालं, सांच्याला बाबा दमून येतो नी भाकरी बनवतो. भाजी हाटेलातून आणतो. कवातरी भात शिजवतो. मग भात आणि भाजी खायची. अस जेवण मला रोज रोज कुट मिळाया ? पोटात अन्न गेलं तर मी शिक्षण घेईन. अभ्यास करेन. पण मला मायची लय आठवण येते. किनीची पण आठवण येते. मग काय करायचं फक्त रडायचं. माय कुठं नाहीशी झाली, किनी नाहीशी झाली.'' कृष्णाला आईच्या आणि बहिणीच्या आठवणीने गदगदुन आलं.

पाच वाजता शाळा सुटली तसा कृष्णा वर्गाबाहेर पडला. गेटच्या बाहेर पडणार एवढ्यात बापट बाई अवीचा हात धरून जवळ आल्या.

''कृष्णा थांब, सोबत जाऊ. कुठं राहतोस तू?''

''रामेश्वराच्या देवळापाशी, तिथं एक चाळ हाय, तिथं ऱ्हाहतो आमी.''

''बरं बरं, आम्ही पण त्याच बाजूला रोज जातो. मी भरडावर राहते. तुला माझं घर दाखवते. शाळेत जाताना थोडा लवकर ये. मग आपण एकदमच शाळेत जाऊ.''

''व्हयं'' असं कृष्णा म्हणाला. वाटेतील एका बेकरीकडे थांबून बाईंनी दोन बिस्किट पुडे विकत घेतले. कृष्णाच्या हातात ते पुडे ठेवत म्हणाल्या, ''बाबा किती वाजता घरी येतात ?''

''लई रात झाल्यावर येतो.''

''मग तोपर्यंत काय करतोस?''

''काय न्हाई, बसून ऱ्हाहतो.''

''असं बसून राहू नये कृष्णा, या पुड्यातील बिस्किटे खा आणि तिथे मुलं खेळत असतील ना तेथे खेळायला जा. उद्या मी तुला सहावीची पुस्तके आणि वह्या घेऊन देणार. रोज शाळेत शिक्षकांनी सांगितलेला अभ्यास पुरा करायचा आणि मला दाखवायचा.''

भरडावर आल्यावर बाईंनी एका चपलाच्या दुकानाकडे थांबून त्यांनी कृष्णासाठी चप्पल घेतले. कृष्णा मनात म्हणाला – वर्गातल्या सर्वांच्या पायत चप्पल हाई पण माझ्या पायात काही नाही आता सहावीत गेल्यावर बाईंनी चप्पल घेतलं. आता शाळंत जाताना मजा येईल.''

भरडावर गेल्यावर बाईंनी आपले घर दाखवले. बाई म्हणाल्या –

''ही सरनाईकांची चाळ, पुढं त्यांच औषधं दुकान आहे. मागे आम्ही राहतो. उद्या लवकर आमच्या घरी यायचं मग आपण एकदम शाळेत जायचं, कळलं ?
''व्हयं'' म्हणत कृष्णा नवीन चप्पल घालून ऐटीत घरी गेला. घरी गेल्यावर कृष्णाने पिशवी खोलीत टाकली आणि बिस्किटाचा पुडा फोडला. बिस्किटे खात खात तो नारायणाच्या देवळाजवळ आला. तिथे एक झेंडा उभा करुन खाकी हाफ पॅन्ट घातलेली मुलं झेंड्याभोवती बसली होती. मोठा दादा त्यांना गोष्ट सांगत होता. गोष्ट संपल्यावर त्यांनी वंदे मातरम् राष्ट्रगीत म्हटलं. तो मोठा दादा कृष्णाकडे पाहत
म्हणाला –
''कुठ राहतोस रे तू ?''
''इथं देवळाच्या मागं''
''बरं, नाव काय तुझं ?''
''कृष्णा, कृष्णा शिंदे''
''हा. तर कृष्णा उद्या शाळा सुटली की इथं देवळापाशी ये. आमची इथे शाखा असते. ही मुले आम्ही सर्व इथं जमतो. रोज इथं यायचं.''
'हूं, येतो साहेब''
''साहेब नाही म्हणायचं, दादा म्हणायचं....''
''हा दादा उद्या येतो.''

कृष्णाला कोण आनंद झाला. आज दुपारी जेवण मिळालं, चप्पल मिळाली, बिस्किट पुडा मिळाला, आणि आता हे दादा आणि सवंगडी मिळाले. कृष्णाने घरी येऊन दिवा लागला. एकच बल्ब घरात होता. आईने पांडुरंगाचा फोटो आणला होता. आता आई गेली पण पांडुरंग आहे. कृष्णाने पांडुरंगाला नमस्कार केला आणि शाळेत सांगितलेला अभ्यास तो वहीत उतरवू लागला.

सकाळी लवकर उठून विहिरीवर दोरीने पाणी काढून कृष्णाने आंघोळ केली. कृष्णाच्या बाबाने काल येताना पाव आणला होता. चहात पाव बुडवून खाल्यावर बाबा कामावर गेला आणि कृष्णा नवीन चपला घालून भरडाच्या दिशेने चालू लागला. बापट बाईंच्या घरी तो बाहेर उभा राहिला. अवी बाहेरच बसला होता. अभ्यास करत होता. त्याने आईला आत जाऊन कृष्णा आल्याचे सांगितले. बापट बाई बाहेर आल्या. कृष्णाला हात धरुन आत घेतलं. पटकन आत जाऊन दोन थाळीत दोन दोन चपात्या आणि दुधाचे दोन कप बाहेर आणले आणि कृष्णासमोर चपाती दूध ठेवून खायला सुरुवात करा असं म्हणत आपली तयारी करायला आत गेल्या.

कृष्णा भिरभिरत्या नजरेने बाईंचे घर पाहत होता. बाईंचा आणि बाईंच्या

नवऱ्याचा एक फोटो दिसत होता. एक कपाट होतं. त्याच्यावर रेडिओ ठेवला होता. एक कॉट होती. त्यावर गादी गुंडाळलेली दिसत होती. दोन चटया गुंडाळलेल्या होत्या. कृष्णाने असं चटपटीत घर पाहिलं नव्हतं. कृष्णाने अवीकडे पाहत चपाती दुधात बुडवून खाल्ली. अवी प्रमाणेच अंगणात नळावर जाऊन ताटली कप धुतला आणि घरात नेऊन ठेवला.

तोपर्यंत बाईंची शाळेत जायची तयारी झाली होती. बाई, अवी आणि कृष्णा तिघेही शाळेत जायला निघाले. पुढे बाजारात आल्यावर बाई नेवाळकरांच्या दुकानात गेल्या. दुकानदारांना कृष्णाच्या साईजच्या दोन पॅन्टी, बनियन, दोन शर्टस् दाखवायला सांगितले. कृष्णा भिरभिरत्या नजरेने एवढं मोठं कपड्याचं दुकान पाहत होता. बाईंनी कृष्णाला कपडे घेतले आणि पुढे खंडाळेकरांच्या दुकानातून सहावीची पुस्तके एक डझन वह्या, दोन पेन, पेन्सिल, कंपासबॉक्स आणि हे सर्व ठेवण्यासाठी स्कूलबॅग विकत घेतली. कृष्णाला खूपच आनंद झाला. आपल्या बाबाला एवढी वह्या पुस्तकं घ्यायला कधीच जमली नसती याची त्याला कल्पना होती.

आता कृष्णा सर्व तासांना व्यवस्थित लक्ष देऊ लागला. सर्व तासांचे शिक्षक त्याच्यावर खूश होते. त्याचा अभ्यास चांगलाच होता. शाळा सुटली की तो बापट बाई आणि अवी बरोबर घरी जात होता. कृष्णाचा बाबा कृष्णाला म्हणाला –
''आरं नव चप्पल, पुस्तकं, कापडं देतं तरी कोण ?''
कृष्णाने शाळेत बापट बाई आहेत त्यांनीच हे सर्व दिलं असं सांगितलं.
तेव्हा कृष्णाचा बाप म्हणाला, – ''आरं ही बाई म्हणजे कोल्हापूरची महालक्ष्मी समज. ती सांगल तसं वागायचं, तिला कधी तरास द्यायचा न्हाई आणि अभ्यास करायचा.''

असचं एकदा शाळेतून येताना फोकांड्याच्या पिंपळाजवळ एक बासरीवाला काखेतील पिशवीत भरपूर बासऱ्या घेऊन विकायला आला होता. एक बासरी ओठांत ठेवून मधुर वाजवत होता. पिंपळावर बसलेली माणसं, जाणारी येणारी माणसं, शाळेत जाणारी येणारी मुलं त्या बासरीवाल्याकडे पाहत होती. त्याचे ते मधुर बासरी वादन ऐकत होते. कृष्णाचे आणि अवीचे लक्ष त्या बासरीवाल्याकडे गेलेच. बापट बाई बरोबर चालताना ते दोघं मान मागे मागे करत परत परत त्या बासरीवाल्याकडे पाहत होते. कृष्णाची पावलं रेंगाळत आहेत हे बापट बाईंच्या लक्षात आलं. बाईंच्या मनात आलं. पोराची आई असती तर त्याने हट्ट धरुन बासरी विकत घेतली असती. बाईंच्या काळजात कालवा कालव झाली. बाईंनी मागे येत त्या बासरीवाल्याला म्हटलं –
''कशी दिलीस रे बासरी ?''

तो बासरीवाला आपल्या पिशवीतील सर्व बासऱ्या दाखवू लागल्या. बाई कृष्णाला म्हणाल्या – ''कृष्णा तुला बघ कुठली आवडते यातली ?''
कृष्णा पिशवीतल्या सर्व बासऱ्या चाळू लागला. एक अत्यंत आकर्षक बासरी त्याने निवडली. तसा बासरीवाला म्हणाला – अरे वाजीव की, कृष्णाने तोंडात बासरी धरली आणि मघा बासरीवाला वाजवत होता तसा वाजवू लागला. बाईंनी बासरीवाल्याला किंमत विचारली आणि त्यांनी त्याचे पैसे दिले. अवी पण तशीच बासरी मागू लागला. बाईंनी त्या बासरीवाल्याला आणखी एक तशीच बासरी द्यायला सांगितली पण त्या बासरीवाल्याकडे त्या पध्दतीची एकच बासरी होती. बाईंनी वेगळ्या प्रकारची एक बासरी घेतली आणि अवीला दिली. त्याने अवी हिरमुसला झाला. तो एक सारखा कृष्णाच्या हातातल्या बासरीकडे पाहत होता. बाईंनी अवीला डोळे वटारले आणि त्याचा हात धरत, ओढत घराकडे निघाल्या. रडत रडत अवी आई बरोबर चालला होता. कृष्णा मजेत उड्या मारत चालला होता. घरी आल्यावर अवी आईशी वाद घालू लागला. तेव्हा बापट बाईंनी अविला समोर घेऊन सांगितलं – अरे तुझी आई तुझ्या समोर उभी आहे आणि त्या कृष्णाला आई नाही लक्षात घे. तेव्हा उगाच हट्ट करु नकोस. अविच्या रडण्याकडे दुर्लक्ष करुन बाई घरकामाला लागल्या.

कृष्णा घरी आला. शाळेची बॅग घरात टाकून नारायण मंदिराकडे आला. त्याठिकाणी दादाभोवती बरीच मुलं जमली होती. हात छातीजवळ घेऊन मुलं म्हणत होती. –

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम् ।
महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे

कृष्णा पण त्या मुलांसमवेत छातीजवळ हात घेऊन प्रार्थना म्हणू लागला. त्या मुलांसमवेत कृष्णा तल्लीन होऊन दादाचे म्हणणे ऐकत होता. काळोख पडू लागला तशी मुलं आपआपल्या सायकली घेऊन घरी निघाली. दादापण आपली सायकल घेऊन घरी जाण्याच्या तयारीत असताना कृष्णा पुढे झाला. त्याने दादाला आज बाईनी घेऊन दिलेली बासरी दाखवली.
''दादा, ही बघ माझ्या बापट बाईनी बासरी घेतली.''
''अरे व्वा कृष्णा ! छानच आहे.''
''पण दादा, मला बासरी वाजीवता येईना, तुला येत का ?''

''थोडी थोडी येते''
''मग मला शिकीव नां''

दादाने बासरी हातात घेतली आणि बासरीचे सहा होल दाखवले. वरच्या तीन होलावर डाव्या हाताची बोट धरुन प्रत्येक होलावरील एक एक बोट कमी करत – सा रे ग म कसे वाजवावे हे त्याने दाखवले. बासरी फुंकावी कशी हे पण दाखवले आणि रोज बाकीची मंडळी घरी गेली की बासरी शिकवायचे मान्य केले. कृष्णा घरी गेला आणि दादाने दाखविल्या प्रमाणे बासरीवर सारेगम वाजवू लागला. बऱ्याच वेळा सराव केल्यानंतर त्याला थोडा थोडा सारेगम वाजवायला येऊ लागला. दुसऱ्या दिवशी दादाने खालचे तीन होल हळू हळू उघडून सारेगम उलट कसं वाजवाचं हे शिकवलं आणि कृष्णाचा हा रोजचा कार्यक्रम झाला. शाखेत जायचं, शाखा संपली की दादाकडून बासरी शिकायची.

एका महिन्यात कृष्णाने बापट बाईंना बासरी वाजवून दाखवली तेव्हा त्यांना कमाल वाटली. अवीला काहीच वाजवता येत नव्हते. अवीने बासरी आणली ती कपाटावर ठेवली ती परत हातातपण घेतली नाही. सहामाही परीक्षेत कृष्णा वर्गात तिसरा आला. बाईंना आनंद झाला. पाच महिन्यापूर्वी वर्गात तोंड न उघडणारा कृष्णा आता वर्गात सर्वांत मिसळू लागला.

दिवाळीत अवीचे बाबा पुण्याहून आले तेव्हा त्यांनी अवीसाठी टीशर्ट, फुलपॅन्ट आणली तशीच कृष्णासाठी पण आणली. अर्थात बापट बाईंनी पत्राद्वारे आपल्या नवऱ्याला तसं कळवलं होत. बापट काकांनापण कृष्णा आवडला. त्याचा अभ्यास, त्याची बासरी याच्या ते प्रेमात पडले. शाळेच्या गॅदरींगमध्येपण कृष्णाने बासरी वाजवली. त्याची सर्वांनी प्रशंसा केली. वार्षिक परीक्षेत कृष्णा संपूर्ण वर्गात पहिला आला. रिझल्ट नंतर मुख्याध्यापक सामंत सरांनी बापट बाईंना बोलावून घेतले.

''बापट बाई, तुम्ही कमाल केलीत, सात–आठ महिन्यापूर्वी ज्या मुलाची तुम्ही काळजी करत होतात तो मुलगा वर्गात पहिला आला.''

''हो सर, मी खूप आनंदात आहे. तुम्ही म्हणाला होतात – त्याच्या बाई नव्हे आई व्हा, मी आई होण्याचा प्रयत्न केला.''

''हो बाई, तुम्ही यशस्वी झालात, मी पाहतोय रोज शाळेत येताना जाताना तो तुमच्या बरोबर असतो. माझ्या माहिती प्रमाणे मधला डबा सुध्दा तुम्हीच देता, हे पुण्य आहे बाई.''

थँक्यू सर म्हणत बापट बाई बाहेर पडल्या. आज सामंत सरांनी त्यांच कौतुक केलं याच त्यांना समाधान वाटलं. कृष्णा सातवीत गेला. अवी पाचवीत गेला.

कृष्णाचे रोज लवकर बापटांकडे येणे, न्याहारी, मग बाई आणि अवी समवेत शाळेत जाणे, दुपारी बापट बाईंच्या घरचा डबा, सायंकाळी परत घरी गेल्यावर शाखेत जाणे आणि मग बासरीची प्रॅक्टीस. सातवीतपण कृष्णा पहिला आला. शाळेचे रिझल्ट लागले आणि बापट बाई अवीसह पुण्याला गेल्या. पुण्यात अवीच्या बाबांनी लहानसा फ्लॅट घेतला होता. त्याची वास्तूपूजा आणि बाईंची तब्येत तपासणीपण करायची होती. बाई कृष्णाला म्हणत होत्या – तू पण चल आमच्या बरोबर. पण कृष्णा म्हणाला – ''बाबा येकटा आय इथं, मी इथं राहतो तुमी जावा''

बापट बाईंना हल्ली लवकर थकवा येत होता. पुण्यात केलेल्या तपासणीत मधुमेह निघाला. बाईंच्या माहेरी आईलापण मधुमेह होता. डॉक्टरांनी खाण्यावर बंधने आणली आणि औषधे लिहून दिली. दीड महिना पुण्यात राहून बापट बाई आणि अवी पुणे मालवण एसटीने मालवणात आले. जून महिन्याचा पहिला आठवडा होता. मालवणात थोडा थोडा पाऊस सुरु झाला होता. बापट बाई बसमधून उतरल्या, बाईंनी ब्रेड आणि दूध घेतले आणि दोघे भराडावर बिऱ्हाडी आले. दार उघडून आत आल्या आल्या बाई अवीला म्हणाल्या – अवी आंघोळ कर आणि सायकल घेऊन कृष्णाकडे जा. कृष्णाला घेऊन ये. तोपर्यंत मी आंघोळ करते आणि तुमच्यासाठी खाणे करते. बाईंनी नळावरुन पाणी भरले आणि गॅसवर पाणी गरम करुन अवीला दिले. अवीने आंघोळ केली आणि सायकल घेऊन कृष्णाच्या घरी निघाला. बाहेर पावसाची भूरभूर सुरु होती. तसाच भिजत अवी गेला आणि सात-आठ मिनिटात परत आला. बाईंचे आत-बाहेर सुरु होते. कधी एकदा कृष्णाला पाहते असे झाले होते त्याला. अवी सायकल लावून घरात आला तो सांगत – ''अगं आई त्या घरात दुसरेच कोणीतरी राहत आहेत. कृष्णा आणि त्याच्या बाबांनी हे घर सोडले आणि ते गावाला गेले.'' बाई आश्चर्यचकित झाल्या.

''काय ? पण कुठल्या गावाला ?''

''ते माहीत नाही, पण त्या घरात आता माने म्हणून रहायला आलेत, ते म्हणाले शिंदेनी ही जागा सोडली आणि मग आम्ही इथे रहायला आलो.''

बाईंना वाटले मालवणात दुसरीकडे रहायला गेले असतील किंवा आजूबाजूच्या गावात कुठेतरी गेले असतील. दोन वर्षापूर्वी देवबाग सोडून मालवणात कसे आले तसे. पण बाईंना चैन पडेना. थोडा पाऊस कमी झाला तसा त्या म्हणाल्या, ''अवी चल मी येते तुझ्याबरोबर आपण परत एकदा कृष्णाच्या घरी जाऊया.'' बाई आणि अवी छत्री घेऊन चालू लागले. नारायण मंदिराजवळ बाई आल्या. चाळीच्या खाली मालक भेटले. त्यांना विचारले – ''ओ शिंदे कुठे गेले माहिती आहे का ?'' मालक म्हणाले – ''शिंदे त्यांच्या गावाक गेले. शिंदे म्हणा होते तेंचा लगीन ठरला हा.

त्यांच्या गावच्या लोकांनी हेंचा दुसऱ्यांदा लगीन ठरवल्यानी म्हणून ते झिलाक घेवन गेले. आता ते थयसरच रवतले. झिलाक थयल्याच शाळेत घालतले असा म्हणा होते.''
''क्काय ?'' बापट बाई चित्कारल्या.
'' पण कुठल्या शाळेत ?''
''ता म्हायत नाय ओ, कराड सातारा भागात आसा खयचा तरी खेडेगांव, आता येवचे नाय
ते. हयला तेलयाकडचा कामपण सोडल्यानी तेनी''
''हो का, बरं बरं. पण तुम्हाला त्यांच्याबद्दल काही कळलं तर मला कळवा हां ! मी येथील हायस्कूलमध्ये शिक्षिका आहे – बापट. बरे येते मी.''

बापट बाई आणि अवी बाहेर पडले. तेवढ्यात जोराचा पाऊस सुरु झाला. बाई नारायण मंदिरात येऊन बसल्या. अवी एकसारखा कृष्णा केव्हा येईल गं म्हणून विचारत होता. त्याच्याकडे दुर्लक्ष करत बापटबाई पावसाकडे पाहत विचार करत होत्या.

कुठं असेल हा पोरगा ? कुठल्या शाळेत, कुठल्या गावात ? शिंदेंनी परत लग्न केलयं तर ह्याला धड जेवणतरी मिळत असेल काय? शाळा सुरु असेल ना याची ? एवढा हुशार मुलगा वाया जायचा. विचार करता करता बाईंच्या छातीत थोड थोड दुखू लागलं. त्यांनी अवीला एखादी रिक्षा मिळते का पहायला सांगितलं. रिक्षा मिळाली आणि बाई आणि अवी घरी आले. घरी आल्यावर सुध्दा बाईंना अस्वस्थ वाटायला लागले. त्या त्यांच्या घराजवळ असलेल्या झांटयेच्या दवाखान्याकडे गेल्या. डॉक्टरांनी त्यांना तपासलं.

''बाई ! ब्लडप्रेशर फार वाढलयं, बरं झाल तुम्ही लगेच आलात. आता मी इंजेक्शन देतो आणि एका महिन्याच्या गोळ्या देतो. रोज सकाळी एक गोळी घ्यायची. कसला विचार करताय का?''
''तसं नाही, आज सकाळीच प्रवास करुन आले ना !''
''ठीक आहे, काळजी घ्या. दगदग करु नका. आठ दिवसांनी पुन्हा दाखवायला या.''

बाई बाहेर पडल्या. त्यांना जेवण करण्याचा पण कंटाळा आला. त्यांनी अवीला महाजनांच्या खाणावळीत पिटाळलं आणि त्या कॉटवर झोपी गेल्या. सायंकाळी थोड बरं वाटल्यावर बाई अवीला सोबत घेऊन शाळेचा क्लार्क कांबळी यांच्या घरी गेल्या.

''कांबळी, सातवीत कृष्णा शिंदे नावाचा मुलगा होता त्याचा दाखला कोणी नेला

काय ?''
''हो बाई, कृष्णाचा बाबा आला होता स्वतः''
''कुठल्या शाळेत कृष्णाचे नाव घालणार, काही म्हणत होते ?''
''नाही, निश्चित सांगितले नाही. पण कराडच्या बाजूला त्यांच गाव आहे लहानस, तेथे तो शाळेत जाईल असं ते म्हणत होते.''
''हो का ? अहो मी नेमकी पुण्याला गेलेली दीड महिना पुण्यात होते. अवीचे बाबा तिकडे असतात ना, बर मग येते मग, त्याच्याबद्दल काही कळलं, पत्र वगैरे काही आलं तर कळवा मला.''
''हो बाई''

बाईंना कृष्णा नेमका कुठे गेला काही कळेना. त्यांनी नारायण मंदिराकडील शाखेच्या दादाकडे चौकशी केली. त्याला पण काहीच माहीत नव्हत. कृष्णा त्यालापण न सांगता गेला होता.

मालवणात जोरदार पाऊस सुरु झाला आणि शाळा सुरु झाल्या. बापटबाई अवीसमवेत शाळेत जाऊ लागल्या. रोज शाळा सुरु होण्यापूर्वी त्या अवीसाठी नाश्ता आणत तशा अजून एक कृष्णासाठीपण. मग त्यांच्या लक्षात यायचं कृष्णा नाही येणार आता. शाळेत जाताना त्यांना नेहमी डाव्या उजव्या बाजूकडे पाहत जायची सवय. उजव्या बाजूला अवी असायचा डाव्या बाजूला कृष्णा. पण आता डाव्या बाजूला कोणीच नसायचं. फोकांड्याच्या पिंपळाकडे त्यांच लक्ष जायचं. येथेच तो बासरीवाला बासऱ्या विकायला आलेला आणि कृष्णाची नजर बासरीवर पडलेली. त्या आठवीच्या वर्गात जायच्या तेव्हा पुढील दुसऱ्या बेंचवर त्यांच लक्ष जायचं. तिथे दुसराच मुलगा बसलेला असायचा.

कृष्णा एखादं पोस्टकार्ड पाठवेल म्हणून बाई वाट पाहत असायच्या. पण कृष्णाचं कार्ड, पाकिट काही आलचं नाही. बाईच्या तब्येतीच्या तक्रारी सुरु झाल्या. मधुमेह कमी अधिक होणे, ब्लडप्रेशर सतत वर, चिडचीड सुरु झाली. शेवटी अवीच्या बाबांनी त्यांना नोकरीचा राजीनामा द्यायला सांगितला आणि दिवाळीच्या सुमारास बापट बाईंनी नोकरीचा राजीनामा दिला आणि अवी आणि त्या पुण्याला आल्या. पुण्यात आल्यानंतर चांगल्या हॉस्पिटलमधून तपासणी करुन बाईंना थोड बरं वाटलं. आता बापटबाई सकाळची योगासनं, हास्यक्लब, चालणं, दुपारचा आराम, संध्याकाळी नाटक, सिनेमा, गाण्याचा कार्यक्रम, महिला मंडळ यात रमू लागल्या.

## वीस वर्षानंतर....

अवीचे बाबा बँकेतून निवृत्त झाले. अवीने अमेरिकेत एम.एस. केलं आणि आता तो तिकडेच नोकरी करतोय. अजून तो अविवाहीत आहे. वर्षातून एकदा तो भारतात येतो. बापट बाई त्याच्या लग्नासाठी मागे लागल्या पण तो हसण्यावरी नेतो. बापट बाईंची तब्येत मात्र फारशी चांगली नाही. तरुणपणी मधुमेह जडल्याने त्या एवढ्यात थकल्या. ब्लड प्रेशर सतत वर खाली होण, धाप लागणं, झोप न लागणं अशा सतत तक्रारी सुरु झाल्या. दिवसाला १५-१६ गोळ्या, श्वासासाठी इनहेलर सुरु होतं. त्यात त्यांना नैराश्याने पकडलं होतं. कशातही लक्ष लागत नव्हतं. अधून मधून त्यांना मालवण शाळेचे दिवस आठवत. आयुष्यात मनापासून रमले ते मालवणातच असे त्यांना वाटे. असच एका संध्याकाळी बापट आणि बापट बाई बागेत फेऱ्या मारत होते. फेऱ्या मारता मारता बापटबाई खाली बसल्या आणि धापा घालू लागल्या. बापट बाईंना उठताच येईना. बापटांनी तिथल्या माळ्याला बोलावून बाईंना रिक्षात घातले आणि हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. हॉस्पिटलमध्ये सर्व तपासण्या झाल्या. डॉक्टरांनी एन्जीओग्राफी करण्याचा निर्णय घेतला. एन्जीओग्राफी नंतर लक्षात आले ह्रदयात नव्वद टक्के ब्लॉकेजीस आहेत त्यामुळे ओपन हार्ट सर्जरी करावी लागेल.

बापट काळजीत पडले. मुलगा अमेरिकेत पण बापटांची बहीण पुण्यातच होती. भाचा भाची म्हणाले - मामा घाबरु नको. आम्ही येथेच आहोत, ऑपरेशन करुन घेऊया. हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी सर्व तयारी केली. ऑपरेशन करण्यासाठी बाहेरुन तज्ज्ञ डॉक्टरनी ऑपरेशन करण्याची तयारी दाखवली.

पंधरा ऑगस्ट हा ऑपरेशनचा दिवस ठरला. सकाळी सात वाजता ऑपरेशन सुरु होणार होते. आदल्या दिवशी पुन्हा एकदा बापट बाईंची सर्व तपासणी करुन रिपोर्ट ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरना पाठविले गेले. सकाळी सहा वाजता डॉक्टर आले. त्यांना या हॉस्पिटलमधील डॉ. जयश्री रानडे मदत करणार होत्या. डॉक्टर आल्या आल्या डॉ. रानडे यांच्या केबिनमध्ये गेले. आपल्या बॅगेमधून डॉक्टरनी एक लहानसा फोटो काढला आणि टेबलावर ठेवला. डॉ. रानडेंना माहीत होते की, हे डॉक्टर जेव्हा जेव्हा ऑपरेशन करायला येतात तेव्हा हा फोटो नेहमी काढून टेबलावर ठेवतात, त्याला नमस्कार करता आणि मगच ऑपरेशन सुरु करतात. सर्व तयारी झाल्यानंतर तज्ज्ञ डॉक्टर, डॉ. रानडे आणि नर्स स्टाफ ऑपरेशन थिएटरमध्ये आले. ऑपरेशन सुरु करण्याआधी डॉक्टरनी सहज बेशुध्द पेशन्टच्या चेहऱ्याकडे पाहिले आणि ते दचकले. त्यांनी पेशंटच्या रिपोर्टवरचे नाव पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव भराभर बदलत गेले. डॉक्टरनी एक मिनिट डोळे मिटले. कसलेचे ध्यान केले आणि ऑपरेशन करायला सुरुवात केली. डॉ. रानडे सोबत

होत्याच. त्यांनी पाहिले आज या डॉक्टरांचे हात थरथरत आहेत. डॉ. रानडेंनी या डॉक्टरांच्या हाताला हळूच टोचले. सावध केले. डॉ. रानडे विचार करायला लागल्या नेहमी सफाईने ऑपरेशनची सुरुवात करणारे हे डॉक्टर आज असे नर्व्हस का झाले ? पण लगेचच डॉक्टर सावरले आणि त्यांनी नेहमीप्रमाणे सफाईदार ऑपरेशन केले.

सुमारे पाच तासानंतर सर्व ऑपरेशन मनासारखे झाले आणि अत्यंत समाधानाने सर्व डॉक्टर्स बाहेर आले. डॉ. रानडेंच्या केबिनमध्ये आल्यावर ऑपरेशन केलेल्या डॉक्टरनी छोटा फोटो बॅगेत ठेवला आणि ते पेशंटच्या नातेवाईकांना भेटायला गेले. डॉ. रानडे पाहत होत्या. हे डॉक्टर स्वतः पेशन्टच्या नातेवाईकांना कधी भेटत नाहीत पण आज कसे काय? याचे आश्चर्य वाटत असताना डॉक्टर बापट काकांकडे गेले आणि त्यांच्या हातावर थोपटत थोपटत ऑपरेशन छान झाले कसलीच काळजी करु नका, पंधरा दिवस त्या फक्त हॉस्पिटलमध्ये राहतील असे सांगून त्यांची काळजी कमी केली.

आय.सी.यु.मधील उत्तम उपचार, फिजीओ उपचार, औषधे यांनी बापट बाईंना बरं वाटायला लागलं. आठ दिवसांनी आय.सी.यु. मधून बाहेर काढून त्यांना स्पेशल रुममध्ये घेतले. आता स्वतः बापट किंवा बापटांची बहीण, भाचरे सर्वजण बाईंना भेटू लागले. अमेरिकेहून अवीचा रोज व्हिडीओ कॉल येत होता. ऑपरेशनला जवळ जवळ पंधरा दिवस झाले आणि बापट बाईंची तब्येत व्यवस्थित दिसू लागली. त्यांच्या छातीतील दुखणे कमी झाले. श्वासोश्वास व्यवस्थित चालू झाला. शुगर कंट्रोलमध्ये आली. ब्लडप्रेशर नॉर्मल झाले. बापट बाईंनी थोडा थोडा चालण्याचा व्यायाम सुरु केला आणि शेवटी बापट बाईंच्या डिस्चार्जचा दिवस उजाडला. सोमवार ८ सप्टेंबर रोजी बापट बाईंना डिस्चार्ज मिळणार होता. ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरांचे रोज हॉस्पिटलमध्ये फोन येत होते. बापट बाईंची विचारपूस करत असताना त्यांना सोमवारी डिस्चार्ज मिळणार हे कळताच, मी सोमवारी संध्याकाळी पाच वाजता येतो आहे, मी पेशंटला तपासतो आणि मगच डिस्चार्ज द्या असा डॉक्टरांचा निरोप आला.

### सोमवार, ८ सप्टेंबर -

आज बापट बाईंना डिस्चार्ज मिळणार म्हणून हॉस्पिटलमध्ये पुन्हा सर्व तपासण्या झाल्या, सर्व रिपोर्ट नॉर्मल आले. औषधे, घ्यायची काळजी, आहार याबद्दल सर्व माहिती दिली गेली. सकाळ पासून बापटांचे नातेवाईक भेटून जात होते. शुभेच्छा देत होते. बाई पुन्हा पुन्हा या हॉस्पिटलमधील सर्व डॉक्टर्सना, नर्सेसना, वॉर्डबॉयना धन्यवाद देत होत्या. त्या सर्वांनी बाईंची खूपच काळजी घेतली होती. ऑपरेशन करणारे डॉक्टर पाच वाजता यायचे होते तेव्हा त्या त्यांचे आभार मानणार

होत्या.

संध्याकाळचे पाच वाजले आणि हॉस्पिटलसमोर डॉक्टरांची गाडी उभी राहीली. डॉक्टरांची पत्नीपण समवेत होती. दोघ दुसऱ्या मजल्यावरील हार्ट डिपार्टमेंटमध्ये आली. डॉ. रानडे यांनी त्यांचे स्वागत केले. त्यांच्याशी दोन मिनिटे बोलून डॉक्टर आणि त्यांची पत्नी डॉ. रानडेंसह बापट बाईंच्या रुममध्ये आली. रुममध्ये बापट साहेब, त्यांची बहीण, भाचा-भाची सर्वजण होते. डॉक्टर आत आले आणि त्यांनी हळूच खिशातून काहीतरी बाहेर काढले. सर्वजण डॉक्टरांकडे पाहत होते. एवढ्यात डॉक्टरांनी बासरी आडवी करत ओठाकडे नेली आणि बासरीतून मधुर सुर बाहेर पडू लागले. रुममधील सर्व मंडळी डॉ. रानडे, नर्स, वॉर्डबॉय सर्वजण हे काय नवीन डॉक्टरांचं बासरी वादन असं म्हणत असताना, बापटबाई डॉक्टरांचे आभार मानण्यासाठी हात अर्धवट वर घेत असताना बासरी तोंडात घेतलेले डॉक्टर त्यांच्या समोर आले. बाईंच्या डोळ्यासमोर अचानक मालवण, फोकांड्याचा पिंपळ, बासरीसाठी हट्ट धरणारा कृष्णा आठवला आणि तीच बासरी, बासरी तोंडात धरण्याची तीच पध्दत, तसेच वाजवलेले ते सुर कानात पडताच बापटबाई ओरडल्या - कृष्णा ! कृष्णा !!

रडत रडत डॉक्टर त्यांच्या पायावर कोसळत म्हणाले - होय बाई, मीच तुमचा कृष्णा.

गंगा-जमुना डोळ्यातून वाहणाऱ्या बापट बाई त्यांचे तोंड हातात धरत म्हणाल्या, ''कुठे होतास रे बाळा ? वेड्यासारखी आयुष्यभर शोधत राहिले रे कृष्णा ! काही न सांगता गेलास रे बाळा''

गदगदलेल्या स्वरात डॉक्टर बोलू लागले - ''होय बाई, तुमच्या कृष्णाला क्षमा करा किंवा तुम्ही क्षमा करावी म्हणूनच एवढ्या वर्षांनी तुम्ही याच हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आलात. बाई सिनेमात असे योगायोग असतात, भाऊ-भाऊ अनेक वर्षांनी भेटतात, आई मुलाची ताटातुट होते, पुन्हा भेटतात आपण अशा सिनेमांची चेष्टा करतो पण खरोखरच असा योगायोग माझ्या आयुष्यात येईल असे स्वप्नातही वाटले नव्हते, किती छान योगायोग हा !'' डॉक्टर रडत रडत पुढे म्हणाले - डॉ. रानडे त्या दिवशी ऑपरेशन करताना पेशंटच्या चेहऱ्याकडे लक्ष गेले आणि मी दचकलोच माझी आईच ऑपरेशन टेबलावर होती. ज्या हृदयात माझ्या बद्दल प्रेम, वात्सल्य काठोकाठ भरलेलं आहे तेच हृदय मला फाडायचं होतं. सुरुवातीला माझे हात थरथरु लागले. मी इमोशनल होत गेलो पण डॉक्टर रानडे तुम्ही मला टोचलत आणि माझ्या लक्षात आलं समोर ऑपरेशन करायचं आहे ते माझ्या आईचं नव्हे पेशंटचं. पेशंट आपलं शरीर आम्हा डॉक्टरावर विसंबून स्वाधीन करतो, त्या पेशंटला मला बरं

करायचयं, आणि मग मी सफाईने ऑपरेशन केलं.''

बापट बाई आणि त्यांच्या पायाकडे बसलेले शिंदे पाहून इतरांच्या काही लक्षात येत नव्हते. कोण आई ! कोण बाई ? एवढ्यात तिथे बसलेले बापट साहेब पुढे झाले. त्यांनी कृष्णाला ओळखले. ''कृष्णा ! आम्ही किती शोधलं तुला. या तुझ्या बाईंना वेड लागायचं बाकी होतं, तु निदान एखादं कार्ड तरी पाठवायचं, कुठं होतास तू?''

''मी एक कार्ड पाठवलं होत काका, पण ते कार्ड पत्ता चुकीचा म्हणून परत आलं, मग मी बारावी पास होऊन मेडिकलला ॲडमिशन मिळाली हे सांगायला मालवणला गेलो होतो तेव्हा तुम्ही मालवण सोडलं होत.''

बापट काकांनी बापट बाईंच्या पायाकडे बसलेल्या डॉ. शिंदेना वर उचलल आणि बाईंच्याच बाजूला बसवलं.

''खूप आनंद झाला रे कृष्णा, अवी अमेरिकेला असतो. या पुण्यात हे आणि मी. गेली काही वर्षे मधुमेह आणि प्रेशरने मला त्रस्त केलं. मला कंटाळा येतो रे कृष्णा, एक सारखी मालवणची आठवण येते. आपली शाळा, ते मुख्याध्यापक सामंत, तो सहावीचा वर्ग आणि शेवटच्या बाकावर निश्चल डोळ्यांनी समोर पाहणारा कृष्णा.''

डॉ. शिंदे बोलू लागले – ''डॉ. रानडे, आज तुम्हाला हा प्रसिध्द हार्टसर्जन डॉ. शिंदे दिसतो तो या माऊलीमुळे. माझी आई मला लहानपणीच सोडून गेली तेव्हा मी सैरभैर झालो होतो. तेव्हा या माऊलीने आपल्या तोंडातला घास मला भरवला. आपल्या मुलासारखंच मला वाढवलं. पण मी एवढा कृतघ्न की यांना न सांगता बाबाबरोबर गावी गेलो. पण बाई, काका माझा नाईलाज झाला हो, मी होतो केवढा जेमतेम अकरा वर्षाचा आमच्या गाववाल्यांनी माझ्या बापाच लग्न ठरवलं आणि माझा बाप हुळहुळला. काही विचार न करता मालवण सोडूया म्हणाला, मी नाही म्हटलं तेव्हा मला बेदम मारलं आणि चार पाच भांडी गोणत्यात घालून एसटी पकडली. या परिस्थितीत मी पोटाजवळ दडवून ठेवली ती ही बासरी. फोकांड्याच्या पिंपळाकडे आलेल्या एका बासरी विक्र्याकडून माझ्या मनात भरलेली ही बासरी या मातेने मला घेऊन दिली. तशीच बासरी यांच्या मुलाला अवीला पण हवी होती. पण त्या बासरी विक्र्याकडे अशी एकच बासरी होती, अवी हट्ट करु लागला तेव्हा स्वतःच्या मुलाला अवीला दोन चापट्या देऊन ही बासरी मला देणारी ही माझी माता. मालवण सोडताना ती बासरी तेवढी मी बरोबर घेतली.

आमच्या गावाकडे आल्यानंतर बाबाचे लग्न झाले आणि तो चेकाळलाच. माझ्या नवीन आईला मी नकोच होतो. पुन्हा एकदा दोन वेळच्या खाण्याची पंचाईत.

पण बाबाने एक मोठी गोष्ट केली माझ्यासाठी सातान्यात रयत शिक्षण संस्थेत नेऊन माझा दाखला दिला आणि आयुष्यात दुसऱ्यांदा मला आधार मिळाला. रयत संस्थेत वसतीगृहात राहणे आणि शाळेत शिकणे या संस्थेने मला घडवले. इथेही चांगला अभ्यास केला. शाळेत सतत पहिला येत राहिलो. या सातारा शाळेचे मुख्याध्यापक कदम साहेब यांनी प्रोत्साहन दिले. दहावी, बारावीत बोर्डात आले आणि या कदम साहेबांमुळे मेडिकलला गेलो. या कदम साहेबांनी आपली मुलगी मला दिली आणि तीच माझी पत्नी डॉ. जयश्री. बाई तुमची सून.

जयश्री येऊन बाईंच्या बाजूला बसली. बापट बाईंनी जयश्रीला जवळ घेतले. किती गोड सून माझी! मी अवीच्या मागे लागले आहे, लग्न कर लग्न कर पण अजून तो मनावर घेत नाही पण कृष्णा तू मला पहिली सून दिलीस.

बाई किती वर्षांनी तुम्ही दिसलात. आज खरं तर हवी तशी चांगली बासरी मी विकत घेऊ शकतो पण आजही रोज नियमितपणे हीच बासरी वाजवतो तुम्ही घेऊन दिलेली. ही बासरी माझ्यासाठी अमूल्य आहे आणि माझ्या आईने ती मला घेऊन दिली आहे.

डॉ. रानडे आणि हा हॉस्पिटल स्टाफ, तुम्हाला कदाचित हा फॅमिला ड्रामा वाटत असेल तर तसे नाही. माझ्या डोळ्यात आलेले हे अश्रू अस्सल आहेत मोत्यासारखे.

'' होय रे कृष्णा, यात खोटेपणा कसा असेल आणि कृष्णा मी तुझ्यासाठी फार केल असं समजू नकोस, मुख्याध्यापक सामंत म्हणाले होते, ''बाई या पोरक्या पोराची आई होण्याचा प्रयत्न करा, तसा मी प्रयत्न केला.''

''प्रयत्न केला नाही, आईच झालात तुम्ही बाई.''

''होय रे कृष्णा, मी आईच तुझी.''

'' तर मग बापट काका, आई तुम्ही आता माझ्या म्हणजे आपल्या घरी यायचं, तसं तुम्हाला या ऑपरेशनंतर डॉक्टरची गरज आहेच. आम्ही दोघंही तुमची काळजी घेऊ आणि आपल्या घरात मला आईबाबा हवेत. जयश्रीला पण सासूसासरे हवेत. तेव्हा नाही म्हणू नका. आईबाबा आपल्या घरी चला.

'' कृष्णा आम्ही येतो तुझ्या बरोबर नाहीतरी आम्ही पुण्यात दोघंच राहून कंटाळलोय आम्ही पण कृष्णा, जयश्री माझी एक इच्छा आहे. आपण लवकरच मालवणला जाऊया. मला ती शाळा, तो मालवणचा समुद्र , तो फोकांड्याचा पिंपळ, ते भरड आणि तू शाखेत जायचास ते नारायण मंदिर सर्व डोळे भरुन पहायचं आहे.''

'' होय आई, मला पण मालवणला जायची केवढीतरी घाई झाली आहे आणि आईबाबा नुसतं मालवणात जायचं नाही, मालवणात आपलं घर बांधायचं.''

‘‘ होय कृष्णा माझीपण इच्छा आहे, आयुष्याची अखेर त्या मालवणात व्हावी. त्या मालवणच्या मातीत माझ्या अस्थी विरघळाव्या.’’

‘‘ होय आई, चला आपल्या घरी.’’

डॉ. शिंदेनी खूणा करताच बापट बाईंच्या बॅगा, औषधे वॉर्डबॉयने गाडीत नेऊन ठेवले आणि डॉ.शिंदे आणि जयश्री शिंदे आईबाबांना सांभाळत गाडीकडे घेऊन गेले. गाडी सुरु झाली आणि ड्रायव्हरने टेप चालू केली. बाबुजी सुधीर मोघेंच गाण आळवत होते.

**फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश...**
**दरी खोऱ्यातून वाहे, एक प्रकाश प्रकाश...**
**एक प्रकाश प्रकाश...**

# लंच टाईम

प्रदीप केळुसकर – मोबा. ९४२२३८१२९९

विश्वास जाधव बिल्डिंगच्या लिफ्टमधून बाहेर पडला आणि शिळ वाजवत पार्किंगमधील गाडीच्या दिशेने गेला. पार्किंग लॉटमधून त्याने शिताफीने गाडी बाहेर काढली आणि गल्लीतून बाहेर पडून गाडी मुख्य रस्त्यावर आणली. आता अंधेरीचा स्टुडिओ त्याच्या डोळ्यासमोर येऊ लागला. आत स्पर्धेचा शेवटचा दिवस म्हणजेच ग्रँड फिनाले. आज फारसे टेंशन नाही कारण स्पर्धेचा निकाल जवळपास तयार होता.

गेले आठ आठवडे स्पर्धा सुरु होती. एकंदर वीस हजार गायकांमधून वीसजण निवडले गेले आणि या वीसजणांना आपल्या तिघांच्या हातात सोपवले गेले. माधुरी ही हिंदीतील गायिका या चॅनेलच्या प्रत्येक स्पर्धेला असे. ह्या चॅनेलची स्पर्धा आणि माधुरी हे ठरलेलेच होते. तिला फॅन्स पण फार होते. गेले पाच सिझन तिने गाजवले होते. विश्वासला पण तिच्या गाण्याबद्दल आदर होता. पण परीक्षक म्हणून सोबत बसल्यावर त्याच्या लक्षात आले की ती फार गर्विष्ठ आहे आणि या चॅनेलची लाडकी असल्याने जवळ जवळ हुकूमशहा आहे. दुसरा परीक्षक मंगेश हा पॉप म्युझिक मधील लोकप्रिय कलाकार. तो स्वभावाने बरा होता. पण उडत्या चालीची गाणी आणि पाश्चात्य गाणी त्याला जास्त आवडत. त्यामुळे शास्त्रीय संगीतावर आधारित गाणी त्याला आवडत नसत. त्यामुळे अशा गाण्यावर तो टिका करायचा हे विश्वासला आवडत नव्हते.

तिसरा विश्वास. हा उदयोन्मुख संगीतकार. त्याचा पाया शास्त्रीय संगीताचा होता आणि गुरु चरणदास यांचेकडे तो शास्त्रीय गाणे शिकला होता आणि त्यांच्या गुरुकूलमध्ये अजूनही शिकत होता. विश्वासचे दोन मराठी आणि दोन हिंदी सिनेमे गाजले होते. आणि हिंदी अल्बम्सनी लोकप्रियता मिळविली होती.

खरं म्हणजे हिंदीतील या प्रसिध्द चॅनेलने विश्वासला परीक्षक म्हणून निवडले तो प्रसंग विश्वासच्या डोळ्यासमोर आला. एका मराठी चॅनेलच्या वार्षिक कार्यक्रमाच्यावेळी विश्वास आमंत्रितांच्या खुर्चीत बसला होता. एवढ्यात एक पंचवीस वर्षाची मुलगी त्याच्या जवळ आली –

''आप विश्वासजी है ना ?''

''हा, आप कौन ?''

''मै, रचना एन चॅनल की तरफसे –''

''क्या है ?''

‘‘मेरे सुपिरीयर आपसे बात करना चाहते है, जरा बाहर आओगे ?’’
विश्वास बाहेर गेला. ती त्याला पार्किंग लॉटकडे घेऊन गेली. तिथे एका कारमध्ये तिचा सुपिरीयर बसला होता.
‘‘हाय, हाय मिस्टर विश्वास, मै शशांक फ्रॉम चॅनेल एन, हमारे चॅनेल का पाँचवा सुरसंगम एक महिनेके बाद शुरू होगा हम चाहते है की, आप सुरसंगम प्रोग्रॅमके परीक्षकके रुप में काम करें’’
‘‘लेकिन मेरी कमिटमेंट.....’’
‘‘कोई बात नहीं, ये प्रोग्रॅमकी शुटिंग सप्ताहमें एक दिन होगी, सुबह १० से रात १० तक, बाकी के दिन आप फ्री है,’’
‘‘मुझे सोचना पडेगा’’
‘‘कोई बात नही, हम फिर कल फोन करेंगे’’

रात्रौ विश्वास पत्नी अनिता बरोबर बोलला. तिलापण एवढ्या मोठ्या चॅनेलने स्वतःहून संपर्क ठेवल्याबद्दल आश्चर्य वाटले. पण चांगले पैसे मिळत असतील तर ऑफर स्वीकारायला हरकत नाही असे तिने मत व्यक्त केले. दुसऱ्या दिवशी एन चॅनेलवरुन पुन्हा रचनाचा फोन आला. चॅनेलने आठवड्याला दिड लाख रुपये पेमेंट देण्याचा शब्द दिला. एक दिवस शुटिंग, प्रत्येक एपिसोडचे कपडे वगैरे सर्व चॅनेल्सचे. विश्वासने विचार केला. प्रत्येक महिन्यात सहा लाख मिळत असतील आणि दोन महिने स्पर्धा चालली तर बारा लाख मिळतील. शिवाय या हिंदी चॅनेलमुळे भारतभर प्रसिध्दी. त्यामुळे हिंदी आणि प्रादेशिक सिनेमा मिळण्याची शक्यता मोठी. कार्यक्रमामुळे घराघरात आपण ओळखलो जातो हा मोठा फायदा. विश्वासला वाटले, राजापूर तालुक्यातील आपल्या गावातसुध्दा प्रत्येक घरी आपण दिसू. त्यामुळे आपले आईवडील, नातेवाईक, गाववाले किती खुश होतील हे त्याच्या डोळ्यासमोर आले आणि त्याने ही ऑफर स्वीकारली.

विचार करता करता त्याची गाडी स्टुडिओपाशी आली. त्याची गाडी पाहताच रखवालदार मनोहर धावला. त्याने फाटक उघडून त्याची गाडी आत घेतली. विश्वासने गाडी पार्किंग लॉटमध्ये लावताच मनोहरने गाडीचा मागचा दरवाजा उघडला. त्याची बॅग बाहेर काढून तो विश्वास बरोबर सेटच्या दिशेने चालू लागला.
‘‘मग विश्वासराव, फायनल किरण मारणार का ?’’
‘‘बघू, अजून दोन परीक्षक आहेत ना ?’’
रखवालदार मनोहर हळू आवाजात म्हणाला –
‘‘तसं नव्हं, या आधी प्रत्येकवेळी धक्काच बसलाय, आम्ही अंदाज बांधतो एक आणि जिंकतो दुसराच काही करा विश्वासराव त्या किरणलाच नंबर द्या, केवढा लांबून

आलाय ओ, उत्तराखंडवरुन आणि गातो काय एक नंबर. या मुंबईत त्याची लोक फॅन झालीत. गरीब आहे पोरगा. पहिल्यांदा आला तवा त्याच्या अंगावरची कापडं बघवत नव्हती. मी त्याला माझ्या पोराची कापडं आणून दिली. मग चॅनेलची कापडं आली सोडा.

''बरं, बघू.'' अस म्हणून विश्वास सेटवरील आपल्या केबिनकडे गेला. त्याने पाहिले माधुरीच्या केबिनमधून मोठमोठ्याने हसण्याचा आवाज येत होता. म्हणजे माधुरी लवकरच सेटवर पोहोचली होती. मंगेशची केबिन बंद होती. म्हणजे तो अजून पोहोचला नव्हता. विश्वासने आपली केबिन उघडली आणि एसी चालू केला. टेबलावरील ग्लासातून पाणी प्याला आणि लॉकर उघडून गेल्या दोन महिन्यातील मार्कलिस्टवर त्याने नजर टाकली. मघाशी रखवालदार मनोहर बोलला ते त्याला पुन्हा आठवले. ''या आधी प्रत्येक स्पर्धेत धक्काच बसला''

धक्का का बसला ? विश्वासच्या मनात आलं, धक्का बसू शकतो, कारण सर्वसामान्य लोकांचे मत आणि परीक्षकांचे मत एक होणे कठीण असते. प्रेक्षक मुळ गायकाचा आवाज हुबेहूब काढला की खुश होतात पण परीक्षकाला सुर, ताल, राग, आलापी सर्वच पहावे लागते. तो विषय झटकून विश्वासने आठ आठवड्यातील मार्कलिस्ट समोर आणली. पहिल्या चार आठवड्यात पंधराजण कट झाले आणि शेवटच्या महिन्यात राहिले पाचजण. जयंती, अरुण, केदार, तन्मय, निकिता. दोन मुलगे तीन मुली.

त्याने स्वतः दिलेल्या मार्क्सचा अंदाज घेतला. केदार निःसंशय पहिला होता. त्याने पाहिले केदार ९० टक्केच्यावर होता. त्यानंतर जयंती, तन्मय, अरुण ही मंडळी पंच्याऐंशीच्या आसपास आणि निकिता ऐंशीच्या खाली. त्याच्या डोळ्यासमोर केदार आला. केदार पासवान. १४-१५ वर्षाचा, उत्तराखंडमधून आलेला. चेहऱ्यावरुन कळतं होतं तेथल्या आदिवासी भागातून आला असणार. मोडकी तोडकी हिंदी बोलत होता. कदाचित त्याची मातृभाषा वेगळी असेल. पहिल्या वीसात आला तेव्हा खूप घाबरलेला होता आणि सिनिअर परीक्षक माधुरी हिंदी आणि इंग्लिश मधून बोलून त्याला नर्व्हस करत होती. पण आपल्याला केदार आवडायचा कारण तो मदन मोहन, अनिल विश्वास, खैय्याम अशा संगीतकारांची गाणी म्हणायचा. त्याच्या गावामध्ये त्याचे गुरु राहुल देव बर्मन यांच्याकडे वादक होते. आता ते मुंबई सोडून त्याच्या गावी स्थायिक झाले होते. स्वर, ताल, आलापी सर्व काही व्यवस्थित समजवत होते. त्यानी सर्व ज्ञान केदारला दिले होते. विश्वास मनात म्हणायचा, मी जशी राजापूरच्या खेड्यातून इतपर्यंत मजल मारली तसाच केदार. शहरातील मुलं खूप नशिबवान. त्यांना हवी ती वाद्ये सहज उपलब्ध होतात.

नाहीतर पालक वाद्य विकत घेऊन देतात किंवा आजूबाजूला हवे तेवढे क्लासेस आहेतच. शहरातील मुलांना इच्छा असेल तर मार्ग सहज मिळतो. आपल्याला हार्मोनियमवर बोटे फिरवायला वयाची बारा वर्षे लागली. त्यानंतर विविध राग. आणि तबला पेटी सोडून इतर वाद्ये फक्त लांबून बघायची. मुंबईत येऊन गुरु चरणदास यांच्या गुरुकूलमध्ये मात्र सगळी वाद्य सतार, संतुर, व्हायोलीन, बासरी, इलेक्ट्रिक गिटार, सिंथेसायझर हवी ती वाद्ये हात जोडून उभी होती. विश्वासला आपले रत्नागिरीतील गुरु ताम्हणकर बुवा आठवले. एकदा राजापूरात कीर्तन करायला आलेले. पेटीच्या साथीला कोणी नाही म्हणून आपण साथीला बसलो. लहान वयातील आपली बोटे स्वर बरोबर काढतात हे पाहून त्यांना आनंद वाटला. आपल्या वडिलांशी बोलून ते शनिवार रविवार रत्नागिरीत शिकवू लागले. वडिलांना एस.टी.चे भाडे देणे कठीण म्हणून आपण एस.टी.चे भाडे देऊ लागले. विश्वासच्या डोळ्यासमोर ताम्हणकर बुवा आले. असे गुरु अजून जगात आहेत म्हणून विद्यादान गरीबांना मिळते.

विश्वासने आपला अंतिम रिझल्ट लिहायला घेतला. एवढ्यात केबिनचे दार उघडून सरदेसाई आत आला. या हिंदी चॅनेलवर सारे हिंदी भाषिक. फक्त रखवालदार मनोहर आणि या प्रोग्रॅमचा मॅनेजर सरदेसाई तेवढे मराठी बोलणारे.

''गुड मॉर्निंग जाधव''

''यस गुड मॉर्निंग सरदेसाई. अंतिम रिझल्ट पाच मिनिटात देतो. ''

''जाधव, त्यासंबंधातच मी बोलायला आलोय.''

''बोला.''

सरदेसाईनी केबिनचे दार आतून बंद केले आणि जाधव समोरच्या खुर्चीवर बसला.

''जाधव, चॅनेलची इच्छा आहे, या स्पर्धेत निकिता पहिली यावी.''

''व्हॉट नॉनसेन्स, अरे निकिता माझ्याकडे सर्वात शेवटी आहे. तिचा स्कोअर ऐंशीच्या खाली आहे.''

''असू दे, अंतिम पाचमध्ये आलेला कोणीही विजेता किंवा विजेती होऊ शकतो.''

''बरोबर, पण गेल्या एक महिन्याचे मार्क निकिताला सर्वात कमी आहेत आणि पहिल्या नंबरवर....''

''कोणीही असू दे, निकिताच विजेती होणार असे चॅनेलचे म्हणणे आहे.''

जाधव ओरडला – ''अरे का पण ? केदारवर हा अन्याय आहे.''

''याचे कारण, एन चॅनेलला दक्षिण भारतात विशेषतः ओरीसा, आंध्रप्रदेश या भागात हातपाय पसरायचे आहेत आणि निकिता ही ओरीसाची आहे. या स्पर्धेत ती विजेती झाली म्हणजे त्या भागातील लोक एन चॅनेल घरोघरी घेतील आणि हा अंतिम फेरीचा

कार्यक्रम पुन्हा पुन्हा पाहतील.

''चॅनेलच्या धंद्यासाठी खऱ्या गायकावर अन्याय? मग स्पर्धा घेता कशाला ? आणि परीक्षक हवे कशाला ? चॅनेलला वाटेल त्याला बक्षिसे देऊन मोकळं व्हायचं.''

''असे कार्यक्रम असले तरच टिआरपी जास्त मिळतो. लोक तहान भूक विसरुन टिव्ही पाहत राहतात. आम्हाला पण अशाच कार्यक्रमांना प्रायोजक मिळतात. विशेषतः लहान मुलांच्या स्पर्धेत लोक जास्त इमोशनल होऊन कार्यक्रम पाहतात. चॅनेल घरोघरी पोहचते. चॅनेलला खूप पैसे मिळतात. आणि परीक्षकांना पण मिळतात. ''

''अशा पैशांवर थुंकतो मी. मी पण कोकणातून गरीब घराण्यातून आलोय. दुर्गम भागात विद्या मिळवायची याला किती त्रास असतो ते मला माहिती आहे. मी केदारला ९० टक्केपेक्षा जास्त मार्क दिलेत आणि निकिता ऐंशी टक्केच्या खाली आहे. माझ्या मार्कलिस्टवर केदारच पहिला येणार.''

जाधवने पुन्हा मार्कलिस्ट समोर घेतली आणि तो अंतिम रिझल्ट तयार करु लागला.

''जाधव एक मिनिट थांब, हे फोटो पहा. मी पाच मिनिटांनी येतो. मग बोलू आपण.'' त्याच्या समोर फोटोचे इनव्हलप ठेवून सरदेसाई केबिन उघडून बाहेर गेला. जाधवने इनव्हलप हातात घेतले आणि एका बाजूने उघडले. आतमधून चार फोटो बाहेर पडले. कसले फोटो म्हणून जाधव पाहू लागला आणि तो चमकला, त्याचे आणि एका कॉलगर्लचे एकामेकाच्या मिठीतले फोटो होते. त्याच्या लक्षात आले गेल्यावर्षी एक अल्बम लाँच व्हायचा होता त्यावेळी अलिबागच्या हॉटेलमध्ये पार्टी होती. पार्टीनंतर त्याच हॉटेलमध्ये रहायचे होते. तो पार्टी संपवून त्याच्या रुमवर गेला तेव्हा त्याच्या रुममध्ये ही कॉलगर्ल आधीपासून हजर होती. त्याला पाहताच ती त्याच्या गळ्यात पडत होती. पण त्याने तिला ढकलले. हा ''हनीट्रॅप'' आहे आणि यापासून लांब रहायला हवे हे त्याच्या लक्षात आले. म्हणून त्याने आरडाओरड करुन इतरांना बोलावले. ती कॉलगर्ल चडफडत पळाली. तसे आपण पोलीसात कळविणार होतो पण अल्बमची मंडळी हात जोडू लागली. तसेच त्या हॉटेलची माणसेपण आमचे नाव खराब होईल पुन्हा येथे कोण येणार नाही तेव्हा पोलिसांना बोलवू नये म्हणून आग्रह करु लागली म्हणून आपण गप्प बसलो. पण हे फोटो या चॅनेलकडे कसे आले? की, गेल्यावर्षीपासून या चॅनेलचे आपल्यावर लक्ष होते? आपल्याला परीक्षक बनवायचे आणि हवा तसा रिझल्ट नाही दिला तर हनीट्रॅपमध्ये अडकवायचे?

जाधवने पुन्हा फोटो पाहिले. प्रत्येक फोटोत ती कॉलगर्ल त्याच्या हातावर पडलेली दिसत होती. जाधवला वाटलं आपण त्याच वेळी पोलीस कंम्पलेंट करायला

हवी होती. आता असे फोटो पाहून आपल्यावर कोण विश्वास ठेवणार ? त्याला त्याची पत्नी अनिताची आठवण झाली. तिला पण हा प्रसंग सांगायला हवा होता. पण ठीक आहे. अनिताचा आपल्यावर विश्वास आहे. अशा फोटोंवर विश्वास ठेवणारी ती नाही. या झगमगत्या दुनियेत अशा गोष्टी नेहमीच्याच. विश्वासने मनात म्हटले, सरदेसाई असल्या फोटोनी माझा रिझल्ट बदलणार नाही. मी तुझ्या चॅनेलला पुरुन उतरेन.

सरदेसाई एवढ्यात केबिनचे दार ढकलून आत आला. त्याला जाधव काही म्हणणार, एवढ्यात हातातील एक फोटो दाखवत त्याला म्हणाला, जाधव मागच्या वेळी या स्पर्धेत कबिर जडेजा परीक्षक होता. तू ओळखत असशील कबिरला ?''

''हो तर. आमच्याच गुरुकूलचा तो. मला चार वर्षे सिनिअर''

''हा, हा त्याचाच मुलगा'' हातातला फोटो दाखवत सरदेसाई म्हणाला.

''कबिर जडेजा असाच, आपले विचार आणि तत्वांवर ठाम, रिझल्ट बदलायला नकार देत होता. पण काय योगायोग त्याचवेळी त्याच्या मुलाचा पाचगणीत अपघात झाला. पाचगणीच्या शाळेतून दोन मिनिटावर असलेल्या हॉस्टेलमध्ये जाताना त्याला गाडीने उडवले. नशीब म्हणून तो वाचला. आता अपंग झालाय आणि आता व्हिलचेअरवर आलाय. कबिर आता पश्चातावलाय. हातातील दुसरा फोटो दाखवत सरदेसाई जाधवला म्हणाला – ''जाधव, हा तुझा मुलगा पन्हाळ्यात शिकतो काय ?'' सरदेसाईच्या हातात आपल्या मुलाचा फोटो पाहून जाधव आश्चर्यचकित झाला. एक भीतीची लहर त्याच्या कण्यापासून मेंदूपर्यंत सरकली. छातीत धडधडू लागले. आपल्याला हृदयविकाराचा त्रास आहे हे जाधवच्या लक्षात आले. त्याने चटकन बॅगेतून सॉरबीट्रेटची गोळी काढली आणि जिभेखाली ठेवली. त्याच्या केसातून मानेपर्यंत ओघळणारा घाम पाहून सरदेसाई शांतपणे म्हणाला, ''जाधव शांत हो, मघा सॉरबीट्रेटची गोळी जिभेखाली ठेवलीस काय ? एवढा मनाला त्रास करुन घेऊ नये बाबा. शांत हो.''

जाधव सरदेसाईकडे शुन्यपणे पाहत होता, एकीकडे घाम पुसत होता. पुन्हा सरदेसाईने खिश्यातून एक फोटो काढला. जाधव हा तुझा बाबा काय ? रोज बॉम्बे गोवा रोडवर फिरायला जातो. त्याला सांग रस्ता बदल नाहीतर एखाद्या ट्रकची धडक बसेल. विश्वास जाधव घाम पुसत म्हणाला,

''तू मला धमकी देतोस काय ? पण तू माझ्याच मागे का लागतोस इतर दोघे परिक्षक आहेत ना ? त्यांना सांग.''

''जाधव, ते दोन्ही परीक्षक चॅनेलला विकले गेले आहेत. माधुरी उगीच नाही पाच सिझनमध्ये काम करते आणि तिला बॉलीवूडमध्ये गाणी मिळतात ती

कुणामुळे ? तिच्या गाण्यामुळे ? हुडत. अशा छप्पन्न माधुरी इंडस्ट्रीत आहेत. या चॅनेलमुळे तिला कामं आहेत. आणि तो मंगेश कायम गांजा ओढत असतो. त्याला माहिती आहे. चॅनेलच्या विरोधात गेला तर तुरुंगात जाईल. पण आम्हाला आमच्या प्रायोजकाला तिनही परीक्षकांची मार्कलिस्ट सादर करावी लागतात आणि ज्या स्पर्धकाला तिनही परीक्षक नव्वद टक्केपेक्षा जास्त मार्क देतात तोच विजेता होतो. आणि समजा त्या दोघांनी नव्वद टक्के दिले आणि तू कमी दिलेस तर प्रायोजकांना वाटते काहीतरी गडबड आहे आणि मग चॅनेलचे पेमेंट स्टॉप होते. म्हणून तुझेपण निकिताला नव्वद टक्केपेक्षा जास्त मार्क हवे आहेत. नाहीतर चॅनेलचे फार मोठे नुकसान होईल आणि चॅनेल आपले नुकसान कधीच करुन घेत नाही.

सरदेसाईने घड्याळात पाहिले दुपारचा दीड वाजला होता. तो बाहेर गेला आणि सीसीटीव्ही बंद करुन आला. पुन्हा सरदेसाई जाधव समोर येऊन बसला.

''जाधव, मी सीसी कॅमेरे बंद केलेत. कारण माझी अर्ध्यातासाची लंच सुट्टी सुरु झाली. आता हा अर्धा तास मी चॅनेलचा माणूस नाही. खराखुरा सरदेसाई. जाधव, तुला वाटत असेल किती हा सरदेसाई दुष्ट. चॅनेलला हवा तसा रिझल्ट मिळावा म्हणून हनीट्रॅपमध्ये अडकवणारा, कबिरच्या मुलाचे फोटो दाखवून तसे तुझ्या मुलाचे होईल अशी भिती दाखविणारा किंवा तुझ्या वडिलांना सकाळी फिरायला जाताना ट्रक धडक बसेल म्हणून भिती घालणारा. पण जाधव, तू राजापूरचा आणि मी म्हापशाजवळच्या वाळपईचा. तुझ्यासारखाच मी सुध्दा गरिबीतून वर आलेला पण मी या चॅनेलमध्ये नोकरी करतो आणि मला चॅनेलकडून दरमहिन्याला गलेलठ्ठ पगार मिळतो. सकाळ पासून तुला जो ट्रॅपमध्ये अडकवत होतो तो माझ्या नोकरीचा भाग होता.

मघाशी मी तुला हॉटेलमधील तुझे फोटो दाखविले किंवा कबिरच्या व्हिलचेअर वरील मुलाचा फोटो दाखविला हे सर्व तुला दाखविण्यासाठी फक्त १५ मिनिटे आधी माझ्या हातात पडले. याबाबत काय आणि कसे बोलायचे हे पण सांगण्यात आले. जाधव, मला क्षमा कर. आता निकिताला तू पहिला नंबर देणार की केदारला देणार ते तूच ठरव. पण आता सीसीटीव्ही बंद आहेत म्हणून मी हे बोलतोय. हे कॉर्पोरेट सेक्टर फार निर्दयी आहे. इथे दया माया नाही. व्यवसाय वाढवायचा हेच यांना माहित असते आणि त्यासाठी कितीही खाली यायची यांची तयारी असते. मघापासून ज्या धमक्या तुला मिळाल्या त्या सत्यात आणण्याची त्यांची तयारी असते. असो. आता माझी लंच सुट्टी संपत आली. आता पुन्हा मी चॅनेलचा माणूस.'' अस म्हणून सरदेसाई बाहेर गेला.

विश्वास जाधव विचार करत राहिला. काय करावे ? कोणता निर्णय घ्यावा ?

त्याचं एक मन सांगत होतं या चॅनेल विरुध्द उभा रहा. या आधी हे धाडस कुणी दाखवलं नाही तू दाखव. काय होईल.....? त्याला कबिर जडेजाच्या मुलाचा फोटो आठवला. आपले राजापूरचे गावात फिरणारे आईवडील आठवले. समाजात मानाने वावरणारी आपली पत्नी अनिता आठवली. उद्या हॉटेलमधील माझे फोटो प्रसिध्द झाले तर अनिता मानाने जगेल काय ? कुणा कुणाला उत्तरे देणार आपण ?

विचार करता करता जाधवने टेबलावर डोक टेकलं. आपण उगाचच या चॅनेलची जबाबदारी स्वीकारली. त्याच्या डोळ्यासमोर केदार पासवानचा चेहरा आला. त्याला आपल्याकडून खूप अपेक्षा असणार पण.... विचार करता करता जाधवचा डोळा लागला.

दहा मिनिटात केबिनचा दरवाजा उघडून सरदेसाई आत आला. मग जाधव, तुमचा रिझल्ट तयार असेल तर या पाकीटामध्ये बंद करा. रिझल्टशीटवर आणि पाकीटावर तुमची सही करा आणि मुख्य प्रायोजक आलेले आहेत त्यांना तुमच्या हाताने हे पाकीट द्या. बाकी दोन परीक्षकपण आपापली पाकीटे घेऊन येत आहेत. जाधव पटकन उठला बेसीनवर जाऊन तोंड धुतलं आणि रिझल्टशीटवर मार्क लिहून पाकिटात घातले. पाकीट बंद केले आणि तो सरदेसाई बरोबर बाहेर पडला. सरदेसाई आणि जाधववरच्या मजल्यावरील प्रोग्रॅम हेडच्या ऑफिसमध्ये पोहोचले तेव्हा माधुरी आणि मंगेश बाहेरच उभे होते. मग सरदेसाईसह तिघेही परीक्षक आत गेले आणि खुर्चीवर बसलेल्या चेन्नई ऑईल आणि स्वरुप मसालेच्या डायरेक्टरांच्या हातात आपापली पाकीटे दिले. त्यांनी तिघांना बसायला सांगितले आणि एनी प्रॉब्लेम? असा प्रश्न विचारला. माधुरी तत्परतेने म्हणाली, नॉट एटऑल सर ! पाठोपाठ मंगेशही नॉट ॲटॉल सर  म्हणाला. त्यांनी जाधवकडे नजर टाकली. जाधवच्या तोंडातून शब्द बाहेर पडेना. शब्द अडखळू लागले पण तो थोड्या जड आवाजात म्हणाला, नॉट ॲटॉल सर!

आता मुख्य स्टेज अंतिम फेरीसाठी सजले आहे. जिकडे तिकडे शोभिवंत कंदील लागले आहेत. पायाखाली मऊमऊ गालीचा पसरला आहे. परीक्षकांसाठी आणि विशेष पाहुण्यांसाठी खास कोच ठेवले आहेत. संगीत साथ करणाऱ्यांसाठी नवीन युनिफॉर्म, सर्व काही झकपक. आज काही विशेष पाहुणे आमंत्रित केले आहेत. इंडस्ट्रीमधील संगीतकार, गायक, वादक, टीव्हीवरील नट, निवेदिका जान्हवी आज विशेष वेशभूषा करुन सजली आहे. तिघेही परीक्षक आपापल्या जागेवर बसले आहेत आणि अंतिम फेरीतले पाच स्पर्धक नवीन फॅशनचे कपडे घालून सज्ज आहेत. निवेदिका जान्हवी सर्वांचे स्वागत करते आहे आणि एक एक स्पर्धक आपली गाणी गाऊन जातो आहे. टाळ्यांच्या कडकडात, विनोदांची आतिषबाजी

सुरु आहे. आणि जस जसा वेळ संपायला येतो आहे तस तसा स्पर्धक आणि त्यांचे नातेवाईक यांच्या पोटात गोळा येतो आहे.

आपल्या केबिनमध्ये बसून चॅनेल हेड गुप्ता हा टीव्हीवर कार्यक्रम पाहत आहे. त्याने संपूर्ण फिल्डिंग लावली आहे. त्याला माहिती होतं अंतिम विजेती निकिताच होणार आणि मग दक्षिण भारतात आपण आपल्या चॅनेलला घरोघरी पोहोचवणार. मग टिआरपी वाढणार आणि आपणाला प्रमोशन. कदाचित चॅनेलच्या सर्व भाषिक आणि हिंदी चॅनेलचे प्रमुखपण. तस झालं तर आपल्याला कदाचित सिंगापूरला जावे लागेल अशी स्वप्न पाहणारा गुप्ता खाली फ्लोअरवर लक्ष ठेवून होता. कार्यक्रम रंगत होता आणि आता परिक्षकांसह स्पर्धक स्टेजवर आले होते. मुख्य प्रायोजक स्टेजवर आले. आणि आता निकिता विजयी होणार हे निश्चित असतानाच प्रायोजकांनी परीक्षकांच्या गुणानुसार विजयी स्पर्धकाचे नाव जाहिर केले – ''केदार पासवान''

केदारचे नाव जाहीर झाले आणि संपूर्ण स्टेजवर आणि सेटवर आनंद पसरला. आमंत्रित विशेष पाहुणे आनंदित झालेले दिसले. प्रेक्षकांनी केदारला उचलून घेतले आणि त्याच्यावर पुष्पवृष्टी होऊ लागली.

गुप्ता आपल्या केबिनमध्ये धुसमुसत होता. त्याचा त्याच्या कानावर विश्वास बसत नव्हता. तिनही परीक्षकांना अडकवून ठेवले तरी चॅनेलच्या विरोधात जाण्याचे धाडस त्यांनी कसे केले ? आणि याचा परिणाम काय होणार ? आपली हकालपट्टी की चॅनेल आपल्याला आयुष्यातून उठवणार ? तेवढ्यात त्याला आठवण झाली. सरदेसाईवर सगळी जबाबदारी होती. मग सरदेसाई गेला कुठे ? गुप्ता केबिन बाहेर आला आणि सरदेसाईच्या नावाने आरडाओरडा सुरु केला. चॅनेलमधले सर्व मॅनेजर्स, स्टाफ घाबरुन गेले. काहीजन सरदेसाईला फोन करु लागले. एवढ्यात स्टाफमधील एकजण म्हणाला – ''सरदेसाई दोपहरसे बाहर गया है, उसका फोन नॉटरिचेबल है'' गुप्ता ओरडला. ''ढुंडो सरदेसाईको''

यावेळी सरदेसाई अंधेरी पोलीस स्टेशनच्या इन्स्पेक्टर समोर बसला होता. इन्स्पेक्टर देसाई चॅनेल एन चे विविध कारनामे पाहत होते. परीक्षकांना अडकविण्यासाठी चॅनेल एन कसे ब्लॅकमेल करते आहे तसेच त्यांच्या खाजगी आयुष्यात, संसारात कशी विघ्ने आणते आहे आणि लहान मुलांच्या स्पर्धेत त्यांना हवा तो स्पर्धक विजेता ठरविण्यासाठी अनेक कलाकारांच्या खाजगी जीवनातील क्लिप्स त्यांनी मिळविले आहेत. इन्स्पेक्टर देसाई हे पुरावे पाहून हैराण झाले. त्यांनी ताबडतोब पोलीस कमिशनरना हे पुरावे पाठविले. कमिशनरने पण चॅनेल एन वर ताबडतोब कारवाई करावी अशी सूचना दिली. देसाईंनी सूरसंगम कार्यक्रम संपेपर्यंत

वाट पाहिली.

सुरसंगम कार्यक्रम संपला, सर्व मंडळी आपापल्या घरी गेली आणि त्याच वेळी इन्स्पेक्टर देसाई आणि पोलिसांनी चॅनेलचा ताबा घेतला. चॅनेलच्या सर्व स्टाफला आणि खुद्द गुप्ताला काही कळण्याआधी अटक करण्यात आली. सर्व कॅमेरे, हार्डडिस्क, कॅसेट्, पेनड्राईव्ह ताब्यात घेण्यात आले. भारतातील सर्व भाषातील चॅनेल्सनी तातडीने ही बातमी दिली. पत्रकार, संपादक यांनी सरकारची मुस्कटदाबी म्हणून आरडाओरड केली. पण कमिशनरनी चॅनेल एन ने परिक्षकांना केलेल्या ब्लॅकमेलच्या पुराव्यांचा पाढा वाचला. चोरुन घेतलेले अनेक फोटो, व्हिडिओ दाखविले. तेव्हा पत्रकारांचा विरोध कमी झाला.

इकडे दादर स्टेशन जवळील हॉटेल प्रितममध्ये सरदेसाई बसला होता. त्याच्या समोर परीक्षक मंडळी माधुरी, मंगेश आणि जाधव बसले होते. प्रत्येकाच्या समोर भरलेले बिअरचे ग्लास होते. सरदेसाई सांगू लागला.

''या चॅनेलला धडा शिकविण्यासाठी कधीपासून संधी शोधत होतो. मागील प्रत्येकवेळी घाबरट परीक्षक मिळत होते. यावेळी जाधव सारखा धाडसी परीक्षक मिळाला. चॅनेलच्या सुचनेनुसार मी जाधववर अनेक प्रकारे दडपणे आणत होतो. पण माझ्या लक्षात आले की तो डगमगणार नाही. लंचच्या आधी लक्षात आले की, काहीही झाले तरी जाधव केदार पासवानलाच पहिला नंबर देणार. लंच टाईममध्ये सीसीटीव्ही बंद होते त्याकाळात मी माधुरीला ही गोष्ट सांगितली. आता यापुढे माधुरी सांगेल''

माधुरी बोलू लागली - ''मला माझ्या दुसऱ्या स्पर्धेच्या वेळेपासून चॅनेलने ट्रॅप करायला सुरुवात केली. एकदा मी माझ्या मित्राबरोबर अहमदाबादला एक रात्र राहिले आणि त्याचे फोटो आणि व्हिडिओ करुन चॅनेल मला ब्लॅकमेल करु लागले. माझा नवरापण माथेफिरु त्यामुळे चॅनेल सांगेल तस तो ऐकणार त्यामुळे चॅनेलचे ऐकण्याशिवाय माझा इलाज नव्हता. यावेळीपण निकिताला पहिला नंबर देण्याबद्दल चॅनेलची सक्ती होती. एवढ्यात लंच टाईममध्ये सरदेसाई मला म्हणाला, जाधव कोणत्याही परिस्थितीत निकिताला नंबर देणार नाही. तो केदारलाच पहिला नंबर देणार. त्यामुळे मी धाडस करुन केदारलाच नंबर दिला. मंगेश म्हणाला - मी मजा म्हणून रेव्ह पार्टीत ड्रग्ज घेतले होते. त्याची कॅसेट चॅनेलकडे आहे. ती कॅसेट पोलिसांकडे देण्याची धमकी दिली जात होती. त्यामुळे नाईलाजस्तव चॅनेलसमोर मान टेकावी लागत होती. लंच टाईममध्ये सरदेसाई मला येऊन म्हणाला, माधुरी आणि जाधव केदार पासवानलाच पहिला नंबर देणार तेव्हा मी धाडस केले.

सरदेसाई पुढे म्हणाला - तिघांचे रिझल्ट निश्चित झाले तशी पाकीटे

प्रायोजकांकडे देऊन मी सेटच्या बाहेर पडलो. माझ्या मोबाईलमध्ये तुम्हा तिघांसाठी दिलेले व्हिडिओ होतेच शिवाय तुम्हाला धमकविण्यासाठी दिलेल्या तुमच्या मुलांचे, नातेवाईकांचे फोटो होते ते सर्व अंधेरी पोलीस स्टेशनच्या इन्स्पेक्टर देसाईंना दाखविले आणि तिघा परीक्षकांना आणि मला जीवाची भीती असल्यानेपण कळविले. एवढे सगळे पुरावे मिळाल्यानंतर पोलिसांची धाड पडली आणि त्यांना भरभक्कम पुरावे मिळाले. आता ह्या चॅनेलविरुध्द केस उभी राहिलं आणि चॅनेल एनची पुरती बदनामी होईल. याचे सर्व श्रेय त्यामधल्या लंच ब्रेकला. तो अर्ध्या तासाचा लंच ब्रेक मिळाला नसता तर सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली काहीच शक्य नव्हते. सरदेसाई जाधवला म्हणाला,

''जाधव, तुझ्यासारखा धाडशी कोकणी माणूस होता म्हणून हे शक्य झाले.''

त्याच रात्री सरदेसाई चेन्नईला जाणाऱ्या विमानात बसला आणि मून चॅनेलला जॉईन होण्यासाठी चेन्नईला रवाना झाला.

# लग्नाला यायचं हं...!

प्रदीप केळुसकर - मोबा. ९४२२३८१२९९

लग्न करुन अनिता देशमुखांच्या घरी आली. तिचे माहेर कल्याणचे आणि आता सासर सांगलीचे. नवरा विनोद इन्शुरन्स कंपनीत नोकरीला आणि अनिता प्रायव्हेट बँकेत. फेसबुकवर दोघांची ओळख झाली, चॅट सुरु झालं, विनोदचा मोकळा ढाकळा स्वभाव तिला आवडला. विनोदची लहान फॅमिली. आई-वडील आणि एक मोठी डॉक्टर बहीण. वडिलांची म्हैसाळ भागात शेती होती त्यामुळे ते बऱ्याचदा तिकडेच असत. विनोदच्या मोठ्या बहीणीने लग्न केले नव्हते. ती त्याच बंगल्यात बाहेरच्या रुममध्ये जनरल प्रॅक्टीस करायची.

अनिताचे आणि विनोदचे भेटायचे ठरले तेव्हा ती सांगलीत पहिल्यांदाच आली. तेव्हा विनोदची डॉक्टर बहीण तिला भेटली. पहिल्याच भेटीत तीने अनिताचे मन जिंकले. सुंदर, स्मार्ट, हुशार तरतरीत स्त्री. विनोदपेक्षा १२-१३ वर्षांनी मोठी असेल. एखादी व्यक्ती पहिल्यांदाच भेटली तरी लक्षात राहते अशी विनोदची ताई होती. तिचे आधुनिक विचार, चांगले वाचन, नाटकाची, संगीताची आवड. या घरात आल्यावर ताईसारखी मोठी बहिण, मार्गदर्शक मिळेल म्हणून अनिता हरखून गेली. अनिताच्या आई-वडिलांना भेटायला म्हणून विनोद कल्याणला आला तो प्रभातच्या गाडीतून. तेव्हा प्रभात दादा अनिताला पहिल्यांदा भेटला. प्रभात दादा हा त्यांचा फॅमिली फ्रेंड. खरतर तो ताईचा वर्गमित्र. पाचवीपासून दहावीपर्यंत ताईच्या वर्गात. लहानपणापासून त्यांच्या घरात येत होता. अनिताला प्रभात दादा पण आवडला. एकदम मस्त माणूस. बडबड्या, सढळ खर्च करणारा, संगीताचा आणि नाटकाचा शौकीन आणि स्वतः नाटक करणारा. अनिताच्या आई-वडिलांनापण जावई आवडला तसेच प्रभातदादा पण आवडला.

अनिता विनोदच्या लग्नात विनोदच्या ताईची आणि प्रभातदादाची जास्त गडबड होती. लग्नाच्या आदल्या दिवशी सीमंतपूजनानंतर नाच, गाणी सुरु होती. पहिल्यांदा लहान मुले, मग तरुण मुले-मुली, शेवटी सर्वांनीच ताईला फारच आग्रह केला तेव्हा ताई माधुरीच्या गाण्यावर बेफाम नाचली. एरवी शिस्तीची असणारी ताई एवढी नाचू शकते हे अनितालाच काय कुणालाच माहीत नव्हते. एवढ्या नाचानंतर आणि दमल्यानंतरसुध्दा आलेल्या सर्व पाहुण्यांना गादी, उशी, पांघरुण मिळालं की नाही याची ताई जातीने चौकशी करत होती.

दुसऱ्या दिवशी लग्नात सुध्दा ताईचा उत्साह पाहण्यासारखा होता.

देशमुखांच्या घरात दुसऱ्या पिढीतले पहिले लग्न म्हणून झाडून सर्व नातेवाईक, मित्रमंडळी लग्नातील कामाला मदत करत होते. अनिताला वाटले मुंबईत अशी एकमेकांना मदत करणारी माणसे कमी, उलट नावे ठेवायला जास्त. सांगलीत मोकळा ढाकळा कारभार होता. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी देवदर्शनाला जायचं म्हणून विनोदने प्रभातदादाला फोन केला आणि प्रभात दादाने ड्रायव्हरसह गाडी पाठवून दिली. विनोद आणि अनिता नृहसिंहवाडीला दत्त दर्शनाला गेली. दत्त दर्शन केल्यानंतर कृष्णेच्या काठावर दोघं विसावली. गेले दोन तीन दिवस मनातले विचारायची हीच संधी म्हणून अनिता विनोदला म्हणाली –

''विनोद, प्रभात दादाला तू हक्काने गाडी पाठव असं कसं म्हणालास ?''

''अग त्यात विशेष काही नाही. तो आपल्या घरचाच आहे. दोन्ही कुटुंब एकमेकांसाठी करतच असतो. त्यात कुणाला काही वाटत नाही. प्रभात दादा दोन तीन दिवस घरी आला नाही तर माझ्या आईला चुकल्या चुकल्या सारखे वाटते आणि मी प्रभात दादाच्या घरी गेलो नाही तर त्याच्या आईला करमत नाही.''

''आणि ताई ? ती जात नाही प्रभात दादाच्या घरी ?''

''फारशी जात नाही, फक्त कुणाला बर नसलं तर डॉक्टर म्हणून जाते. विशेषतः काकुंचं ब्लडप्रेशर बघायला जाते. प्रभात दादा फारसा आजारी नसतोच कारण त्याच्याकडे पंचवीस औषध कंपन्यांच्या एजन्सीज आहेत त्यामुळे त्याला औषधांची माहिती आहे. त्यामुळे बरं नसलं तर तो स्वतः औषध घेतो.''

''मग ताई फारशी का जात नाही ?''

''कारण असं काही नाही, खरतर ती आणि प्रभातदादा एका वर्गातले. ताई वर्गात खूप हुशार, प्रभात दादा फार हुड होता. खूप मस्ती करायचा म्हणून तो ताईला आवडत नव्हता.''

अनिताला हसू आलं.

''कमाल आहे ताईची, तो मस्ती करायचा म्हणून आवडायचा नाही, लहानपणी मुलं विशेषतः मुलगे मस्तीखोरच असतात. तू मस्ती करत नव्हतास का ?''

''मी फारसा मस्ती करायचो नाही, ताईला ते आवडायचं नाही. लहानपणापासून ताईच्या शिस्तीत वाढलोय मी. अभ्यास, व्यायामशाळा, शाखा एवढचं माझं विश्व.''

''अच्छा ! तरीच तू ताईचा लाडका. आणि आई–बाबांचा ?''

''बाबांची ताई फार लाडकी, तिला कोणी बोललेल त्याना आवडत नाही आणि बाबा घरी असले की ताई जणू त्यांच्या सेवेत असते. आईचा मी लाडका, मला तळहातावरच्या फोडासारखी जपायची आई. पण एकंदरीत काका–काकू, आत्या, मावशी सर्वांची ताई फार लाडकी. ती पण सर्वांची खूप काळजी घेते. नाती जपावीत

तर ती ताईनेच. मला ते जमत नाही.''
''विनोद, नाती ही जपायचीच असतात. मला जमत नाही असं चालत नाही. माणसे जोडावीत. ''
''खरं आहे, मला पण प्रयत्न करायला हवा. पण ताई सर्वांना फोन वगैरे करत असते म्हणून मी करत नाही.''
''मग ताईने लग्न का नाही केले ?''
''ते ताईलाच माहीत. तिला खूप स्थळे येत होती, ओळखीतून, नात्यातून मावशीने कित्येक स्थळे आणली पण तिने इंटरेस्ट घेतला नाही हे खरे.''
''मग तिचे कुठे प्रेम वगैरे होतं का ?''
''मला माहीत नाही. नसावं... तसा मी तिच्यापेक्षा १३ वर्षांनी लहान. पण तिच्या मैत्रिणी घरी येतच असतात. आईपण मैत्रिणींना हिच्यासाठी नवरा बघा असं सांगत असते. बाबा, काकांना, मामांना ताईच्या लग्नाबद्दल सांगताना मी ऐकले आहे. पण ताईने गांभीर्याने कधी घेतलंच नाही.''

''अरे पण आता ती ३८ वर्षांची झाली. तिचे तारुण्य कितीसे राहिले ? तिला काही इच्छा, भावना आहेतच ना ? तू आता भाऊ म्हणून तिच्या लग्नासाठी प्रयत्न करायला हवा, तुझे कर्तव्य आहे ते.''
''मी ? माझे कर्तव्य ?''
''मग ? नुसते ताईकडून लाड करुन घेतोस, तिच्या आयुष्याकडेपण बघायला नको ?''
''पण ती काही बोलत नाही, लग्नाबद्दल काही सांगत नाही.''
''भारतातल्या स्त्रिया असं 'माझं लग्न करा, मला लग्न करायचं आहे' असं सांगत नाहीत. आपण समजून घ्यायचं असतं.''

एवढ्यात गाडीचा ड्रायव्हर त्यांना बोलवायला आला तसे त्यांचे बोलणे राहिले. दुसऱ्या दिवशी सकाळी अनिता उठली तेव्हा ताई बॅटमिंटन खेळून येत होती. बॅटमिंटनच्या कपड्यात ती फारच तरुण आणि आकर्षक दिसत होती. तिने अनिताला हाय केलं आणि ती आंघोळीला गेली. आज अनिताने किचनचा ताबा घेतला होता. सकाळच्या न्याहारीसाठी आंबोळी आणि चटणी असा बेत केला होता. आंघोळ करुन ताई न्याहारीला आली आणि आंबोळी चटणी बघून खुश झाली.

एवढ्यासाठी दुसऱ्या गावातील मुलीशी लग्न करावं, विन्याने बरं केलं, सांगलीतली मुली बघितली नाही, नाहीतर रोज पोहे, उप्पीट नाहीतर दडपे पोहे या खेरीज काही मिळाले नसते नाश्त्याला. पण विन्याने लग्न केले कल्याण मधली पण मालवणी मुलीशी. आता रोज मालवणी पदार्थ खायला मिळणार. ''

‘‘ए अनिता, तू मासे बनवत असशील ना? मी तुला फिश मार्केटमधून मासे आणून देते. मस्तपैकी माशांचे कालवण बनव आणि सोलकढी.’’

‘‘हो ग ताई, तू मासे आणचं, मी कसे मालवणी स्टाईलने आमटी करते, फ्राय करते ते बघच. आणि आता आईकडे गेले की आमसुले घेऊन येते. आमच्या गावाहून परुळ्याहून काका आमसुल पाठवतात आम्हाला.’’

नाश्ता करुन ताई तिच्या दवाखान्यात गेली. तेवढ्यात आई, विनोद यांचा पण चहा नाश्ता झाला आणि साडेनऊला अनिता बँकेत जायला निघाली. विनोद तिला बँकेत सोडून त्याच्या ऑफिसमध्ये जाणार होता. आज अनिताचा सांगलीच्या बँक शाखेत पहिला दिवस म्हणून अनिता थोडी लवकर निघाली. वाटेवर प्रभात दादाची एजन्सी लागायची. विनोदने रस्त्यावरुन अनिताला प्रभात दादाची एजन्सी दाखवली. पहिल्या दिवशी अनिता हजर झाली आणि सांगलीच्या शाखेतील सर्वांची ओळख करुन घेतली. संध्याकाळी अनिता बँकेतून चालत चालत घराकडे येत होती. एवढ्यात मागाहून प्रभातदादा बुलेटवरुन आला.

‘‘काय आज बँकेत हजर झाली वाटतं?’’

‘‘होय हो प्रभात दादा ! आज पहिला दिवस, सर्वांची ओळख करुन घेण्यात आजचा दिवस संपला.’’

‘‘तुमच्याच बँकेत माझ्या एजन्सीचे अकांउंट आहे बरं का ? आता बरं झालं कधी एनीएफटी वगैरे काढायची असेल तर तुला फोन केला तर काम होईल.’’

‘‘चल बस, तुला सोडतो घरी.’’

प्रभात दादाच्या बुलेटवर बसून अनिता घरी आली. अनिताने चहासाठी आग्रह केला तेव्हा तो बुलेटवरुन उतरला. मागोमाग चालताना त्याचे लक्ष ताईच्या दवाखान्याकडे गेले.

‘‘डॉक्टरीण बाईचा दवाखाना सुरु झाला वाटतं’’

‘‘हो तर, हल्ली पेशंटपण खूप वाढलेत’’

‘‘ का नाही वाढणार ? एवढी हुशार डॉक्टरबाई, शिवाय कमी खर्चात पेशंटना बरं करणार, पण आमच्या धंद्याला हिचा जास्त फायदा नाही.’’

‘‘का हो प्रभात दादा अस का म्हणता ?’’

‘‘अगं ही जास्त औषधे लिहित नाही, मग आमच्या औषध धंद्याला हिचा काय उपयोग ?’’

‘‘ते बरचं की, गरीब पेशंटचा फायदा नाही का ?’’

‘‘हो, हो चहा दे, तिचं जास्त कौतुक करु नकोस. लहानपणापासून ओळखतोय मी तिला.’’

अनिताने दिलेला चहा घेतला आणि दोन मिनिटे आईना भेटायला प्रभात दादा गेला. अनिता सासूबाईंच्या खोलीत गेली तेव्हा त्या टीव्ही पाहत होत्या. अनिता आत येताच त्यांनी अनिताची चौकशी केली.

''काय गं, आज इकडच्या शाखेत पहिला दिवस तुझा ! नव्या ओळखी वगैरे झाल्या की नाही ?''

''हो तर, आज नवीन ओळखी, परांजपे म्हणून मॅनेजर आहेत इथे, तुम्हा सर्वांना ओळखतात ते.''

''अग तो परांजपे डॉक्टरांचा पुतण्या, ओळखणार नाही तर काय ? अग त्याची आई आमच्या भजनात असते. रोज सोमवारी, मंगळवारी आम्ही भजनासाठी राम मंदिरात जमतो तेव्हा ती तिथे येते. खूप वर्षापासूनची ओळख आहे.''

''आई, तुम्हाला एक विचारायचं होतं, विचारु ?''

''अग विचार ना !''

''आई, आपल्या ताईने लग्न का केल नाही हो ?''

''हो, हा प्रश्न तु विचारणार हे माहीत होतच, सर्वजण विचारतात आणि उत्तर देता देता मी मेटाकुटीला येते. पण तुला माहीत असायला हवच कारण या घरची सून आहेस तू. अग ती मनावर घेत नाही हाच प्रश्न. स्थळ येतात पण ती हसून सोडून देते. माझ्या बहिणीनी, नणंदांनी ओळखीतून सर्व प्रयत्न झाले. पण बाईसाहेब लक्ष घालत नाहीत. तिच्या बाबांची ती फार लाडकी. ते पण कुणाकुणाला सांगत असतात. पण हिच्यावर काही परिणाम नाही.''

''पण तिच्या मनात काय असेल हे बाहेर यायलाच हवं. तिच्या खास मैत्रिणी वगैरे ?''

''सर्वांना सांगून झालं. सर्वांनी हात टेकले.''

एवढ्यात विनोदचे बाबा बाहेरुन आले आणि त्यांना चहा देण्यासाठी आई किचनमध्ये गेल्या. त्यामुळे तो विषय तिथेच राहिला. अनिताला पाहताच बाबा म्हणाले –

''अगं अनिता, उद्या प्रभातच्या घरी जाऊन या, त्याच्या आईचा फोन आलेला म्हणाल्या – लग्न झाल्यानंतर विनोद आनिता आली नाही घरी ?''

''हो बाबा, उद्या शनिवारच आहे, विनोदला सांगते उद्या प्रभात दादाच्या घरी जाऊया म्हणून.''

दुसऱ्या दिवशी शनिवार होता. विनोदच्या मोटर सायकलवर बसून अनिता प्रभात दादाच्या घरी विश्राम बागेला गेली. नवीनच डेव्हलपेंट झालेल्या भागात प्रभात दादाचा भलामोठा बंगला होता. मोटर सायकलचा आवाज ऐकून प्रभातची आई

बाहेर आली.

‘‘या, या विनोदराव, घरी हक्काची बायको आली म्हटल्यावर काकूला विसरला वाटतं ? लग्नाला आठ दिवस झाले तरी इकडे फिरकलास नाही कुठे बाहेर गेलेला की काय ?’’

‘‘नाही ग काकू, अनिताला सध्या रजा मिळणार नाहीय, तेव्हा देवदर्शन करुन ती बँकेत हजर झाली. आता दिवाळीत जाऊ कुठेतरी.’’

‘‘जा जा फिरुन या, मग एकदा दोनाची तीन झाली की राहिलं.’’

अनिता हसली.

‘‘पूर्वीच्या बायका अशी चेष्टा केली की लाजायच्या, आताच्या हसतात याला म्हणतात नवीन पिढी.’’

सर्वजण मोठ्याने हसले.

‘‘प्रभात दादा नाही आले अजून ?’’ अनिताने विचारले.

‘‘प्रभात ? तो दहा शिवाय उगवायचा नाही. एजन्सी सातला बंद केली की तो ‘भावे’ मध्ये जाणार, तेथे त्याचा ग्रुप जमलेला असतो. मग साडेनऊ पर्यंत नाटकाची प्रॅक्टिस, तेथून मग मित्रांबरोबर गप्पा मग दहा नंतर घरी.’’

‘‘मग त्यांच जेवण ?’’

‘‘मी त्याचं जेवण टेबलावर ठेवते. मला नऊ वाजता झोपायची सवय. तो येऊन जेवण गरम करतो आणि जेवतो.’’

अनिता अंदाज घेत होती. प्रभात दादाच्या बायकोचा कुठे उल्लेख होत नाहीय, ती माहेरी वगैरे गेली की काय ?’’ तेवढ्यात विनोद म्हणाला –

‘‘अनिता तुला प्रभातच घर दाखवतो.’’

अनिता विनोद बरोबर घर पहायला गेली. खाली तीन बेडरुम्स, हॉल, किचन, स्टोअर रुम, वरती दोन गेस्ट रुम्स सर्व ठिकाणी उंची फर्निचर्स, टाईल्स, सर्व चकाचक. सर्व घर पाहून अनिता विनोद पुन्हा हॉलमध्ये आले.

‘‘छान आहे हो घर, केव्हा बांधलं हे ?’’

‘‘हे घर प्रभातने बांधलं, पाच वर्षे झाली त्याला. पूर्वी आम्ही नळभागात दोन खोल्यात रहायचो. प्रभात ने धंदा सुरु केला आणि खूप वाढवला मग घर बांधलं.’’

‘‘छानच आहे हं... कर्तृत्ववान आहे प्रभात दादा !’’ अनिताने कौतुक केले. तिच्या कौतुकानंतर आईनी एक निश्वास टाकलेला अनिताने ऐकला. तिला विचारायचं होतं – प्रभात दादाची बायको, मुलं कुठं आहेत ? पण पहिल्यांदाच ती या घरी आलेली त्यामुळे असे काही विचारणे म्हणजे आगाऊपणा दिसला असता म्हणून ती गप्प राहिली.

काकूंना नमस्कार करुन विनोद – अनिता निघाली आणि कृष्णेच्या घाटावर येऊन बसली. घाटावर अनेक जोडपी, प्रेमीयुगुलं, वयस्क बरीच मंडळी बसली होती. अनिताच्या ओठावर केव्हापासून येत होतं पण मघा काकूसमोर असताना तिने विचारायचे टाळले. आता घाटावर आल्यावर तिने विनोदला विचारले –

''विनोद, प्रभात दादाची बायको मुलं कुठे दिसली नाहीत ती ?''

''मला वाटलचं होत तू हे विचारणार. प्रभात दादाचं पुण्याच्या आरती महाजनबरोबर लग्न झालं होतं. अगदी लग्न जमवणाऱ्या संस्थेत नाव घालून. आरती कमालीची देखणी होती. तिचे वडील पुण्यातील प्रतिष्ठित वकील. लग्न पुण्यात धुमधडाक्यात झाले. आम्ही सर्वजण लग्नाला चार दिवस होतो ताई सोडून.''

''आ, ताई लग्नाला आली नाही ?''

''नाही. त्याच मुहूर्तावर तिच्या जवळच्या मैत्रिणीचं अहमदाबादला लग्न होतं त्यामुळे ताई त्या लग्नाला गेली.''

''बर मग ?''

''आरतीचं आणि प्रभातचं अजिबात जमेना. काकू सांगायच्या सतत त्या दोघांच तू–तू, मी–मी होत असे. चार महिन्यातच आरती माहेरी निघून गेली. एका वर्षानंतर तिने डायव्हर्स मागितला आणि प्रभातने तो दिला. आता तिने दुसरं लग्न केलं अस म्हणतात. पण प्रभात गप्प आहे. माझ्या बाबांनी त्याला परत लग्न करायचा सल्ला दिला पण तो बघुया असं म्हणून या विषयावर गप्प झाला. बिचारी काकू एकटी झालीय. त्यात हे महाशय दहा वाजता उगवणार.''

एवढं बोलून विनोद गप्प झाला. अनिता गप्प होती. कृष्णामाई संथ वाहत होती. कृष्णेच्या पलीकडची लहान लहान घरं पाण्यात बुडालेली दिसत होती. सांगली – कोल्हापूर रस्त्यावर वाहने धावत होती. अनिताच्या मनात आले. लग्न करुन सांगलीत आले त्याला अजून आठ दिवस झाले नाहीत. तोपर्यंत एक देखणी, सुसंस्कृत स्त्री लग्न करत नाही आणि एक कर्तबगार पुरुष लग्न करुन एकटा झालाय. प्रत्येकजण आपआपल्या कामात बिझी आहे असं दाखवतोय, पण ही माणसं एकटी आहेत. काही तरी करायला हवं.

दुसऱ्या दिवशी अनिताने कोकणी पध्दतीचे घावण आणि नारळाचं दूध आणि गुळ घालून रस बनविला. ताई बॅडमिंटन खेळून, आंघोळ करुन नाश्त्याला आली आणि घावण आणि रस पाहून बेहद्द खूश झाली. अनिताच्या पाठीवर कौतुकाचा धपाटा घालून खायला बसली. रसात बुडवून घावण तोंडात घालता घालता – ''मस्त, मस्त'' असं बडबडत राहिली.

अनिता हळूच म्हणाली – ''ताई तुम्हाला एक विचारु ? रागावू नका. ''

‘‘अग विचार, विचार ! आज मी बेहद्द खुश आहे. हे घावण खाऊन मी तृप्त झाली आहे, विचार’’

‘‘ताई, तुम्ही एवढ्या देखण्या, कर्तबगार, मनमिळावू मग अजून लग्न का करत नाही ?’’

‘‘अरे व्वा ! तूच हे विचारायची राहिली होतीस. मला सांग प्रत्येकाने लग्न केलेचं पाहिजे असं आहे का? आणि लग्न केलेले सुखी होतात काय ?’’

‘‘सुखी कोणच नसतं हो ताई, समस्या प्रत्येकाला असतात, तरीपण पुरुष आणि स्त्रीने एकत्र येण्याची पध्दत आहे. नाहीतर वंश वाढणार नाही आणि प्रत्येकाला आपला स्वतःचा आधार हवा असतो. वेल स्वतः वाढतेच पण तिला काठीचा आधार मिळाला की भरभर वाढते.’’

‘‘काही वेली जमिनीवर पसरतात, मी त्याचपैकी एक आहे असं समज अनिता.’’

‘‘तुम्ही बोलायला हरणार आहात का ताई ? तरी पण मला वाटतं, मी पण एक स्त्री आहे मला समजतात स्त्रीच्या इच्छा, भावना. त्यांना कोंडून ठेवू नये असं वाटतं. तुम्हाला तुमचा हक्काचा पार्टनर मिळायला हवा. कोणी योग्य तुम्हाला वाटला नाही का ? ’’

‘‘एवढी वर्षे मी एकटी राहिले याचा अर्थ नाही असं समज.’’

‘‘ताई, मला थोडी आगाऊ म्हणा किंवा मुंबईत लहानाची मोठी झाल्यामुळे कदाचित मोकळ्या स्वभावाची म्हणा, मला निश्चित वाटतं तुमच्या सारख्या स्त्रीसाठी अनेकजण झुरले असतील पण तुम्ही दुर्लक्ष केलं असणार.’’

‘‘असेल कदाचित’’ नाश्ता संपवता संपवता ताई म्हणाली. तिच्या कपात चहा ओतता ओतता अनिता म्हणाली –

‘‘मला लग्न होऊन जेमतेम आठ दिवस झाले. म्हणजे सांगलीत मी फक्त आठ दिवसांपूर्वीच आले. एवढ्यात मला दोन सुंदर, सुस्वभावी कर्तबगार व्यक्ती बाहेरुन आनंदी पण आतून दुःखी दिसतात.’’

‘‘मी नाही हं दुःखी, मी माणसं, माझे पेशंट, मित्रमंडळी यासर्वांत एवढी अडकलेली असते की दुःख करायला वेळच नाही माझ्याकडे आणि दुसरं कोणाबद्दल बोललीस ?’’

‘‘प्रभात दादा बद्दल. मला कालच समजलं, प्रभात दादा पण एकटे आहेत. त्यामुळे काकूना पण त्रास होतो आहे.’’

‘‘प्रभातचं लग्न झालं होतं’’

‘‘हो कळलं मला, पण ते यशस्वी होऊ शकले नाही. ताई प्रभात दादा तुमचे वर्गमित्र ना ?’’

''चौथी पासून दहावीपर्यंत, पण त्याचे आणि माझे कधीच जमले नाही. लहानपणी सतत भांडायचो आम्ही''

''आणि आत्ता ?''

''आत्ता मी प्रभात बरोबर जास्त बोलतच नाही. कधी समोर आलाच तर जेवढ्यास तेवढे''

''प्रभात दादा सर्वांना प्रिय आहेत मग तुमच्या बरोबर का जमत नाही ?''

''लहानपणी माझ्या वेण्या ओढायचा तो, त्यामुळे त्याच्या पासून लांब लांब राहिले मी. तो घरी येतो नेहमी. आईबाबांबरोबर, तुझ्या नवऱ्याबरोबर त्याचे गुळपीठ असते पण माझ्याबरोबर नाही.''

''ताई, सांगलीत आल्यापासून मला तुम्ही खूप आवडलात. तसेच प्रभात दादा पण फार आवडले. पण माझे दुर्दैव हे की, माझी दोन्ही आवडती माणसं एकटी आहेत. ताई धाडसाने बोलते मी रागावू नका. मला वाटतं तुम्ही आणि प्रभात दादा ''मेड फॉर इच अदर'' आहात.''

''काय ?'' ताईने दचकून विचारले. ''कोण प्रभ्या ? एक नंबरचा मस्तीखोर. तो आणि मी एकत्र येऊ ? शक्यच नाही....'' एवढं बोलून ताई ताडताड चालत आपल्या रुममध्ये गेली आणि तिने दरवाजा आतून लावून घेतला.

## सुकन्या (ताई) -

आत्ता अनिता बोलून गेली - तुम्ही आणि प्रभात दादा मेड फॉर इच अदर आहात. प्रभात माझा नवरा ? छे ! छे !! अजिबात नाही. सीटी हायस्कूलमध्ये मी पाचवीत होते तेव्हा काही द्वाड पोर मुलींना त्रास द्यायची. मागून वेण्या ओढायची. प्रभ्या त्यातला एक. मग सहावीत आमच्या वर्ग शिक्षकांनी नाटक बसवले. त्यात प्रभ्या आणि मी होतो. प्रभ्या नाटकात काम छान करायचा. (अजूनही त्याचे नाट्य प्रेम आहेच. भावे नाट्यगृहामध्ये त्याचा ग्रुप जमतो. प्रभ्या नाटकात काम छान करतो.) एकत्र नाटक केल्यामुळे तो घरी यायला लागला. त्याचे वडील आणि माझे वडील मित्र निघाले. दोघही संघाचे कार्यकर्ते. त्यामुळे संघाच्या बैठकीत ते भेटायचे. आम्ही आठवीत असताना प्रभ्याचे वडील वारले आणि तो पोरका झाला. माझ्या आईवडिलांनी त्याला खूप सांभाळले. त्यामुळे तो घरचाच झाला. बाबा, आई, विनोद यांचे त्याच्याशी खूप जमते. एम.आर. म्हणून तो कंपनीत नोकरीला लागला आणि त्या लाईनची ओळख झाल्यानंतर त्याने आपली एजन्सी काढली. फार मोठा बिझनेस वाढवला त्याने.

मी बारावीनंतर बी.ए.एम.एस. करायचे ठरवले तेव्हा सरकारी कोट्यातून

मला सावंतवाडीचे आयुर्वेदिक कॉलेज मिळाले. सावंतवाडीतील मस्त तळ्याकाठी कॉलेज मिळाले म्हणून मी खुश होते. तेथे मला भेटला तन्मय, तन्मय फोंडेकर. गोव्याचा. सर्वांना तो आवडायचा. अभ्यासात हुशार होताच पण त्याच्या अंगात अनेक कला होत्या. संगीतात त्याला जास्त रुची होती. त्याचे वडील गायक होते. आई संगीत विद्यालयात शिक्षिका होती. घरात संगीताचे वातावरण. अनेक शास्त्रीय गायक त्यांचेकडे यायचे.

त्याची आणि माझी ओळख झाली आणि मी त्याच्याकडे ओढले गेले. त्याचे बोलणे ऐकत रहावे असे वाटायचे. सावंतवाडीतील तलावात केशवसुतांच्या तुतारीसमोर बसून आम्ही मस्त गप्पा मारायचो. मला वाटायचे त्याला माझ्यात इंटरेस्ट आहे, कधीतरी तो प्रेमाचे विचारेल, लग्नाचे विचारेल पण फक्त एकदाच तारकर्लीला वर्गातील मित्रमंडळी गेलो होतो तेव्हा मी त्याच्या बाजूबाजूने चालत होते. सुर्यास्त व्हायला आला आणि तो क्षण डोळ्यात साठविण्यासाठी आम्ही एकटक सूर्याकडे पाहत राहिलो. माझ्या बाजूला तन्मय होताच. त्या अंधुक अंधुक प्रकाशात तन्मयने माझा हात हातात घेतला. मी पण माझी बोटे त्याच्या बोटावर दाबली. मी सूर्याकडे पहायच्या ऐवजी तन्मयकडेच पाहत होती. हळूच त्याच्या खांद्यावर माझे डोके टेकले. पण दुसऱ्या क्षणी सूर्य बुडाला तशी मुले मोठ्याने ओरडली आणि तन्मय बाजूला झाला. त्यानंतर सुध्दा तो नेहमी सारखाच बोलायचा. तो डॉक्टर होत होता, पण पुढे संगीत शिकायचे की डॉक्टरी करायचे हे त्याचे निश्चित होत नव्हते. मिनिटा मिनिटाला त्याचे बेत बदलायचे.

फायनल परीक्षा झाली आणि मुलांनी हॉस्टेल सोडले. जो तो आपआपल्या घरी जायला निघाला. मला वाटत होते. तन्मय आता तरी आपल्याशी प्रेमाचे बोलेल पण त्याचे काही चिन्ह दिसेना म्हणून मीच त्याला गाठले आणि मला तू आवडतोस आपण आयुष्यभरासाठी एकत्र येऊया असे म्हटले. तेव्हा तो घाई घाईत म्हणाला,
''सुकन्या, माझं काही निश्चित नाही गं, मी बनारसला संगीत शिकण्यासाठी जातोय. एवढ्यात लग्न वगैरे करण्याचा काही विचार नाही. तू माझी वाट पाहू नकोस.'' असं म्हणून त्यानं झिडकारलच मला. मी सांगलीत आले तरी पण त्याची वाट पाहत राहिले. दवाखाना सुरु झाला, पेशंट यायला लागले पण मनातून कुठेतरी वाटत होते कधीतरी तन्मयचा फोन येईल. त्याची वाट पाहत एवढी वर्षे राहिले. आता मात्र मी निराश झाले आहे. तन्मयची वाट पाहण्यात अर्थ नाही. माझ वय वाढत चाल्लय. अनेकांनी चांगल्या चांगल्या मुलांची स्थळे सुचवली, मी नकार देत राहिले आणि आज अचानक अनिताने प्रभात बरोबर लग्नाचे विचारले. पण प्रभात मला आवडतो का ? हा प्रश्न. आणि तो माझ्याशी लग्नाचा विचार करु शकतो का ? हा ही प्रश्न. तस

त्याच्या मनात असतं तर त्याने आरती बरोबर लग्न करण्याआधी मला विचारलं असतं. त्यामुळे प्रभात बरोबर लग्न ? नहीं, कभ्भी नहीं...!

**अनिता –**

देशमुखांच्या घरात मी नवी खरी पण आगाऊपणे ताई आणि प्रभात दादा यांचे लग्न ठरवायला निघाले. आठ दिवसांच्या सहवासाने वाटलं होतं की ही दोघं खरचं एकमेकांसाठी आहेत. ताईला मी प्रभातदादा बद्दल विचारले पण तिचं तेच तुणतुणं, ''तो द्वाड होता, म्हणून त्याच्याशी माझं जमत नाही वगैरे...'' लहानपणाचा द्वाड गुण आत्ता राहिलायं का ? आणि हल्ली मुली द्वाड मुलांवरच जास्त मरतात हे या काकूबाईंना कोण सांगणार ? ताई नंतर आता प्रभात दादाकडेपण चाचपणी करायला हवी. तशी संधी मला मिळाली.

शनिवारी अर्धा दिवस बँक, त्यामुळे दुपारी दोनला मी घरी चालत निघाले. वाटेत प्रभात दादाची एजन्सी. मी प्रथमच दादाच्या एजन्सीमध्ये पाय ठेवला. बाहेर कॉम्प्युटरवर काम करणाऱ्या मुलीने दादाचे ऑफिस दाखवले. मी केबिनचे दार उघडून आत गेले एवढ्यात दादाने मला पाहिले.

''अग ये ये, अनिता, आज प्रथमच ऑफिसमध्ये ? काय विशेष ?''

''दादा, मला तुमच्याशी जरा महत्त्वाचं बोलायचं होतं'' मी आजुबाजूला पाहत म्हटलं.

''ओके'' दादाने केबिनचे दार बंद केलं आणि म्हणाला,

''आता बोला''

''दादा, त्या दिवशी मी विनोद बरोबर पहिल्यांदा तुमच्या घरी गेलेली.''

''हो, हो आई बोलली मला. तू येणार हे माहीत असतं तर मी आधीच आलो असतो घरी. ''

''नाही, अचानक ठरलं. दादा मी नवीन असून काही विचारु का ? रागावू नका. दादा तुमचं वैवाहिक जीवन असं अर्धवट राहिलं याचं वाईट वाटत हो मला. काकू पण एकट्या झाल्यायत. एवढ्या मोठ्या घरात दोन माणसं, तुम्ही दिवसभर बाहेर, तुम्ही काहीतरी विचार करायला हवा. कोणीतरी आपल्या हक्काचं हवं ना ?''

''हो ग, मला पण समजतं.'' असं म्हणताना प्रभातच्या डोळ्यात पाणी आलं. घसा भरुन आला.

''माझ्या आयुष्याचा खेळच झालाय सध्या. एकदा पायरी चुकली की गडगडून पडायच हे निश्चित.''

''झालं ते झालं दादा, पण तुम्ही लवकरात लवकर लग्नाचा विचार करावा असं

मला वाटतं.''
''लग्नानं तोंड कडू झालयं ग माझं.''
''पण ते तोंड गोड करु शकणारी स्त्री आहे ना आपल्याकडे !''
''काय ? कोण ग बाई ?''
''तुमची बालमैत्रीण, ताईबद्दल बोलतेय मी. तुम्ही दोघ एकमेकांसाठी अनुरुप आहात असं मला वाटतं.''
''कोण सुकन्या ? ती घमेंडी मुलगी? अनिता त्या घरात मी शिरलो तो सुकन्येचा वर्गमित्र म्हणून पण तिचं माझं कधी जमलचं नाही. ती स्कॉलर पहिली बेंचवाली. आम्ही लास्ट बेंचवाले. तिच्या दृष्टीने ढ आणि मस्तीखोर. त्या घरातली सर्व मंडळी मला एकदम जवळची आहेत एक सुकन्या सोडून. तिच माझ्याशी कधी जमलं नाही आणि यापुढे जमणार नाही.''
''पण दादा, तुम्ही विचार करावा.''
''सॉरी अनिता, हे कधीच जमायचे नाही.''
निराश होऊन मी त्यांच्या केबिनमधून बाहेर पडले. हे दोघेहीजण आपआपला अहंम सांभाळत आहेत.

पुढे चार महिने गेले आणि एक दिवस अनिता बँकेत काम करीत असताना तिच्या नवऱ्याचा विनोदचा तिला फोन आला. तो प्रचंड घाबरलेला होता.
''अनिता, प्रभातला मोठा ॲक्सिडंट झालाय''
''कुठे ?'' अनिता किंचाळली.

''पुण्याहून सांगलीला आपल्या गाडीतून येत होता. साताऱ्याजवळ याची गाडी लक्झरी गाडीवर आदळली. प्रभातला खूप लागलय बहुतेक, मी आणि ताई तिकडे जातोय.'' एवढं म्हणून विनोदने फोन ठेवला. अनिताचे पाणी पाणी झालं. मॅनेजरना सांगून ती बाहेर पडली आणि रिक्षा करुन घरी आली. घरी पोहोचेपर्यंत विनोद आणि ताई साताऱ्याला रवाना झाले होते. आईबाबा सगळे काळजीत होते. बाबांनी जाऊन प्रभातच्या आईला पण या घरीच आणले होते. बाबांच्या कानाला मोबाईल चिकटलेला होता. सगळीकडून ते बातम्या घेत होते. थोड्या वेळाने समजले कराडच्या कृष्णा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्याचे. बाबा ताईला सतत फोन करत होते. पण ताई फोन घेत नव्हती. घरातील वातावरण चिंताजनक झाले होते. प्रभातच्या आईला खोटचं – आता बर आहे प्रभातचं असं सांगून वेळ मारत होते.

सायंकाळी सात वाजता ताईने बाबांना फोन लावला. ताई रडत रडत बोलत होती. बाबा फार सिरीयस कंडिशन आहे हो, डोक्याला मार लागलाय. बाकी पाय मोडलाय, हात फ्रॅक्चर आहे ते सर्व बरं होईल पण स्कल इंज्युरीची भीती वाटते. काही

तरी तातडीने निर्णय घ्यायला लागेल. मी प्रयत्न करते आहे मग तुम्हाला कळवते. असं म्हणून ताईने फोन ठेवला.

बाबांच्या पण डोळ्यात पाणी जमा झाले होते पण ते इतरांना दाखवत नव्हते. बाबांनी बळेबळे सर्वांना दुधभात खायला लावला आणि त्यांनी सांगलीच्या आमदारांना फोन लावला. आमदार पण संघाशी संबंधीत त्यामुळे बाबांच्या चांगल्या ओळखीचे. आमदारांनी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या पी.ए.ना फोन लावला आणि एअर टॅक्सीने प्रभातला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. ताई आणि विनोद बरोबर होतेच. मुख्यमंत्र्यांच्या ऑफिसमधून खास मेसेज आल्याने बॉम्बे हॉस्पिटलमध्ये मुंबईतील सर्व तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासण्या झाल्या आणि तातडीने ब्रेन सर्जरी झाली. हॉस्पिटलमध्ये सांगण्यात आले पंधरा दिवसानंतर कदाचित आणखी एक ऑपरेशन करावं लागेल. प्रभात बेशुध्द होता. ताई सतत बाहेर काळजीत बसलेली असायची. डॉक्टर्स रोज औषधं लिहून देत होते. ताई आणून देत होती.

सांगलीतील घरातील वातावरण टेन्स होते. कधी कसला फोन येईल याची भीती वाटत होती. अनिता रजेवरच होती. किचनमध्ये थोडफार शिजवून सर्वांना बळेबळे खायला लावत होती. पंधरा दिवसांनी मुंबईतील प्रसिध्द न्युरोसर्जनने दुसरं ऑपरेशन केले आणि अपघातानंतर डोक्यात आलेले सर्व अडथळे बाहेर काढले. आता डॉक्टरना आशा वाटायला लागली. आणखी चार दिवसांनी प्रभात किंचित डोळे उघडायला लागला. पण अजून नजरेत ओळख नव्हती. काही दिवसांनी नजरेत ओळख यायला लागली. त्याने सर्वात प्रथम ताईलाच ओळखले. सुकन्या... म्हणून तो पुटपुटला. दोन दिवसाने त्याने विनोदला ओळखले. मग हळूहळू त्याच्या प्रकृतीत सुधारणा दिसू लागली. ताई चौवीस तास त्याच्यावर लक्ष ठेवून होती. त्याच्या तब्येतीतील सुधारणा सांगलीत घरी कळवित होती. चार महिन्यानंतर प्रभातला डिस्चार्ज मिळाला आणि तो सांगलीत डॉ. शहांच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाला. डॉ. शहा ताईच्या खास ओळखीचे त्यामुळे सर्व सोपे झाले. हळूहळू प्रभात स्टीक घेऊन चालू लागला. ओळखू लागला, थोड थोड बोलू लागला.

पंधरा दिवसानंतर प्रभातला डिस्चार्ज मिळाला पण अजून त्याच्याकडे लक्ष देणे गरजेचे होते त्यामुळे तो देशमुखांच्याच घरी आला. सकाळ संध्याकाळी ताई त्याचे खाणे पिणे, व्यायाम यावर लक्ष ठेवून होती.

या अपघातानंतर ताई आणि प्रभात यांच्यातला अबोला कमी झाला. अनिताच्या लक्षात आलं आता प्रभात घरात कुणाही पेक्षा ताईबरोबर जास्त बोलू लागला. दोघंही एकमेकांच्या सहवासात आनंदी दिसत होते. त्यानंतर प्रभातच्या तब्येतीत सुधारणा झाली. देशमुखांच्या घरी सहा महिने राहिल्यानंतर तो आणि त्याची

आई आपल्या घरी गेली. गेल्यावर्षी गणपतीच्यावेळी प्रभात हॉस्पिटलमध्ये होता, सिरीयस होता. यावेळी प्रभात पूर्वीसारखा झालेला. दोन्ही घरात आनंद होता. प्रभातच्या घरी दरवर्षी गणपतीची पूजा व्हायची. गेल्यावर्षी झाली नव्हती याची प्रभातच्या आईला रुखरुख होती. यंदा तिने गणपती आणून सत्यनारायण घालायचा असे ठरविले. सत्यनारायण पूजा झाली, सर्व पाहुणे, आमंत्रित गेले आणि घरची मंडळी कॉफी प्यायला बसली.

**अनिता –**

केवढं मोठं संकट टळलं. प्रभात दादा खडखडीत बरे झाले. पुन्हा मोटर सायकल चालवायला लागले. ऑफिसात जायला लागले. त्यांच्या आयुष्याची दोरी बळकट होतीच पण ताईने त्यांची जीव तोडून काळजी घेतली म्हणून तिला श्रेय द्यावेच लागेल. प्रभात दादाला याची जाणीव होती. हल्ली मी पाहते दोघांच्याही डोळ्यात एकमेकांबद्दल स्निग्ध भाव दिसत होते. एकमेकाच्या वाऱ्यालाही न उभा राहणारे आता गप्पा मारायचे. आणि खरं सांगू याचा मला खूप आनंद होतो.

प्रभात दादांकडे सत्यनारायणाच्या नंतर दोन्ही घरची मंडळी होती. ताई मस्त नारिंगी साडीत होती, प्रभात दादा लेंगा, झब्बा, जॅकिटमध्ये होते. दोन्ही घरची मंडळी समाधानाने कॉफी पित असताना मी बोलायला लागले.

''बाबा, आई, काकू तुम्हा सर्वांपुढे मी लहान आहे, तशीच दीड वर्षापूर्वीच लग्न करुन देशमुखांच्या घरी आली आहे. मी आगाऊ बोलत असेन तर मला क्षमा करा. पण या गणपतीच्या आणि सत्यनारायणाच्या कृपेने आपले प्रभात दादा बरे झाले. आपल्या ताईने खूप मेहनत घेतली. आपला डॉक्टरी व्यवसाय जवळ जवळ सहा महिने बंद ठेवून ती प्रभात दादांच्या तब्येतीसाठी झटली. तिच्याचमुळे आणि हॉस्पिटलमधील डॉक्टरांमुळे प्रभात दादा बरे झाले. मी लग्न होऊन सांगलीत आले तेव्हा मला कळलं आपली ताई अविवाहित आहे. एवढी सुंदर, हुशार, मेहनती, सुस्वभावी स्त्री एकटी का आहे ? तसेच प्रभात दादांचे लग्न अयशस्वी ठरले त्यामुळे ते पण एकटेच आहेत. मला वाटते या दोन वर्ग मित्रांना आता एकटे ठेवायचे नाही. ही दोघं एकमेकांसाठी अनुरुप आहेत. तेव्हा या दोघांची लग्नगाठ लवकरात लवकर मारावी.''

जे सर्वांच्या मनात होतं तेच कदाचित अनिता बोलत असल्याने सर्वांना खूप आनंद झाला. सर्वांनी ताईकडे पाहिलं. ताई प्रथमच हलकेच हसली. प्रभात दादापण खुश दिसला. त्या दोघांकडे पाहून सर्वांनी टाळ्या वाजवल्या. आई उठल्या आणि ताईकडे गेल्या. ताईने त्यांच्या खांद्यावर आपली मान ठेवली. आईने कौतुकाने तिला

थोपटले. बाबा खुश झाले. काकूंसमोर हात जोडून उभे राहिले.
''वहिनी, माझ्या लेकीला सून करुन घ्या.''
काकू खुशीने हसल्या, दोन्ही घरं आनंदीत झाली.
मग लग्नाची तयारी सुरु झाली. खरेदी सुरु झाली. घरांना रंगरंगोटी केली गेली. पाहुण्यांना, नातेवाईकांना निरोप गेले. सर्वांना खूप आनंद झाला. पत्रिका छापायला दिल्या, छापून आल्या पण. अरे हो, मघापासून मी तुम्हाला गोष्ट ताईच्या आणि प्रभात दादाच्या लग्नाची गोष्ट सांगतेय पण तुम्हाला आमंत्रण द्यायचे राहिले नाही का ?

।। श्री गजानन, दत्त महाराज प्रसन्न ।।
स.न.वि.वि.,
आमचे येथे आमची कन्या,
**चि. सौ. कां. सुकन्या (ताई)**

**हिचा शुभविवाह**
**चि. प्रभात**
(कै. शंकरराव प्रभावळकर, सांगली यांचा सुपुत्र)

**दि. १५ नोव्हेंबर सकाळी १०.३० मि.**
**स्थळ** : श्री दत्त मंदिर सभागृह, नृहसिंहवाडी,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

**आपले,**
श्री. दत्तात्रय ज्ञानेश्वर देशमुख
सौ. माधवी दत्तात्रय देशमुख

**आमच्या ताईच्या आणि प्रभात दादाच्या लग्नाला यायचं हं....**
श्री. विनोद दत्तात्रय देशमुख
सौ. अनिता विनोद देशमुख

**हेच आमंत्रण समजून सर्वांनी लग्नाला यायचं हं....!**

# मृत्युपत्र

प्रदीप केळुसकर. – मोबा. ९४२२३८१२९९/९३०७५२११५२

केशव काकांच्या तेराव्याचे जेवण जेवून शेजारी, नातेवाईक पांगले आणि घरात राहिले मोहन, वसंता हे केशवरावांचे दोन मुलगे, यशोदा ही लग्न झालेली मुलगी, मोहनची बायको आशा, वसंताची बायको नलिनी आणि केशवरावांची पत्नी सुमतीबाई.

मोहन आणि मोहनची बायको आशा उद्याच मुंबईला जायची आणि बहीण यशोदापण उद्याच आपल्या घरी जायची. सकाळपासनू भटजींची गडबड. जेवण, येणारे नातेवाईक. गडबड नुसती. वसंताची बायको नलिनी सोडली तर बाकीचे जरा पडले होते. मोहन, वसंता लोट्यावर आणि मोहनची बायको आशा, बहीण यशोदा आत वाणशीमध्ये. त्यांची आई आत काळोखाच्या खोलीत. नलिनी येथेच राहणारी. त्यामुळे तिला घरची भांडीकुंडी, धुणी याची काळजी. त्यामुळे ती बिचारी भांडी धुत होती. गळून झाली की स्टॅण्डवर ठेवत होती. ती मनात म्हणत होती. उद्या मोहन भावोजी आणि आशा वहिनी मुंबईला जाणार म्हणून त्यांचे कपडे उन्हात सुकवायला हवेत. एकीकडे तिला तिचा मुलगा शंतनु याची बारावीचा अभ्यास चुकतो आहे याचे वाईट वाटत होते. पण उद्या सर्व मंडळी गेली की घर खायला येणार असेही वाटत होते.

गेले पाच महिने सासरे आजारी त्यामुळे त्यांचे करताना तिला वेळ पुरत नव्हता. सासुबाई असतात पण त्यांचे गुढगे संधीवाताने सतत दुखत असतात. त्यामुळे सासऱ्यांचे सर्व तिनेच केले. त्यांना जाऊन आज तेरा दिवस झाले. आता उद्यापासून नेहमीचेच. नवरा उठून बागेत जाईल, शंतनुची शाळा त्यामुळे उरलो आपण आणि सासुबाई. सकाळपासून भाकरी, चहा मग पेज, दुपारी जेवण पुन्हा चहा, पुन्हा रात्रीचं जेवण यामध्ये विहिरीवरुन पाणी आणायचे, गोठ्यातल्या जनावरांना पाणी द्यायचे, शेण काढायचे, गवत काढायचे. दुपारी बाजारात जाऊन घर सामान आणायचे. दुपार उतरली की, बागेत जाऊन पतेरा गोळा करायचा. तो भातशेतीच्या जमिनीवर टाकायचा. तिन्हीसांज झाली की गाईचे दूध काढायचे. गुरांना गवतकाडी घालायचे. नवरा वसंता घरी असला तर मदत करायचा. पण तो गवंडीकाम करायला गेला तर सकाळी बाहेर पडायचा तो रात्रीच घरी यायचा. शंतनुचा आतल्या खोलीत अभ्यास. मध्येच उठून तो आजीची औषधे देतो. त्याचे आजोबा त्याच खोलीत बाकावर पडलेले असत. त्यांना स्वच्छ करायचा. तोंडात औषधे घालायचा. झाले ! उद्यापासनू

रोजचेच काम... असे मनातल्या मनात म्हणत नलिनी चहा करायला गेली. गोबरगॅस तिने चालू केला पण लक्षात आले गॅस येत नाही. कारण घरच्या गडबडीत गोबरगॅसमध्ये शेण घालायचे राहिले. तिने माडाच्या चुडत्या पेटवल्या आणि चुलीवर आधण ठेवले. घरातल्या भांड्यांचा आवाज ऐकताच बाहेर वामकुक्षी करणारी मंडळी जागी झाली. तोंड वगैरे धुऊन चहा प्यायला जमली. नलिनीने स्टीलच्या कपात प्रत्येकासाठी चहा ओतला आणि एक-एक कप प्रत्येकाच्या हातात दिला. एक कप नेऊन आत सासुबाईंना दिला. चहा पिता पिता वसंता मोठ्या भावास म्हणजेच मोहनला विचारु लागला.

''दादा ! मग विवेक केव्हा चललो अमेरिकेत ?''

''बहुतेक पुढच्या महिन्यात. काय आसता अमेरिकेतल्या विद्यापीठाकडून निश्चित ॲडमिशनचा कळला की मग तिकिटासाठी धडपड करुक व्हयी.''

''मग विवेक आता मोठ्या कॉलेजमधून इंजिनिअर झालो, मग पुढचा शिक्षण आपल्या देशात मिळणा नाय काय ?''

''काय आसता, अमेरिकन विद्यापीठांका जगात मोठो मान आसता. तिकडे ॲडमिशन मिळणा कठीण आणि खर्च भरपूर. पण एकदा का तो एमएस झालो की मग खोऱ्यांनी पैसे कमवतलो.''

''पण खर्चपण खूप येता ना रे ?''

मध्येच आशा बोलली - ''हो येणारच, शिक्षण आहे ना स्टॅण्डर्ड, मग खर्च करायलाच हवा आणि आम्ही कर्ज घेतलयं बँकेकडून. त्यात इकडे तातडीने याव लागलं तो खर्च वाढला नाहीतर आम्हाला एवढ्यात गावी यायचं नव्हत. खर्च खूप होतो.'' आशा बडबडत सुटली.

आत नलिनी नारळाच्या झावळ्या पेटवून काजू भाजताना हे सर्व ऐकत होती. मोहनरावांची बायको आशा आतमध्ये बॅग भरायला गेली. एवढ्यात दारात मारुती कार येऊन थांबली. गाडीतून कोण येतय म्हणून वसंता आणि त्याचा मुलगा शंतनु खळ्यात आले. गाडीतून कणकवलीचे वकील नाडकर्णी आणि त्यांचा ड्रायव्हर हातात बॅग घेऊन उतरले. अचानक एवढे मोठे कणकवलीचे वकील कसे काय ? अशा आश्चर्यात असताना मोहनरावांनी वकीलांना खुर्ची दाखवली. समोरच्या बाकावर मोहनराव बसले. बाजूला येऊन वसंता बसला. आत बॅग भरायला गेलेली आशा मोहन वसंताची लग्न झालेली बहीण यशोदा उंबऱ्यावर येऊन उभ्या राहिल्या. आत चहाची भांडी धुणारी वसंताची बायको नलिनी वाणशीतून वकीलांकडे पाहू लागली. वसंताचा बारावीतील मुलगा शंतनु तो पण आईच्या बाजूला येऊन उभा राहिला.

नाडकर्णी वकिलांनी सर्वांकडे एकदा नजर टाकली आणि ते बोलू लागले. ''मंडळी, मला तुम्ही ओळखत असालच. मी ॲड. ज्ञानेश नाडकर्णी, कणकवलीत गेली पंचवीस वर्षे वकीली करतो. आता आज अचानक मी तुमच्याकडे का आलो याचा आश्चर्य वाटले असेल. पण त्याचे कारण कै. केशवराव मुंज म्हणजेच या घरचे कर्तेपुरुष हे चार वर्षापूर्वी कणकवलीत माझ्या ऑफिसमध्ये आले होते. त्यांना त्यांची या गावात असलेल्या मालमत्तेचे मृत्युपत्र करायचे होते. त्यांच्या इच्छेनुसार मी रजिस्ट्रारकडे जाऊन त्यांचे मृत्युपत्र रजिस्टर्ड केले. केशवराव मुंज यांचे निधन होऊन आज तेरा दिवस झाले. त्यामुळे त्यांचे हे मृत्युपत्र मी तुमच्या समोर ठेवतो. सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. मोहनला किंवा वसंताला आपल्या वडिलांनी मृत्युपत्र केल्याचे माहीत नव्हते. असे मृत्युपत्र का केले असेल याचा प्रत्येकजण विचार करत होता.

तेवढ्यात वकील साहेब पुढे म्हणाले – ''केशवराव मुंज यांच्या इच्छेनुसार हे त्यांचे राहते घर त्यांचे दोन मुलगे मोहन आणि वसंत यांच्या नावावर केले आहे. आणि केशवराव मुंज यांच्या नावावर असलेली या गावातील ३२ गुंठे जमीन त्यावरील २६ आंब्याची कलमे, २० काजूची झाडे आणि १० गुंठे भातशेती जमीन फक्त वसंत केशव मुंज याच्याकरिता ठेवली आहे. तसेच या दोघांनी आपली लग्न केलेली बहीण सौ. यशोदा हिचे माहेरपण करावे अशी सूचना केली आहे. बाकी केशवरावांकडे सोने किंवा बँकेत पैसे वगैरे काहीच नाही. एवढेच मला सांगायचे होते. आता हे मृत्युपत्र महसूल विभागाकडे देऊन त्याप्रमाणे नावे लावून घेणे. नाडकर्णी वकील निघण्याच्या तयारीत असताना संतापलेला मोहनराव वकीलांना म्हणाला – ''नाडकर्णी साहेब मृत्युपत्रासाठी माझे वडील एकटे आले होते की हा वसंता आला होता ? कारण वडीलांनी माझ्यासाठी काहीच जमीन ठेवली नाही याचे मला आश्चर्य वाटते.''

''मोहनराव माझ्या आठवणीनुसार मृत्युपत्र करण्यासाठी एकटे तुमचे वडिलच आले होते.''

''वकील साहेब निश्चित आठवा हा वसंता त्यांना घेऊन आला असणार. नाहीतर माझ्यावर असा अन्याय करणार नाहीत ते.'' मोहनराव चिडून बोलत होता.

''नाही मोहनराव, ते एकटेच आले होते आणि आपल्या हयातीत आपण केलेले मृत्युपत्र तिनही मुलांना कळता कामा नये अशी त्यांनी विनंती केली होती. त्यानुसार आजच आपणासमोर मी हे उघड करतो आहे.''

मोहनराव आणि त्याची पत्नी आशा भयंकर संतापली होती. आशा आपल्या नवऱ्याला एकाबाजूला बोलावून काही सांगत होती. वसंता मान खाली घालून ऐकत

होता. आत वसंताची बायको नलिनी आणि शंतनु काकांचा चढलेला आवाज ऐकून कावरेबावरे झाले होते. नाडकर्णी वकील गाडीत बसून निघून गेले.

मोहनराव वसंताकडे पाहून कडाडले.

''तू जाणूनबुजून हे केलस. मी बाबांचा मोठा मुलगा असताना मला जमिनीतील एक इंच जमीन दिली नाही. सगळी जमीन तुझ्या नावावर. एवढा कारस्थानी असशील असे वाटले नव्हते.'' आशा आता चिडून बोलू लागली.

''खाली मुंडी पाताळ धुंडी, आम्ही आलो की दादा दादा म्हणत मागे येतो. मग दादाला साफ फसवलं कसं? वसंता घाबरुन म्हणाला,

''दादा, खराच माका काय म्हायती नाय रे ! बाबांनी माका कायएक सांगूक नाय, नायतर मी असा करुक दिलय नसतयं, व्हया तर आईक विचार.''

मोठ्या मोठ्याने बोलणे ऐकून त्यांची आई एव्हाना आपल्या खोलीतून बाहेर आली. थोरल्याचे आणि सूनेचे बोलणे तिने ऐकले होते. ती बोलायला लागली.

''मोहना, या वसंताक खराच काय म्हायती नव्हता. तुझ्या वडिलांनी फक्त माका सगळा सांगितलेल्यानी, नायतर ह्यो वसंतापण तयार झालो नसतो.''

''मग असं का केल? मी त्यांचाच मुलगा आहे ना ? थोरला मुलगा. मग माझा हक्क कडावलला ?''

आई बोलू लागली - ''मोहना, चिडा नको, तुझ्या बाबांचा म्हणणा होता पाच-सहा वर्षापूर्वी ते सतत विचार करत रवत तेव्हा मी त्यांका विचारलय इतकी कसली विवंचना आसा ?''

**पाच वर्षापूर्वी.....**

केशवराव सतत विवंचनेत असत. आपल्या दोन नंबरचा मुलगा वसंता याचे आपल्यामागे कसे होईल याची त्यांना काळजी वाटे. या दोन मुलातील मोठा मोहन अभ्यासात हुशार. पहिल्यापासून एक दोन नंबराने पास होत गेला. आपणास त्याचे कौतुक वाटे.

आपल्या या परिस्थितीत पाचवीपासूनच त्याला कणकवलीतील एस.एम. हायस्कूलमध्ये घातले. त्याच्या वर्गात कणकवलीतील डॉक्टर्स, प्रोफेसर्सची मुले होती. सातवी स्कॉलरशीपमध्ये तो जिल्ह्यात पाचवा आला. त्याचे फोटो सर्व पेपरमध्ये छापून आले. त्याच्या शिक्षकांनीपण त्याच्या अभ्यासात लक्ष घातले. दहावीत तो जिल्ह्यात तिसरा आला. त्याची आवड म्हणून तो कॉमर्सकडे गेला. बारावीत पुन्हा चांगले मार्क्स मिळाले. त्याच्या मुंबईच्या मामाने त्याला मुंबईस नेले.

तेथे तो बी.कॉम. झाला सी.ए. झाला आणि मोठा सरकारी ऑफिसर बनला. त्याची प्रगती होतच राहिली.

मामांच्या मुलीशी आशाशी त्याने लग्न केले. सासऱ्याने त्याला अंधेरी भागात मोठा ब्लॉक दिला. त्याचा एकच मुलगा त्यांच्यासारखाच हुशार, शिवाय चांगली शाळा, क्लास यामुळे तो शिकत गेला. मोहनच्या घरात सुबत्ता. मोहनने पुण्यातपण घर घेतल्याचे ऐकले. हल्ली मोहन काही सांगत नाही. पण त्याच्या मित्रांकडून कळले. त्याच्या बायकोने आशाने आपल्यापासून तोडलच त्याला. दोन वर्षातून केव्हातरी गणपतीत येतो. येतो पण तो तिसऱ्या दिवशी. तिसऱ्या दिवशी येऊन गणपतीच्या पुजेला बसतो आणि दोघेजण जातात कणकवलीत लॉजवर. परत पाचव्या दिवशी गणपती पोहोचवायला येतो आणि गाडीत बसून मग कणकवली आणि मग मुंबई. वर्षातून चुकून कधी फोन केला तर. तो आपल्यापासून लांब गेला.

पण धाकटा वसंता तसा हुशार होता पण बारावीनंतर आपण त्याला पुढे पाठवल नाही. त्यालाही तशी अभ्यासाची आवड नव्हतीच. म्हटले, आपल्या सोबत म्हातारपणी कोणीतरी हव. तो पण प्रामाणिकपणे शेतीत, बागायतीत लक्ष घालतो. कष्टाची कामं करतो. शिवाय घरचे देव, सण वगैरे त्याच्या बायकोलाच करावे लागतात. त्याची बायकोपण आहे गुणी. आम्हा दोघांचे तीच मान खाली घालून करते. तिच्या माहेरीपण तशी गरिबीच. वसंताचा मुलगापण आहे लाघवी. आम्हाला दोघांना त्याने लळाच लावला. गेली दहा-पंधरा वर्षे आंब्याचे पीक व्यवस्थित येत नाही शिवाय माकडे फार वाढली आहेत. खूप नासधुस करतात. गाईच्या दूधांना आता मागणी नाही. शहरात दूध पिशव्या येतात. एकंदरीत वसंताला यापुढे घरखर्च भागविणे कठीण. आपली थोडीशी बागाईत, थोडी शेती यात जर दोन मुलांचे दोन भाग केले तर वसंताला काय राहणार ? त्याने आयुष्यभर बागायतीत, शेतीत कष्ट केले त्याला काय मिळणार ? मोठ्या मोहनने कधीच मातीत हात घातले नाहीत. पण तो हक्क मागणार म्हणून वकिलांचा सल्ला घेतला. आपल्या मागे आपली थोडी जमीन वसंताकडे राहील हे पाहणे योग्य. तो जमीन विकायचा नाही पण या शहरातल्या मुलाचा काय भरवसा ? तो बायकोच्या नादाला लागून जमीन विकेल आणि शहरात बसेल. कणकवलीत जाऊन नाडकर्णी वकीलांचा सल्ला घ्यावा. असा विचार करुन केशवराव नाडकर्णी वकीलांच्या ऑफिसात पोहोचले. वकीलांना सांगून त्यांनी मृत्युपत्र करुन घेतले आणि गावातील जमीन वसंताच्या नावे केली.

सुमतीबाईंनी आपल्या नवऱ्याने असा का निर्णय घेतला हे सांगितले आणि या निर्णयामागे वसंता किंवा त्याची बायको नलिनी यांचा काहीही संबंध नसून आपण त्यांना काहीच सांगितले नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर आशा खवळली.

''काहीच सांगू नका, याला माहीत नाही आणि त्याला माहीत नाही. तुम्ही सर्वांनी आमच्या विरुध्द कट रचलाय कट. हा इथे भावासमोर बसून रडतोय आणि ती आतमध्ये चहा करणारी एक नंबरची लबाड बाई आहे. तरी बरं बाबा नुसता भिकारी म्हणून आवाज कमी नाहीतर कुणाला ऐकली नसती.'' नलिनीच्या दिशेने तोंड करत आशा बडबडत होती.

गावचे लोक तुम्ही सगळे आळशी, काम करायला नको. मग तुमचं भागणार कसं ? बापाला मुलाची एवढी काळजी वाटते तर त्याला मजूरीच्या कामाला पाठवायचं. आंब्याच्या एवढे लाखो रुपये येतात त्याचे करता काय? आम्हाला फक्त दोन पेट्या पाठवतात. बाकी सर्व तुम्ही खाता ना ? मी एकेकाला सोडणार नाही. आई कसली ही तर कैकयी. रामाला विसरली.

ही तणतण ऐकून वसंता रडू लागला आणि आतमध्ये त्याची बायको नलिनी हुंदके देऊ लागली. शंतनु आई शेजारी बसून हे सर्व ऐकत होता. सुमतीबाई मोहनला समजावण्याचा प्रयत्न करत होत्या पण मोहन आणि आशाने आरोपावर आरोप सुरु केले. हे ऐकून कंटाळलेली बहीण यशोदा बाहेर येऊन मोहनला बोलू लागली.

''तुका फक्त हक्क व्हयो, जमिनीत वाटो व्हयो पण कसले जबाबदारे उचलतस ते सांग? एवढो मोठो ऑफिसर तू आणि श्रीमंताचो जावय कधी आईक यॅक लुगडा तरी पाठवलसं ? बापाशीक कधी लेंगो पाठवलस, या भावाशीक काय व्हया नको इचारलस ? आणि तुझी एकुलती एक बहीण मरे मी माझ्या लग्नानंतर कधी माका बघुक इलस ? बहीणीक साडी कधी धाडलसं ? नाय ना ? पण ह्यो वसंता दोन तीन महिन्यांनी बहीणीकडे येता. माझी चौकशी करता, सुट्टी पडली की माझ्या चेडवाक आजोळाक घेवन जाता. माका दरवर्षी दोन साडये घेवन येता. हेका भावस म्हणतत. तुका कसली जबाबदारी नको. फक्त प्रॉपर्टीवर नाव व्हया. ही तुझी बायल आशा सासऱ्याक कधी बघुक इल्ली ? तू एवढो बापूस शिक तर बघुक तरी इलस? आता बापूस मेलो तर हक्कासाठी भांडतस. बाबांनी केला ता बरा केल्यानी. ह्या वसंतान आणि नलिनीन तेंका बघल्यानी आणि म्हाताऱ्या आईक पण तोच बघतलो.''

तिचे हे बोलणे ऐकून मोहनराव चिडून बोलू लागला.

''यशोदे, तुझा तोंड फोडीन पुढे बोल्लस तर. तू लग्न करुन दिलेली मुलगी, ह्या प्रॉपर्टी बद्दल बोलू नकोस.''

''वा रे ! एक लक्षात ठेव माझोपण ह्या प्रॉपर्टीत हक्क आसा. आता प्रॉपर्टीत मुलांसारखे मुलींचोपण हक्क असतत.''

तेवढ्यात आशा नवऱ्याला म्हणाली - चला हो, इथे बोलण्यात काही अर्थ नाही.

कायदेशीर हिसकाच दाखवला पाहिजे यांना.
आशा आत जाऊन कपड्याची बॅग घेऊन आली. वसंता रडत रडत म्हणाला – ''दादा, जाऊ नको आज बाबांचा तेराव्या घातला, तेंका काय वाटात ? तू आणि मी उद्या तहसिलदारांकडे जाऊया. मी लिहून देतय ह्यो माझो मोठो भावस आसा ह्या प्रॉपर्टीत हेचो पण अर्धो हक्क आसा.
आशा कडाडली.
आम्हाला कोणाची भिक नको. आम्ही हक्काने येऊ या घरात. चला हो. आमचे मोठे मोठे वकील ओळखीचे आहेत. आता येऊ तो हक्काने येऊ.
असे बडबडत मोहन आणि आशा बॅग घेऊन बाहेर पडली. रस्त्यापलीकडे त्यांची गाडी उभी होती. त्यात बॅग ठेवून गाडीने निघून गेली. आत बसलेली वसंताची बायको आणि मुलगा शंतनु आता बाहेर आले.
''काय ह्या ? रागान चलते झाले. सकाळी बापाचा तेराव्या आणि दुपारी भांडण करुन गेले'' नलिनी रडत रडत म्हणाली. यशोदा येऊन तिच्या शेजारी बसली. सासुबाईपण तिथेच खुर्चीवर बसलेली. त्यांच्याही डोळ्यात पाणी होते. वसंता स्फुंदून स्फुंदून रडत होता. यशोदा वसंताला म्हणाली, वसंता भिया नको ही बहीण तुझ्या पाठी आसा. आपण दोघांनी मिळून या मोहनाक आणि त्याच्या बायकोक धडो शिकवया.

मोहन आणि आशा कणकवलीला पोहोचली. लॉजवर गेल्यानंतर आशाने मामांना फोन लावला. तिचे मामा पुण्यातील मोठे वकील. त्यांना सर्व हकिगत सांगितली आणि आमचा हिस्सा कसा मिळेल याची विचारणा केली. आशाच्या मामांनी कणकवलीत त्यांचे मित्र भोसले वकील यांची भेट घ्यायला सांगितले. आपण भोसलेंशी बोलतो असे सांगितले. दुसऱ्या दिवशी मोहन आणि आशा भोसले वकिलांच्या ऑफिसमध्ये पोहोचले.
''नमस्ते, वकील साहेब ! मी मोहन मुंज आणि ही माझी पत्नी''
''या या मोहनराव. पुण्याहून साळुंखे साहेबांचा फोन आला होता. ते म्हणाले मला आपले जावई तुम्हाला भेटणार म्हणून. बोला, काय झालं ?''
''माझ्या वडिलांनी वडिलोपार्जित जमिनीत मृत्युपत्र करुन सगळी प्रॉपर्टी माझा दोन नंबरचा भाऊ वसंता याचे नावे केली. मी त्याचा मोठा भाऊ असताना सुध्दा त्यांनी मला पूर्णपणे डावललं. माझ्यावर पूर्णपणे अन्याय झाला. मला त्या प्रॉपर्टीत माझा हिस्सा हवा, तो मला मिळवून द्या.''
''ठीक आहे, तुम्ही बाहेरच्या मुलीकडे तुमचे नाव, पत्ता, मोबाईल वगैरे द्या. आणि मला सांगा तुम्ही किती भावंडे?''
''तीन. एक लग्न झालेली बहीण आहे आणि आईपण आहे.''

''म्हणजे या प्रॉपर्टीत चार वारस आहेत बरोबर ? म्हणजे तुम्हाला या तिघांना नोटीस पाठवावी लागणार. त्यांची नावे, पत्ते द्या. बाकी प्रॉपर्टीचे सातबार, आठ-अ ही कागदपत्रं लागतील.''

''पण या मृत्युपत्राला चॅलेंज देऊ शकतो का आपण ?''

''हो, का नाही ? पैसे खर्च करण्याची तयारी ठेवा.''

मध्येच आशा म्हणाली - ''खर्च होऊंदे पण या वसंताला, यशोदेला आणि त्यांच्या आईला धडा शिकवायचा आहे मला.''

''मग ठीक आहे, सुरुवातीला पन्नास हजार जमा करा.''

''पण मिळेल का मला हिस्सा ?'' मोहनराव उद्गारला.

''हो मिळणारच, कारण ही इस्टेट आहे ती वडिलांनी मिळवलेली नाही की विकत घेतलेली नाही. ती तुमच्या आजोबांकडून वारसाने वडिलांकडे आली आहे. म्हणजेच वंशपरंपरेने आलेली आहे. त्यामुळे त्यांना मृत्युपत्र करुन कुणाला देताच येणार नाही असा युक्तिवाद करु आपण. तुम्ही आपल्या आजोबांचे वारस म्हणून त्या इस्टेटीत हक्क सांगताय असा युक्तिवाद करायचा.''

''पण यात यश मिळेल ना ?'' मोहनरावांचा प्रश्न.

''प्रयत्न करायचाच. ही अशीच एक केस मी लढतो आहे. कसालचे एक गृहस्थ आहेत. तुम्हाला नाव सांगतो - प्रमोद नाईक. हे कोल्हापूरला राहतात. त्यांच्या वडिलांनी वंशपंरपरेने आलेली इस्टेट आपल्या मुलीच्या नावावर केली. कारण म्हातारपणी त्या मुलीनेच त्या दोघांना सांभाळलं. प्रमोदरावांच्या वतीने मी चॅलेंज केलय. तुम्हाला या प्रमोद नाईकांचा नंबर देतो. त्यांना विचारा.'' वकिलांच्या सेक्रटरीने त्यांना प्रमोद नाईक यांचा कोल्हापूरचा पत्ता आणि फोन नंबर दिला.

''बर मी करतो फोन यांना. मग आम्ही निघू ?''

''हो. सर्व भावंडांचे पत्ते द्या, बहीणीचा पण द्या.''

पण हा, गावातील सातबारा वगैरे कागदपत्रे मिळवायला मला वेळ नाही. मला मुंबईला तातडीने जायचंय.''

''ठीक आहे. मग अजून पाच हजार द्या. म्हणजे एकूण पंचावन्न हजार. मग माझा माणूस सर्व कागदपत्रे गोळा करेल.''

मोहनरावाने पंचावन्न हजाराचा चेक वकिलांच्या सेक्रटरीकडे दिला. सेक्रेटरीने आवश्यक त्या सह्या घेतल्या. सेक्रेटरी म्हणाली - ''ठीक आहे साहेब, सर्व कागदपत्रे तयार झाली की, तुम्हाला स्वतः एकदा येऊन कोर्टात दावा दाखल करायला लागेल. तेव्हा एकदा या.''

वकीलांच्या ऑफिसमधून बाहेर पडून लॉजवर आल्यानंतर मोहनरावाने प्रमोद

नाईकांना फोन लावला.
''हॅलो, प्रमोद नाईक बोलतात का ?''
''होय, मी प्रमोद नाईक, तुम्ही कोण ?''
''मी मोहन मुंज. मुळ गांव आंबेरी सध्या मुंबईत राहतो.''
''बोला काय काम होतं, आणि माझा नंबर कोणी दिला ?''
''तुमचा नंबर कणकवली भोसले वकीलांनी दिला. तुम्ही तुमच्या वडिलांच्या मृत्युपत्राला चॅलेंज केलंय ना कोर्टात त्या संबंधी बोलायचं होतं.''
''तुमचा काय संबंध ?''
''माझ्या वडिलांनीपण असचं केलयं. वडिलोपार्जित जमीन मृत्युपत्राने माझ्या एकट्या भावाच्या नावाने केली. मला एक गुंठापण ठेवला नाही. मी भोसले वकीलांमार्फत कोर्टात दावा ठोकायचा विचार करतोय. भोसले वकील म्हणाले, असाच एक दावा सध्या त्यांचेकडे आहे. त्यांनी तुमचे नाव आणि पत्ता दिला.''
''होय, होय. मी त्या मृत्युपत्राला चॅलेंज केलयं. आता दावा कोर्टात आहे. भोसले वकील म्हणाले कोणत्याही परिस्थितीत तुमच्या बाजूने निकाल येईल. फक्त पैसे सोडायला लागतील.''
''मला पण तसेच सांगितले. पण खरोखर तसे होईल काय ?''
''निश्चित होईल. भोसले वकील सर्व फिक्स करण्यात हुशार आहे. तो कशी मांडवली करतो बघा. तुम्ही निश्चिंत रहा. माझी केस चालू आहे त्याच्या निकालाने तुम्हाला अंदाज येईलच.''
''मग आपण संपर्कात राहू. केस कशी चालते आहे हे मला कळवत रहा.''
''निश्चित कसलीच काळजी करु नका.''
मोहनरावांनी फोन ठेवला आणि विजयी मुद्रेने पत्नीकडे पाहिले. आशापण खुश झाली. तिला सासुबाईला, दिराला, जावेला, नणंदेला धडा शिकवायचा होता.

दुसऱ्या दिवशी मोहनराव आणि आशा मुंबईस निघाली. मोहनरावांच्या सुचनेनुसार भोसले वकीलांनी सर्व कागदपत्रे तयार केले आणि त्यांच्या नोटीसा मोहनरावांची आई, भाऊ वसंता, बहीण यशोदा यांना पाठवल्या. आपल्या मुलाकडून कोर्टातर्फे अशी नोटीस आल्याने सुमतीबाईंना फार वाईट वाटले. त्यांच्या डोळ्यात राहून राहून अश्रू जमा होऊ लागले.

आपल्या नवऱ्याने कोणत्या हेतूने मृत्युपत्र केले आणि त्याचा परिणाम कुटुंब फुटण्यात होईल याची त्यांना कल्पना नव्हती. उलट मोहन सर्व समजून घेईल असे त्यांना वाटत होते. या गावच्या थोड्याशा जमीनीसाठी त्याला स्वार्थ नसणार असे त्यांना वाटत होते. पण झाले उलटेच. वसंताला नोटीस मिळताक्षणी तो खिन्न झाला.

काही झालं तरी आपण कोर्टात जाणार नाही किंवा वकीलपत्र देणार नाही असा त्याने निर्णय घेतला. पण त्यांची बहीण यशोदा तिला आपल्या मोठ्या भावाचा राग आला. वडिलांच्या इच्छेविरुध्द त्यांच्या मृत्युपत्राला तो आव्हान देतो आहे हे पाहून या केसमध्ये आपल्या भावाविरुध्द उभे रहायचे एवढेच नव्हे तर कुणालातरी वकीलपत्र देण्याचा तिने निर्णय घेतला. त्याप्रमाणे तिने आणि तिच्या नवऱ्याने कणकवलीतील एक तरुण पण हुशार वकील पाहिला आणि कोर्टात उभा केला. मृत्युपत्राला आव्हान देणारी केस कोर्टात उभी राहिली पण कागदपत्र अपुरं, पत्ता अपुरा या कारणाने पुढच्या तारखा मिळत गेल्या. भोसले वकील प्रत्येक तारखेचे मोहनरावांकडून पैसे उकळत होता. मोहनराव आणि आशा यांना वाटले होते दोन-तीन महिन्यात केसचा निकाला लागेल. पण केस लांबत गेली.

आणि अचानक कोल्हापूरच्या प्रमोद नाईकांचा मोहनरावांना फोन आला. नाईक कणकवलीत होते आणि कोर्टाने त्यांच्या बाजूने निकाल दिला होता. वडिलांच्या प्रॉपर्टीत त्यांचा हिस्सा मान्य केला होता. प्रमोदरावांच्या या फोनने मोहनराव खुश झाले. मोहनरावांना खात्री झाली की आपल्यालापण असाच निर्णय मिळणार कारण दोघांचे वकील एकच होते.

मोहनरावांनी मोठ्या आनंदाने ही बातमी आशाला सांगितली. दोघेही आनंदात मग्न झाले. आता सासुचे, नणंदेचे आणि दिराचे नाक कापायला उशिर होणार नाही याची तिला खात्री वाटू लागली. तिने तातडीने ही बातमी वडिलांना कळविली आणि लवकरच आपणास कोकणातली प्रॉपर्टी मिळेल याची खात्री तिने वडिलांना दिली. या आनंदाच्या बातमी निमित्त मोहनराव, आशा तिचा भाऊ उमेश आणि त्याची पत्नी सर्वजण मोठ्या हॉटेलात जेवायला गेले. सर्वजण खुशीत होते. हॉटेलमधून मोहनराव आणि आशा रात्रौ ११ च्या सुमारास घरी पोहोचले. मोहनराव कपडे बदलत असताना अचानक त्यांचा फोन वाजला. कणकवलीहून भोसले वकिलांचा फोन होता. भोसले वकिलांनी एक भयानक बातमी मोहनरावांना कळविली-

''संध्याकाळी सातवाजता कणकवलीहून कोल्हापूरला निघालेले प्रमोदराव नाईक यांच्या गाडीला बावडा घाटात समोरुन येणाऱ्या खाजगी बसने धडक दिली आणि त्यात दोघही नवरा बायको ठार झाली.''

ही बातमी ऐकताच मोहनराव किंचाळले, थरथरले. त्यांच्या घशाला कोरड पडली. संध्याकाळी चारच्या सुमारास प्रमोदरावांनी फोन करुन केस जिंकल्याची बातमी सांगितली आणि आपण त्यांचे अभिनंदन केले आणि आता सहा तासात दुसरी बातमी अपघातात नाईक नवरा बायको ठार झाल्याची. मोहनराव सुन्न झाले. त्यांनी

आशाला कशीबशी ही बातमी सांगितली. आशाही घाबरली. मोहनरावांनी कपडे बदलले आणि ते कॉटवर पडले. त्यांना एकसारखे भोसले वकीलांनी फोनवर सांगितलेले कानात ऐकू येत होते. प्रमोद नाईकांनीपण आपल्या सारखेच वडिलांच्या मृत्युपत्रातील इच्छेला कोर्टात आव्हान दिले आणि केस जिंकून प्रमोदराव कोल्हापूरला जात होते आणि.... मोहनराव मनात म्हणत होते - आपण पण तेच करतोय. आपण पण वडिलांच्या मृत्युपत्राला कोर्टात आव्हान दिले आहे. केस सुरु आहे. आपण आपली जन्मदाती आई, पाठचा भाऊ आणि एकुलती एक बहीण यांना नोटीस पाठविली. आपली सख्खी माणसे त्यांना नोटीस पाठविली..... एक सारखे हे विचार मोहनरावांच्या डोक्यात घोंगावू लागले. मोहनरावांना दरदरुन घाम सुटला. डाव्या पाठीत ठणके बसू लागले. छाती ठणकू लागली आणि मोहनराव बेशुध्द झाले.

बाथरुममधून बाहेर आलेल्या आशाने नवऱ्याकडे पाहिले, तिच्या लक्षात आले - नवऱ्याची तब्बेत बरोबर नाही. तिने एसी चालू केला. धावत जाऊन पाणी आणून तोंडात घातले. पण शुध्द येईना. तिने भाऊ उमेशला फोन केला आणि येताना ॲम्ब्युलन्स आणायला सांगितली. उमेशने तिला घरात सॉर्बिट्रेटची गोळी असेल तर जिभेखाली ठेवायला सांगितली. आशाने कपाटात शोधून सॉर्बिट्रेटची गोळी काढली आणि मोहनरावांच्या जिभेखाली ठेवली. दोन मिनिटानंतर मोहनराव श्वास घेऊ लागले. पंधरा मिनिटात उमेश ॲम्ब्युलन्स घेऊन आला आणि मोहनरावांना हिंदूजा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले.

हिंदूजा हॉस्पिटलमध्ये सर्व तातडीच्या तपासण्या झाल्या. भराभर छातीत इंजेक्शने दिली गेली. दोन दिवसांनी मोहनरावांची एन्जीओग्राफी केली गेली आणि त्यांना बायपास करण्याची शिफारस केली. दोन दिवसांनी मोहनरावांची बायपास झाली. आशा विचार करत होती. गेल्या दहा दिवसात किती धावपळ झाली. कणकवलीतील त्या भोसले वकीलांनी कोल्हापूरच्या नाईकच्या अपघाताची बातमी सांगितली आणि आपला नवरा हादरला. केवळ नशीब म्हणून आपला नवरा वाचला.

बायपास नंतर मोहनरावांना आयसीयुमधून जनरलमध्ये आणले पण मोहनराव खिन्न होते. आपण किरकोळ जमीनीसाठी आईवर, भावंडांवर केस केली. त्यांना नोटीसा पाठविल्या ही आयुष्यातली फार मोठी चुक केली असे त्यांना वाटत होते. त्यांच्या डोळ्यासमोर वडिल येत होते. गावातील महाजनांच्या बागेत अळी काढणे, कोळम्याने पाणी काढणे, झाडावर चढून आंबे, रतांबे काढणे अशी कामे करुन त्या मजुरीतून घरात साखर पावडर मीठ आणायचे. रोज कष्टाची कामे, बागेतली नारळ सुपारी घेऊन दहा मैलावरील कणकवलीच्या बाजारात चालत जायचे आणि

येताना मुलांना खाऊ, शाळेची पुस्तके-वह्या आणायचे. आपण हुशार म्हणून आपल्याला कणकवलीला अभ्यासाला ठेवले. तेव्हा त्यांची आणि आईच्या जीवाची किती घालमेल झालेली. आईफक्त रडत होती पण बापाने आपल्याला गावात अडकवले नाही. उलट शिक्षण घेऊ दिले. मुंबईहून आपले पत्र आले नाही तर दोघांचा जीव वर खाली व्हायचा. भाऊ वसंता आपण कणकवलीला शिकत होतो तेव्हा एवढासा होता. मी गावी गेलो की मागून मागून असायचा. अजूनही आपण गावी गेलो की माझ्यासाठी काय चांगले मिळेल ते आणायचा. कधी शहाळी, चांगले मासे, आंबे. बहीण यशोदा तर सर्वांची लाडकी. नेहमी दादा दादा करत मागे मागे. सर्व माझीच माणसे. रक्ताची माणसे. एका आईच्या पोटातून सर्वांनी जन्म घेतला. पण गावच्या किरकोळ गुंठ्यातील जमीनीसाठी आपण कोर्टात गेलो. वडिलांचे पण काही चुकले नाहीच. एवढ्याशा जमीनीत दोन भाग पाडले तर प्रत्येकाला काय येणार ? वसंताला काय राहणार ? त्याची तिन माणसे आणि आई जगणार कसे ? आपण आई-वडिलांना कधी पैसे धाडले नाहीत की बहीणीला काही पाठविले नाही. आपण पत्नी आशा, मुलगा आणि सासुरवाडीच्या माणसांचा विचार करत राहिलो. आपली बुध्दी भ्रष्ट झाली होती. छे छे... आपले चुकलेच. आता बरे वाटले की गावी जायचे. आईच्या पायावर डोके ठेवायचे. वसंताच्या पाठीवर थाप द्यायची. बहीणीच्या घरी जाऊन तिची खुशाली घ्यायची आणि कोर्टातली केस मागे घ्यायची. त्याशिवाय आपल्याला चैन नाही की सुख नाही. आशा समोर येऊन बसली. म्हणाली - ''कसाला विचार करताय?''

''मी फार मोठी चुक केली. तुझ्या आणि तुझ्या माहेरच्या माणसांच्या बुध्दीवर चाललो. माझ्या सख्ख्या रक्ताच्या माणसांना विसरलो. वडिलांना त्यांच्या आजारपणात हाक मारली नाही, मदत केली नाही. खरतर त्यांच्या शेवटच्या आजारपणात त्यांना मुंबईत आणून मोठ्या हॉस्पिटलमध्ये उपचार केले असते तर ते अजून जगले असते. पण मला तशी बुध्दी झाली नाही. त्यांचे सर्व वसंता आणि नलिनीने केले. तोंड मिटून केले. माझ्या वडिलांचे आजारपण त्या दोघांनी काढले म्हणून खरतर मी त्यांचे आभार मानायला हवे होते. त्या ऐवजी मी वाट्टेल तसे बोललो. मी ही केस मागे घेणार आहे. मला नको जमीन. नको हिस्सा. मला माझी माणसे हवीत. आता मला कोणी अडवायचे नाही. नाईकांचा अपघातात मृत्यु झाला पण त्यामुळे माझे डोळे उघडले. आता जर मी तुम्हाला जिवंत हवा असेन तर माझ्या मनाप्रमाणे वागायचं. वडिलांच्या अखेरच्या इच्छेचा मान ठेवायचा.''

आशा गप्प होती. आपला नवरा या आजारपणात पुरता खचला आहे. त्याला परत चालता फिरता करायचा असेल तर त्याच्या मनाविरुध्द वागायचे नाही हे

तिने ओळखले. मोहनरावांनी भोसले वकीलांना सांगून केस मागे घेण्याची तयारी दाखवली.

वसंता नलिनीचा मुलगा शंतनु बारावी पास करुन कणकवलीत लॉ कॉलेजला जाऊ लागला होता. लॉ च्या दोन्ही वर्षात तो कॉलेजमध्ये पहिला आला. सुरुवातीला तो गावाहून जाऊन येऊन करत होता. पण आता अभ्यास वाढला म्हणून आणि नाडकर्णी वकिलांकडे अनुभवासाठी काम करत होता म्हणून तो कणकवलीतच हॉस्टेलमध्ये राहू लागला. मोहन-वसंताची आई सुमतीबाई अधून मधून आजारी असायची. तिलापण कणकवलीत अधून मधून डॉक्टरांकडे न्यायला लागत होते. शंतनु आता बाईबाबांना म्हणत होता. आपण सर्व कणकवलीत भाड्याची जागा घेऊन राहूया.

मोहनरावांना आईला, वसंताला, बहीणीला भेटायचं होतं. कोर्टात जाऊन केस मागे घ्यायची होती. जवळ जवळ तीन वर्षांनी मोहनराव आणि आशा घरी आली. काका घरी येणार आहेत हे कळताच शंतनुपण गावी आला. बहीण यशोदापण माहेरी आली. मोहनराव घरी आले ते आईच्या खोलीत गेले. आईच्या पाया पडले. वसंतापण तेथेच त्यांच्या मागोमाग आला. वसंताच्या पाठीवरुन हात फिरवला. आशाने बॅगेतून सासुबाईंसाठी साडी बाहेर काढली. वसंतासाठी पॅन्टशर्ट बाहेर काढले, नलिनीसाठी साडी बाहेर काढली. शंतनुसाठी मोबाईल बाहेर काढला. बहीणीसाठी साडी, बहीणीच्या मुलीला मोबाईल हे सर्व टेबलावर ठेवून मोहनराव बोलू लागला.

''आई, वसंता, यशोदे माझा चुकलाच. मी तुमका नको नकोता बोल्लयं, यशोदा मागच्यावेळी बोलली ता खरा आसा. खरंतर मी घरातलो मोठो मुलगो. मी घरातली जबाबदारी घेवक होई होती. आईबाबांनी माका मोठो केलो, शिकवलो. पण तेची जाण ठेवलयं नाय मी. मी मुंबईक गेलय आणि सगळ्यांका विसारलयं. लग्नानंतर माका सासुरवाडीची लोका मोठी वाटाक लागली आणि गावची बावळट. मी सासुरवाडच्यासाठी खुप केलय पण माझ्या आईवडिलांका, भावाक, बहीणीक विसारलयं. माझी चुक माका कळली. माझ्या वडिलांनी मृत्युपत्र करुन माका जमीन देवक नाय म्हणून मी रागान बेभान झालयं. त्यामागचो वडिलांचो हेतू माझ्या लक्षात ईलो नाय. वडिलांका या जमीनीचो तुकडो पाडूचो नाय व्हतो. माझी एकुलती एक बहीण यशोदा - तिच्या घराकडे कधी गेलयं नाय. तिची कधी विचारपुस केली नाय. तिच्या चेडवाक कधी जवळ घेतलय नाय. माझी चुक माका कळली. मी पैशाच्या धुंदीत होतय. पण एक फटको बसलो. आजारपणात मरणातून वाचलयं. कारण आईबाबांचे आशीर्वाद पाठीशी होते. हॉस्पिटलमध्ये एक महिनो बिछान्यावर पडलयं

आणि सगळा डोळ्यासमोर इला. मी खूप चुक केलयं. आई, वसंता, यशोदे माझा चुकला. मोठ्या मनान सगळा इसरा.'' मोहनराव गदगदून रडत रडत बोलत होता. बाजूला आशापण गप्प राहून ऐकत होती. त्यांच्या आईचेपण डोळे ओले झाले होते. वसंता, नलिनी, यशोदापण भावूक झाली होती. एवढ्यात वीस-एकवीस वर्षाचा वसंताचा मुलगा शंतनु बोलू लागला.

''मोहनकाका तुम्ही म्हणालात सगळा विसरा, पण आम्ही कसे विसरतलवं, आजोबा वारले तेव्हा मी बारावीत होतय. सतरा वर्षाचो. मृत्युपत्रात तुमच्या नावावर जमीन ठेवक नाय म्हणून तुम्ही आजी, बाबा, यशोदे आते हेंका काय काय बोल्लात.

माझ्या आईबाबांनी मुद्दाम तसा मृत्युपत्र आजोबांका करुक सांगल्यानी असो आरोप केलात. यशोदा आतेन जाब विचारल्यान तेव्हा तिचा थोबाड फोडूक निघालात. मी लहान होतय म्हणून गप्प रवलंय आणि माझी आई माका काही बोलूक देईना. ही आशा काकी म्हणाली आंब्याच्या बागेचे लाखो रुपये घेतास - सव्वीस कलमांचे लाखो रुपये येतत ? कलमा आधी एक वर्षाआड येतत. तेंका मोठा करुन काय करुचा लागता त्या शेतकऱ्याक माहीत. बागेची साफसफाई, खत, किटकनाशका किती महाग झाली याची तुमका कल्पना नसतली. आणि हल्ली माकडांचो त्रास किती सुरु आसा. माकडा लहान लहान फळा अर्धी खाऊन नासधुस करतत. बागवाल्याक कसला उत्पन्न मिळतला ? माझे आजोबा आणि बाबा वर्षभर तेच्या मागे रवत म्हणून थोडे आंबे. ही आशा काकी मागे म्हणाली, तुम्ही सगळे आयत्या घरात रवतात.

ह्या जुन्या घरांका सांभाळना म्हणजे काय दुसऱ्याक कळाचा नाय. किती कौला फुटतत, माकडा उडी मारुन फोडतत, लाकूड खराब होता, वाळवी लागता, पावसात कौला फुटून गळता. गावात रवल्याशिवाय ह्या कळाचा नाय. ह्या असल्या घराक कंटाळून लोकांनी स्लॅबची घरा बांधल्यानी. आमच्याकडे पैशे नाय म्हणून - आणि तुम्ही जर पैशाची मदत केला असतास तर आम्ही स्लॅबचा घर बांधला असता पण तुमका तशी बुध्दी होना नाय.

गणपतीक दुसऱ्या दिवशी येतास आणि पुजेक बसतास. गणपतीची तयारी आधी पंधरा दिवस असता. गणपतीक येवक होया तर त्या तयारीक येवक होया. गावात आळशी माणसा रवतत अशी ही काकी म्हणाली, असू दे आम्ही आळशी. आता या पुढे या घरातलो मोठो मुलगो म्हणून ह्या घर, आंब्याची झाडा, शेती, सण, देवपूजा सगळा तुम्ही सांभाळा. मी, आईबाबांका आणि आजीक घेवन कणकवलीक जातय. ती तिकडे भाड्याची जागा बघलय. माझे बाबा गवंडी आसत तेंका थय काम मिळतला. आम्ही बिऱ्हाड केला तर माझ्या आईक थोडी विश्रांती गावात. या घरात

लग्न होऊन इल्यापासून तिका विश्रांती कसली ती माहीती नाही. आजीकपण मी घेवन जातय. कारण तिका वारंवार कणकवलीचो डॉक्टर लागता. आमची गुरा आसत तेंका मी माझ्या मामाकडे पाठवलयं. कारण तुमच्याकडून तेंची देखभाल होवची नाय. माझे बाबाही अशी कामा करत करत पन्नासाव्या वर्षी म्हातारे झाले, आई पंचेचाळीसाव्या वर्षी म्हातारी झाली. तेनी आयुष्यात कधी विश्रांती घेवक नाय. या दोघांचा आयुष्य वाढवचा आसात तर या घर सोडूक व्हया आणि आम्ही कणकवलीक बिऱ्हाड करुक व्हया. तेवा तुम्ही आणि काकी ह्या घर सांभाळा. तसे तुमी आता रिटायर्ड आसात, तुमचो मुलगो अमेरिकेत गेलो हा. तुम्ही मुंबईक रवलास काय आणि हय रवलास काय फरक पडना नाय. आजच संध्याकाळी मी आई बाबा आणि आजीक घेवन जातय. आता एकदम गणपतीक येव. तुम्ही कसे तिसऱ्या दिवशी गणपतीक येवास. तुम्ही मोठे भाऊ वडिलानंतर या घरची जबाबदारी तुमची. या घरातले देव, त्यांची पूजा, सण सगळे मोठ्या भावानच करुचे आसतत. आजपासून ह्या घर तुमचाच, शेती फक्त तुमचीच, आंब्याची झाडा, काजूची झाडा फक्त तुमचीच.'' एवढे भडाभडा बोलून शंतनु थांबला.

मोहनराव आणि आशा आ वासून ऐकत राहिली. एवढासा शंतनु मोठा केव्हा झाला हे कळलेच नाही. वसंता आणि नलिनी सुध्दा आपल्या मुलाकडे पाहत राहिली. या शंतनुला आपण अजून लहान लहान म्हणत होतो, पण खरंच जे आम्ही बोलू शकणार नव्हतो ते हा मुलगा बोलला. वसंताला वाटले आयुष्यभर मी या घरासाठी झटलो, एक दिवस विश्रांती नाही. शहरातल्या लोकांसारखे ना नाटक, ना सिनेमा. पण किंमत कोणाला आहे ? ही आशा वहिनी गावातले सगळे लोक आळशी असे म्हणून मोकळी झाली. खरचं शंतनु म्हणतोय तर जाऊया कणकवलीला. मी गवंडी काम करेन. नलिनीला विश्रांती मिळेल.

नलिनी मनात विचार करत होती. कमाल आहे या मुलाची. मोठ्या काकांना मनातले बोलला. मला असे कधी बोलायला जमले नसते. घर सोडून कणकवलीला बिऱ्हाड करायचं म्हणतोय सोप आहे का ते ? एवढी वर्षे या घरात राहिले. चला आता बिऱ्हाड करुया. तो म्हणतोय तर जाऊ कणकवलीला. शंतनुचे बोलणे मोहनराव आणि आशा ऐकत होती. शंतनु एवढा मोठा झाला हे त्यांना माहीतच नव्हते. तो खरच घर सोडून आईवडिलांना, आजीला घेऊन कणकवलीला जाईल असे त्यांना वाटत नव्हते. मोहनरावांना वाटत होते. आपल्याला आणि आशाला हे घर सांभाळणे जमायचे नाही. नलिनी दिवसभर राबराब राबत असते. आशाला थोडेच जमणार ? आशाला आता शहरात राहून सुखाची सवय झाली आहे. पण करणार काय ? मागच्या वेळी आपण आणि आपली बायको काय काय बोलून गेलो. आता

आपणाला हे सर्व ऐकून घ्यावेच लागेल.

मोहनराव आणि आशा पाहत होती. खरेच नलिनी कपड्यांच्या पिशव्या भरत होती. वसंता तिला मदत करत होता. मध्येच नलिनीने दोघांचे जेवण आणून ठेवले आणि रात्रीसाठी तुम्हा दोघांसाठी जेवण ठेवले आहे असे सांगून गेली. नलिनी वसंताने भरलेल्या पिशव्या पाहून आशा बोलू लागली.

''वसंत भावोजी, आमचं चुकलंच, आम्ही रागाच्या भरात बोलून गेलो. मी तुम्हाला आळशी म्हणाले, ऐतखाऊ म्हणाले, आंब्याचे एवढे पैसे खाता म्हणाली, चुकच झाली. आम्ही तुमच्या सगळ्यांवर दावा दाखल केला. त्याची शिक्षा आम्हाला मिळाली. माझा नवरा मरणाच्या दारातून परत आला. पण आता तुम्ही हे घर सोडून जाऊ नका. मी शहरात राहिलेली. मला हे गावातील घर सांभाळता येणार नाही. गावातले सण, रितीरिवाज मला जमणार नाहीत. मी सासुबाईंना उलट-सुलट बोलले. सासुबाई मला क्षमा करा.'' असे काहीबाही आशा मोहन बोलत होते. हात जोडत होते. डोळे पुसत होते. पण वसंता, नलिनी, यशोदेने तिकडे लक्ष दिले नाही. थोड्या वेळाने त्यांनी बाहेर जायचे कपडे घातले एवढ्यात शंतनु टेम्पो घेऊन आला. त्यात शंतनुने आणि वसंताने मिळून सर्व सामान भरले. एक रिक्षा आली त्यात शंतनुची आजी, आईबाबा आणि आते बसली. टेम्पोबरोबर शंतनु बसला. सर्वांनी देवाला नमस्कार केला. घराकडे एकदा डोळेभरुन पाहिले. रिक्षा आणि टेम्पो कणकवलीच्या दिशेने निघाली.

बाहेर लोट्यावर बसून मोहनराव आणि आशा डोक्याला हात लावून हे सर्व पाहत होते आणि त्यांच्या समोरील टेबलावर त्यांनी मुंबईहून आणलेल्या साड्या, शर्टपॅन्टपीस, मोबाईल्स त्यांचेकडे पाहत होते.......

# त्या दोघी...

प्रदिप केळूसकर – मोबा. ९४२२३८१२९९/ ९३०७५२११५२

घरातून बाहेर पडता पडता सेलफोन वाजला म्हणून सुलभाने पर्स उघडली आणि फोन हातात घेतला आणि फोनवरचे नाव पाहताच तिच्या चेहऱ्यावर स्मित आले कारण फोन तिच्या मैत्रिणीचा स्मिताचाच होता.

''काय ग ? आज सकाळीच ? बँकेत गेली नाहीस का ?''

''अग बँकेतूनच बोलते. संध्याकाळी स्टेशनवर भेटतेस ?''

''हो, भेटूया. सहा वाजता ना ?''

''हो, नेहमीच्या जागेवर.''

''येते.''

सुलभा झपझप पोस्टाच्या दिशेने चालू लागली. काल जमा केलेली सर्व कलेक्शन आरडी पोस्टात जमा करायची होती. आणि मग इन्शुरन्सच्या ऑफिसमध्ये जायचं होतं. काल एक पॉलिसी मिळाली होती ती ऑफिसमध्ये द्यायची होती. शिवाय तीन वाजता डेव्हलपमेंट ऑफिसर ज्योतीने मिटिंग ठेवलेली आहे. ती मिटिंग करुन साडेपाच पर्यंत बाहेर पडायचं आणि सहाच्या आधी विलेपार्ले स्टेशनवर नेहमीच्या जागी स्मिताला भेटायचं. ही एवढी कामं डोक्यात ठेवून सुलभा पोस्टात पोहोचली.

रोजच्या प्रमाणे पोस्टाची कामे केली. मग इन्शुरन्स कंपनीत जाऊन आणि तीनची मिटिंग अटेंड करुन साडेपाचला बाहेर पडली आणि झपझप स्टेशनच्या दिशेने चालू लागली. कधी एकदा स्टेशनवर पोहोचतो आणि स्मिताला भेटतो असे तिला झाले. खरतर स्मिता आणि ती सोमवारीच भेटल्या होत्या आणि आज शुक्रवार मध्ये फक्त चार दिवस झाले. पण त्या दोघींची कोल्हापूरातली बालवाडीपासूनची मैत्री. दोघींची जोडी शाळा, कॉलेजात तशीच राहिली. सुलभा लग्न होऊन पार्ल्याला आली आणि स्मिता गोरेगांवात. सुलभा पोस्टाचे आणि इन्शुरन्सचे काम करायची आणि स्मिता बँकेत लागली. दोघीची एवढी मैत्री की, संसारातल्या बारीक सारीक गोष्टीपण एकमेकांना सांगायच्या.

आज काय एवढे अर्जंट काम काढल स्मिताने, असे मनात म्हणत सुलभा सहा वाजता विलेपार्ले स्टेशनवर पोहोचली. तेव्हा स्मिता नुकतीच तिथं आली होती आणि रुमालाने घाम पुसत होती. रेल्वेचा जिना उतरता उतरता सुलभाला स्मिता दिसली. तिला बघून सुलभाच्या मनात आले –''काय परिस्थिती झाली स्मितूची

किती देखणी ही, कोल्हापूरात असताना महाद्वार रोडला आपण फिरायला जायचो तेव्हा कोल्हापूरातील पोर मागून मागून यायची. स्मिताने सुलभाला पाहताच हात दाखवला तशी स्मिता तिच्या दिशेने पुढे आली. मग दोघी तीन नंबर प्लॅटफॉर्मच्या टोकाला आल्या. ही दोघींची बोलण्याची जागा होती. इथे थोडी शांतता होती. सुलभा स्मिताला म्हणाली –

''काय ग एवढ काम काढलस? सोमवारी तर भेटलो होतो ना ?''

''काय सांगायचं कप्पाळ ! माझ्या मागे एक एक टेन्शन आणि टेन्शन''

''काय झालं ?''

''तेजू कोणाबरोबर तरी फिरते अशी बातमी होतीच. काल माझ्या व्हॉटस्ॲपवर कोणीतरी दोघांचा फोटो पाठविला. तिच्याबरोबर एक दाढीवाला पुरुष, हिच्यापेक्षा वयानं बराच मोठा दिसत होता. शेवटी काल तिला खडसावलं. तेव्हा कळलं तो गोरेगांव स्टेशन जवळचा लोखंडाचा व्यापारी जमीर.''

''मुस्लिम आहे की काय ?'' सुलभा ओरडली.

''हो गं माझे विचार तुला माहीत आहेत ना ? माझे आईबाबा होते संघाशी संबंधित, माझेपण विचार त्यांच्यासारखेच आणि तो वयानं पण पंधरा वर्षांनी मोठा.''

''बाप रे ! मग अभयला कळलं का ?''

'' तो असतो का घरी ? सकाळी टेबल टेनिस खेळायला बाहेर पडतो आणि सायंकाळी क्लबमध्ये ब्रिज खेळायला जातो. त्याच्या मॅचिस आणि टुर्नामेंटस. तो बेफिकीर बाप. आयुष्यात जबाबदारी कसली घेतली नाही त्याने. त्याला काय तो खांदे उडवित म्हणेल, ''तिच लाईफ आहे ते. मी कोण लुडबुड करणारा?'' असं म्हणून तो गाढ झोपेल. झोप माझीच उडाली गं सुलु.''

''खरं आहे गं स्मितू, हे वयच असं असतं. डोळ्यावर पट्टी बांधल्यासारखी मुलं निर्णय घेतात. ती ठाम आहे का? मी तिच्याशी बोलून बघू?''

''बघ तुझं ऐकतेय का ते, मी निघते. घरी जाऊन जेवण करायचं आहे. दहा वाजल्यानंतर दोघं बाप लेक गिळायला येतील. त्यांना काहीतरी घालायला हवं ना? आणि परत उद्याचा माझा डबा – त्याची तयारी. जाते.''

''सांभाळून जा ग स्मितू, रस्ता सांभाळून क्रॉस कर. आजूबाजूच्या गाड्या बघ आणि मगच रस्ता ओलांड.''

हो म्हणत स्मिता गेली आणि तिच्या पाठमोऱ्या शरीराकडे सुलभा पाहत राहिली. स्मिता दिसेनाशी झाली तशी ती घरी जायला वळली. आज खूप दगदग झाली म्हणून सुलभाने रिक्षा केली. रिक्षावाल्याला पत्ता सांगितला आणि डोळे मिटून रिक्षाच्या पाठीवर टेकून बसली. आपल्या संसारापेक्षा तिला स्मिताच्या संसाराची आणि

स्मिताची जास्त काळजी वाटत होती. बेजबाबदार नवरा, हाताबाहेर गेलेली एकुलती एक मुलगी कुटुंबासाठी नोकरी करण्याची गरज, नोकरी आणि संसार सांभाळता सांभाळता होणारी दमणूक कधी या स्मिताला विश्रांती मिळणार आहे कोण जाणे ? त्यात आता तिच्या मुलीने तेजश्रीने घेतलेला निर्णय.

पहिल्यापासून ही तेजश्री आपल्याला आवडत नव्हती. बेफिकीर मुलगी. आईच्या कष्टाचे आणि धावपळीचे काहीसुध्दा पडले नाही तिला. रिक्षा थांबवून सुलभा घरी आली. नवरा नऊच्या पुढेच येणार, कन्या विनयाचा पाच वाजताच फोन आलेला. आता थोडावेळ विश्रांती घेऊ. पोळ्या साडेआठनंतर केल्या तरी चालतील. असे म्हणत वॉश घेऊन, कपडे बदलून सुलभा बेडवर पडली. तिच्या मनात आले – यावेळी स्मिता काय करत असेल? गोरेगांवला उतरुन भाजी, ब्रेड घेऊन दोन किलोमीटर अंतर चालत असेल. तिला किती वेळा सांगितलं अगं स्टेशनवरुन रिक्षाने जा. पण कुटुंबासाठी पैसे वाचवायचे म्हणून चालत जाते. पुन्हा घर दुसऱ्या मजल्यावर. लिफ्ट नाही. घरी गेल्यागेल्या जेवणाची तयारी. बरं या दोघांना साग्रसंगीत जेवण हवं. अधून मधून नॉनव्हेज हवं. दोघांची मदत शून्य. सुलभाच्या अंगाचा संताप संताप झाला. आपला नवरा असा असता तर मी सरळ केला असता. पण स्मितू पडली गरीब गाय. स्वतः रडत बसेल पण नवऱ्याला बोलणार नाही. त्यात आता तेजश्रीने ठरविलेले लग्न. आपण आता उद्या फोन करावा. यावेळी कुठेतरी मित्राबरोबर नाहीतर मैत्रिणीबरोबर हुंदडत असेल असा विचार करता करता सुलभाचा डोळा लागला. दारावरची बेल वाजली तशी ती उठली आणि तिने दरवाजा उघडला. तिचा नवरा राजन आला होता. तिने घड्याळ्यात पाहिले. साडेआठ वाजले होते.

''आज लवकर ! मेननने लवकर सोडलं वाटतं''

''हो मेनन साहेब पण अंधेरीला जात होते त्यांनीच सोडलं''

''माझ्या पोळ्या करायच्या आहेत, वॉश घ्या तोपर्यंत जेवण वाढतेच.''

हो म्हणत राजन कपडे बदलून वॉशरुममध्ये गेला तोपर्यंत सुलभाने गॅस पेटवून पोळ्या करायला घेतल्या. राजन बाहेर आला तोपर्यंत तिने ताटात जेवण वाढायला घेतले.

''आज पोस्टात गेली होतीस का?''

''हो तर. आज खूप धावपळ, पोस्ट, एलआयसी, त्यात ज्योतीने मिटिंग लावलेली आणि स्मितूचा फोन – स्टेशनला भेटायला ये म्हणून...''

''पण स्मिता सोमवारीच भेटलेली ना?''

''भेटलेली पण आज पुन्हा भेटू म्हणाली. तिच्या पोरीने तेजूने लग्न जमवलयं म्हणे''

''आ ऽऽ कोणाबरोबर ?''

''आहे कोणी मुस्लिम, लोखंडाचा व्यापारी गोरेगांव स्टेशनजवळचा.''

''अरे बापरे, मग स्मिता – अभयची काय प्रतिक्रिया ?''
''स्मितूची झोप उडालीय बिचारीची, अभय काय बिनधास्त माणूस, तुमच्या एकदम विरुध्द.''
''म्हणजे ?''
''तुम्ही अति काळजी करणारे, आपल्या विनूने स्वतः लग्न जमवल म्हणून ब्लड प्रेशर वाढवून घेतलंत पण विनूने लग्न जमवलं ते उच्च शिक्षित, एमबीए झालेला, चांगल्या कुटुंबातील मुलाशी, आता बिपीन तुम्हाला मुलगा वाटतो.''
''अगं बाप हा असाच हळवा असतो. तो बाहेरुन फणसासारखा वाटत असला तरी''
''पण त्याला आहे ना अपवाद ! हा स्मितूचा नवरा अभय''
''अग त्याला पण वाटत असेल, बाहेरुन दाखवल नाही तरी.''
''कुठलं काय ? स्मितू सांगत होती उद्यापासून तो ट्रेकिंगला चाललाय चार दिवस भिमाशंकरला''

सुलभाने दोघांचे जेवण घेतलं पण तिच्या डोळ्यासमोर होती स्मिता. कोल्हापूरातून ग्रॅज्युएट झाल्यावर स्मिता आणि मी नोकरीसाठी कसल्या कसल्या परीक्षा देत होतो तेवढ्यात मुंबईत सचिवालयात नोकरी करणाऱ्या अभयचे स्मितासाठी स्थळ आले. मुंबईत जायला मिळणार म्हणून स्मिता लग्नाला तयार झाली.

अभय होता पण देखणा. आम्ही तिच्या मैत्रिणी तिच्या भाग्याचा हेवा करत होतो. पण लग्नानंतर चार पाच महिन्यानंतर स्मिता आली ती निराश होऊन. तिच्यामते अभय अती आळशी, बेफिकीर माणूस होता. सचिवालयात नोकरीला होता पण त्याचे नोकरीत धड लक्ष नव्हते. सतत खेळ, ट्रेकिंग, मित्र मंडळी, पार्ट्या, पैसे किती खर्च करायचा त्याला मर्यादा नव्हती.

एका वर्षानंतर स्मितूची बँकेत निवड झाली आणि तिचा पगार घरात यायला लागला तसा तो जास्तच बेफिकीर झाला. त्याच्या पार्ट्या वाढल्या. खर्च वाढले. त्याच दरम्यान सुलभाचे राजनशी लग्न झाले. राजन इन्शुरन्स कंपनीत नाकासमोर चालणारा, काटकसरी, संसारी. सुलभा पार्ल्यात आणि स्मिता गोरेगावला. सुलभा मुंबईत आली तशी दोघांच्या भेटीगाठी सुरु झाल्या. स्मिताची बँकेची नोकरी होती. मग स्टेशनवर भेटणे सुरु झाले. मग सुलभाचे बाळंतपण आले. कोल्हापूरात न्यू महाद्वार रोडवर चिपलकट्टी हॉस्पिटलमध्ये विनया झाली. सुलभाची काळजी घ्यायला स्मिता कोल्हापूरात हजर होती. मग बारसं करुनच मुंबईला गेली. एका वर्षाने स्मिताचं बाळंतपण. पुन्हा चिपलकट्टी हॉस्पिटल. तेजश्रीचा जन्म. तेजश्रीच्या बारशाला अभय आला नाही हे सर्वांना खटकलं.

सुलभाची विनया दोन वर्षाची झाली आणि सुलभाने पोस्टल एजन्सी घेतली. एल.आय.सी.चे काम करु लागली. मॅच्युअल फंड एजन्सी घेतली. सुलभाचा नवरा राजन तिला सहकार्य करणारा. रविवारी सुट्टी असेल तेव्हा सुलभाला मदत करणारा. प्रसंगी पोस्टाचं कलेक्शन आणणारा. स्मिताचा नवरा सतत बाहेर, स्पोर्टस, मित्र, ट्रेकिंग. वयाच्या चाळीसाव्या वर्षी स्मिताच्या नवऱ्याने - अभयने नोकरी सोडली आणि टेबल टेनिसचा ट्रेनर म्हणून गोरेगांव स्पोर्टस क्लबमध्ये नोकरी पकडली. मग पहाटे उठून जाणे, दुपारी येणे, दुपारी भरपूर झोपणे, संध्याकाळी जाणे, रात्रौ उशिरा येणे, मग खेळाच्या स्पर्धा कधी इथे, कधी तिथे. मग जय पराजय, पार्ट्या, बाहेर खाणे, पैसे उडविणे हे सुरुच. यात स्मिताची खूप ओढाताण झाली. नवरा सतत बाहेरगावी म्हणून तेजश्रीचे लाड झाले आणि तिच्या अभ्यासात दुर्लक्ष झाले.

जेवता जेवता सुलभाच्या डोळ्यासमोर सर्व येत होते. स्मिता मग नर्व्हस होत गेली. सतत आपल्या विचारात राहू लागली. त्याचा परिणाम तिच्या तब्येतीवर झाला. केस गळू लागले. सुलभाच्या एक लक्षात आले. गेली काही वर्षे स्मितू स्वतःच्या विमा पॉलिसीज काढू लागली आहे. आपण तिला म्हणायचो अग सगळ्या पॉलिसी स्वतःच्या नावाने कशाला काढतेस? काही तेजूच्या नावाने काढ, अभयच्या काढ. तिचे म्हणणे - तिला स्वतःचे काही खरं वाटत नाहीय. अभयला नोकरी नाही, आपल्यामागे तेजूला काही कमी पडायला नको.

रात्री झोपताना सुलभाने मनाशी ठरविले, उद्या तेजूला काय ते विचारायचे. दुसऱ्या दिवशी तिने तेजश्रीला फोन लावला. तिचा फोन कशासाठी हे तिने ओळखले असावे.

''काय ग मावशी, आई काही बोलली वाटतं?''

''काय ?''

''माझ्या लग्नाचं''

''होय बाई, काहीतरी घाईघाईत निर्णय घेऊ नकोस तेजू''

''मावशी, मला समजतं आता मी तेवीस वर्षाची आहे. तुमच्या टिपीकल मिडलक्लास लोकांचे रडगाणं मला सांगू नकोस.''

''अग पण त्याचा धर्म ?''

''मी एवढ्यात लग्न करीन असं नाही गं मावशी, सुरुवातीला मी रिलेशनमध्ये राहीन, तो आवडला तर मग लग्न.''

''अगं बाई असलं काहीतरी बोलू नकोस. मी काय, तुझी आई काय? आम्ही कोल्हापूरातल्या साध्या मुली गं, असले संस्कार आमच्यावर नाहीत.''

''पण मी कोल्हापूरातली नाही ना? मी मुंबईतल्या अभय कानविंदेंची मुलगी आहे.

माझा बाबा बघा कसा फॉरवर्ड विचाराचा आहे. नाहीतर तुम्ही ....'' असं म्हणून तेजश्रीने फोन ठेवला. सुलभाने तेजश्रीला पुन्हा फोन लावायचा प्रयत्न केला पण तिने फोन उचललाच नाही.

आज काही काम नव्हतं म्हणून सुलभा घरातच थांबली. तिने चादरी, बेडशीटस् धुवायला काढल्या. दहा वाजायला आले. दारावरची बेल वाजली म्हणून दार उघडलं तर बाहेर स्मिता.

''अगं स्मितू ! फोन न करता आलीस ? नशीब मी आज घरी होते. ये आत.''

''होय फोन करायचं पण विसरले. हल्ली विसरायला होतं गं. वय झालं का आपलं ?''

अगं वय कसलं, अजून पन्नाशी नाही आली.''

''मग अस का होत ? काल भाजी घ्यायला विसरले, अभयचे कपडे इस्त्रीला द्यायचे विसरले. त्यावरुन सकाळी सकाळी अभय चिडला. घरची कामे जमत नसतील तर नोकरी सोड म्हणाला.

''आणि काय करु म्हणाव ? टाळ घेऊन भजन करावं का ? स्मितू तू फार साधी मुलगी गं. त्याचा फायदा घेतो हा अभय आणि त्याचे पाहून तेजू. जगात एवढं साध राहून चालत नाही बाई. माती मऊ दिसली की जो तो खणू पाहतो. हा आता तुझा अभय नोकरी सोडून दे म्हणाला, आपण नोकरी आधीच सोडली. मग घर खर्च कसा करणार ? मोठा सावकार लागून गेला तो. बेफिकीर माणूस. स्मितू तुला वाईट वाटेल म्हणून जास्त बोलत नाही, नाहीतर....''

''बोलून का उपयोग आहे का सुलु ? ''

''आज बँकेत नाही गेलीस' ?''

माझं कशात लक्ष लागत नाही गं...तेजूशी बोललीस काय ?''

''बोलले बाई, ती मला काय सरळ उत्तर देते त्याच्याशी रिलेशनमध्ये राहणार म्हणे. मग वाटलं तर लग्न करीन म्हणते. मी तुमच्यासारखी मुळमुळीत नाही म्हणाली. अभय कानविंदे सारखी स्मार्ट बापाची मुलगी आहे म्हणे

हे असं रिलेशन वगैरे आपण याचा विचार तरी केलेला का गं सुलु ?''

''आपण जुन्या संस्कारातल्या मुली गं.... आपले नवरे राम आणि आम्ही सिता. पण आपणच सितेची भूमिका निभावतो म्हणून अभय सारख्यांच फावतं.

जाऊ दे सुलु ! मला कंटाळा आला आहे तोच तोच विषय बोलून. मी आज मुद्दाम आले होते. माझ्या इन्शुरन्स पॉलिसीज किती रकमेच्या आहेत ते पहायला.

आज काय अचानक ? तरी पण तू म्हणते आहेस तर पाहू. सुलभाने कॉम्प्युटर उघडला आणि स्मिताच्या सर्व पॉलिसीज, हप्ते चेक केले.

''एकंदर एक कोटी पंचेचाळीस लाखाच्या पॉलिसीज आहेत ग स्मितू.''

‘‘आणि नॉमिनीज वगैरे, केवायसी ?’’
‘‘नॉमिनीज बहुतेक अभय कानविंदे, काहीवर तेजश्री कानविंदे. केवायसी अपटूडेट केलेल्या आहेत.’’
आणि मॅच्युअल फंड.
‘‘तीन फंड हाऊस मध्ये तुझी एसआयपी सुरु आहे. त्याची आजची किंमत अंदाजे सोळा लाख आहे.’’
आणि शेअर्स ?
‘‘तुझ्या शेअर्सची आजची किंमत सहा लाख पन्नास हजार आहे. पण हे सर्व आजच का पाहते आहेस तू स्मितू ?’’
‘‘तसं नाही गं. नवरा म्हणतो ना नोकरी सोड म्हणून समजा नोकरी सोडली तर किती रक्कम मिळेल याचा अंदाज घेत होते.’’
पण तुझ्या या इन्शुरन्स पॉलिसीज चालू आहेत बरं का ? एवढ्यात त्याचे पैसे मिळणार नाहीत किंवा एकदम कमी मिळतील. हा तुझ्या पश्चात वारसांना आत्तासुध्दा मिळतील. ’’
‘‘झालं तुझे इन्शुरन्स फंड वगैरे? किती दिवसात तुझ्या केसांना तेल घातलं नाही. सुलभाने स्मिताला पुढे बसवलं आणि ती तिच्या केसांना मालीश करु लागली.’’

‘‘सुलू केव्हा केव्हा मला वाटतं आपण लग्न केलेल्या मुली फक्त आपला नवरा, मुलं यांचीच काळजी घेतो. पण आपली माहेरची माणसं आई, बाबा, भाऊ, वहिनी, भाचरं यांचा पण विचार करायला हवां. आपली आई नऊ महिने पोटात वाढविते. आई-बाबा किती प्रेमाने संगोपन करतात. भाऊ प्रेम देतो, संरक्षण देतो, पण आपण जेव्हा अर्थार्जन करतो तेव्हा आपला संसार पाहतो. माहेरच्या मंडळींना गरज असेल तर आपण त्यांना मदत करायला नको ?
‘‘करायला हवीच बाई ! तू आता ही नोकरी करतेस, तू पण तुझ्या भावाचा श्यामूचा काहीतरी विचार कर. ’’

तेल घालून केस विंचरल्यावर सुलभाने गरम पाणी काढले आणि स्मिताला आंघोळ करायला सांगितली. आंघोळ झाल्यावर दोघी जेवायला बसल्या. सुलभाने तिच्याशी कोल्हापूरातील मैत्रिणींच्या आठवणी जागवल्या. दामले सरांची नक्कल केली. पाटील बाईंचे विनोद सांगितले. स्मितापण हसली. दोघीही झटपट ओटा, भांडी आवरली आणि बेडरुममध्ये आल्या. सुलभा म्हणाली, स्मितू थोडी झोप आता. पूर्वी कोल्हापूरात असताना मी तुला थोपटायचे ना ? तशी आज थोपटते आणि सुलभा हळू आवाजात गाणं म्हणू लागली आणि स्मिताला झोप लागली. सुलभा पण झोपली. तासा दीडतासाने स्मिताला जाग आली.

''सुले किती दिवसात अशी गाढ झोपली नाही गं !''
''मी थोपटल ना स्मितू राणीला म्हणून गाढ झोप बरं का ''
''होय बाई सुले, तू म्हणजे माझी आईच आहेस. चल निघते आता.''
''जा ग सावकाशीनं दुपारची वालाची उसळ आहे ती देऊ का डब्यातून ?''

''दे, तेजुला फार आवडते वालाची उसळ.'' सुलभा स्वयंपाक घरात डबा भरायला गेली तोपर्यंत स्मिताने फोनवर कुणाचे फोन, मेसेज आलेत का हे पाहू लागली. फोनवरचे मेसेज वाचता वाचता एकदम रडू लागली.

''काय हे ? आता काय करायचं मी ?''
सुलभा बाहेर आली तर स्मिता रडते आहे.
''अग काय झालं?''
''वाच हा तेजूचा मेसेज'' स्मिताने रडत रडत मोबाईल सुलभाला दाखवला. सुलभाने मेसेज वाचला, तेजश्रीने लिहिलं होतं –
''मी आज रात्री घरी येत नाही, जमीर बरोबर बाहेर जात आहे. ''
''आता काय करायचं गं सुले? हे आपले संस्कार का ? मला नाही सहन होत आता.''
''आता काय करणार बाई, मनाची तयारी करायला हवी. काळच तसा आलाय.
सिनेमातल्या आणि मालिकेतल्या नट्या काय काय करतात ते या मुली पाहतात. ते आदर्श त्यांचे. तू शांत हो पाहू.

कितीतरी वेळ स्मिता रडत राहिली आणि सुलभा तिला थोपटत राहिली. संध्याकाळ होत आली तशी स्मिता उठली, तिनं तोंड धुतलं आणि ''येते गं सुले'' असं म्हणत तिने पायात चप्पल घातले.''
सांभाळून गं स्मिते, मी येऊ का घरापर्यंत?''
''नको बाई, किती दिवस माझ्यासाठी रडणार तू. शेवटी मलाच तोंड द्यायला हवे. येते. अस म्हणत स्मिता बाहेर पडली. सुलभा गॅलरीत उभी राहिली. लांबपर्यंत चालणारी स्मिता तिला दिसत राहिली. मग हळू हळू गर्दीत गडप झाली.

विषण्ण मनाने सुलभा घरात आली. तिचे मन काळजीने आणि दु:खाने भरुन गेले होते. तिला स्मितूची काळजी वाटत होती. आपल्या एकुलत्या एक मुलीने आपल्या पेक्षा दहा वर्षांनी मोठ्या पुरुषाबरोबर रात्री बाहेर जाणे आणि तसा मेसेज आईला करणे ह किती दुखःचे आणि त्रासाचे. सुलभाच्या मनात आलं. काळ किती बदललाय कोल्हापूरला असताना आम्ही वर्गातल्या आणि शेजारच्या मुलांबरोबर बोलायचो नाही. आता गळ्यात गळे घालून सगळीकडे मुल–मुली फिरतात. काळ बदललाय.

तिने कन्येला विनयाला फोन केला. तिला आता स्मितू मावशी येऊन गेल्याचे सांगितले. हॉलमध्ये येऊन तिने टी.व्ही लावला आणि कार्यक्रम पाहत राहीली. टी.व्ही पाहता पाहता तिचे डोळे मिटू लागले. हॉलमध्ये कोचवर कधी ती झोपली हे तिलाच कळले नाही. दरवाजाच्या बेल वाजत राहिली त्याने तिला जाग आली. तिने घड्यात पाहिले साडेसात वाजत होते. यावेळेस कोण आले ? असे पुटपुटत तिने टी.व्ही बंद केला आणि दरवाजा उघडला. बाहेर राजन होता.

''अरे, आज एवढे लवकर ? मेनन सध्या तुमच्यावर खुश दिसतो.'' ती हसत हसत म्हणाली.

राजन चाचरत चाचरत म्हणाला ''नाही, नाही मी मुद्दाम आलो. स्मिताचा ॲक्सिडेंट झालाय गोरेगांवला, एसव्ही रोडवर''

''काय !'' सुलभा किंचाळली.

''आत्ता ती पाच वाजता येथून घरी गेली.''

''इथे आली होती काय ? तिच्या भावाचा कोल्हापूरहून मला फोन आला. रस्ता क्रॉस करताना, म्हणजे हिचीच चूक. सिग्नल नसताना ही क्रॉस करत होती म्हणे, टॅक्सीने उडवले''

''पण आता कसं आहे ?'' सुलभा किंचाळत बोलली.

राजन चाचरत चाचरत तिची नजर चुकवत म्हणाला,

''श्यामू म्हणाला बरं आहे म्हणून, पण डोक्याला मार लागलाय. ॲडमिट केलंय, आपण निघायला हवं.''

सुलभा रडायलाच बसली. राजनने तिचा ड्रेस आणून दिला.

''चल चल घाल हा ड्रेस, मी उबर मागवतो.''

सुलभाने रडत रडत ड्रेस बदलला आणि खाली उभ्या असलेल्या उबरमध्ये दोघे बसले. संध्याकाळच्या सुमारास मुंबईतील रस्त्यावर गर्दी त्यामुळे उबर हळूहळू चालत होती. शेवटी रात्रौ नऊ वाजण्याच्या सुमारास उबर भगवती हॉस्पिटलमध्ये पोहोचली. नेहमीप्रमाणे हॉस्पिटलमध्ये गर्दी. राजनने सुलभाच्या हाताला धरुन तिला ॲक्सिडेंट विभागाकडे नेले. राजन व सुलभा आत जाताच त्याठिकाणी आधीपासून आलेली स्मिताची बँकेतील मंडळी तसेच बिल्डिंगमधील मंडळी पुढे आली. स्मिताची बँकेतील जवळची मैत्रीण कल्पना रडत रडत पुढे आली. सुलभाच्या गळ्यात पडून – ''गेली ग स्मिता आपली !'' म्हणून आक्रोश करु लागली. तिच्या सोबतीच्या अनेक स्त्रियांनी पण हुंदके देत रडायला सुरुवात केली.

राजनला स्मिताच्या निधनाची कल्पना होतीच तरी तो भांबावून गेला. आता सुलभाला कसे सांभाळावे याचा तो विचार करत होता पण सुलभा शांत होती.

कदाचित ती बधीर झाली असावी. हा आक्रोश तिच्या मेंदूपर्यंत पोहोचत नव्हता. कुणीतरी स्मिताचा मृतदेह बाजूच्या पोलीसांच्या खोलीत असल्याचे राजनला सांगितले. राजन सुलभाच्या हाताला धरुन त्याखोलीत गेला. संपूर्ण झाकलेला तो देह आणि बाजूला बसलेले अभय, तेजश्रीला पाहून सुलभा ''स्मिते'' म्हणून जोरात किंचाळली आणि बेशुध्द झाली.

**आठ दिवसानंतर....**

गेले आठ दिवस सुलभा पार्ल्याच्या जोशी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होती. गेल्या आठ दिवसात तिने अन्नाचा कण पोटात घेतला नव्हता. सलाईनमधून थोडंफार व्हिटॅमिन जात होतं तेवढंच. तिच्या अवतीभवती राजन, त्यांची मुलगी विनया, जावई बिपीन उभे होते. एक नर्स खास सुलभासाठी बाजूलाच होती. सुलभाला थोडावेळ शुध्द येत होती सर्वांकडे पाहता पाहता तिचे डोळे भरुन येत होते आणि ओठातून 'स्मितू, स्मितू' असे हलकेच शब्द बाहेर पडत होते. विनया तिच्या तोंडात दूध घालू पहात होता पण ती हाताने चमचा दूर लोटत होती. सर्वजण मोठ्या काळजीत होते. डॉक्टर्स म्हणत होते काहीतरी करा आणि त्यांच्या पोटात दूध, अन्न जाऊ द्या. विनयाने ठरविले आता गप्प बसून चालणार नाही. दुपारी बारा वाजता सुलभाने डोळे उघडले, ती आजूबाजूला बघत होती. पुन्हा तिचा चेहरा रडवेला झाला. तेव्हा विनया आईला म्हणाली –

''आई, स्मितू मावशी गेली ती परत येणार नाही पण तुझं काय चाललयं ? तुला बाबांचा विचार आहे ना ? तू जगली नाहीस तर बाबांनी काय करायचं ? मला माझी नोकरी आहे, संसार आहे, त्यांना तुझ्याशिवाय कोण आहे ? तू गेल्यावर त्यांनीपण विष घ्यायचं का ?''

विनयाचं हे बोलण ऐकून सुलभा गप्प झाली. हळूच तिने नवऱ्याकडे पाहिलं. अर्ध्यातासाने तिने विनयाकडे दूध मागितलं. थोड्यावेळाने मोसंबी रस घेतला. दुसऱ्या दिवसापासून सुलभा सावरली. थोडथोड खाऊ लागली.

पंधरा दिवसानंतर विनया आईला म्हणाली, –''आई स्मिता मावशीचे इन्शुरन्स, म्युच्युअल फंड डिटेल्स तुझ्याकडे असेल ना ?''

''हो, तिच्या नोकरीतले फंड वगैरे सोडून, सर्व गुंतवणूक माझ्याकडेच आहे. खरं तर त्या दिवशी तिने आपली सर्व गुंतवणूक, इन्शुरन्स वगैरे पाहिलं, त्यावरील वारस वगैरे पाहिलं. मी तिला म्हटलं होत ही विमा रक्कम तुझ्या पश्चात तुझ्या वारसांना मिळणार एवढ्यात नाही. पण मला काय माहीत तिने एवढी कोटीच्यावर

रक्कम नवऱ्याला, मुलीला ठेवून ती गेली. मी तिला म्हणत होते अग सर्वच पॉलिसी तुझ्या नावावर कशाला? ती म्हणायची, मला माझी खात्री वाटत नाही. मला काय माहीत एवढ्यात स्मितू जाईल म्हणून.''

''ते जाऊदे आई, एकदा जाऊन आणि अभय काकाला आणि तेजूला भेटून त्यांच्या सर्व पॉलिसीज, फंड वगैरे देऊन येऊया.''

''नाही तरी ती मंडळी त्याचीच वाट पाहत असतील. काही काम ना धंदा. आता या पैशावर मजा करा म्हणावं.''

''आई, दोघही तुझी चौकशी करत असतात.''

''या पैशासाठी करत असतील. तिच्याबद्दल कुठलं आलयं त्यांना प्रेम?''

''आई असं बोलू नकोस. शेवटी अभय काका तिचा नवरा होता आणि तेजश्रीला तिने जन्म दिला होता.''

''हो ग हो मला माहिती आहे म्हणूनच मी गप्प आहे. नाही तर....''

''आई, मी अभय काकाला विचारते मग आपण जाऊया.''

''पण विनया स्मितूनंतर त्या घराच काय झालं असेल ते मला पाहावणार नाही. ती नोकरी सांभाळून घरदार व्यवस्थित ठेवायची, यांना जमणार आहे का ते?''

''जर घर व्यवस्थित नसेल ना तर आपण दोघी त्यांच घर लावून देऊ. पण आता जायलाच हवं.''

दोन दिवसांनी विनया आणि सुलभा गोरेगांवला स्मिताच्या घरी गेल्या. सुलभा मनात म्हणत होती स्मितू नंतर घर अस्ताव्यस्त पडलं असेल, कचरा तरी काढतात की नाही कोण जाणे? खरं तर या दोघांची तोंड पाहू नयेत असं वाटतं, पण एकदा स्मिताची गुंतवणूक त्यांच्या ताब्यात द्यायची आणि संबंध संपवायचा.

दोन मजले चढून ती दोघं वर पोहोचली. तेजश्री वाटच पाहत होती. सुलभाने आत पाऊल टाकताच पहिल्यांदा स्मितूचा मोठ्ठा फोटो हार घातलेला दिसत होता. ती फोटोतली स्मितू हसत होती. कदाचित लग्नातील फोटो इनलार्ज केला असावा. सुलभाने हॉलमध्ये नजर टाकली सर्वकाही व्यवस्थित होते. कोचवरच्या गाद्या, उश्या व्यवस्थित लावलेल्या होत्या. सुलभा गॅलरीत गेली तिला माहिती होते या ठिकाणी स्मिताची छोटी बाग आहे. तिथे नवीन झाडे आणि व्यवस्थित झाडांना पाणी घातलेले होते. सुलभा स्वयंपाकघरात शिरली. सर्व भांडी स्टँडवर व्यवस्थित अडकवलेली, गॅस शेगडी व्यवस्थित पुसलेली, ओटा धुतलेला. सुलभा घर बघत होती. तिच्यामागे विनया आणि तेजश्री येत होत्या. सुलभाने बेसीन पाहिलं, स्वच्छ होतं. वॉशिंग मशिनला व्यवस्थित कव्हर घातलेलं होतं. फ्रिज उघडून बघितला, भाजी, अंडी, फळ व्यवस्थित ठेवलेली होतं. बाथरुम उघडला. स्वच्छ होता, साबण वगैरे जागच्या

जागी होतं.

‘‘कामाला कोण येत?’’ सुलभाने विचारलं.

‘‘नाही मावशी, सर्व मी आणि बाबाच करतो. तेजश्री उद्धारली.’’

‘‘मग जेवण, भांडीकुंडी ?’’

‘‘जेवण चुकतमाकत करतो, अजून व्यवस्थित जमत नाही. पण जमेल. थोडफार पुस्तकात बघून, युट्यूबवर बघून.’’

‘‘आणि बाजार, भाजी वगैरे?’’

‘‘ते बाबा आणतो.’’

‘‘मग स्पोर्टस् क्लबला केव्हा जातो ?’’

‘‘ते सोडलयं त्याने’’

‘‘का?’’

‘‘त्यात फारसे पैसे मिळत नाहीत आणि सतत दौरे असतात बाहेरगावी आणि आता बाबाने जॉब घेतलाय. सोमवारपासून हजर होणार.’’

‘‘कुठे ?’’ विनयाने आणि सुलभाने एकदम विचारले.

‘‘ब्रोकर्स ऑफिसमध्ये, बाबाचं सीएस झालेलं त्यामुळे त्याला पटकन नोकरी मिळाली ती पण मालाडला, जवळचं आहे.’’

‘‘आणि तू काय करणार आहेस?’’

‘‘माझा आता कॉलेजचं शेवटचं वर्ष, ते पूर्ण करीन मग बघू कदाचित बाबासारखं सीएस करेन.’’

एवढ्यात बाहेर गेलेला अभय आला. त्या दोघींना बघून खुश झाला. सुलभा किती वर्षांनी अभयला पाहत होती. मागे कधी यायची तेव्हा तो क्लबमध्ये गेलेला असायचा.

‘‘खूप धक्का बसला ना तुला? आठ दिवस बेशुध्द होतीस अस समजलं’’ अभय म्हणाला.

‘‘धक्का बसणारचं, आमची मैत्री होती तशीच ! कोल्हापूरात असताना सतत दोघी बरोबर असायचो. वर्गात शिक्षक ‘‘त्या दोघी’’ कुठे गेल्या असे विचारायचे.’’

‘‘खरंच अशी मैत्री विरळच आजकाल’’ अभय म्हणाला.

‘‘स्मितू गेली म्हणजे माझ्या शरीराचा अर्धा भाग लुळा पडला असच मला वाटतं. त्या शेवटच्या दिवशी ती माझ्याकडे आली होती. मला कल्पना न देता तणावाखाली होती. खूप दिवसांनी मी तिच्या केसांना तेल लावलं. केस विंचरुन दिले. मग तिने गरम पाण्याची आंघोळ केली. आम्ही जेवलो आणि मी तिला थोपटून थोपटून झोपवलं. कोल्हापूरात असताना झोपवायची तशी. सुलभा जुन्या आठवणीत

रमली.

''तिच्या सर्व विमा पॉलिसीज, म्युच्युअल फंड, शेअर्स ही सर्व गुंतवणूक किती आहे ? तसेच नॉमिनीवगैरे बरोबर आहे ना याची तिने खात्री करुन घेतली. तिच्या पॉलिसीज बघून मी तिला म्हटलं - अग हे पैसे तुला नाही तुझ्या वारसांना मिळणार, मला काय कल्पना त्या पॉलिसीज एवढ्यात ड्यू होतील. अभय, तेजू स्मितू गेली पण तुम्हाला कोट्याधीश बनवून गेली. या तुमच्या पॉलिसीज, फंड डिटेल्स, शेअर्स तुमच्या ताब्यात घ्या आणि मला मोकळं करा. एवढ्यासाठीच मी आले होते.

**तेजश्री –** मावशी खरं आम्हाला नको हे पैसे, आईच्या बँकेतून मिळणारा फंड खूप झाला आमच्यासाठी, आम्ही पैसे मिळवू. एवढे दिवस ऐतखाऊ सारखं जगलो आता स्वाभिमानाने जगू.'

**अभय –** जोपर्यंत ती व्यक्ती आजूबाजूला असते, तोपर्यंत तिची किंमत नसते. स्मिता गेली तेव्हा लक्षात आलं, आम्ही खऱ्या अर्थाने अनाथ झालो. आम्ही तिला गृहित धरले. ती नोकरी करणार, घरातले सामान आणणार, जेवण बनवणार, कपडे ईस्त्रीला पाठवणार, गुंतवणूक करणार. सुलभा हे सर्व आम्हाला नकोच. स्मिता म्हणत होती कोल्हापूरातल्या शाळेची इमारत पडायला आलीय. त्यासाठी पैसे जमवणं सुरु आहे. हे पैसे त्यासाठी वापरुया.

**सुलभा –** कोल्हापूरच्या शाळेसाठी पैसे जमवणे सुरु आहे हे खरे, पण ती जबाबदारी दोन हजार माजी विद्यार्थ्यांनी घेतलीय. त्यात पाहिजे तर या पैशातील पाच लाख घेऊया. पण बाकी पैसे तुम्हाला घ्यावेच लागतील. कारण तिची तशी इच्छा होती.

**तेजश्री –** मावशी आई गेल्यानंतर मामा-मामी आले होते. खूप रडला गं श्यामू मामा. त्याची लाडकी ताईना गं ती. मावशी, मामाचे कोल्हापूरातील घर तीन-चार पिढ्यांचे जुने. मी मागे पाहिले तेव्हा फार जीर्ण झाले होते. आईची इच्छा होती मामाला घर बांधून द्यायचं. त्याची घर बांधण्याची परिस्थिती नाही. मला वाटते की, आईच्याच पैशातून मामाला घर बांधून देऊ. मजबूत, पुढील तीन पिढ्यांनी काळजी करता नये.

**सुलभा –** स्मितू माझ्याशीपण हे बोलली होती. खरंच चांगली कल्पना आहे. आपण ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्यांनी आपल्या आईवडिलांना, भावांना मदत करायलाच हवी. तुझ्या श्यामू मामाला गरज आहे. मला वाटतं यातून पन्नास लाख रुपयात ते घर बांधता येईल. आणि वर दोन ब्लॉक्स बांधले तर त्याचे भाडे मामाला मिळेल.

**तेजश्री –** पण मावशी या सर्व पैशांच्या देवीघेवी तुलाच करायला हव्यात. तुला

एकदम यातून मोकळं होता येणार नाही. आम्ही फक्त सह्या करायला येणार.

**सुलभा –** हो, ग हो. माझं पिल्लू ते. तुला सोडून कशी जाईन मी ?

**अभय –** सुलभा, तुझ्या मनात एक विचारायचं असेल तेजूचं लग्न ? ते तुला तेजूच सांगले.

**तेजश्री –** मावशी आईची बँकेत मैत्रीण होती कल्पना, आईची इच्छा होती कल्पनाचा मुलगा विराज याच्याशी माझं लग्न व्हाव, तो चांगला सीए आहे आणि वडिलांच्या फर्ममध्ये काम करतोय. पण माझ्या डोक्यात खुळ भरलं होतं. मी वेळीच सावरले पण आईच्या अपघाताचे मोल देऊन. विराजशी लग्न ठरते आहे माझे. तेजश्री रडत रडत सांगत होती.

**सुलभा –** रडू नकोस तेजू, ती असताना हे सर्व झाले असते तर ती समाधानी झाली असती. तिच्या डोक्यातील वादळे कमी झाली असती. पण....

**अभय –** आणि सुलभा लग्न फक्त वीस पंचवीस जवळच्या लोकांमध्येच आणि ते पण सहा महिन्यानंतर तोपर्यंत आम्हाला पण सावरु दे आणि कन्यादान तुला आणि राजनला करायचं आहे. नाही म्हणून नकोस. स्मिताला असेल तिथून समाधान वाटेल.

''ठीक आहे'' सुलभा डोळे फुसत म्हणाली. मी आले होते तुमचे सर्व व्यवहार तुमच्या हाती देऊन त्यातून मोकळी होण्यासाठी पण तुम्ही दोघांनी मला पुन्हा अडकवलंत याच्यात. पण तिच्यासाठी हे मला करावचं लागेल. कारण आमची जोडी होतीच तशी.....

# रंगदेवता आणि...

प्रदिप केळूसकर – मोबा. ९४२२३८१२९९/ ९३०७५२११५२

वसंतराव रंगात येऊन जेवत होता. आज रविवार. आज मटण आणि पुरीचे जेवण. रात्रौ विष्णुदासच्या प्रयोगाचे उत्पन्न चांगले आले होते. आज सकाळी मॅनेजर सुनीलने व्हॉटस्‌अ‍ॅपवर सगळा हिशेब पाठविला होता. एकंदरीत या नाटकाचे उत्पन्न बरे येत होते. पहिले दहा प्रयोग तोट्यात गेले. पण नंतर ''हवा येऊ द्या''मध्ये प्रमोशन झाले तसेच मुंबईतील पेपरमध्ये चांगली परीक्षणे छापून आली आणि गर्दी वाढू लागली.

आज रविवारी फक्त एक प्रयोग, साहित्य संघामध्ये आणि तो कॉन्ट्रॅक्ट प्रयोग. तो गिरगांवातल्या कुडाळदेशकर गौड ब्राह्मण समाजाने त्यांच्या ज्ञातीबांधवांसाठी ठेवला होता. तसा वसंतरावांना सतत पाच वर्षे या समाजाकडून प्रयोग मिळत होता. त्यांची आणि आपली वेव्हलेन्थ जुळली आहे आणि आपली नाटकेपण चांगली. तसेच या समाजाचे कार्यकर्तेपण चांगले. लोक चांगली. पैसे प्रयोगाआधी मिळत होते. आपल्या संस्थेच्या प्रत्येक प्रयोगाला आपण स्वतः जातो असे नाही. पण प्रयोग मुंबईत आहे आणि या कुडाळदेशकर परिवाराचा आहे त्यानिमित्ताने त्यांची माणसे भेटतात म्हणून जायचे.

वसंतराव चवीने मटणाची नळी चोखत होता एवढ्यात मॅनेजर सुनीलचा फोन मोबाईलवर दिसला. वसंतरावांना वाटले संध्याकाळच्या प्रयोगाची तयारी सांगत असेल. पण

**सुनिल** – साहेब, प्रॉब्लेम झालायं, मनोहरला आज सकाळी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये आयसीयुमध्ये ठेवलाय. मोठ्ठा झटका आलाय त्याला. त्याची कंडिशन सिरीयस आहे म्हणे

**वसंतराव** – अरे बापरे ! मनोहर हॉस्पिटलमध्ये ? म्हणजे संध्याकाळच्या प्रयोगाला येऊच शकत नाही की काय ?

**सुनिल** – नाही हो, मी आत्ता हॉस्पिटलमध्ये फोन करुन चौकशी केली, किमान चार दिवसतरी त्याला आयसीयुमधून बाहेर काढणार नाहीत. कदाचित बायपास करावी लागेल.

**वसंतराव** – अरे, आजच्या संध्याकाळच्या प्रयोगाचे काय? आपण आधीच पैसे घेतलेत.

**सुनिल –** त्याकरिताच तुम्हाला फोन केला. तुम्ही ताबडतोब ऑफिसमध्ये या.
वसंतराव ताटावरुन उठले. बायकोनेपण आग्रह केला नाही कारण ती फोनवरचे बोलणे ऐकत होती. वसंतरावांनी कपडे चढवले आणि बिल्डिंगखाली येऊन गाडी चालू केली. डोक्यात विचार सुरु. मनोहरची बदली घेऊन काम करणे अशक्य कारण त्याचे यात साठ टक्के काम. आयत्यावेळी दुसरा कोण मिळणार ? आणि आज रविवार, सर्वच थिएटर्समध्ये नाटके सुरु. कॉन्ट्रॅक्ट शो म्हणजे ती संस्था आपल्या मेंबर्सना तिकिटे देऊन मोकळी झाली असणार. लोकांना केवढा उत्साह असतो.

विचार करता करता वसंतराव परेलमधील आपल्या ऑफिसमध्ये पोहोचले. सुनिल डोक्याला हात लावून बसला होता.

**वसंतराव –** आता काय करता येईल ? प्रयोग रद्द करता येणार नाही. कॉन्ट्रॅक्ट शो आहे. हौशी लोक असतात. एक दिवस हौस करुन सहकुटुंब नाटक बघायला येतात. सगळे एका जातीचे म्हणून त्यांना जास्त हौस.

**सुनिल –** 'जाऊबाई' करता येणे अशक्य. कारण मनोहरशिवाय एवढे नाटक कुणाला जमणार नाही. आता दुपारचे दिड वाजतायत आणि सहाचा प्रयोग ठरलाय.

**वसंतराव –** अस केलं तर आपल्याच प्रोडक्टशनच ''खरा जावई'' केलं तर ? पण त्यातली माणसं इथं आहेत का बाहेरगावी गेले कळायच नाही.

**सुनिल –** त्यात मोठी भूमिका निलिमाताईची आहे. ती परदेशी गेलेली. कुठे हाँगकाँग की सिंगापूरला. आली की नाही कोण जाणे ?

**वसंतराव –** तिला फोन लागतो का बघ, आणि लागला तर म्हणावं सहाला ''खरा जावई''चा प्रयोग साहित्यला करायचा आहे.

सुनिलने त्वरीत नीलिमाला फोन लावला. ती आज सकाळीच सिंगापूरहून मुंबईला आली होती. ती सहाचा प्रयोग करायला तयार झाली.

**वसंतराव –** आता बाकीचे किती राहिले ? पाचजण, आणि लाईटवाला, म्युझिक, मेकअपमन सर्वांना फोन लाव.

सुनिलने व्हॉटस्‌ॲप ग्रुप कॉल लावला. समीर खारघरला मित्राकडे होता. विश्वासचे कालच लग्न झालेले, त्याच्याकडे सत्यनारायण होता. संगीता आणि विद्या दोघी गडकरीमध्ये एकांकिका स्पर्धेत होत्या आणि प्रवीणचा संपर्क होत नव्हता. मेकअपमन निवृत्ती सिरीयलच्या शुटिंगमध्ये होता. त्यामुळे तो येऊ शकणार नव्हता. त्याच्या ऐवजी कोणीतरी दुसरा पहायला हवा होता. लाईट करणारा सुंदर गावी गेला होता. असा एकंदर रिपोर्ट सुनिलने वसंतरावांना दिला. मग वसंतरावांनी संगीताला फोन लावला.

**वसंतराव –** ''कोण संगीता काय ? मी वसंतराव बोलतोय, अगं आज साहित्य संघात जाऊबाईचा प्रयोग होता. पण मनोहरला ॲटॅक आलाय, बरं तो कॉन्ट्रॅक्ट प्रयोग आहे त्यामुळे तो केलाच पाहिजे. म्हणून आपलंच नाटक ''खरा जावई'' तिथ करुया असं मी म्हणतो, नीलिमा आजच सिंगापूरहून आलीय आणि ती सहाचा प्रयोग करते म्हणाली. तेव्हा तू आणि विद्या गडकरीमध्ये आहात म्हणे, कसही करुन पाच पर्यंत संघात पोहोचा. काय ? वाट बघतोय.

**संगीता –** ''विद्याची एकांकिका तीन वाजता आहे, माझी सहाला आहे आम्ही कसे येणार ?''

**वसंतराव –** 'गोखलेंच्या संस्थेची स्पर्धा आहे न्हवं? मी गोखलेला फोन लावतो आणि तुमची एकांकिका तीन वाजता घ्यायला लावतो. पण विद्याला विचार जरा.''

संगीताने त्याच नाट्यगृहात मेकअप रुममध्ये असलेल्या विद्याच्या कानी ही बातमी घातली. विद्या म्हणाली, ''मी नाही येणार. मागच्या सातारच्या प्रयोगाला या वसंतरावाच्या बायकोने माझा सर्वांसमोर अपमान केला. वसंतरावांना सांग विद्या येत नाही म्हणून.'' संगीताने ताबडतोब वसंतरावांना फोन लावून विद्याचे म्हणणे कळविले. वसंतरावांनी विद्याला फोन लावला.

**वसंतराव –** हॅलो विद्या, संगीताने तुला सांगितलं असेल, संध्याकाळी सहाला साहित्य संघात अचानक खरा जावईचा प्रयोग करायला लागतोय. तुम्हाला आधी कळविले नाही हे खरे पण नाईलाज आहे. मनोहर फार आजारी पडलाय, त्यामुळे हे नाटक करावं म्हणतोय. तेव्हा तू आणि संगीता साडेपाचपर्यंत संघात पोहोचा.

**विद्या –** मी येत नाही, मी नाटक सोडलयं तुमचं. मागच्या सातारच्या प्रयोगात तुमच्या बायकोने सर्वांदेखत माझा अपमान केला तेव्हाच मी सोडलं, आता दुसरी बघा.

**वसंतराव –** अगं आयत्यावेळी कुठं बघणार ? आजचा एक प्रयोग कर. मग पुढच्या प्रयोगाला दुसरी बघु.

**विद्या –** ते नाही जमायचं. तुमची बायको असेल तुमच्या घरची राणी म्हणून तिने काय माझा अपमान करावा? मी काय रस्त्यावर पडले नाही अजून.

**वसंतराव –** अगं विद्या, माझी बायको तुला का बोलली माहिती आहे ना? त्या परक्या गावात तुझी आणि संस्थेची बेअब्रु झाली असती. तुला मी किती वेळा सांगत होतो बाहेरगावी पिण कमी करायचं मग आपल्याला शुध्द राहत नाही.

**विद्या –** दारु कोण पित नाही वसंतराव ? तुम्ही पित नाही की ती नीलिमा मोठी नटी, ती पित नाही?

**वसंतराव –** सर्वजण पितात मला माहिती आहे, अग पण मला सवय आहे खूप वर्षापासून. तू तरुण आहेस आणि तुला दारु झेपत नाही हे लक्षात ठेव.
**विद्या –** तुमचं कायपण ऐकणार नाही मी, जर मी प्रयोगाला यायला हवी असेल तर, तुमच्या महाराणीला माझी माफी मागायला सांगा नाही तर दुसरी बघा.

वसंतरावांचा नाईलाज झाला, आता बायकोला सांगितलं तर ती आपल्यावर डाफरेल पण करणार काय ? प्रयोग तर व्हायला हवा. वसंतरावांनी बायकोला फोन करुन सर्व परिस्थिती सांगितली आणि विद्या आपली क्षमा मागायला सांगते आहे असं कळविले.

**वसंतरावांची पत्नी –** तुम्हाला कशाच काहीच वाटत नाही ? त्या दीडदमडीच्या नटीची मी माफी मागू? सातारच्या प्रयोगानंतर ती पिऊन टाईट झाली. तिला आपल्या कपड्याची शुध्द नव्हती. आपल्या संस्थेमध्ये एवढी बाप्ये माणसं कोण कसा गैरफायदा घेईल सांगता येईल? म्हणून मी बोलले.
**वसंतराव –** अगं ते मला माहिती आहे, पण अडवून दाखवते ना ! माझे हात आता बांधले गेलेत. एक प्रयोग होऊ दे, नाही तिच्या....वर लाथ मारतो की नाही बघ. एकदा तिला फोन कर आणि मिटवून टाक भांडण.
वसंतरावांच्या बायकोने विद्याला फोन लावला
**वसंतरावांची बायको –** अगं विद्या, मी सरस्वती बोलते, वसंतरावांची बायको. त्यांचा फोन होता संध्याकाळी साहित्यमध्ये जावईचा प्रयोग करावा लागतोय, तो मनोहर सिरीयस झालाय म्हणे, अगं विद्या परवा ना सातारच्या प्रयोगानंतर माझं चुकलचं गं, मी तुला सर्वांसमोर बोलायला नको होतं, मला आपली तुझी काळजी वाटली म्हणून बोलली. तुला राग आला असेल तर मला माफ कर पण आजचा प्रयोग होऊ दे.
**विद्या –** ठीक आहे, पण यापुढे माझ्यासमोर दात दाखवताना विचार करा आणि आजच्या प्रयोगाचे डबल पाकीट पाहिजे तरच मी साहित्यला येते नाहीतर बघा दुसरी.
**सरस्वती –** बरं बाई मी सांगते यांना डबल नाईट द्यायला, पण तू साडेपाचपर्यंत साहित्यला पोहोच.
**विद्या –** मी आणि संगीता गडकरीत आहोत. आम्ही ओला करुन गिरगांवात येणार म्हणून सांग तुझ्या नवऱ्याला. ओलाचं भाडं द्या म्हणावं.

सरस्वतीबाईंनी विद्याचा निरोप वसंतरावांना सांगितला. आता प्रश्न होता तो संगीताची एकांकिका सहाला होती. ती वेळ बदलून घ्यायला लागणार होती. विद्याची तीनची होती. म्हणजे विद्याची चारला एकांकिका संपली की दोघीही ओला

करुन गिरगावांत आल्या असत्या. वसंतरावांनी एकांकिका स्पर्धेचे आयोजक गोखले यांना फोन लावला आणि अडचण सांगितली आणि संगीताची एकांकिका चारला घ्या अशी विनंती केली. गोखले ऐकायला तयार नव्हते. ''इतर स्पर्धक ओरडतील, त्यांना प्रॉब्लेम होईल त्यामुळे आपण तसे करु शकत नाही.'' असे ते स्पष्टपणे वसंतरावांना म्हणाले. वसंतराव म्हणाले चारची एकांकिका कोणाची आहे ती मी पाहतो. चारची एकांकिका कल्याणच्या ग्रुपची होती.

कल्याणच्या ग्रुपचा दिग्दर्शक अनिकेत त्यांच्या ओळखीचा होता. त्याला फोन करुन तुझी चारची एकांकिका सहाला कर आणि सहाची एकांकिका चारला होऊदे अशी विनंती केली. अनिकेत तयार झाला, पण तो म्हणाला परिक्षकांना सांगायला पाहिजे. कारण शेवटी सकाळी त्यांच्या हातात टाईमटेबल दिलयं. वसंतरावांनी स्पर्धेचे परिक्षक जयंत सामंत यांना फोन करुन अडचण सांगितली. सामंत म्हणाले, जर एकांकिका करणारे संघ अदलाबदल करायला तयार असतील तर माझी काही हरकत नाही.

वसंतरावांनी पुन्हा संगीताला फोन लावला. फोन करुन तुमची एकांकिका चारला आणि विद्याची तीनला करा. संगीता म्हणाली, अडचण अशी आहे आमच्या एकांकिकेत काम करणारा मिलिंद रानडे डोंबिवलीत लग्नाला गेलाय. सहाची एकांकिका म्हणून तो पाचपर्यंत पोहोचणार. तो एका तासात इथे कसा येईल ? वसंतरावांनी डोक्याला हात लावला आणि संगीताकडून मिलिंदचा फोन घेतला आणि त्याला अडचण सांगितली. मिलिंद ऐकेना. तो म्हणाला त्याच्या जवळच्या मित्राचे लग्न आहे तेव्हा तो वरातीत नाचून मगच ठाण्याला जाणार. वसंतरावांनी फारच विनंती केली तेव्हा जर तुम्ही माझ्या गुगल–पेवर पाच हजार भरले तरच मी ठाण्याला जायला निघतो नाही तर नाही. वसंतरावांनी मिलिंद रानडेला गुगल–पे वरुन पाच हजार पाठविले. तसा मिलिंद म्हणाला, माझ्यापाशी मोटरबाईक आहे मी तीनपर्यंत ठाण्याला पोहोचतो. वसंतरावांनी परत संगीताला फोन लावला आणि पाचला एकांकिका संपली की दोघीही ओला करुन गिरगांवात या. ओलाचे पैसे मी देतो. संगीता आणि विद्या या दोन कलाकारांची सोय झाली आणि इतर कलाकार कोण राहिले हे सुनिलने वसंतरावांना सांगितले. शिवाय लाईटवाला, म्युझिकवाला, मेकअपमन.

वसंतराव सुनिलला म्हणाले, तू समीरच्या संपर्कात रहा. तो खारघरहून येऊ शकेल आणि प्रविणचा कॉन्टॅक्ट होतो का बघ. विश्वासचे काल लग्न झाले आहे त्याच्या लग्नाला मी जाऊ शकलो नाही आता त्याच्याकडे पूजेला जातो आणि येताना

त्याला घेऊन येतो. तोपर्यंत या दोघांना कोणत्याही परिस्थितीत साडेपाचपर्यंत गिरगावात बोलव. आणि वर्दम मेकअप सर्व्हिसमध्ये फोन करुन आजच्या पुरता कोण मेकअपमन मिळतो का बघ, म्युझिक आणि लाईटवाला कोण नाही मिळाला तर आजच्या दिवस तू आणि मी जमेल तस करु. आणि शिवाय धोंडूला फोन कर. त्याला सांग आज 'जाऊबाई' होत नाहीय, गोडावूनमधून 'खरा जावई' भर. नाहीतर तो येडा 'जाऊबाई' घेऊन यायचा. सुनिलने धोंडूला फोन करुन गोडावूनमधून जाऊबाई घेऊ नकोस, 'जावई' टेम्पोत भर आणि पाचपर्यंत संघात पोहोच असा निरोप दिला. धोंडू सुनिलला शिव्या देऊ लागला.

''सकाळी सांगायचं नाही का? बारापासून टेम्पोत 'जाऊबाई' भरणं सुरु आहे, अर्धी भरुन झाली आणि आता सांगतो 'जावई' भर म्हणून.'' सुनिलने त्याला शांत करत काय अडचण झाली ते सांगितले.

इकडे वसंतरावांची गाडी वांद्र्याला खेरवाडीच्या दिशेने धावू लागली. आता विश्वासला आणि त्याच्या नवीन पत्नीला कसे पटवायचे याचा विचार ते करु लागले. आपल्या नाटकात असून आपण काल त्याच्या लग्नाला गेलो नाही ही मोठी चूक झाल्याचे वसंतरावांना वाटले. आता त्याच्या घरचे काय बोलतील ते गुपचूप ऐकावं लागेल. इकडे प्रवीणचा पण संपर्क होत नाहीय. तो xxx कुठे गेला? लयं बाराचा हाय. बाई दिसली की लाळ घोटत मागं फिरल, आता कुठल्या बाईच्या मागून गेला कोण जाणे. पण साल्याच एक आहे, स्टेजवर गेला म्हणजे सर्वांना खाऊन टाकतो. वसंतरावांना मनात येत होतं - ''हा नाटकाचा धंदा लई वाईट, कुणा कुणाचे पाय धरावे लागतील नेम नाही, रोज म्हणतो हा धंदा सोडून दुसरं काहीतरी करु, पण दारुड्यासारखं व्यसन आहे हे. नवीन नाटक केल्याशिवाय चैन पडत नाही.

एव्हाना वसंतरावांची गाडी खेरवाडीत शिरली. एकदोन वेळा ते विश्वासच्या घरी आले होते. त्यामुळे बरोबर त्याच्या बिल्डिंगखाली पोहोचले. बिल्डिंगखाली भरपूर गाड्या, स्कूटर्स उभ्या होत्या. त्याच्या गॅलरीत रोषणाई दिसत होती. वसंतराव दोन जिने चढून तिसऱ्या मजल्यावरील विश्वासच्या ब्लॉकजवळ आले. दरवाजा सताड उघडा होता आणि माणसे बाहेर पॅसेजमध्ये उभी होती. वसंतराव पॅसेजमध्ये उभे राहिले. एवढ्या गर्दीत विश्वास कुठे काय दिसतो ते पाहत होते. विश्वास सोवळे नेसून प्रसाद वाटत होता आणि त्याची बायको बायकांना हळदीकुंकू आणि तिर्थ वाटत होती. आता विश्वासला हाक कसा मारायचा असा विचार वसंतराव करत होते तेव्हा त्यांच्या लक्षात आले आपण सत्यनारायणासाठी आलो आहे, लोकांना बाजूला सारत वसंतराव आत गेले आणि सत्यनारायणासमोर उभे राहिले. सत्यनारायणाला

नमस्कार करुन वसंतराव उठले एवढ्यात विश्वासच्या आईने त्यांना पाहिले.
''कोण वसंतराव ? काल लग्नाला आला नाहीत, आज वेळ मिळाला की काय?''
अहो आई, काल येणार होतो, पण बायकोला डॉक्टरकडे न्यायला लागलं, पाचवा महिना आहे ना.''
असं होय ! मी म्हटलं खरा जावई बंद आहे म्हणून विश्वासला विसरला की काय?
''नाही हो, विसरणार कसा ? आणि आज यायचचं होत ना. गेला कुठं विश्वास ?''
''आहे, बायकोसोबत बोलतोय आत, कालच नवीन लग्न झालयं ना!''
आईने विश्वास, विश्वास अशा हाका मारल्यावर विश्वास बाहेर आला. वसंतरावांना पाहताच –
''अरे वसंतराव, आज आलात ? काल वाट पाहत होतो तुमची.''
होय रे बाबा, काल बायकोला डॉक्टरकडे न्यायचं होतं, आणि आज यायचच होत ना !''
''बर, बर मग आज काय जाऊबाईचा प्रयोग आहे ना? सकाळी जाहिरात पाहिली.''
''तेच सांगायला आलोय, जरा बाहेर येतोस.''
येतो – अस म्हणत विश्वास गॅलरीत आला.

वसंतरावांनी विश्वासला मनोहरचे अचानक आजारपण आणि त्यामुळे जाऊबाईचा रद्द करावा लागलेला प्रयोग आणि त्यामुळे खरा जावई संध्याकाळी करावा लागतोय हे सर्व सांगितलं आणि विश्वासला कोणत्याही परिस्थितीत साडेपाचपर्यंत संघात पोहोचायला सांगितलं. हे ऐकून विश्वास उडालाच.

''अहो माझं काल लग्न झालयं, आणि आज घरी सत्यनारायण आहे, मी कसा येऊ ? स्वप्ना चिडेल. तिचे माहेरचे येणार आहेत संध्याकाळी प्रसादाला.''

''कसही कर विश्वास. पण आजचा प्रयोग करणे महत्त्वाचे आहे. नाहीतर माझी सगळी अब्रु गेली. एवढ्या एक हजार माणसांना काय उत्तर देणार. त्यांचा किती हिरमोड होईल ? पाहिजे तर मी तुझ्या बायकोशी बोलतो.'' असे म्हणता म्हणता विश्वासची पत्नी स्वप्ना तिथेच आली. विश्वासने तिची वसंतरावांशी ओळख करुन दिली. विश्वासने वसंतरावांची अडचण सांगितली आणि सायंकाळी खरा जावईचा प्रयोग करणे आवश्यक आहे, असे वसंतरावांचे म्हणणे आहे हे ऐकून स्वप्ना उखडलीच.

''अरे काल आपलं लग्न झालय, आज सत्यनारायण, माझी माहेरची लोकं सत्यनारायणाला येणार, आणि तू प्रयोगाला जाणार? जमणार नाही. काही वाटतं का मनाला ?'' अस एवढं बोलून स्वप्ना तणतणत आत गेली. विश्वासचा पण नाईलाज

झाला. काल लग्न केलेल्या स्वप्नाला दुखवणार कसा?

वसंतरावांना पाहून विश्वासचे बाबा पुढे आले. ते पण जुन्या काळात रंगभूमीवरील नट होते. चिंताग्रस्त वसंतरावांना पाहून त्यांनी ''काय झालं?'' म्हणून विचारलं. वसंतरावांनी त्यांना पुन्हा सगळी हकिगत सांगितली. विश्वासच्या बाबांच्या अडचण लक्षात आली. ते म्हणाले, मी सांगतो स्वप्नाला. असे म्हणून ते स्वप्नाला आतून घेऊन आले. तणतणत स्वप्ना बाहेर आली.

''हे बघ स्वप्ना, कोणत्याही परिस्थितीत नाटक व्हायला पाहिजे. एक हजार प्रेक्षकांना परत पाठवता कामा नये. समजा आपण नाटकाचे ॲडव्हान्स तिकीट काढले आणि थिएटरवर गेल्यावर नाटक रद्द झाले असे कळले तर काय होईल ? लोक ऐकणार नाहीत, दगडफेक करतील, थिएटर जाळतील. शेवटी एक हजार प्रेक्षकांचे दोन हजार हात असतात. आधी नाट्यसृष्टीला लोक नाक मुरडतात. त्यात हा प्रयोग रद्द झाला म्हणजे उद्या सगळ्या पेपरमध्ये तिखटमीठ लावून बातमी येईल. वाईटच ते. तेव्हा विश्वासला जाऊदे प्रयोगाला. तुझ्या आईबाबांना मी सांगेन आणि कोणी विचारलं तर माझ्याकडे बोट दाखवं. पण नाटक व्हायला पाहिजे.''

वसंतरावांना वाटलं. विश्वासच्या बाबांचे पाय धरावेत. स्वप्ना आतल्या आत धुमसत होती. पण सासरेबुवा सांगतात तर नाही कस म्हणणार, तशी ती धुश्यात आत निघून गेली. बाबा वसंतरावांना म्हणाले, ''तुम्ही निघा, अजून बरीच कामे असणार, मी विश्वासला साडेपाचपर्यंत संघात पाठवतो.'' वसंतरावांनी बाबांचे हात हातात घेतले आणि आपल्या डोळ्याला लावले आणि ते चप्पल घालून बाहेर पडले.

बिल्डिंगखाली येताच वसंतरावांनी सुनिलला फोन लावला. सुनिल म्हणाला, ''समीर खारघरहून निघालाय, पण मुंबईत आज मेगाब्लॉक आहे, रेल्वेने मोठ्ठं काम काढलय, त्यामुळे तो खारघर स्टेशनवर अडकून पडलाय. दिडतासभर तो तिथेच आहे आणि स्टेशनवर खूपच गर्दी आहे. काय करायचं ?'' वसंतरावांनी डोक्याला हात लावला. वसंतरावांच्या लक्षात आलं आपल्या पुतण्या विनोद ठाण्याला राहतो. आज त्याची सुट्टी आहे. त्याला सांगूया गाडी घेऊन खारघरला जा आणि स्टेशनवरुन समीरला उचल. त्यांनी विनोदला फोन लावला. तो गाढ झोपला होता. तीनचार वेळा बेल वाजल्यानंतर तो जागा झाला. वसंतरावांनी त्याला खारघरला जाऊन समीरला गाडीत घालून कुर्ल्यापर्यंत सोडायला सांगितले. कुरकुरत तो उठला. तोपर्यंत वसंतरावांनी त्याच्या फोनवर समीरचा फोन पाठविला. आणि समीरला विनोद तुला घ्यायला येतोय तू तिथेच रहा असा मेसेज दिला.

वसंतराव गाडीतून निघाले, वाटेत दादरला जाऊन गोडावूनपाशी धोंडू काय

करतोय ते पहावे म्हणून त्यांनी गाडी गोडावूनपाशी नेली. त्यांनी घड्याळ्यात पाहिले साडेतीन वाजले होते. अजून प्रवीणचा संपर्क नाही. त्याच्या बायकोचा फोन आपल्यापाशी नाही. त्याची बायको त्याच्याजवळ आहे की सोडून गेली हे पण आपल्याला माहिती नाही. दोन तासात प्रवीणचा संपर्क झाला नाही तर काय करावे अशा विचारात असताना त्यांची गाडी गोडावूनपाशी आली. धोंडू आणि मंडळीचे 'खरा जावई'चे सामान टेम्पोत भरणे सुरु होते. त्यांना पाहताच धोंडू नाटक बदलल्याने त्याचे कसे हाल झाले ते सांगू लागला आणि दोन माणसे आली नाहीत म्हणून चौघांवर काम पडले आणि आता चौघानांच स्टेज लावावे लागणार अशी त्याची कुरकुर सुरु झाली. वसंतरावांनी खिशातून पाचशेच्या दोन नोटा काढल्या आणि त्याच्या खिश्यात कोंबल्या आणि लवकर संघात पोहचा असं सांगितलं. वसंतराव गाडी स्टार्ट करणार एवढ्यात धोंडूनं विचारलं – ''प्रविण घावला काय ?''
नाही रे, असे म्हणत वसंतराव एक सेकंद थांबले,
''मला आत्ता दुपारी माहिमच्या टोपाझ बारमध्ये शिरताना दिसला होता.''
असे म्हणताच वसंतराव थबकले. ''किती वाजता ?''
''साडेबारा वाजता''
''बरोबर कोण होत ?''
''एक बाई व्हती''

वसंतरावांनी ऑफिसमध्ये फोन करुन सुनिलला प्रविण टोपाझ बारमध्ये असल्याचे सांगितले. आणि त्याला जाऊन बघतो असे म्हणून ते टोपाझ बारच्या दिशेने निघाले. माहिम कोळीवाड्याजवळ येताच त्यांनी टोपाझ बारची चौकशी केली. तिसऱ्या गल्लीत टोकाला टोपाझ बार असल्याचे कळताच त्यांनी टोपाझ बार शोधून काढला. बारच्या बाहेर उभे असलेल्या गुरख्याला मोबाईलमधील प्रवीणचा फोटो दाखवला आणि हा माणूस आतमध्ये आहे का पाहून ये असे म्हणताच तो गुरखा म्हणाला, ''ये आदमी अंदर है, ये बहुत शराब पिता है और दंगामस्ती करता है, अंदर जाओ'' असं म्हणताच वसंतराव आत गेले. त्या काळोखात त्यांना काही दिसेना. काऊंटरवर त्यांना एक माणूस दिसला. त्या माणसाला त्यांनी प्रवीणचा फोटो दाखवला ''ये आदमी अंदर है क्या ?'' म्हणून विचारलं. तो फोटो पाहताच बारचा मॅनेजर चिडून बोलू लागला. ''सुबहसे पी रहा है, अभी उसको होश नहीं है, कितनी बार बोला, अरे कम पिओ, कम पिओ मगर सुनता नहीं, हमारा रेग्युलर कस्टमर है इसलिए चुप बैठा हूँ, नहीं तो कभीका बाहर फेंक देता.''
मैं उसे ले के जाता हूँ – वसंतराव म्हणाले.

‘‘अरे ऐसे कैसे लेके जा सकते हो तुम ? इसके साथ एक औरत थी वो एक घंटा पहले निकल गयी, दोनोने बहोत बिल किया है, वो देना पडेगा, नहींतो उसको बाहर जाने नहीं देंगे’’
वसंतरावांनी विचारले – कितना बिल है ?
मॅनेजर वहीवरुन हिशेब करुन म्हणाला – ‘‘चार हजार सात सौ रुपया है, ये बिल पुरा करो बाद में उसको लेके जाओ’’

वसंतरावांनी चुपचाप स्कॅनरवरुन चार हजार सातशे रुपये भरले आणि ते आणि मॅनेजर आत गेले. तिथे एका टेबलावर डोके टेकलेल्या प्रवीणला उठविले. त्याला काही जाग येईना. शेवटी दोन वेटरनी त्याला उचलले आणि वसंतरावांच्या गाडीत नेऊन ठेवले. वसंतरावांच्या लक्षात आले. आत्ता याचे काय करावे ? याला गार पाण्याची आंघोळ घातल्याशिवाय याची दारु उतरायची नाही. एवढ्यात त्यांच्या लक्षात आले आपल्या गोडावूनच्या बाजूला लहानसे लॉज आहे. त्याठिकाणी आपण काहीवेळा विश्रांतीसाठी जातो. तिथली पोर आपल्या ओळखीची आहेत. तिथेच याला नेऊन भरपूर आंघोळ घालायला सांगूया आणि दीडतास झोपवून ठेवायला सांगूया. वसंतरावांनी आपली गाडी गोडावून जवळ घेतली आणि लॉजच्या पोऱ्यांना बाहेर बोलावले. त्या दोघांच्या हातात दोनशे दोनशे टेकवले आणि – ‘‘याला भरपूर आंघोळ घाला आणि झोपवून ठेवा. मी साडेपाचला माणूस पाठवतो त्याच्याबरोबर याला पाठवा’’ असं म्हणून वसंतराव गिरगावच्या दिशेला निघाले.

आज सकाळी सकाळी कोणाचे तोंड बघितलं कोण जाणे? एक काम निट होईल तर शप्पथ. आता सहाही कलाकार मिळाले होते. स्टेज लागणार होत पण मेकअपमन, कपडेपट सांभाळणारा, लाईट, म्युझिक ऑपरेटर शोधायचे होते. आता चार वाजत आले. अजून दोन तास आहेत नाटकाला वसंतराव दुपारपासून वणवण करुन थकले होते. एक बार बघुन त्यांनी गाडी थांबवली. आणि उभ्या उभ्या व्हिस्कीचा ड्राय पेग घश्याखाली रचवला. आता त्यांना थोडी तरतरी आली. साडेचार वाजले आणि वसंतराव साहित्य संघाच्या आवारात पोहोचले. मागच्या दाराने रंगमंचाकडे वळले तेव्हा त्यांना दिसले धोंडूची माणसे नाटकाची प्रॉपर्टी आत घेत होती. स्टेजवर सुनिल संघाच्या लाईटवाल्याकडून स्पॉट ॲडजस्ट करुन घेत होता. वसंतरावांना पाहताच सुनिल म्हणाला, ‘‘वर्दम मेकअपचा माणूस येतोय. त्याला सर्व फोटो पाठविले. त्या नीलिमाला केस लावायचे आहेत ना?’’

‘‘होय बाबा, तिचा व्यवस्थित मेकअप झाला नाही तर थयथयाट करील. या बायकांचे नखरे सांभाळता सांभाळता मी लवकर म्हातारा होणार. आता हे शेवटचं

नाटक, आता काय शेवटचे प्रयोग लागले ते करायचे आणि इगतपूरी गाठायची. जमिनीत द्राक्ष लागवड केली तरी उपाशी नाही मरायचा. पुरे झालं आता.''

सुनिल गालातल्या गालात हसला, त्याला माहीत होतं. मालकांनी आजपर्यंत कितीवेळा नाटकधंदा सोडण्याचा पण केला आणि सोडला. वसंतरावांनी सुनिलला विचारले, ''कपडेवाला येतोय ना? नाहीतर आपले बाजीराव आणि मस्तानी स्टेजवर जायचे नाहीत.''

तो येतोय, स्टेशनवर उतरला असेल, आल्या आल्या इस्त्री करायला घेईल.

''आता सर्वांना फोन लाव. कोण कोण कुठं कुठं आलेत बघ.''

सुनीलने फोन लावायला सुरुवात केली. नीलिमा घरातून बाहेर पडून गाडीत बसत होती. संगीता आणि विद्या ओला पकडून भांडुपपर्यंत आल्या होत्या. समीर कुर्ल्याला येऊन ट्रेनमध्ये बसला होता. विश्वास आपल्या मोटरसायकलची किक मारत होता. आता प्रवीणला जागं करुन गिरगावांत आणायला पाहिजे होतं. वसंतरावांनी त्या लॉजमधला पोरगा तुकारामला फोन लावला त्या प्रवीणला उठवून त्याला कोरी कॉफी देऊन दहा मिनिटात टॅक्सीत बसवून तू स्वतः ये. तू इथ आलास की टॅक्सीच भाड आणि तुला मी एक हजार रुपये तयार ठेवलेत.'' हे ऐकताच तुकाराम खुश होऊन प्रविणला उठवायला गेला.

इकडे सहाच्या नाटकासाठी कुडाळदेशकर बांधव आणि भगिनी नटूनथटून, नवीन कपडे घालून, बायका फुलांची वेणी माळून आणि छोट्या मुलांना हाताशी धरुन आल्या होत्या. कित्येक पुरुष आणि स्त्रीया वर्षातून एकदा हे नाटक बघणार होत्या. त्यात या नाटकात सर्वांचा लाडका मनोहर याची देही याची डोळा दिसणार होता. पण बाहेर मोठ्ठा बोर्ड लागला होता.

''मनोहर अचानक आजारी पडल्याने जाऊबाई नाटका ऐवजी खरा जावई हे नाटक होईल.''

लोक कुजबुजू लागले. पण एव्हाना फेसबुक व्हॉटस्‌ॲपवर नट मनोहर याला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्याची बातमी पसरली होती. त्यामुळे ती बातमी लोक एकमेकांना दाखवत होते आणि आता सिनेतारका नीलिमाला याची देही याची डोळा पाहणार याची मनाशी तयार करत होते.

गिरगावात राहणारा दुसऱ्या कंपनीचा लाईटवाला हजर झाला. पुस्तकातील खुणावरुन तो आज लाईट करील अशी त्याने जबाबदारी घेतली. एव्हाना कपडेपट सांभाळणारा हजर झाला आणि तो कपड्यांना इस्त्री मारु लागला. वर्दम मेकअपचा माणूस पोहचला आणि त्याने मेकअप रुममध्ये मेकअपचे रंग उघडून ठेवले. तोपर्यंत

नीलिमा पोहोचली आणि मेकअपला बसली. पाठोपाठ रेल्वेने निघालेला समीर आला. मोटरसायकलवरुन निघालेला विश्वासपण हजर झाला. दोन मिनिटात ओलाने संगीता आणि विद्या आल्या. पाच कलाकार हजर. फक्त प्रवीण आला नव्हता. वसंतरावांनी तुकारामला फोन लावला. तुकाराम प्रवीणला घेऊन बॉम्बे सेंट्रलपर्यंत पोहचला होता. म्हणजे आणखी पंधरा मिनिटात नाटकातील सर्व कलाकार हजर होणार होते. मेकअपमन, कपडेपट सांभाळणारा हजर होता. आजच्या दिवशी सुनिल म्युझिक वाजवेल म्हणा, असे म्हणत वसंतरावांनी खिश्यातून सिगरेट काढली आणि मोठ्ठे चार झुरके घेतले.

कुडाळदेशकर समाजाचे नेते, कार्यकर्ते वसंतरावांना भेटायला आले तेव्हा मनोहर आजारी पडल्याने तुमच्यासाठी धडपड करुन खरा जावई नाटक उभे केले अशी प्रौढी मारु लागले. एवढ्यात प्रवीणला घेऊन तुकाराम आला. प्रवीण पोहचला तशी स्टेजवर पहिली घंटा वाजली.

वसंतराव मेकअप रुममध्ये गेले तेव्हा नीलिमा मेकअप करुन कपडे बदलायला गेली होती. संगीता मेकअपला बसली होती. बाजूलाच विद्या कुणाशीतरी मोबाईलवर बोलत होती. समीर आणि विश्वास इस्त्रीवाल्याकडे जाऊन आपले कपडे घेत होते. तुकाराम सोबत आलेल्या प्रवीणच्या चेहऱ्यावर दुपारच्या दारुचा हँगओव्हर दिसत होता. पण स्टेजवर गेल्यानंतर तो नेहमीसारखा चौकार षटकार मारणार हे वसंतरावांना माहीत होते. वसंतराव स्टेजवर आले. धोंडूच्या माणसांनी नेपथ्य व्यवस्थित मांडले होते. सुनिलने स्पॉट जोडले होते आणि डिजिटल डिमरवर ते ॲडजस्ट करुन तो लाईटवाल्याला दाखवत होता. सर्व तयारी होत आली तशी वसंतरावांनी साहित्य संघाच्या डोअर किपरला सूचना केली तसा प्रेक्षकांचा लोंढा आत घुसला. एका कोपऱ्यात उभे राहून वसंतराव या लोकांच्या लोंढ्याला पाहत होते. वसंतराव पुन्हा स्टेजवर आले. सर्व कलाकार तयार आहेत हे पाहून तिसरी घंटा देण्यात आली.

पात्र परिचयाचा कागद हातात घेतलेला विश्वास माईक जवळ येऊन पात्र परिचय करु लागला.

''रंगदेवता आणि नाट्य रसिकांना अभिवादन करुन.....''

पडदा उघडला, नाटक सुरु झाले, दोन तासापूर्वी दारु पिऊन टाईट झालेला प्रविण रंगमंचावर येऊन जोरदार फटकेबाजी करीत होता आणि ''तुमचं नाटक सोडलं मी'' म्हणून ठणकवणारी विद्या त्याच्या चेष्टेला जोरदार उत्तरं देत स्टेज गाजवत होती. वसंतरावांनी मनात म्हटले – यालाच नाटक म्हणतात राव, इथे ज्याच्या खिशात पैसा

नाही तो करोडपतीची भूमिका करतो आणि कारमधून आलेला कलाकार भिकाऱ्याची भूमिका करतो.

नाटक रंगत होते. त्या नाट्यगृहामधील एक हजार प्रेक्षक रोजच्या कटकटी विसरुन नाटकाच्या कथानकात तल्लीन झाले होते. हसत होते, रडत होते, टाळ्या वाजवत होते. या तिन तासानंतर त्यांना पुन्हा रोजच्या चिंता, कटकटींना सामोरं जायचं होतं.

इकडे वसंतराव नाट्यगृहाच्या बाहेर आले तेव्हा एक नवीन लेखक त्याच्या नवीन नाटकाची गोष्ट वसंतरावांना सांगत होता.

''हा नाटक धंदा कायमचा सोडतो'' अशी प्रतिज्ञा करणारे वसंतराव ''या नाटकासाठी कुठले कलाकार लागतील आणि बजेट किती असेल याचा मनातल्या मनात विचार करत होते.''

# ।। एक कथामृतानुभव ।।

कथा, कादंबरी, निबंध, ललितनिबंध, लघुनिबंध, चरित्र, आत्मचरित्र, नाटक, प्रहसन, एकांकिका, कविता, गीत, खंड/महाकाव्य, लेख इत्यादी सर्व साहित्यप्रकार वाङमय या सदरात येतात. याप्रत्येक साहित्यप्रकाराचा निर्माता जरी कथाकार, कादंबरीकार, निबंधकार, नाटककार, कवी, गीतकार, चरित्रकार या नावानी( किंवा विशेषणांनी )ओळखला जात असला तरी तो मूलतः लेखकच असतो. विचारवंत L.P. SMITH म्हणतात, What I like in a good author is not what he says but i like what he whispers. (चांगल्या लेखकाच्या लेखनात तो काय सांगतो, याच्यापेक्षा तो काय सूचित करतो हे मला अधिक आवडते )एल.पी. स्मिथ यांचे हे मननीय लेखनविचार आठवण्याचे कारण आणि निमित्त आहे, माझे मित्र श्रीमान प्रदीप रामदास केळुसकर, मु.पोस्ट – पाट, ता .कुडाळ हे लेखक आणि त्यांनी लिहिलेला कथासंग्रह ''एकापेक्षा एक''

श्री. प्रदीप केळुसकर यांचा ''एकापेक्षा एक'' हा १४ कथांचा संग्रह आहे. प्रत्येक कथा वाचताना एकापेक्षा एक या शीर्षकाच्या पुढे सरस किंवा भन्नाट किंवा सवाई किंवा वरचढ अशासारखे एखादे विशेषण असावे, इतक्या या कथा उत्कंठावर्धक आहेत.

माझ्यासारख्या सामान्य वाचकाला हे वाटते पण सर्वसन्माननीय दीपक तांबोळी, रविंद्र देशपांडे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. गिरीश ओक, श्रीनिवास नार्वेकर, राजू हर्डीकर, प्रभाकर वर्तक, डॉ. प्रकाश बावधनकर ,सुहास वैद्य ,प्रकाश कामात ,डॉ. वसुमती कुलकर्णी, मिनाक्षी सरदेसाई, नरेंद्र प्रभू, अनंत जामखेडकर, जयश्री जोशी, राजीव मानवी, प्रीतम ओगले आणि वृंदाताई कांबळी या साहित्यक्षेत्रातील दिग्गजानाही वाटते हे या कथासंग्रहाच्या साहित्यमूल्याचे वर्धित मूल्य आहे .कारण ही सर्व नावे कथा,काव्य , पत्रकारीता, नाट्यलेखन, अभिनय, दिग्दर्शन, संपादन या क्षेत्रातील अधिकारी आणि जाणकार आहेत .या सर्वांचे ''एकापेक्षा एक'' असे अभिप्राय हे या एकापेक्षा एक या कथासंग्रहाचे यश आहे आणि

त्यामुळे या संग्रहाबद्दल ‘काय म्या पामरे बोलावे लिहावे ’ अशी माझी अवस्था झाली आहे.

अनुभूती, निरीक्षण, चिंतन आणि सहसंवेदनशीलतेच्या मंथनातून निष्पन्न झालेली ही चौदा कथारत्ने लेखकाच्या प्रतिभारवीची घुसळण किती सर्जनशील आणि नवनवोन्मेषशालिनी आहे हे दाखवून देतात. ही सर्व कथारत्ने माणसाच्या दैनंदिन जीवनातील विविध अनुभव, मनातील विचारांचे कवडसे, भावनांचे कल्लोळ, मौनावलेल्या मनाचे बोलके आविष्कार, सुप्त मनाचे प्रकट चिंतन, प्रेम या संवेदनेच्या माया, ममता, वात्सल्य, दोस्ती, सख्य या सहसंवेदना, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, प्रयत्नवाद, दैववाद, श्रद्धा आणि सबुरी या मानवी मनाच्या असंख्य मितिय साद पडसादांचे भावसंमेलन या कथासंग्रहात पहायला मिळते !

हा कथासंग्रह श्री. केळुसकर यांनी आपल्या आईला समर्पित केला आहे. त्यांच्या मातोश्री श्रीम सुशीलामाई या पाट या गावाच्या भूतपूर्व सरपंच आहेत. आपल्या सरपंचपदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक सामाजिक सुधारणांबरोबरच वाचनालय प्रथमच नव्याने सुरु करुन उभ्या गावाला वाचनसंस्कृती आणि वाचनप्रेरणा प्रदान केली. वाचनालयात जाऊन वाचन करणारा आपला मुलगा आज एका कथासंग्रहाचा लेखक झाला हे पाहून आणि कथा वाचून धन्य झाल्या आहेत. सृजनशीलतेचे एक बीज आपण त्याच्या मनोभूमीत पेरलेत्याचेच हे फळ आहे असेच त्याना वाटत असेल. कृतार्थतेच्या या क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य आई आणि मुलाला एकाच माध्यमातून मिळावे, हा सुद्धा एक योगच आहे.

या चवदाही कथारत्नांचे पैलू विविध आहेत –रवि साटम या नाट्यवेड्या नटाचे समर्पित नाट्यप्रेम( शंभूराजे ), परदेशस्थ असूनही गावातील घरी येणारी रसिका ( या चिमण्यानो ), लहानपणापासून परस्परप्रेमाने एकमेकाशी मनाने बांधली गेलेली पण दैववशात वेगळेच जोडीदार मिळून आयुष्याच्या संध्याकाळी पुन्हा एकमेकांचे जीवनसाथी झालेले मनीष आणि विजया ( सुख म्हणजे...) मैत्रीचे रुपांतर प्रेमात आणि प्रेमाचे रुपांतर लग्नात होण्याची शक्यता असूनही केवळ व्यक्त न होण्यामुळे एकमेकापासून दुरावलेले वल्लभ आणि मिता ( दोष ना कुणाचा ), कृष्ण सुदाम्यासारखे मित्र असलेले व एकमेकांचा विरह सहन न होणारे म्हणुनच जणु काय एकमेकाना चुकवत देवाघरी गेलेले गोपाळ व मोहन ( प्रिय मित्रास ), आयुष्याच्या प्रत्येक वळणावर फुटके नशिब घेऊनच वळणारा व वळवळणारा पांडू (पांडुची गोष्ट), रा .स्व . संघाचा कार्यकर्ता किती तत्वनिष्ठ ,संघनिष्ठ आणि संयमी असतो हे दाखवून देणारा निनाद आणि साधा वैद्यकिय प्रतिनिधी ( एम.आर.)असूनही गुणांवर भाळणारी डाक्टर असलेली अंजली ( सॉरी मॅडम ),कालेजमध्येच लग्न करु इच्छिणारे

पण होऊ न शकलेले आणि आयुष्याच्या उतरंडीवर पुन्हा भेटणारे सुवर्णा साळगावकर आणि विमाएजंट सामंत (पॉलिसी), रुप, लक्षण, वर्ण याबाबतीत ''अवदिसा'' ठरुन सर्वांना नकोशी झालेली पण गुण, जिद्द, आशावाद, सुस्वभाव यांमुळे भाग्यलक्ष्मी ठरलेली आणि सर्वांना हवीशी वाटणारी सुलभा कदम ( नकोशी ), स्त्रीच्या अब्रुपेक्षा धर्म मोठा नाही असा संदेश देणाऱ्या उषाताई आणि जाहिरा ( लक्ष्मीव्रत ), जगाचे भविष्य सांगणारे पण स्वतःचे भविष्य न समजलेले आणि असहायतेने चुकीच्या मार्गाने जाऊन आपले आणि मुलाचे जीवन उध्वस्त करणारे मनोहर अण्णा (अंधारमाया), लहानपणीच दबून राहिलेले वाङमय प्रेम उत्तरायुष्यात उफाळुन येऊन कवितेलाच मैत्रिण मानणारी ज्योती पारकर ( सखी प्रिय सखी )आणि शेअरबाजारात नशिब आजमावताना लक्षाधिश झालेला समीर मांजरेकर ( आयपिओ)हे या सगळ्या कथांचे नायक, नायिका, चरित्रनायक आणि सहनायिका आहेत. या चवदा कथा रत्नातील कोणती व्यक्तीरेखा आणि कोणती कथा कौस्तुभ आहे, कोण पारिजातक आहे, कोण अमृत आहे किंवा कोण धन्वंतरी आहे हे मर्मज्ञ वाचकांनीच ठरवावे कारण पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना ।

या सर्वच कथा चिंतनशील आणि आनुभुतीजन्य आहेत, त्यांच्यात सहजता, वातावरणाची जवळिकता आणि व्यक्तिरेखांचे सान्निध्य आहे. सर्वसामान्य माणसांच्या जीवनात या कथापैकी कुठलीही कथा घडणे सहज स्वाभाविक असल्यामुळे यातील तीन कथा कथास्पर्धामध्ये पुरस्कारप्राप्त ठरल्या आहेत. ''पांडु'' ही कथा बेळगावच्या वाङमय चर्चा मंडळाच्या स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाने, '' सुख म्हणजे नक्की काय असते'' ही आरति मासिक कथास्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाने आणि ''पॉलिसी'' ही किरात कथास्पर्धेत (दिवाळी अंक २०२२) दुसऱ्या क्रमांकाने गाजलेली आहे. अल्पावधितच प्रथम पदार्पणात मिळालेले हे तिहेरी यश श्री. केळुसकर यांचे साहित्यिक सोनपाऊलच आहे !

या कथा वाचताना मुंबईच्या श्री. अनंतराव जामखेडकर यांना रवी साटम (शंभूराजे) ही व्यक्तिरेखा वास्तवातली वाटली, तशीच स्थिती माझीही झाली कारण डॉ. संजय ओक ,डॉ. नंदन सामंत, अभिनेता हृषिकेशा जोशी, दिग्दर्शक विनय आपटे या वास्तवातील व्यक्तींप्रमाणेच रवी साटम, विजया, ज्योती पारकर, मराठेबाई , प्रवीण अत्रे या व्यक्तिरेखाही वास्तवातीलच आहेत असे मला वाटले होते पण या सर्व व्यक्तीरेखा काल्पनिक आहेत. वाचकांना असा वाङमयीन चकवा देणारा लेखक पाटमध्ये राहतो आणि पात्र, संहिता आणि कथावस्तू यांचा त्रिवेणीसंगम सहज करतो याचे आश्चर्य वाटते आणि धन्यताही.

कविहृदयाचा कथाकार असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही अशी

एक कथा श्री. केळुसकर यांची आहे. 'सखी प्रिय सखी' या कथेत बालकवी , कुसुमाग्रज, इंदिरा संत, ग्रेस, सुधीर मोघे यांच्या काव्यकवडशांचा आस्वाद घेतानाच कवी प्रवीण अत्रे हे कविराजही आपली काव्यमैफल जागवतात आणि गाजवतात. हे प्रवीण अत्रे वास्तवातील वाटावेत इतके काल्पनिक आहेत, हे उशिरा कळते आणि त्यांच्या काव्यलहरीतून केळुसकरांचे काव्यतरंग शांतपणे मनाच्या किनाऱ्याला सुखद स्पर्श करुन जातात.

श्री. प्रदीप रामदास केळुसकर सध्या कुडाळ येथे Printing Material विक्रीचा व्यवसाय करतात. याआधी ते कोल्हापूर येथे Medical Representative होते. कोल्हापूर येथील हा नोकरीचा कालावधी त्यांच्या मूळ नाट्यछंदाला पोषक ठरला. कारण कोल्हापूरच्या गायनसमाज देवल क्लबचा निकट सहवास त्यांना लाभला आणि या समाजाच्या नाट्यपरंपरेने त्यांच्यातील नट, दिग्दर्शक, नेपत्थ्यकार, परीक्षक आणि समिक्षक या नाट्यव्यक्तिरेखांवर सुसंस्कार झाले. या शिदोरीवरच त्यांनी पाट या आपल्या गावात नटराज नाट्यसंस्था स्थापन करुन पाच नाटकांची निर्मिती करुन आपले आणि आपल्या मित्रांचे नाट्यवेड जोपासले. या नाटकांना विविध स्पर्धात बक्षीसेही मिळाली. अनेक नाट्यसंस्था आणि अनेक नाट्यधर्मियांशी जिव्हाळ्याचे संबंध जोडणारा, मैत्री जोडताना अभिनयशून्यता असणारा आणि कलेसाठी कला हा सिद्धांत जोपासून केवळ स्वान्तसुखाय या भावनेने लेखनकार्य करणारा प्रदीप केळुसकर यांच्यातील लेखक या कथासंग्रहाच्या माध्यमातून आमच्यासमोर येत आहे.

'एकापेक्षा एक' मधील प्रत्येक कथा वाचत जाताना मनात ठसत जाऊन रुतुन बसते. प्रवीण अत्रेंच्या माध्यमातून कवी प्रदीप केळुसकर म्हणतात त्याप्रमाणे

**बाकी उरणे महत्वाचे**
**तेवढीच श्रीशिल्लक ।**
**कविता असेल साधी**
**पण विचार मात्र तल्लख ।।**

कथाबीजांची ही श्रीशिल्लक साधी असली तरी विचारांच्या तल्लखपणामुळे त्या एकापेक्षा एक--सरस--सुरस--सुरेख--सुंदर--सवाई --आणि सूचक वाटतात.

सुशीलामाई केळुसकर यांच्या निवासस्थानातील माई, प्रदीप, भारती , मानसी , अभिषेक या पंचमितिय परिवाराची ''एकापेक्षा एक'' ही सहावी बाजू आहे .या सर्वच कथांची कथाबीजे, संहिता, भाषा, शब्दसौष्ठव, कल्पनाविलास, काल्पनिकता आणि प्रभावक्षमता सुगम, सुबद्ध, सुनियोजित आणि सुस्पष्ट आहे.

साधे शब्द आणि सहज कल्पना एकदा कथेच्या मुशीत शिरल्या की ते शब्द आणि कल्पना साध्या राहत नाहीत .त्यांचे साहित्यमूल्य वाढते. श्रीसंत नामदेव महाराजांच्या शब्दात

**लोखंडाचा विळा परिसी लागला ।**
**मागिलिया मोला मागो नये ।।**

(लोखंडाच्या विळ्याला परिस स्पर्श झाल्यावर तो सोन्याचा होतो, तो लोखंडाच्या किंमतीने मागू नये, त्याला सोन्याचे मोल प्राप्त होते.) तसे मराठी माती , मराठमोळा मुलुख, मालवणी बोली, डोंगर, समुद्र, शेती आणि बागायतीचा कस घेऊन येणारे केळुसकरांचे शब्द, शब्द न राहता तळपणाऱ्या सुवर्णशलाका वाटतात.

''एकापेक्षा एक'' हे श्री. केळुसकर यांचे साहित्य पदार्पणाचे पहिलेच पाऊल आहे. पदार्पणातच या कथासंग्रहाला फार लक्षणीय प्रतिसाद मिळत आहे. सर्वच कथा आता लेखकाच्या आवाजात यूट्यूबवरही असंख्य रसिक आज ऐकतही आहेत.

अशीच साहित्यसेवा श्री. केळुसकर यांच्या हातून निरंतर व्हावी आणि त्यांच्या लेखणीने मराठी आणि मालवणीमधून सृजनशील वाङमयनिर्मिती व्हावी, अशा हार्दिक, कायिक, वाचिक आणि मनस्वी शुभेच्छा !!

बी .एस .नाईक,
परुळे
९४२१२३५४५६



# वाचकांच्या प्रतिक्रिया

**सौ. वासंती कुलकर्णी –**

तुमच्या बहुतेक कथा मी फेसबुक वर वाचल्या, एकाहून एक सरस कथा आहेत तुमच्या. कुणाला उजवी म्हणावे आणि कुणाला डावी म्हणावे. जणूकाही मोत्यांची माळ, टपोऱ्या मोत्यांची माळ.

**कृष्णा मेहेंदळे (पुणे )–**

''प्रिये पहा ' या कथेने मला वेडं केलं. ही कथा किती वेळा वाचली आणि युट्युब वर ऐकली तरी समाधान होत नाही. संगीतातली अशी गुरु शिष्यांची जोडी कट्यार काळजात घुसली नाटकात दिसली होती. यातील शेवटची भैरवी वाचताना रडू कोसळले. आदर्श गुरु कसा असावा हे बुवांकडे पाहिल्यावर कळतं आणि आदर्श शिष्य म्हणजे अर्जुन, या कथेवर चांगलं नाटक होऊ शकते, असं माझं मत आहे.

**निर्मला वागळे ( ठाणे )–**

तुमच्या सर्वच कथा सरस, हल्लीच्या काळात अशा कथा वाचायला मिळत नाहीत. मधुभाईंच्या कथांची आठवण झाली. तुमची 'कृष्ण सर्प' कथा वाचताना माझ्या अंगावर शहारे आले. 'चळवळ' ही अतिशय उच्च दर्जाची कथा आहे.

**दीनानाथ मालणकर –**

''शुभमंगल सावधान ' सध्याच्या जमान्यातली योग्य कथा आहे. कोकणात तरी मुलांचे लग्न न जमण्याचा मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या मुलाचे लग्न तर जमणे महाकठीण. पण तुम्ही या कथेत आशेचा किरण दाखवला आहे हे महत्त्वाचे.

# वाचकांच्या प्रतिक्रिया

**रचना गार्गी (ठाणे)–**

'रंगदेवता' कथा वाचताना डोकं गरगरून गेलं. आपण पडद्या पुढचं नाटक बघत असतो, पडद्यामागे काय काय घडत असतं हे तुमच्या कथेतून कळलं. शेवटी नाटकाची तिसरी घंटा झाली, आणि माझं मन स्थिर झालं. अप्रतिम कथा.

**वंदना कुरबेट्टी (सोलापूर) –**

म्हाई म्हणजे घाटमाथ्यावरची जत्रा. देवीची पालखी घरोघरी येते. केळूसकर तुम्ही कोकणातले असून म्हाई जत्रेतले एवढे बारकावे कसे काय मिळवले याचे कौतुक वाटते. या कथेत एका कर्तबगार स्त्रीचे दर्शन होते. अशा कर्तबगार स्त्रिया घरोघरी असतात.

**श्री. दिलीप पांढरपट्टे (गझलकार)–**

''बासरी ' ही मी गेल्या कित्येक वर्षात वाचलेली सर्वोत्तम कथा, ही कथा मालवण शहरात घडलेली आहे. मालवण शहरात जाण्याचा मला बराच योग आला. शिक्षिका आणि तिचा विद्यार्थी यांच्यावरची ही सर्वोत्तम कथा ठरावी.

**डॉ. जी. ए. बुवा (संपादक–आरती, सावंतवाडी)–**

आपले लेखन खरोखर कौतुकास्पद आहे. त्याला एक गती आहे, लय आहे आणि त्यापेक्षा ते सहज सुंदर आणि अर्थगर्भ आहे.

**वि. जो. जोशी (विजो–गझलकार, डोंबिवली व मालवण)–**

बासरी ही अति उत्तम कथा, तुमच्या कथांवर वेब सिरीज सिनेमा होऊ शकतात. अशा कथा शक्यतो सोशल मीडियावर टाकू

नका. तुम्हांला न कळवता लोक त्यावर सिनेमे वेब सिरीज बनवतील.

**शर्मिला फडणीस (ठाणे )–**

तुमची राजवैद्य ही कथा मला फार आवडली. तसेच प्रिये पहा, चल धन्नो, मृत्यूपत्र अप्रतिम.

**जोशी ए एन (बंगलोर)**

एका ग्रुप वर तुमची 'प्रिये पहा ' ही कथा वाचली आणि तुम्हाला फोन केला आणि मग तुमच्या एका पाठोपाठ एक कथा वाचायला मिळाल्या. एकसे एक वाचनीय कथा, हल्ली अश्या कथा वाचायला मिळत नाहीत,तुमची 'आंब्याची बाग' ही अती उत्कृष्ठ कथा आहें. कल्टार घालून आंब्याच्या बागांची कशी वाताहत लागू शकते, हें तुम्ही या कथेत एका कीटक नाशकाच्या सेल्समनच्या मुखातून सांगितलं आहें, ''पाणक्या, श्रीमंत, त्या दोघी ' या अती उत्कृष्ट कथा.

**डॉ. नरहर प्रभू ( डोंबिवली ) –**

तीन महिन्यापूर्वी फेसबुक वर तुमची कथा वाचली आणि तुम्हांला फोन केला, त्या नंतर एका पेक्षा एक सुंदर कथा वाचता आल्या. पाणक्या, श्रीमंत, रंगदेवता, चल धन्नो, शुभमंगल सावधान' या कथानी मन तृप्त केलं.

**सुभाष अवचट ( चित्रकार )–**

तुमची चळवळ ही कथा वाचली. नवीन पिढीला चळवळ म्हणजे काय, चळवळीतील माणसे कशी होती ही या कथेवरून कळेल.

# वाचकांच्या प्रतिक्रिया

**दिलीप मैत्राणी ( कोल्हापूर )–**

‘‘ लग्नाला जायचं हं ’ ही कथा वाचताना मी सांगलीत फिरत आहें अस वाटतं होत. अप्रतिम कथा आहे.

**राजेंद्र घरत ( संपादक,नवे शहर, नवी मुंबई )–**

तुमच्या अनेक कथा आमच्या दैनिकात तुमच्या परवानगीने आम्ही छापतो आणि आमच्या वाचकांना त्या खूप आवडतात. म्हाई, शुभमंगल सावधान, चल धन्नो, शिक्षण सेवक, पाणक्या, त्या दोघी या कथा वाचकांना खूप आवडल्या.

**सुधाकर वळंजू (माजी मुख्याधपाक, पणदूर हायस्कूल) –**

’किरात’ दिवाळी अंकातील तुम्ही लिहिलेली ‘‘शिक्षक सेवक ’ ही कथा वाचनात आली. खरं तर माझ्या सारख्या शाळा, कॉलेज मध्ये नोकरीं केलेल्या किंवा आजी किंवा माजी शिक्षक, प्राध्यपाकांना जो विषय समजला नाही तो तुम्हांला समजला, याचे कौतुक वाटते.शिक्षक सेवक ही तरुण शिक्षण पेशात येऊ पहाणाऱ्यांची क्रूर चेष्टा आहे. एका पाटणकर नावाच्या शिक्षक सेवकांच्या मार्फत ही चेष्ठा तुम्ही लिहिली आहें. तुमची ओळख झाल्यावर तुमच्या अनेक कथा वाचनात आल्या, मनाला स्पर्शून गेल्या.

**प्रा. श्रीकांत सावंत**
**(प्राध्यापक – संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ)–**

केळूसकर, तुमच्या सर्व कथा मी वाचतो, सुंदर लिहिता, तुमच्या सारखी दीर्घ कथा लिहिणारे हातांच्या मोजण्या एवढे आहेत.

# वाचकांच्या प्रतिक्रिया

कविता खूप जणं लिहितात, उत्तम कथा लिहिणारे मोजकेच.

**प्रा. विनोद गायकवाड (बेळगांव)–**

तुमच्या 'एका पेक्षा एक' या पुस्तकातील बहुतेक कथा उच्च दर्जाच्या आहेत. त्यानंतरच्या सर्व कथा मी नियमित वाचत आहे. आमच्या ग्रुपमध्ये पण या कथांची चर्चा असते. तुमचे लवकरच नवीन पुस्तक यावे, हीच अपेक्षा.

**सौ. रेवती प्रभू (कुडाळ)–**

केळुसकरांच्या कथांची मी वाट पाहत असते, वाचल्याशिवाय चैन पडत नाही, वाचायला एकदा सुरुवात केली की कथा संपल्याशिवाय मन स्थिर होत नाही. पाणक्या, कृषसर्प, श्रीमंत, लंच टाइम् या कथा विशेष लक्षात राहिल्या.

**ॲड. सुषमा प्रभू खानोलकर ( वेगुर्ले ) –**

त्या दोघी आणि शुभमंगल सावधान, लग्नाला यायचं हं, मृत्यूपत्र या केळुस्करांच्या कथा विशेष लक्षात राहिल्या.

**अनंत जामखेडकर (मुंबई ) –**

केळूसकरांची आणि माझी ओळख तीन साडेतीन वर्षांपूर्वीची. आमची ओळख झाली आणि त्यानंतर सहा महिन्यात ते लिहू लागले. त्यांच्या एकापेक्षा एक कथा वाचायला मिळाल्या. केळूसकर कोकणात रहातात पण 'पाणक्या' कथेत त्यांनी इंदोर मधील उत्तम कथा सांगितली आहें.''प्रिये पहा' मध्ये गुरु शिष्याचे नाते सांगताना संगीत नाटकात फिरवून आणले आहे. 'चळवळ' या कथेत कोलकत्ता मधील चळवळ दाखवताना एक अधुरी प्रेम कहाणी सांगतात. त्यांच्या सर्वच कथा

# वाचकांच्या प्रतिक्रिया

आम्ही कुटुंबिय वाचतो आणि ऐकतो.

**सुवर्णा नामजोशी (अंधेरी)–**

केळूसकर कथेत अडकवून ठेवतात. एकदा कथा वाचायला सुरुवात केली की संपविल्याशिवाय चैन पडत नाही. आम्ही दोघेही त्यांच्या कथा आनंदाने वाचतो. आमच्या मित्रमंडळीतही केळूसकर यांच्या कथा प्रिय आहेत.

**दीपक भोगटे ( कट्टा )–**

केळूसकर यांच्या बऱ्याच कथा मी वाचल्या, काही ऐकल्या, त्यांची कथा कथन करण्याची पद्धत खूपच आवडली, मला तर पु. ल. याची आठवण झाली.

**श्यामा सुट्टरकर ( प्रतिलिपी ग्रुप ) –**

प्रदीपजी, इतके वेगळे आणि सुंदर विषय तुम्हाला कसे सुचतात? तुमच्या कथा वाचून मला कथा लिहिण्याची ऊर्जा मिळते.

**प्रदीप ठाकूर (डोंबिवली)–**

आमच्या घरात माझे नव्वद वर्षाचे वडील आणि मी आवडीने तुमच्या कथा वाचतो आणि तुमच्या यू ट्यूब वरील कथा घरातील सर्वजण ऐकतो. मी खात्रीने सांगतो मराठीत स्वतःच्या कथा स्वतः कथन करणारे पु. ल. आणि व.पु. नंतर तुम्हीच आहात, तुमच्या कथा कथन ऐकताना पु.लं. ची आठवण होत असते.

# वाचकांच्या प्रतिक्रिया

**निलेश काळप( कुडाळ नगरपंचायत मधील कामगार )–**

रात्री आम्ही सर्व घरातले तुमच्या कथा आवडीने ऐकतो.

**अर्चना प्रभू खानोलकर (विरार)–**

कोकणातील लोकांच्या दृष्टीने तुमच्या आंब्याची बाग, मृत्यूपत्र तसेच शुभ मंगल सावधान या महत्वाच्या कथा आहेत. तुमच्या बहुतेक कथा या फक्त कथा नसून त्यातून काहीतरी संदेश असतो, असे लिहिणारे विरळाच.

**अरविंद साने (रायगड) –**

मी रायगड जिल्हात रहातो, आमच्या साहित्यिक ग्रुप वर अनेकांच्या कथा येतात. अगदी दीपक तांबोळी यांच्या कथा पण असतांत, पण दर आठवड्याला येणारी प्रदीपरावांची कथा वेगळा आनंद देवून जाते. काल प्रदीपरावांची ‘प्रिये पहा’ वाचत होतो, त्यात रंगून गेलो होतो, पत्नी भाजी आणण्यासाठी ओरडत होती, मी दाद देत नाही, म्हणून चिडून म्हणाली,‘काय एवढे वाचत आहात, मी मघा पासून हाका मारते आहें ’. मी म्हणालो ‘केळुस्करांची ‘प्रिये पहा’ ही कथा वाचतो आहें, संपल्या शिवाय उठणार नाही’. केळुस्करांचे नाव ऐकता क्षणी तिचा राग शांत झाला,‘केळुस्करांची कथा वाचताय काय, वाचा वाचा, मला सुद्धा त्यांची कथा पूर्ण वाचल्या शिवाय चैन पडत नाही ’.

**जालंदर उकिर्डे (बॉर्डरलेस पॅन्थर्स ग्रुप –जुन्नर, जिल्हा पुणे )–**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील सर्व पत्रकार आणि साहित्यिकांचा हा ग्रुप आहे. आमच्या या ग्रुप्स मध्ये बहुतेकजण

# वाचकांच्या प्रतिक्रिया

लिहिणारी मंडळी आहेत आणि सर्वजण सुशिक्षित आणि वाचन प्रेमी आहेत. सात आठ महिन्यापूर्वी फेसबुक वर प्रदीप केळुस्कर यांची 'शिक्षक सेवक' ही कथा वाचली आणि आमच्या ग्रुप मध्ये या लेखकाला घेण्याचे ठरले. त्या वेळे पासून आम्ही ग्रुप मधील बाराशेच्या वर असलेले मेंबर्स केळुस्करांचे फॅन्स झालो आहोत. आमच्या ग्रुप्स मधील अनेकांनी त्यांचे पहिले पुस्तक 'एकापेक्षा एक' विकत घेतले.त्यांचे दुसरे पुस्तक '' माणिकमोती ' याचे प्रकाशन होते आहें, आमचा ग्रुप याही पुस्तकाला पाठिंबा देईल, केळुस्करांच्या सर्वच कथा इतरांपेक्षा वेगळ्या आहेत.

**रवींद्र प्रभुदेसाई ( सावंतवाडी )–**

तुमची एक कथा फेसबुक वर वाचली आणि मग सर्वच कथा वाचल्या, केवळ अप्रतिम. त्या दोघी, लग्नाला यायचं हं, मृत्युपत्र, श्रीमंत, चळवळ अती उत्कृष्ठ कथा.

**विजय वालावलकर ( कुडाळ )–**

केळुस्करांच्या कथा मी नियमित वाचतो, त्या इतरांपेक्षा वेगळ्या असतांत, वाचनीय असतात. एकदा वाचायला सुरवात केली की कथा संपविल्या शिवाय चैन पडत नाही, एवढ्या कथा त्यांना कशा सुचतात याचे आश्चर्य वाटते.

# केळुसकरांच्या कथा कोकणी मातीतील!

## अरुण दाभोलकर यांचे गौरवोद्गार : वेंगुर्ले येथे प्रदीप केळुसकर यांच्या कथासंग्रहाचे प्रकाशन

वार्ताहर
कुडाळ

प्रदीप केळुसकर या नाटकात रमणाऱ्या व्यक्तीने एवढ्या दर्जेदार कथा लिहायला एवढा उशीर का लावला, याचे आश्चर्य वाटते, असे गौरवोद्गार ख्यातनाम चित्रकार अरुण दाभोलकर यांनी वेंगुर्ले येथे काढले.

वेंगुर्ले खर्डेकर कॉलेज येथील आनंदयात्री ग्रुपतर्फे आयोजित केळुसकर यांच्या 'एकापेक्षा एक' या कथासंग्रहाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. केळुसकर यांच्या कथा पडद्यामागील नाटक, डॉक्टर आणि मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह यांच्यातील संबंध, लहानपणापासून आयुष्याच्या अखेरपर्यंतची मैत्री, व्यक्त न झाल्याने अपुरे राहिलेले प्रेम, छत्रपती संभाजी महाराजांची रंगभूमीवर भूमिका करणारा नट अशा अनेकांची आयुष्ये आपल्यासमोर ठेवतात. एवढ्या दर्जेदार कथा पण त्यांची छपाई, मुखपृष्ठ दर्जेदार हवे होते आणि हे लिखाण एखाद्या चांगल्या प्रकाशकाकडे गेले असते, तर पुस्तकाचे सोने झाले असते.



वेंगुर्ले : प्रदीप केळुसकर यांच्या 'एकापेक्षा एक' कथासंग्रहाचे प्रकाशन करताना चित्रकार अरुण दाभोलकर. सोबत वृंदा कांबळी, प्रा. पांडुरंग कौलापुरे, आनंद बांदेकर आदी मान्यवर.

परंतु आपल्या छोट्या गावात आपण या बाबतीत कमी पडतो. लोकांपर्यंत ही पुस्तके पोहोचत नाहीत, अशी खंत दाभोलकर यांनी व्यक्त केली. या पुढील केळुसकरांच्या पुस्तकासाठी मी त्यांना चांगले प्रकाशक मिळवून देईन, असे आश्वासनही त्यांनी दिले.

आनंदयात्री ग्रुप, वेंगुर्ले आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पांडुरंग कौलापुरे होते. यावेळी आनंदयात्री ग्रुपच्या अध्यक्ष वृंदा कांबळी, उपाध्यक्ष आनंद बांदेकर आदी उपस्थित होते.

लेखक प्रदीप केळुसकर म्हणाले, आपण कोल्हापुरात असताना नोकरी सोबत नाटकाची आवड जोपासली. मग कुडाळमध्ये व्यवसाय सुरू केला. तसेच पाट पंचक्रोशीमधील नाट्य कलावंतांना एकत्र जमवून नाट्य ग्रुप तयार केला. गावागावांत नाटक पोहोचविले. काही वर्षांनंतर नाटक थांबले. या काळात कसलीही सांस्कृतिक चळवळ नव्हती म्हणून अस्वस्थ होतो. कोरोना काळात कथा लेखनाला सुरुवात केली. त्यावेळी कथा सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्याने त्या लोकांपर्यंत पोहोचल्या. माझ्या कथा वाचून पसंती देणाऱ्यांमध्ये डॉ. गिरीश ओक, डॉ. तारा भवाळकर, डॉ. प्रकाश बावधनकर, शेखर सामंत, डॉ. उमाकांत सामंत, गिरीश वैद्य, चारुलता पाटील, प्रकाश कामत आदी मान्यवर आहेत. आता ही मंडळी नित्याची वाचक बनली आहेत. या कथांचे पुस्तक व्हावे, अशी अनेकांनी इच्छा व्यक्त केली. यानंतर हा चौदा कथांचा संग्रह 'एकापेक्षा एक' या नावाने प्रकाशित झाला आहे.

वृंदा कांबळी यांनी कथा लिहिणे सोपे नाही. त्यासाठी दर्जेदार निरीक्षणशक्ती हवी. बीज सापडल्यानंतर कथा फुलविण्याची क्षमता हवी. तसेच आता कवी आहेत. परंतु कथाकार फारच कमी आहेत. नवीन पिढीने कथा लेखन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. प्राजक्ता आपटे यांनी केळुसकर यांच्या कथासंग्रहातील सर्व कथांची ओळख करून दिली. प्रदीप केळुसकर यांच्या मातोश्री, पाटच्या माजी सरपंच माई केळुसकर यांचा आनंदयात्री, वेंगुर्ले यांनी सत्कार केला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिव सचिन परुळकर यांनी केले.



कुडाळ तालुक्यातील पाट येथील प्रसिद्ध नाटककार प्रदीप केळुस्कर यांच्या कथासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी त्यांच्या मातोश्री पाटच्या माजी सरपंच माई केळुसकर यांचा सत्कार करताना आनंद यात्री ग्रुपच्या अध्यक्षा वृंदा कांबळी;व उपस्थित मान्यवर

# सुप्रसिद्ध नाटककार प्रदीप केळुसकर यांच्या 'एकापेक्षा एक' कथासंग्रहाचे प्रकाशन

कुडाळ, १५डीसे(वार्ताहर) येथील सुप्रसिद्ध नाटककार लेखक प्रदीप केळुसकर यांच्या एकापेक्षा एक या कथासंग्रहाचे प्रकाशन उत्साहात संपन्न झाले. आनंद यात्री ग्रुप वेंगुर्ले यांच्यातर्फ " बॅ. खर्डेकर कॉलेजमध्ये हा कार्यक्रम आयोजित केला.

या कार्यक्रमाला प्रा पांडुरंग कौलापुरे, चित्रकार अरुण दाभोलकर, वृंदा कांबळी, आनंद बांदेकर आदी उपस्थित होते .सूत्रसंचालन प्रास्ताविक सचिन परुळकर यांनी केले. प्रदीप किलस्कर या नाटकात रमणाऱ्या व्यक्तीने एवढ्या दर्जेदार कथा लिहायला एवढा उशीर का लावला याचे आश्चर्य वाटते असे उद्गार चित्रकार अरुण दाभोलकर यांनी यावेळी काढले. केळुस्कर यांच्या कथा नाटकातील पडद्यामागील नाटक डॉक्टर आणि मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह यांच्यातील संबंध लहानपणापासून आयुष्याच्या अखेर पर्यंतची मैत्री व्यक्त न झाल्याने अपुरे राहिलेले प्रेम संभाजीच्या रंगभूमीवर भूमिका करणाऱ्या नट या अशा अनेकांची आयुष्ये आपल्यासमोर ठेवतात पुढील पुस्तकासाठी मी त्यांना चांगला प्रकाशक मिळवून देईल असे .आश्वासन त्यांनी दिले.

लेखक प्रदीप के ळसकर यांनी कोल्हापुरात नोकरी सोबत नाटकाची आवड जोपासली आणि नंतर कुळात व्यवसाय सुरू केल्यावर पाटकम चौकशी मधील नाट्य कलावंतांना एक जमवून नाट्य ग्रुप तयार केला आणि गावागावात नाटक पोचवले त्यानंत नाटक थांबले पण सांस्कृतिक चळवळ नसल्याने अस्वस्थ ▶पान २ वर



लेखक : श्री. प्रदिप केळुसकर

''तुमच्या सर्वच कथा विलक्षण आवडल्या,
चमकदार शुभ्र मोत्यासारख्या,
जणू सारेच माणिक मोती.''